# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०४/२०२०** **दिनांक २४.०२.२०२०**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सायं. ०४.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दिनांक २४/०२/२०२० रोजी सायं.०४.०० वाजता शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/४६०६/२०२०,दि.२०.०२.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार सदरहु सभा सोमवार दिनांक २४/०२/२०२० रोजी सायं.०४.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.न्या.श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर.
२. मा.श्री.अरुण डोंगरे (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
३. मा.श्री.दिलीप स्वामी, अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४. मा.श्रीमती गीता प्रविण बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.
त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **मे.लेजर व्हिजन लि.हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन कार्यवाही करणेकामी ॲडव्होकेटची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मौजे निमागांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले होते. या प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत लेजर शो तयार करणेसाठी लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना US$५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेशी झालेल्या करारानुसार त्यांनी केलेल्या कामापोटी Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ करीता US$२१,४५,००० अदा करणेत आलेले आहे. लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये करारनाम्यातील Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले सादर केलेली होती.

संस्थानचे मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे.लेजर व्हिजन लि.,हॉंगकॉंग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार संस्थानचे वकील श्री.संजय चौकीदार यांनी CAST/८७०८/२०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केले होते.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी त्यांची Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले प्रलंबीत असल्यामुळे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थानकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. त्यास संस्थानचे वतीने दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने उत्तर पाठविणेत आले आहे. याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीचे अहवालावर दि.०७/०४/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

"The learned AGP has placed on record a copy of the report submitted by the Committee. The same is taken on record.

2. We would like toknow the stand of the Committee in the matter. Stand over to 21.04.2017."

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे म्हणणे न्यायालयात सादर करणेकामी दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.२७९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

".. मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग संदर्भात मा.उच्च न्यायालयात समितीचे मत सादर करावयाचे आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर विषय चर्चेला ठेवणेत आलेला असून सदर प्रकल्प मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांचेमार्फत पूर्ण करायचा की, सदर प्रकल्पाबाबत करारनामा रद्द करायचा याचा निर्णय समितीने घ्यायचा आहे. यापूर्वी मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांना २१,४५,००० मात्र डॉलर्सचे बिल अदा करणेत आलेले असून त्यांनी पुढील कामाचे १५,४०,००० मात्र डॉलर्स बिलाची मागणी केलेली आहे. सदर बिले या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.कापरे यांनी प्रमाणित केलेली आहेत. तसेच मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांना पुढील काम थांबविणेत यावे, असे पत्र दि.०७.०३.२०१३ रोजी संस्थानचे वतीने देणेत आले होते. त्यामुळे मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांनी त्यानंतरचे काम थांबविले आहे. परंतू तत्पुर्वी त्यांनी केलेल्या कामाची व करारनाम्यातील Payment Schedule नुसार देय असलेल्या रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रकल्प व करारनामा रद्द झाल्यास त्यांना देय असलेल्या १५,४०,००० मात्र डॉलर्स रकमेबाबत संस्थानवर जबाबदारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत समितीने निर्णय द्यावा, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी समिती सदस्यांना दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईगार्डन प्रकल्प लवकर कार्यान्वीत होणेकामी, तत्कालीन व्यवस्थापन समितीने लेझर शो उभारणी व त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करणे ही दोन्ही कामे एकाच कंपनीला द्यायला हवी होती. तसेच लेझर शो उभारणीकामी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग या कंपनीचा करारनामा व त्यामधील बीले अदायगीसाठीची कलमे सदोष असल्याचे दिसून येते. याकरीता सदर करारनामा रद्द करुन अर्बिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करणेची कार्यवाही करणेत यावी. याचबरोबर गेल्या १० वर्षामध्ये तंत्रज्ञानामध्ये खुपच बदल झालेला असून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणेत येऊन, त्यांना अदा करण्यात आलेली बीलाची रक्कम वसूल करणेबाबत कायदेशीर कारवाई करणेत यावी व साईगार्डन प्रकल्पामधील लेझर शो उभारणीकामी विहीत पध्दतीने नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

तसेच या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तींमार्फत चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्तींची नेमणूक होणे व मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणे यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकरीता त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी."असे ठरले.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेकडे दि.१४/०७/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.१९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. सदर नोटीसबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी असा निर्णय झालेला आहे. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१४/१२/२०१८ रोजीचे पत्रानुसार लेजन व्हिजन यांचेबरोबर झालेल्या करारनाम्यातील क्लॉज ३१ नुसार आर्बिट्रेशन करणेपुर्वी प्रथम Mediation साठी जाणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता.

सदर सभेत निर्णय क्रं.४१ अन्वये, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसरुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे प्रथम मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना मिडीएशनची नोटीस द्यावी, असे ठरले त्यासाठी राजस्थान उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांना मिडीएटर म्हणून प्रस्तावित करावे, असे समिती सदस्य मा.ॲड. मोहन जयकर यांनी सूचविले, त्यास समितीने मान्यता दिली. तसेच मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी मिडीएशनसाठी तयारी न दर्शविल्यास करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी, असे ठरले आहे.

संस्थानचे वतीने ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत लेजन व्हिजन यांना दि.११/०२/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएशन करीता नोटीस दिलेली आहे. यामध्ये मिडीएटर म्हणून श्री नितिन जी ठक्कर, सिनिअर काऊंसिल, मुंबई यांची नेमणूक करणेबाबत कळविले होते. उपरोक्त प्रमाणे झालेली कार्यवाही

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेपुढे माहिती व मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. सदरहू सभेतील निर्णय क्र.१८९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसरुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना संस्थानचे वतीने ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत मिडीएशन करीता नोटीस देण्यात आलेली असुन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच यासाठी निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांचे ऐवजी निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.ए.पी. कानडे यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली."

संस्थानचे वतीने ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत लेजन व्हिजन यांना दि.१७/१०/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएशन साठी त्यांनी घातलेल्या अटी अमान्य केल्या असल्याचे कळविले आहे. तसेच ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांनी दि.१८/१०/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएटर श्री. नितीन ठक्कर यांना Mediation Failure Report देणेबाबत कळविले आहे.

मा. विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी त्यांचे दि.२३/१०/२०१९ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे.

"Pursuant to the appointment of Mr. Nitin Thakker, Senior Advocate as the learned Mediator, Mr. Thakker had endeavoured to hold mediation meetings. However, M/s. Laservision Ltd., Hongkong came up with absurd suggestions and consequently the Mediator vide his Email dated 22nd October, 2019 has reported failure of the mediation proceedings. A copy of the Email sent by Mr. Thakker to M/s. Junnarkar & Associates is enclosed. Consequently stepswill now have to be taken for initiating arbitration proceedings.

I will now prepare a notice to be addressed to M/s. Laservision Ltd., Hongkong which will be sent through the Solicitors appointed for the Trust M/s. Junnarkar & Associates and will keep you informed of further proceedings."

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०९/२०१९ रोजीचे सभेत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी मिडीएशनसाठी तयारी न दर्शविल्यास करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी, असे ठरले आहे. विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी मे.जून्नरकर ॲण्ड असो., मुंबईयांचे मार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना अर्बिट्रेशन करणेकामी नोटीस देणेत येत असल्याचे दि.२३/१०/२०१९ रोजीचे पत्राने कळविले आहे.

तथापी आर्बिट्रेशची कार्यवाही लवकर सुरु व्हावी या करीतासंस्थानचे वतीने मा. उच्च न्यायालयात काम पहाणारे ॲड. नितीन भवर यांचेमार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही सुरु करणेसाठी दि.०९/११/२०१९ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ॲड. नितीन भवर यांना संस्थानचे वतीने जा. क्र.३१५३/२०१९, दि.१४/११/२०१९ रोजीचे पत्राने मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशन प्रक्रियेची पुढील कार्यवाही करणेस कळविणेत आले आहे.

तसेच सदरहू प्रकरणी आता पुढील कार्यवाही ॲड. नितीन भवर, औरंगाबाद यांचेमार्फत करणेत येणार असल्याने मे. जुन्नरकर ॲण्ड असो., मुंबई यांचेमार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना अर्बिट्रेशन करणेकामी नोटीस पाठविणेत येऊ नये अशा सुचना ॲड. श्री मोहन जयकर यांना संस्थानचे जा. क्रं. ३६०५/२०१९, दि.१६/१२/२०१९ रोजीचे पत्राने देणेत आलेल्या आहेत. यावर ॲड मोहन जयकर यांनी दि.१८/१२/२०१९ रोजीचे ईमेल व्दारे खालीलप्रमाणे कळविले आहे.

"I have received your letter dated the 16th instant in connection with the arbitration to be initiated against M/s. Laseervision Ltd. HongKong. You have informed me that you have taken a decision to appoint Mr. Nitin Bhavar, Advocate to act on behalf of the Sansthan in the said arbitration.

I hope you are aware of the following:

a) The arbitration is an international arbitration.

b) That the venue of the arbitration is Mumbai.

c) The arbitration involves a claim of several crores of rupees.

d) That Mr. Kanade has already been appointed as the Arbitrator by M/s. Junnarkar & Associates pursuant to authority given by the Board.

Could you please inform me whether the instructions given by you are in abrogation of or in supersession of the decision taken by the Board.

I do not have any personal animosity against Mr. Nitin Bhavar but I am sure a dispute of this magnitude affecting the Sansthan should be dealt with deftly especially when Board after due deliberation had taken the decision to appoint M/s. Junnarkar & Associates.

You have informed me that the initiation of the arbitration proceedings has taken time, I hope you have perused the Arbitration Clause which specifically requires the process of mediation to be first gone through and it is only upon the failure in the mediation that arbitration proceedings can be commenced. The mediation proceedings which were pending before Mr. Nitin Thakkar, Senior Advocate of Mumbai High Court in Mumbai has given his Failure Report and it is pursuant thereto that the arbitration proceedings have to commence. I will therefore await your instructions. If, however, you are keen on appointing Mr. Nitin Bhavar, I have no objection and I leave it to your learned opinion.

प्रस्ताव- तरी मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही संस्थानचे पॅनल वरील ॲड. नितीन भवर यांचेमार्फत करणेत यावी अथवा ॲड. श्री मोहन जयकर यांनी उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे मे. जुन्नरकर ॲण्ड असो., मुंबई यांचेमार्फत करणेत येत असलेली कार्यवाही सुरू ठेवावी याबाबत निर्णय होणेसाठी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०१** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०२** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादनासाठी संस्थान निधीतून रु.१६३.५५ कोटी खर्चास व या रस्त्यांचे जमीन खरेदीसाठी दि.२५.०६.२०१८ रोजीचे शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेस मान्यतेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्विस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्त (व्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्त (व्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्यातही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय : ०१. निर्णय क्र. ६७६ दि.२०/०८/२०१७.
०२. निर्णय क्र. ६९७ दि.२०/११/२०१८.

मा .छाननी समिती निर्णय :

०१. निर्णय क्र.१३ दि.३०/१०/२०१७. ०२. निर्णय क्र.२५ दि.१९/०१/२०१८.
०३. निर्णय क्र.२९ दि.०९/०४/२०१८. ०४. निर्णय क्र.५१ दि.१४/१२/२०१८.

प्रस्तावना:- तत्कालीन मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.३०/०६/२०१६ रोजीचे पत्राने शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ०६ रस्ते भूसंपादनखर्च रु.१६३,५५,२६,२१०/- व विकसन खर्च रु.४३,७२,२७,५४३/- तसेच अस्तित्वातील ०८ रस्ते विकसनखर्च रु.२२,६९,९१,५१०/- असा एकूण १४ रस्त्यांचा रु.२२९,९७,४५,२६३/- खर्चाचा सुधारीत प्रस्ताव सादर केला होता.त्यात शिर्डी नगरपंचायत हद्दीतील खालील ०६ रस्ते भूसंपादन व विकसनाचा समावेश होता.

| अ.क्र. | रस्त्याचे नांव | लांबी | (मी.) रुंदी | (मी.) अस्तित्वातील | रुंदी (मी.) भूसंपादन करावयाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | विकास योजनेतील २४ मीटर रुंदवळण रस्ता साई श्रध्दा) हाउसिंग सोसायटी कॉर्नर ते सन एड सॅन हॉटेल रस्ता( | २६५० | २४ | - | २४.०० |
| ०२ | विकास योजनेतील १२ मिटर रुंदीचा हॉटेल गोराडीया समोरील रस्ता ( ते निमगांव शिव रस्तापिंपळवाडी रस्ता) | ५५० | १२ | ५५०. | ६५०. |
| ०३ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा बिरेगांव रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ता- वराह चौक ते कालिकानगर-१५ मीटर व पुढे बिरोबा मंदिरापर्यंत वहिवाटीप्रमाणे) | ५०० | १५ | १० | ५.०० |
| ०४ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) | ३२० | १५ | - | १५.०० |
| ०५ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा जुना पिंपळवाडी रस्ता (पुष्पांजली हॉटेल चौक ते पिंपळवाडी शिव हद्दीपर्यंत) | १००० | १५ | १० | ५.०० |
| ०६ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते १८ मीटर रस्ता यांना जोडणारा निता हॉटेल पश्चिमबाजू दक्षिणोत्तर रस्ता) | ३०० | १५ | -- | १५.०० |

उपरोक्त ६ रस्तेभूसंपादन करून विकसन करणेबाबत तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.६७६ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

"...त्याचप्रमाणे प्रस्तावातील 'क' तक्त्यामध्येनमूद केलेले ०६ रस्ते भुसंपादन करून विकसीत करणेकामी बराचसा कालावधी लागणार असल्यामुळे, प्रथमत: सदरहु रस्ते भुसंपादन करणेकामी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करून देण्यात यावा व भुसंपादन प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ते रस्ते विकसीत करणेसाठीच्या निधीचा प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा. यासाठी अधिनियमातील तरतूदीनुसार छाननी समितीच्या पुर्वपरवानगीने, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा..."

मा. व्यवस्थापन समितीचे सदरहु निर्णयाबाबत मा.छाननी समितीचे दि.३०/१०/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.१३ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

".. .. उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होवून असे ठरले की, छाननी समिती अध्यक्ष व इतर सदस्य यांनी या ठरावाबाबतची कागदपत्रे / सादरीकरण मागवून घ्यावे. तसेच भूसंपादनासाठीचा प्रत्यक्ष खर्च किती येणार व सदर रस्ते भाविकांना उपयोगाचे आहेत किंवा कसे? याबाबत पुढील छाननी समितीच्या बैठकीत प्रत्यक्ष पाहणी करून निर्णय घेण्यात येईल."

त्यानंतर मा. छाननी समितीचे दि.१९/०१/२०१८ रोजीचे सभेतील नि.क्र.२५ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

".. उपरोक्त प्रस्तावाबाबत संस्थान अभियंत्यांशी नकाशासह प्रत्यक्ष चर्चा झाली, दिनांक २० तारखेस छाननी समिती अध्यक्ष, व्यवस्थापन समिती अध्यक्ष व मा.श्री.धनंजय निकम,उपजिल्हाधिकारी,मा.श्री.मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी, तसेच इतर अधिकारी प्रत्यक्ष निरिक्षणासाठी सकाळी ९ ते १० व दुपारी ०४ ते ०६ या वेळेत जाण्याचे ठरले आहे व प्रत्यक्ष पहाणी केल्यानंतर रस्त्यांची प्रत्यक्ष उपयुक्तता लक्षात घेवून व नगरपंचायतीच्या ठरावाची पहाणी करून पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे ठरले."

दि.२०/०१/२०१८ रोजी मा.छाननी समिती अध्यक्ष यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, संस्थानचे कार्यकारी अभियंता तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व अभियंते यांचेसमवेत वरील रस्त्यांची पहाणी केली. दरम्यान मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी दि.२१/०२/२०१८ रोजीचे पत्रान्वये ०६ रस्ते भूसंपादन करणेकामी येणारा संभाव्य मोबदला खर्च रु.१६३,५५,२६,२१०/- ऐवजी रु.१८७.०३ कोटी येणार असुन सदर रक्कम मा. उपविभागिय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडे जमा करणेस विनंती केली. त्यानुसार सुधारीत भूसंपादन खर्च रु.२३,४७,७३,७९०/-इतक्या वाढीव खर्चास मान्यता घेणेकामी दि.०६/०३/२०१८ रोजी सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "अंदाजित कींमतचा प्रस्ताव already छाननी समितीपर्यंत गेलेला आहे. आता शासनाची तत्वत: मंजुरीनंतर

वाढीवचा प्रस्ताव करू." असे निर्देश दिले. करीता वाढीव खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला नाही. त्यांनतर दि.२०/०१/२०१८ रोजीचे पाहणीनंतर मा. छाननी समितीचे दि.०९/०४/२०१८ रोजीचे सभेतील नि.क्र.२९ अन्वये ६ रस्त्यांबाबत खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

".. .. संस्थान निधीतून ६ रस्त्यांचे भुसंपादन या विषयाची सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती कायद्यातील तरतुदीप्रमाणे असे निदर्शनास आले की, अस्तित्वातील रस्त्यांच्या रुंदीकरणाचा वाढीव भुसंपादनाचा प्रस्ताव भुसंपादन अधिका-यांमार्फत कार्यान्वित होतो. भुसंपादन अधिकारी भुसंपादनाची प्रक्रिया सुरु करण्यापुर्वी भुमि अभिलेख विभागाकडून संयुक्त मोजणी करून घेतात. संयुक्त मोजणीनुसार भू-संपादन संस्थेच्या ताब्यात असलेले क्षेत्र वगळून वाढीव क्षेत्राच्या भू-संपादनाची कार्यवाही भुसंपादन अधिका-यांकडून केली जाते.

दि.२०/०१/२०१८ रोजी स्थळनिरिक्षणासांठी मा.न्या.के.यू.चांदीवाल-छाननी समिती अध्यक्ष, मा.श्रीमती रूबल अग्रवाल (भा.प्र.से.),मुख्य कार्यकारी अधिकारी,मा.श्री.मनोज घोडेपाटील-उपजिल्हाअधिकारी, मा. डॉ. संदिप आहेर-उपकार्यकारी अधिकारी, मा. श्री. आर. एस. घुले- कार्यकारी अभियंता, मा.श्री.आर.बी. आहेर-उप कार्यकारी अभियंता, मा.श्री.सी.पी.खैरनार-उप अभियंता, मा.श्री.आर.डब्ल्यु.भामरे- उपअभियंता, मा.श्री.डी.एम.देसाई-उप अभियंता, मा.श्री.जी.एस.जाधव-कनिष्ठ अभियंता तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मा.श्री.सतीष दिघे-मुख्याधिकारी, मा.श्री.भुजबळ-कनिष्ठ अभियंता,मा.श्री.गुजर-कनिष्ठ अभियंता हे अधिकारी होते. या अधिका-यांनी रस्त्याच्या उपयुक्ततेबाबत प्रत्यक्ष पाहणी केली व रस्त्याच्या उपयुक्ततेबाबत सांगोपांग चर्चा झाली.आजूबाजुला राहणा-या रहिवाशांशीही चर्चा झाली. छाननी समितीने असे सुचविले की, वरील ६ रस्त्यांचे भुसंपादनाबद्दल संबंधीत जमिनमालकांशी चर्चा करून जर आपसात रक्कम ठरत असेल तर संस्थानच्या अर्थिक हिताच्या दृष्टीने त्या लोकांशी आपसात तडजोड करून चर्चा करून, जमिनीची किंमत/मावेजा भूसंपादनाची प्रक्रिया न करता दिल्यास समर्पक राहील. याबाबत विशेष बाब म्हणून शासनाची मान्यता घेवूनच कार्यवाही करता येईल.

नगरपंचायतीतर्फे रु.१६३.५५ कोटि एवढी रक्कम भूसंपादनास लागेल, अशी मागणी आहे. हि रक्कम सध्या तरी अंदाजे दिसते. प्रत्यक्ष मोजमाप, रेडिरेकनर प्रमाणे किंमत, अतिक्रमणे हटविणे यांचा विचार होवून शासन मान्यतेनंतरच भूसंपादनाच्या निर्णयास मुर्त रुप देण्यात यावे.."

०६ रस्त्यांचे भूसंपादन खर्चासाठी रु.१६३.५५कोटीखर्चाबाबत मा. व्यवस्थापन समिती व छाननी समितीचे उपरोक्त निर्णयाबाबत शासनाकडून पुढील आदेश व्हावेत याकरीता विधी व न्याय विभागाकडे दि.१५/०५/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर शासनाचे विधी व न्याय विभागाने दि.०४/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये०६ रस्त्यांची जमीन थेट खरेदीपद्धतीने खरेदी करण्यासाठी दि २०१८/०६/२५. शासनरोजीच्या निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करून सुधारीत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे कळविले.

संस्थानचे पत्र जा.क्र.एसएसएसटी/मालमत्ता,/३८२४/२०१७, दि.१७/१०/२०१७ अन्वये जमीनी खरेदी करण्यासाठी मागविलेले मार्गदर्शनाचे अनुषंगाने विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय क्र.सासंवि१०१७/१८४४/प्र.क्र.२०१, का.१६, दि.२५/०६/२०१८ अन्वये संस्थान करीता खाजगी जमीन खरेदी करण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे. "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकरीता खाजगी जमीन खरेदी करण्यासाठी खाजगी जमीनींचे क्षेत्रफळ, अंतर, जमीनीची सलगता, भूधारकांची संमती, मुल्यांकन,खरेदीची कार्यपध्दती इत्यादी बाबींचा सर्वंकष विचार करुन शासन खाजगी जमीन खरेदी करण्यासाठी पुढील धोरण निश्चित करीत आहे -:

१. खरेदी करावयाच्या जमीनीचे क्षेत्रफळ-:

अ. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्यासाठी खाजगी जमीन खरेदी करावयाची झाल्यास त्याचे क्षेत्रफळ खालीलप्रमाणे असणे बंधनकारक राहील.

i. बागायती क्षेत्र असल्यास असे क्षेत्र १ एकरपेक्षा कमी असू नये.

ii. जीरायती क्षेत्र असल्यास असे क्षेत्र २ एकरपेक्षा कमी असू नये.

iii. संस्थानच्या मालकीच्या असलेल्या जमीनीलगत एखादी बागायत अथवाजिरायत १ एकरापेक्षा कमी क्षेत्र असलेली जमीन जर संस्थानच्या जमीनी लगतव सलग होत असेलतर सदरचे क्षेत्र प्रस्तुत धोरणातील कार्यपध्दती अवलंबून विकत घेता येईल.

*iv.* नगरपंचायत हद्दीत मंजूर विकास योजनेतील संस्थानच्या विविध प्रयोजनासाठी आरक्षितअसलेल्या जमीनीचे क्षेत्र कितीही असले तरी ते प्रस्तुत धोरणातील कार्यपध्दती अवलंबून विकत घेतायेईल.

२. खरेदीची वारंवारता:- श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीने अवास्तव प्रमाणात जमिन खरेदी करु नये. केवळ प्रस्तावित असलेल्या एखाद्या प्रकल्पासाठी आवश्यकता असल्यास जमीन खरेदीचा विचार करण्यात यावा. जमीन खरेदी विषयी शासनाकडे पाठवावयाच्या प्रस्तावामध्ये संबंधित प्रकल्पाचा तपशिल व व्यवस्थापन समितीचा ठराव सादर करणे आवश्यक राहील. केवळ खाजगी भुधारकाने जमीन विकत घेण्याची विनंती श्री साईबाबा संस्थानला केली आहे. या कारणास्तव जमिनीची गरज आणि उपयुक्तता विचारात न घेता अशी जमीन विकत घेण्याबाबत विचार करण्यात येऊ नये.

३. अंतर :- श्री साईबाबा संस्थानसाठी खरेदी करावयाची जमीन ही शिर्डी शहरातील असावी किंवा शिर्डी शहरापासून जास्तीत जास्त १५कि.मी. परीघातील असावी. श्री साईबाबा समाधी मंदिरापासून अतिदुर असलेल्या जमीनी खरेदी करुन संस्थानच्या निधीचा अपव्यय करु नये. मात्र पालखी थांब्यासाठी पालखी मार्गावरील विविध ठिकाणी भाविकांना निवारा व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी खरेदी करावयाच्या जमीन प्रकरणी अंतराची सदर मर्यादा शिथील करता येईल.

४. जमीनीची सलगता:- खरेदी करावयाचे क्षेत्र/जमीन ही खंड/तुकड्यांच्या स्वरुपात असू नये. जमीनीची सलगता आणि उपयुक्तता विचारात घेऊनच अशा जमीनीच्या खरेदीचा प्रस्ताव विचारात घेण्यात यावा तसेच हरीतपट्टयात समाविष्ट असलेली खाजगी जमीन खरेदी करु नये. मात्र श्री साईबाबा संस्थानच्या मालकीच्या जमिनीलगत किंवा अशा जमिनीजवळ हरित पट्टयात समाविष्ट एखादी शासकीय जमीन असेल व अशा ठिकाणी संस्थानचा एखादा प्रकल्प प्रस्तावित असेल आणि अशा प्रकल्पासाठी हरितपट्टयात समाविष्ट शासकीय जमीनीची संस्थानला आवश्यकता असल्यास,असे क्षेत्र सदर धोरणातील कार्यपध्दती अवलंबून विकत घेता येईल.

५. जाहीर नोटीस प्रसिध्द करणे:-

अ.) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकरीता जमीन खरेदी करावयाची झाल्यास, तशा आशयाची जाहीर नोटीस मोठया प्रमाणात वितरित होणाऱ्या स्थानिक दैनिकांमध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

ब.) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी खाजगी भु-धारकांची जमीन खरेदी करावी असा स्वतंत्र अर्ज खाजगी भुधारकाकडुन प्राप्त झाल्यास अशा जमीनीबाबत हरकती मागविण्यासाठी देखील जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात यावी.

६. भूधारकांची संमती घेणे:- मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी संबंधित खाजगी भुधारक त्यांची जमीन वाटाघाटीद्वारे विकण्यास तयार आहेत, असे संमतीपत्र खाजगी भुधारक यांच्याकडुन घ्यावे.

७. मोजणी करुन घेणे:- मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान यांनी खरेदी करावयाच्या खाजगी जमीनीची मोजणी भूमी अभिलेख विभागाकडून करुन घ्यावी.

८. कायदेशीर शोध घेणे :-

अ.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी संबंधित खाजगी जमिनींचे सर्व्हेल नंबर/गट क्रमांक निहाय सन १९५० पासून आजतागायत पर्यंतचे महसूल अभिलेख (गाव नमुना नं,७/१२, फेरफार नोंदी, गट बुक नकाशा) इत्यादी तपशिल तहसीलदार/संबंधित महसूल कार्यालयाकडुन प्राप्त करुन घ्यावा.

ब.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी संबंधित खाजगी जमिनींचे सर्व्हे नंबर/ गट क्रमांक निहाय गत ३० वर्षातील नोंदणीकृत दस्तांचा तपशिल (खरेदीखते, गहाणखते, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, दानपत्र इत्यादी) दुय्यम निबंधक कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावा.

क) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खरेदी करावयाच्या जमीनीचे शीर्षक शोध प्रमाणपत्र (Title Search Certificate) प्राप्त करुन घ्यावे.

९. मुल्यांकन:- खाजगी भूधारकाची जमीन ही केवळ शासनाच्या नोंदणी विभागाकडील बाजारमुल्य दरतक्त्यातील दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने खरेदी करण्यात यावी.

१०. जमीन खरेदीचे अधिकार :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यासाठी कोणत्याही स्वरुपाची जमीन ही शासन मान्यते शिवाय खरेदी करु नये. जमीन खरेदीच्या सर्व प्रस्तावांना शासनाची पुर्व मान्यता घेण्यात यावी.

११. अभिहस्तांतरण पत्र / खरेदीखत करणे:-

अ.) मुख्य कार्यकारी अधिकारीयांनी कायदेशीर शोध अहवालाच्या आधारे खाजगी जमिनी संदर्भात कोणताही न्यायालयीन विवाद नसल्याची व खरेदी प्रक्रीयेसाठी कोणतीही बाधा येत नसल्याची खात्री करावी.

ब.) शासनाच्या नोंदणी विभागाच्या बाजारमुल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे जमीनीची निश्चित केलेली रक्कम अथवा त्यापेक्षा कमी दराने निश्चित केलेली रक्कम भुधारकाला अदा करण्यापूर्वी विहीत नमुन्यात भुधारकाकडून क्षतिपूर्ती बंधपत्र घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

क.) क्षतिपूर्ती बंधपत्र घेतल्यानंतरच भूधारकाला देय असणारी रक्कम संबंधित भूधारक यांच्या बँकखात्यामध्ये जमा करण्यात यावी.

ड.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी व संबंधित भुधारक यांनी अभिहस्तांतरण पत्र/खरेदी खताची नोंदणी संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये करावी. खरेदीखतामध्ये क्षतिपूर्ती बंधपत्र, देय मोबदला अदा केल्याचा तपशिल आणि अनुषंगिक बाबी नमूद कराव्यात व त्याची कागदपत्रे दस्ताचा भाग म्हणून खरेदीखतात समाविष्ट करण्यात यावा. अशा नोंदणीकृत खरेदी खताच्या मूळ प्रती प्राप्त कराव्यात.

इ.) खरेदी करावयाच्या जमीन पुर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजाविरहीत आहे याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी करावी जेणेकरुन कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार निर्माण होवून न्यायालयीन प्रकरण उद्भवणार नाही.

१२. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्यासाठी शिर्डी शहराच्या विकास आराखड्यात आरक्षितकेलेल्या जमिनींच्या बाबतीत भुसंपादन कायद्यानुसार करावयाच्या प्रक्रीयेऐवजी खाजगी वाटाघाटीने जमीन खरेदी देण्यास जमीन मालक तयार असल्यास अशा जमीनी देखील शासनाच्या पुर्वपरवानगीने खरेदी करता येतील.

१३. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्याकरीता जमीन खरेदी करताना मालमत्ता हस्तांतरण अधिनियम-१८८२ मधील कलम ५४ व ५५ मधील तरतुदींचे पालन करण्यात यावे.

१४. अटी व शर्ती शिथिल करण्याचे अधिकार - अपवादात्मक व विशेष प्रकरणांमध्ये वरीलपैकी कोणतीही अट वा शर्ती शिथिल करण्याचे अंतिम अधिकार शासनास असतील.

१५. खाजगी जमीनी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने खरेदी करण्याच्या अनुषंगाने वरील विहीतकार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.”

करीता शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्त्यांसाठी भूसंपादनाऐवजी खाजगी जमीन खरेदी करणेसाठी उपरोक्त दि.२५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील नि.क्र.६९७ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

“ …शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते व भूसंपादन (अंदाजे खर्च रु.१६३.५५ कोटी) करणेकामी भूसंपादन कायद्यानुसार प्रक्रिया करणेत यावी, तसेच सदर जमीनीचे भूसंपादन संस्थानसाठी होणारे नसून नगरपंचायतीसाठी होणार आहे. त्यामुळे त्यासाठी दि.२५/०६/२०१८ च्या शासन निर्णयाद्वारे विहीत करण्यायत आलेले जमीन खरेदी धोरण सदर प्रस्तावास लागू होणार नाही, असे अभिप्राय छाननी समितीच्या मान्येतेने शासनास सादर करावे,असे ठरले. तसेच शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादनासाठी अंदाजे खर्च रु.१६३.५५ कोटी शिर्डी नगरपंचायतीस देण्यास मान्यता देण्यात आली व सदर प्रस्ताव छाननी समितीचे मान्यतेने शासनाकडे पाठविण्यात यावा तसेच सुधारीत विकास आराखडा मंजूर होईपर्यंत प्रस्तावातील अ.नं.४ विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) या प्रस्तावीत रस्याच्या भूसंपादनासाठीचा निधी राखुन ठेवण्यात यावा व उर्वरीत ५ रस्यांचा भुसंपादनाचा निधी शासनाचे मान्यतेनंतर शिर्डी नगरपंचायतीकडे वर्ग करावा, असे ठरले. तसेच याकामी छाननी समितीची शिफारस घेवून प्रस्ताशव शासनास सादर करण्यात यावा, असे ठरले.”

तदनंतर सदर प्रस्ताव मा.छाननी समितीचे दि.१४/१२/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला. त्यावर सविस्तर चर्चा होवून नि.क्र.५१ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

“.. ..यावर सविस्तर चर्चा झाली, संस्थानचे अधिका-यांनी त्यांचे मत मांडले व संस्थानचे व्यवस्थापनाचे अवाढव्य काम बघता भुसंपादनाचे काम स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे. त्यामुळे व्यवस्थापन

समितीने दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेत केलेल्यानिर्णयाप्रमाणे रक्कम रु.१६३.५५ कोटी शिर्डी नगरपंचायतीचे ६ रस्त्यांच्या भूसंपादनासाठी देणे योग्य होईल असे अधिका-यांनी सांगितले. सभा चालू असतांना उपरोक्त प्रस्तावातील अ.नं.४ विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) या रस्त्यासाठी ज्या ११ व्यक्तींच्या जमिनी भूसंपादन होणारआहेत त्यापैकी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.तुकाराम शंकरराव गोंदकर, | २ | श्री.अशोक खंडूजी कोते, |
| ३. | श्री.ज्ञानेश्वर शंकरराव गोंदकर, | ४. | श्री.दत्तात्रय शंकरराव गोंदकर, |
| ५. | श्री.वसंत महादू गोंदकर, | ६. | श्री.सदाशिव काशिनाथ गोंदकर, |
| ७. | श्री.दत्तात्रय तुकाराम गोंदकर, | ८. | श्री.रमेश भाऊसाहेब गोंदकर, |
| ९. | श्री.प्रभाकर तुकाराम गोंदकर, | | |

या व्यक्ती हजर होत्या. त्यांनी विकास योजनेतील उपरोक्त नमुद रस्ता संस्थानला रस्ते विकासासाठी खरेदी देणेबाबत सहमती दर्शविली. याबाबत शासनाचे सध्याचे रेडीरेकनरचे दर अथवा चर्चेअंती जी रक्कम ठरेल ती घेण्यास आम्ही जमीन मालक तयार असल्याचे त्यांनी छाननी समिती समक्ष सांगितले. तसेच विनंती केली की, व्यवस्थापन समितीने या रस्त्यांचे भूसंपादन मागे ठेवण्याचे काही कारण नव्हते. छाननी समितीच्या सदस्यांमध्ये सर्व बाबीवर साधक-बाधक चर्चा होऊन असे ठरले की,शिर्डी नगरपंचायतीतर्फे रक्कम रु.१६३.५५ कोटी एवढी रक्कम भूसंपादनासाठी लागेल अशी जी मागणी आहे त्यानुसार या कार्यासाठी तेवढी रक्कम रु.१६३.५५ कोटी रकमेसाठी शासनाकडून मंजूर घ्यावी. भूसंपादनाची कार्यवाही ही छाननी समिती, व्यवस्थापन समिती, शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांचे समितीमार्फत तडजोडीची बोलणी जमिन मालकाशी थेट खरेदी पध्दतीने शासनाचे शासन निर्णय क्र.सासंवि१०१७/१८४४/प्र.क्र.२०१ का.१६ दि.२५/०६/२०१८नुसारनिश्चित केलेल्या जमिन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन त्यानुसार सुधारीत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.या प्रस्तावामध्ये अ.नं.४वरील विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) या रस्त्याचा समावेश करण्यात यावा" असे ठरले.

दरम्यान मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.८६/२०१८ मधील दि.३०/०१/२०१९चे आदेशाने संस्थानला दैनंदिन खर्चा व्यतिरिक्त इतर निधि वर्ग करणेस मनाई केली. मा.छाननी समितीचे उपरोक्त निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेसाठी दि.०७/०२/२०१९ रोजी सादर केलेल्या टिपणीवर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "छाननी समितीचे निर्णयाप्रमाणे प्रस्ताव तयार करा. HC यांचे Stay उठवल्या नंतर" असे निर्देशित केले.

त्यानंतर शिर्डी नगरपंचायतीने दि.०८/०८/२०१९ रोजीचे पत्राने खालील ०२ रस्ते भूसंपादनासाठी निधी मिळणेबाबत विनंती केली आहे.

अ) कनकुरी रस्ता ते नांदूर्खी रस्ता यांना जोडणारा १२ मी. रुंदीचा रस्ता - (अंदाजे खर्च रु.६.९७ कोटी)

ब) शिर्डी मंजूर विकास योजनेतील शिर्डी –निमगाव शिव १५.० मी. रूंदीकरण रस्ता (नगर मनमाड रस्त्याचे पश्चिमेकडे श्री साईबाबा संस्थान साईप्रसादालयाकडे जाणारा भूसंपादन करणे.) -(अंदाजे खर्च रु.२.५५ कोटी)

दि.१६/०१/२०२०व दि.२७/०१/२०२०रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समवेत मुख्याषधिकारी, शिर्डी नगरपंचायत व इतर अधिकारी-पदाधिका-यांचे उपस्थीतीत रस्ते भूसंपादन आढावा बैठक झाली. सदर बैठकीत प्रस्तुत प्रकरणी छाननी समितीचे निर्णयाप्रमाणे दि.२५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणानुसार पुढील कार्यवाही करणेबाबत मा.तदर्थ समितीची मान्यता घेवून विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्तार सादर करणेबाबत ठरले.

प्रस्ताव:- तरी छाननी समिती सभा दि.१४/१२/२०१८ मधील निर्णय क्र.५१ अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभागपत्र दि.०४/०७/२०१८अन्वये प्रस्तावित ६ रस्त्यांची जमीन खरेदीसाठी जमीन मालकांशी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने जमीनी खरेदी करण्यासाठी शासनाचे सदर विभागाच्या दि.२५/०६/२०१८रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन खरेदी धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करून त्यानुसार सुधारीत प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी सादर करणे विषयी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०२ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०३** **साईगार्डन प्रकल्पाचे सिव्हील कामाचे ठेकेदार यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे सोयीसाठी मौजे निमगांव को-हाळे शिवारात संस्थान मालकीच्या गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधील एकूण २० एकर जमिनींमध्ये साई गार्डन प्रकल्पामधील सिव्हील कामांपैकी पहील्या टप्प्यातील लेजर शो करीता आवश्यक असणारे वॉटर बॉडी, प्रेक्षागृह व इतर अनुषंगिक सोयी-सुविधा (कार्यालय, नियंत्रण कक्ष, प्रसाधनगृहे, संरक्षक भिंत आदि) चे बांधकाम करणेचे काम ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांना देणेत आले होते. सदर प्रकल्पाची थोडक्यात माहीती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | कामाचे नांव | साईगार्डन प्रकल्पातंर्गत मुख्य इमारत व कम्पांउड भिंतीचे बांधकाम करणे. |
| ०२. | ठेकेदराचे नांव | मे. के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., हैद्राबाद |
| ०३. | आर्किटेक्ट | मे. माथुर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवी दिल्ली |
| ०४. | कार्यादेश क्र. व दिनांक | जा. क्र.२१८२/२०११, दि.०१/०८/२०११ |
| ०५. | मंजूर निविदा रक्कम | रु.३०,९५,२७,६६६/- |
| ०६. | काम पूर्ण करणेची मुदत | १२ महिने (दि.०८/०८/२०१२ अखेर) |
| ०७. | ठेकेदार यांनी केलेल्या कामापोटी अदा केलेली रक्कम | रु.८४,३२,३०२/- |
| ०८. | दंडापोटी जप्त केलेली रक्कम | रु.९८,४७,०१९/- |

ठेकेदार के.आर.आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांना वारंवार काम करणेची संधी देऊनही ठेकेदार सदरचे काम करणेस असमर्थ ठरल्याने प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांचेमार्फत दि.०१/०६/२०१२ रोजी टर्मीनेशन पत्र देवून सदरचे काम काढून घेणेत आलेले आहे.

ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांचेकडून दंडाची रक्कम वसूल करणेसाठी निवीदेतील पृष्ठ क्र.२० शर्त क्र.०६ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

Liquidated Damages / Penalty – 0.5% per day for delayed completion. The total Compensation for delay shall further be subject to an overall maximum of 10% (Ten percent) of the contract amount as awarded after which the Architect shall get the work done from any other party & deduct the sum thereafter from the main Contractors bill due on any account.

निवीदेतील उपरोक्त शर्तीनूसार ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांना प्रकल्प किमंत रु.३०,९५,२७,६६६/- मात्रचे १०% म्हणजेच रु.३,०९,५२,७६७/- मात्र दंड आकारणी करणेत आली. आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेनुसार ठेकेदार यांनी केलेले कामाचे अंतिम बिलापोटी उर्वरीत देय रक्कम व ठेकेदार यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम मिळूण एकुण रु.९८,४७,०१९/- मात्र संस्थानकडे जप्त करणेत आली.दि.०४/०६/२०१३ रोजीचे पत्राने ठेकेदार यांना उर्वरित दंडाची रक्कम रु.२,११,०५,७४८/- मात्र संस्थानकडे जमा करणेबाबत कळविणे आले. त्यानंतर संस्थानचे विधी विभागामार्फत ॲड. एस.डी.कुलकर्णी, कोपरगांव यांचे सल्याने दि.०३/१२/२०१३ व दि.२८/०३/२०१४ रोजी नोटीस पाठविणेत आली होती. त्यावर ठेकेदार यांचेकडून कुठलाही प्रतीसाद न मिळाल्याने निविदेतील अटी व शर्तीनुसार दंडाची उर्वरीत रक्कम रु.२,११,०५,७४८/- तसेच याशिवाय इतर अनुज्ञेय खर्च K.R.R. Infra Project Pvt.Ltd. Hydrabadया कंपनी कडुन वसूल करणेकरीता ॲड. एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचेमार्फत सिव्हील कोर्टात दावा दाखल करणेबाबत कार्यवाही सुरू करणेत आली.

ठेकदार यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करणेसाठी विधी विभागामार्फत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०९ अन्वये ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांचेसमवेत झालेल्या करारातील Arbitration Clause वगैरे सर्व संबधीत माहितीसह सविस्तर प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा असे ठरले होते. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४५ अन्वये ठेकेदार यांचेकडून उर्वरीत दंडाची रक्कम वसुल करणेकामी लवाद प्रकरण दाखल करणेत यावे असे ठरले.

दरम्यान ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांनी त्यांचे दि.१९/१२/२०१४ रोजीचे पत्राने त्यांचे कार्यालयाचा नविन पत्ता व प्रस्तुत प्रकरणी Sole Arbitrator ची संस्थानमार्फत नियुक्ती करणेबाबत कळविले.

इकडील विभागाचे दि.१६/०१/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये ठकेदार यांचेकडून उर्वरीत दंडाची रक्कम वसूल करणेकामी लवाद प्रकरण दाखल करणेसाठी अॅड.एस.डी.कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडून कायदेशीर मार्गदर्शन घेणेबाबत विधी विभागामार्फत पुढील कार्यवाही होणेस टिपणी सादर करणेत आली. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी Sole Arbitrator नेमणेबाबत कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले.

ठेकेदार यांचे प्राप्त पत्राबाबत विधी विभागामार्फत अॅड.एस.डी.कुलकर्णी, कोपरगाव यांचा सल्ला घेणेत आला असता, अॅड.कुलकर्णी यांनी त्यांचे दि.१३/०२/२०१५ रोजीचे पत्राने "..मी के. आर.आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांचे दि.०५/०१/२०१५ चे पत्र पाहिले त्या पत्रात ज्या गोष्टी त्यांनी कथीत केल्या आहेत, त्यावर त्यांना संबंधीत प्रकरण विलंबीत करावयाचे आहे. संबधीत ठेकेदाराने ज्या तक्रारी खुप मोठ्या विलंबाने केल्या आहेत. त्या मुदतीत नाही म्हणून के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्स प्रा.लि., हैद्राबाद यांना स्पष्ट नोटीस देऊन सिव्हील कोर्टात जाणे योग्य होईल" असा अभिप्राय दिला होता.

अॅड.एस.डी.कुलकर्णी, कोपरगांव यांनी उपरोक्त दिलेल्या अभिप्रायाबाबत विधी विभागाने दि.०६/०३/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये प्रस्तुत प्रकरणी लवाद दाखल न करता उर्वरीत दंडाची रक्कम वसूल करणेसाठी ठेकेदार यांचे विरुध्द सिव्हील कोर्टात दावा दाखल करणेस मान्यतेसाठी टिपणी सादर केली होती. त्यावर करारामध्ये लवादाची तरतुद आणि मा.व्यवस्थापन समितीचा ठरवही तसा आहे. त्यामुळे वेगळा विचार करण्याची गरज नाही. असे निर्देश तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी दिले होते.

उपरोक्त मंजूर टिपणीनुसार अॅड.एस.डी.कुलकर्णी यांना लवाद दाखल करणेबाबत विधी विभागाचे दि.२०/०३/२०१५, दि.२९/०३/२०१५, दि.२७/०५/२०१५, दि.०६/०७/२०१५, दि.३१/०७/२०१५ व दि.१६/०९/२०१५ रोजीचे पत्राने कळविणेत आले होते. परंतु त्यांनी लवाद प्रकरण दाखल केले नाही. त्यामुळे विधी विभागाने दि.१०/१२/२०१५ रोजी सादर केलेल्या टिपणीवर सिव्हील कोर्टात दावा दाखल करणेबाबत तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिले. त्यानुसार अॅड.एस.डी.कुलकर्णी यांना विधी विभागामार्फत दि.१५/०१/२०१६ रोजीचे पत्राने सिव्हील कोर्टात दावा दाखल करणेबाबत कळविणेत आले. अॅड.एस.डी.कुलकर्णी यांनी दि.२२/०४/२०१६ रोजीचे पत्राने दाव्याचा मसुदा तयार करुन दिला.

मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि., हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील कोर्टात दावा दाखल करणे, स्टॅम्प डयुटी रक्कम रु.३ लक्ष, प्रोसेस फि रक्कम रु.१०,०००/- व वकील फी रु.५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन सिमतीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२४ नुसार,के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि., हैद्राबाद या कंपनी विरुध्द तसेच कंपनीचे डायरेक्टर्स असे ०९ लोकां विरुध्द मे.सिव्हील जज्ज यांचे कोर्टात दावा दाखल करणेबाबतचे प्रस्तवावर मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर साहेब यांचा अभिप्राय घेणेत येऊन त्यांचे अभिप्रायसह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा असे ठरले. मा.व्यवस्थापन सिमतीचे उपरोक्त निर्णयानुसार अॅड.श्री.मोहन जयकर यांचा अभिप्राय घेणेसाठी त्यांना विधी विभागामार्फत दि.१०/०९/२०१६, दि.०९/११/२०१६, दि.२५/०१/२०१७, दि.२६/०३/२०१७ व दि.०५/०४/२०१७ रोजीचे पत्राने विनंती करणेत आली. तथापी, त्यांनी अभिप्राय दिलेला नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२४ चे कार्यवाही बाबत दि.१५/०६/२०१७ रोजी झालेल्या आढावा बैठकित तत्कालीन मा.अध्यक्ष साहेब यांनी के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि., हैद्राबाद या कंपनी विरुध्द तसेच कंपनीचे डायरेक्टर्स असे ०९ व्यक्ती विरुध्द मे.सिव्हील जज्ज, सिनियर डिव्हीजन, यांचे कोर्टात दावा दाखल करणेबाबत निर्देशीत केले. त्यानुसार दावा दाखल करणेसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०१अन्वये, मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे व कंपनीचे संचालकां विरोधात मे.सिव्हील जज्ज, सिनियर डिव्हीजन यांचे कोर्टात संस्थान वकीलामार्फत दावा दाखल करणेत यावा व याकामी संस्थान विश्वस्त अॅड.मोहन जयकर यांचे मार्गदर्शन घेणेत यावे असे ठरले तसेच सदर दाव्याची प्रोसेस फी रु.१०,०००/- व स्टॅम्प डयुटीसाठी रु.३,००,०००/- याप्रमाणे वकील फी साठी येणारे अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली होती.

त्यानुसार याकामी अॅड.एस.डी.कुलकर्णी यांनी दाव्याचा मसूदा तयार केला असून त्यामध्ये संस्थानचा क्लेम खालील प्रमाणे दाखविलेला होता.

| Sr.No. | Amount in Rs. | Particulars |
|---|---|---|
| A | 02,11,05,748.00 | Amount settled by the architect Mathur&KapreAsso. Pvt Ltd, New Delhi. |
| B | 22,20,00,000.00 | Loss of further income @ of Rs.1,00,000/- per day from June 2012 to June 2018. |
| C | 03,99,60,000.00 | Interest @ of 18% p.a.from the date of settlement by Mathur till June 2018. |
| D | 11,75,00,000.00 | Amount paid to laser vision Ltd; Hong-Kong as per agreement. |
| E | 09,85,60,000.00 | Unpaid amount of laser vision. |
| F | 05,91,36,000.00 | Interest towards amount of laser vision including unpaid amount. |
| G | 00,00,20,000.00 | Notice Charges. |
| | **55,82,81,748.00** | **Total Amount** |

तसेच अॅड. एस. डी. कुलकर्णी, कोपरगाव यांनी सदरहू दाव्यासाठी रु.२० लक्ष मात्र फी कळविली आहे. त्यास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.६५३ अन्वये, मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेकामी अॅड.मोहन जयकर यांनी अॅड.एस.डी.कुलकर्णी यांचेशी दाव्याचे फी बाबत चर्चा करुन अहवाल सादर करावा, असे ठरले आहे.

त्यानुसार जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/४३६५/२०१८ दि.०३/१२/२०१८ रोजीचे पत्राव्दारे अॅड.मोहन जयकर यांना अॅड.एस.डी.कुलकर्णी यांचेशी दाव्याचे फी बाबत चर्चा करुन अहवाल सादर करणेबाबत विनंती करणेत आली होती. तसेच अॅड. जयकर मा. व्यवस्थापन समितीचे सभेसाठी शिर्डी येथे आले असता याबाबत त्यांचेशी चर्चा करणेत आली होती तथापी, वेळे अभावी त्यांची अॅड.एस.डी.कुलकर्णी यांचेशी चर्चा होऊ शकली नाही. करीता अॅड.मोहन जयकर यांना संस्थानचे दि.०७/०५/२०१९ व दि.१४/०९/२०१९ रोजीचे पत्राने कळविणेत आले आहे. तथापी अद्याप त्यांचेकडून याबाबत अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे दावा दाखल करणेस विलंब होत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५३ नुसार, मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेसाठी अॅड.कुलकर्णी यांनी कळविलेली रु.२० लक्ष मात्र फी जास्त वाटत असल्याने तत्कालीन समिती सदस्य अॅड.मोहन जयकर यांना अॅड.एस.डी.कुलकर्णी यांचेशी दाव्याचे फी बाबत चर्चा करुन अहवाल सादर करणेबाबत वेळोवेळी कळविणेत आले आहे. तथापी त्यांचेकडून दाव्याच्या फी बाबत चर्चा होऊ न शकलेमुळे अॅड.कुलकर्णी यांना दाव्याच्या फी बाबत चर्चा करणेसाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे बोलविणेत येऊन पुढील कार्यवाही करता येईल.

तरी मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेसाठी अॅड.एस.डी.कुलकर्णी यांनी कळविलेल्या रु.२० लक्ष फीबाबत त्यांचेशी चर्चा करणेसाठी त्यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे बोलवून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईगार्डन प्रकल्पाचे सिव्हील कामाचे ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेबाबत मुदतीच्या कायद्याचे अनुषंगाने मुदतीविषयी अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०४** **श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्पाचे ठेकेदार न्याती इंजिनिअर्स अॅन्ड कंन्स्ल्टंट प्रा.लि.पुणे यांचे सिलींग प्लास्टरचा आयटम कामाचे स्कोपमधुन वगळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः- अधिनियमाच्या कलम १७ मधील पोटकलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- संस्थानमार्फत कार्यरत असलेल्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कुल, कन्या विद्या मंदिर, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालय यांचेकरीता संस्थानचे मौजे निमगांव–को-हाळे हद्दीतील गट नं.१८३ मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्प उभारणेत येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ४४ अन्वये सदरहू कामासाठी ठेकेदार न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सल्टंट, पुणे यांची निन्मतम रु.२१८/- कोटी मात्र रकमेची ई- निविदा स्विकारणेत आली. तसेच सदरहू ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभागाचे क्रं.सासंवि १०१८/९६९/प्र. क्र. ११०/का.१६, दि.०६/०३/२०१९ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानुसार ठेकेदार यांना संस्थानचे जा. क्रं. ५९३६/२०१९, दि.०८/०३/२०१९ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. प्रकल्पातील आर.सी.सी.काम पूर्ण झालेले असून अंतर्गत विट बांधकाम आतील व बाहेरील बाजूचे प्लास्टर हि कामे मोठया प्रमाणात सुरु आहेत. तसेच फ्लोरींग व पेटींगचे कामासही सुरुवात करणेत आलेली आहे.

ठेकेदार यांनी त्यांचे दि.०६/०१/२०२० रोजीचे पत्राने निविदेतील छताचे प्लास्टर ही बाब वगळणे बाबत खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

"Intender item no.31, 6mm thick cement plaster is given to ceiling surface. As we had used plywood shuttering for slab, RCC ceiling surface finishing comes very smooth & form finish.

Applicant of cement plaster on smooth surface is not advisable & has Chance of Debonding in future. To avoid this we recommend to use 2 coats of Birla Care White Putty directly on RCC slab surface."

ठेकेदार यांचे उपरोक्त अर्जाबाबत आर्किटेक्ट यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"This has reference to the internal ceiling plaster item No.31, page No.112 of tender BOQ. The plaster to ceiling is considered in above said item No.31 of tender documents as the slab texure never in line, level and form finish by using M.S. Plates, so that it has been considered in tender. But in this case, slab finishing is in line, level and form finish with minimum joints as the contractor had used new ply shuttering so that plaster to ceiling is not recommendable as there are many more chances of debonding plaster from slab surface.

Considering all these circumstances, it is being suggested for no ceiling plaster to be done and wall care putty and paints to be applied to ceiling directly.

Also we can save the money Rs.1,21,16,096 and same amount shall be deducted from contractos RA Bills."

श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्पाचे निवीदेमध्ये स्लॅबला (छताला) अपेक्षित फिनिशिंग आले नाही तर प्लास्टर करणे आवश्यक असते त्यामूळे निविदेमध्ये स्लॅबला (छताला) ६ mm जाड सिंगल कोट प्लास्टर करण्याची तरतूद करण्यात आली आहे. ठेकेदार यांनी इमारतींच्या स्लॅबचे शटरींग करणेसाठी नविन प्लायवूडचे फॉर्मवर्क वापरलेले असल्याने सिलींगचे फिनिशिंग गुळगुळीत आलेली आहे. प्रत्यक्षात छताला प्लास्टर करतेवेळी स्लॅबला टाचे मारले जातात. तथापि लेव्हल व्यवस्थित करणेसाठी प्लास्टरची जाडी जास्त होते. स्लॅबचे (छताचे) फिनिशिंग गुळगुळीत असल्याने काही ठिकाणी प्लास्टर सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता प्लास्टर करण्याची आवश्यकता नाही असे मत आर्किटेक्ट यांनी दिले आहे. सदरहू प्लास्टरचा आयटम निवीदेच्या स्कोप मधुन रद्द केल्यास खर्चात बचत होणार आहे. निविदेतील छताच्या प्लास्टरची बाब वगळल्यास त्यापोटी देय होणारी रक्कम रु.१,२१,१६,०९६/- मात्र निविदा किंमती मधून वजा करुन घेता येईल. निविदा मधिल BOQ नुसार त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr.no. | Floor Mark | Total Qty. in Sqm | Rate / Sqm | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Basement floor | 10600.95 | 156.98 | 16,64,137.131 |
| 02 | Ground Floor | 9363.67 | 156.98 | 14,69,908.917 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 03. | First Floor | 8460.35 | 158.53 | 13,41,219.286 |
| 04. | Second Floor | 7399.08 | 160.08 | 11,84,444.726 |
| 05. | Third Floor | 5747.34 | 161.63 | 9,28,942.564 |
| 06. | Forth Floor | 5747.34 | 163.18 | 9,37,850.941 |
| 07. | Fifth Floor | 5747.34 | 164.73 | 9,46,759.318 |
| 08. | Above Terrace | 1070.65 | 164.73 | 1,76,368.174 |
| | | | Amount Rs.: | 86,49,631.06 |
| | | | Add 10% Excallation: | 8,64,963.11 |
| | | | Tehinical scrutiny Charges 1.25 % : | 1,08,120.39 |
| | | | Add GST 18 % : | 15,56,933.59 |
| | | | Add Contingences 5 % : | 4,32,481.55 |
| | | | Total Amount : | 1,16,12,129.69 |
| | | | Add 4.34 % above: | 5,03,966.43 |
| | | | **Grand Total :** | **1,21,16,096.00** |

याबाबत निविदेतील पृष्ठ क्रं.६५, शर्त क्रं.१३५ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद नमूद आहे.

Variations (Deviations/Extra Works):- No Aleration, Omission or variation shall vitiate this contract but in case the Architect/Executive Engineer/Employer thinks proper at any time during the progress of the works to make any additions, alterations or omissions from the work or any alteration in the kind or quality of the materials to be incorporated therein, the Architect, with approval of the Employer, shall give the Contractor written notice thereof well in advance of the work being taken up and the Contractor shall alter, add to, or omit from, as the case may require, in accordance with such notice. The value of such extra alteration, additions or omissions shall in all cases be determined by the Employer in accordance with the provision of Conditions 89 and 90 hereof and the same be added to or deducted from the contract amount accordingly, subject to the condition that the contract sum will not thereby vary on the whole by more than 20% (Twenty per cent).

विभागाचा अभिप्राय– सदरहू प्रकल्पातील आर.सी.सी. स्लॅबचे शटरींग करणेसाठी नविन प्लायवूडचे फॉर्मवर्क वापरलेले असल्याने सिलींगचे फिनिशिंग गुळगुळीत आलेले आहे. त्यामुळे आर्किटेक्ट यांचे उपरोक्त अभिप्रायानूसार निविदेतील छताच्या प्लास्टरची बाब वगळता येईल त्याबाबत निविदेतील पृष्ठ क्रं.६५, शर्त क्रं.१३५ मध्ये वरीलप्रमाणे तरतूद नमूद आहे. या कामापोटी निवीदेतील परिमाणाप्रमाणे रक्कम रु.१,२१,१६,०९६/- मात्र किंमत होते तथापी सदरहू बाबीचे प्रत्यक्ष मोजमाप घेऊन येणा-या परिमाणाची निविदा दराने होणारी किंमत ठेकेदार यांना देय निवीदा रक्कमेमधून वजा करता येईल.

प्रस्ताव– तरी श्री साईबाबा शैक्षणिक संकुल या प्रकल्पातील छताचे प्लास्टर ही बाब वगळणे व सदरहू बाबीचे प्रत्यक्ष मोजमाप घेऊन येणा-या परिमाणाची निविदा दराने होणारी किंमत ठेकेदार यांना देय निवीदा रक्कमेमधून कमी करणेस मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा शैक्षणिक संकुल या प्रकल्पातील छताचे प्लास्टर हे काम वगळणेत येऊन सदरहू कामाचे प्रत्यक्ष मोजमाप घेऊन येणा-या परिमाणाची निविदा दराने होणारी किंमत सदर कामाचे ठेकेदार न्याती इंजिनिअर्स ॲन्ड कंन्स्ल्टंट प्रा.लि.पुणे यांना देय निवीदा रक्कमेमधून कमी करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत न्याती इंजिनिअर्स ॲन्ड कंन्स्ल्टंट प्रा.लि.पुणे यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०५** **मौजे पिंपळवाडी, ता.राहाता येथील जमीन गट नं.१६४/२ क्षेत्र ३.२९ हेक्टर, गट नं.२७९ क्षेत्र ०.०२ आर आणि गट नं.९/ड क्षेत्र २.४८ हेक्टर असे एकुण क्षेत्र ५.७९ हेक्टर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कायम खरेदी देणेबाबत श्री.विलास मोहनराव तुरकणे व इतर २ रा.पिंपळवाडी, ता.राहाता यांचा दि.०१.११.२०१९ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– श्री.विलास मोहनराव तुरकणे व इतर २ रा.पिंपळवाडी,ता.राहाता यांनी दि.०१/११/२०१९ रोजीच्या अर्जान्वये "आमची मौजे पिंपळवाडी येथील शिर्डी-पिंपळवाडी रोड येथे गट नं.९/ड,गट नं.१६४/२ व गट नं.२७९ मध्ये एकूण क्षेत्र ०५ हेक्टर ७९ आर इतकी शेतजमीन मिळकत आहे. सदर मिळकतींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | गट | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १ | १६४/२ | ०३ हे.२९ आर | १२ रु.८५ पैसे |
| २ | २७९ | ०० हे.०२ आर | ०० रु.१० पैसे |
| ३ | ९/ड | ०२ हे.४८ आर | ११ रु.४० पैसे |
| | एकूण | ०५ हे.७९ आर | |

सदर शेतजमीन ही आमचे वडीलोपार्जित असून सदर मिळकतीवर कुठलीही बँक/पतसंस्था तसेच इतर हक्कात कोणचीही नोंद नही. सदर मिळकती हया भोगवटादार वर्ग-१ च्या आहेत. आम्हास शेती करणे परवडत नसल्या कारणाने आम्हास सदर मिळकतीची विक्री करावयाची असून त्यास आम्हा सर्वांची संमती आहे. सदर मिळकती आम्ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना विक्री करण्यास अनुकुल आहोत. त्याकरीता सदर मिळकतींचा अपेक्षित भाव रक्कम रु.५,००,०००/- (अक्षरी रु.पाच लाख मात्र) प्रति गुंठा आहे. सदर रकमेत तडजोड (Negotiaatible) करण्यास तयार आहोत. तरी आमच्या सदर मिळकती आपण खरेदी करण्याबाबत विचार व्हावा,ही विनंती," असे बाबत नमुद केलेले आहे.

अर्जदार श्री.विलास मोहनराव तुरकणे व इतर रा.पिंपळवाडी यांचे मालकीचे उपरोक्त क्षेत्र ५ हेक्टर ७९ आर हे संस्थानला एखाद्या प्रकल्पासाठी आवश्यक आहे किंवा कसे याबाबत उक्त जमीनीचे प्रत्यक्ष स्थळनिरीक्षण करुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करणेकामी इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/१७९८/२०१९ दि.१५/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संस्थानचे बांधकाम विभागास कळविणेत आलेले आहे.

तदनुषंगाने प्र.कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग यांनी त्यांचेकडील दि.१८/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये इकडेस अहवाल सादर केला असून त्यात "सदर क्षेत्राची दि.२७/११/२०१९ रोजी पाहणी करण्यात आली असून त्यावेळी १) श्री.एस.एम.जोरी,उपअभियंता,बांधकाम विभाग २) श्री.जी.एस.जाधव, क.अभियंता, बांधकाम विभाग ३) श्री.बी.एन. जाधव, कं.मोजणीदार,मालमत्ता विभाग व ४) अर्जदार श्री.विलास मोहनराव तुरकणे हे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मौजे पिंपळवाडी,ता.राहाता येथील गट नं.१६४/२,२७९ व ९ ड मधील सदरहू क्षेत्र अर्जदार श्री.विलास मोहनराव तुरकणे यांनी प्रत्यक्ष दाखविले असून ते शिर्डी-पिंपळवाडी (रा.मा.३५) या रस्त्यास सन्मुख रस्त्याचे दक्षिण बाजूस आहे. सदरहू क्षेत्र शिर्डीपासून सुमारे ४ किमी.अंतरावर असून संस्थानचे मौजे रुई येथील गट नं.२९३ पैकी मधील क्षेत्रापासून सुमारे २ किमी.अंतरावर आहे. सध्या शेती वापरात असलेल्या या क्षेत्रापैकी काही भागात पेरुची बाग असून इतर क्षेत्रावर भुसार पीक घेतले जाते. सध्यस्थितीत प्रस्तावित असलेल्या कुठल्याही प्रकल्पासाठी सदरहू जागेची आवश्यकता नाही. तथापी सदरहू जागा ही राज्य मार्गाचे सन्मुख असल्याने भविष्यात संस्थानचे प्रकल्पांसाठी लॅंडबॅंक म्हणून याचा विचार करता येईल,असे मत आहे,"असेबाबत इकडेस अभिप्राय नमुद केलेले आहेत.

विभागाचा अभिप्राय- बांधकाम विभागाकडील उपरोक्त अभिप्रायाचे अवलोकन केले असता सध्यस्थितीत संस्थानला सदर जागेची आवश्यकता नसलेबाबत व सदर ठिकाणी कोणताही प्रकल्प प्रस्तावित नसलेबाबत दिसून येत आहे. याशिवाय शासनाचे विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय

क्रं.सासंवि/१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/का.१६ दि.२५/०६/२०१८ अन्वये संस्थानकरीता जमीन खरेदी धोरण निश्चित करणेत आलेले आहे. सदर निर्णयातील मुद्दे विचारात घेता

**१)** अर्जदार यांचे क्षेत्र संस्थान मालकीचे क्षेत्रालगत नाही अथवा सदर परिसरात संस्थान मालकीचे कोणतेही क्षेत्र नाही.

**२)** मौजे पिंपळवाडी परिसरात सध्यस्थितीत संस्थानचा कोणताही प्रकल्प प्रस्तावित नाही.

३) सदरचे क्षेत्र हे कृषिक विभागात असलेचे दिसून येते.

४) शासनाचे प्रचलित सिध्द शीघ्र गणक (रेडी रेकनर) नुसार उपरोक्त गट नं.१६४चे प्रति हेक्टरी दर रु.५१,७४,९००/- (रु.५१,७४९/- प्रति आर) इतका दर्शविलेला असून गट नं.२७९ चा प्रति चौमी.दर रु.१,१५०/- (रु.१,१५,०००/- प्रति आर) आणि गट नं.९ चा प्रति चौमी. दर रु.१,३००/- (रु.१,३०,०००/- प्रति आर) असा दर्शविलेला आहे. मात्र अर्जदार यांनी त्यांचे अर्जात अपेक्षित भाव रक्कम रु.५,००,०००/- प्रति गुंठा (प्रति आर) नमुद केलेले असून सदर रकमेत तडजोड करण्यात येईल,असे नमुद केलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी जमीन खरेदी धोरण निश्चित करणेत आलेल्या शासन निर्णयातील निकषात सदरचे क्षेत्र बसत नाही.

प्रस्ताव- अर्जदार श्री.विलास मोहनराव तुरकणे यांचे मौजे पिंपळवाडी, ता.राहाता येथील जमीन गट नं.१६४/२ क्षेत्र ३.२९ हेक्टर,गट नं.२७९ क्षेत्र ०.०२ आर आणि गट नं.९/ड क्षेत्र २.४८ हेक्टर असे एकुण क्षेत्र ५.७९ हेक्टर या क्षेत्राची संस्थानला सध्यस्थितीत आवश्यकता नाही. यास्तव अर्जदार यांचा प्रस्ताव अमान्य करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०५ सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०६ प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील वापरास दिलेली जमिन सर्व्हे नं.१४८ पै.मधील ११४.३२ चौ.मी.बांधीव व २६६.२८ चौ.मी.मोकळी जागा वापराचे मुदतीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– प्रसार भारती (भारतीय प्रसारण निगम) आकाशवाणी तथा दुरदर्शन मुंबई यांनी दि.२१/०४/२००३ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथे दुरदर्शन लघु प्रसारण केंद्र उभारणेसाठी संस्थानकडे मासिक भाडे तत्वावर २६६.२८ चौमी.मोकळी जागा व ११४.३२ चौमी बांधीव जागा अशी एकुण ३८०.६० चौमी जागा मिळणेस विनंती केलेली होती. सदर प्रस्तावाबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ रोजीचे सभेत ठराव क्र.२०७ अन्वये मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांची पुर्व मान्यता घेवून जागा भाडे तत्वावर देण्यात यावी ठरले आहे. सदर ठरावास अनुसरुन दि.०९/०६/२००३ रोजीचे पत्रान्वये मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया यांना संस्थानची जागा भाडे तत्वावर देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.१०/०७/२००३ रोजीचे आदेशाने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना Low Power T.V.Center शिर्डी येथे उभारणेसाठी संस्थानचे अर्जात नमुद केलेप्रमाणे जागा भाडयाने देणेस परवानगी दिलेली आहे.

प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,यांनी दि.०६/०८/२००३ रोजीचे पत्राने (१) पी.डब्ल्यु.डी.यांचेकडून निश्चित झालेले भाडे देण्यात येईल, (२) कमीत कमी १५ वर्षासाठी जागा दयावी लागेल, (३) करारनामा ३ वर्ष किंवा ५ वर्षासाठी करण्यात यावा त्यानंतर नुतनीकरण करण्यात यावे असा राहील, असे इकडील कार्यालयास कळविलेले आहे. प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, यांचे उपरोक्त पत्राबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.०५/१०/२००३ रोजीचे सभेत विषय सादर करुन निर्णय क्र.४७३ अन्वये प्रसार भारती यांना १५ वर्षासाठी जागा भाडयाने देणेबाबतचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. त्यानुसार प्रसार भारती यांना दि.२२/०८/२००६ पासून स.नं.१४८ धर्मशाळा सध्या साईनाथ रुग्णालय येथील २६६.२८ चौमी. मोकळी

जागा व ११४.३२ चौमी. बांधीव जागा अशी एकुण ३८०.६० चौमी.संस्थानची जागा व रुम वापरास देण्यात आलेली आहे.

यापुर्वी ठरावाप्रमाणे १५ वर्षासाठी (३-३ वर्षाचे टप्प्याने) लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर जागा दिली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियमातील कलम १७(३) च्या तरतुदीप्रमाणे फक्त १ वर्ष कालावधीसाठी संस्थान मिळकत Lease वर देता येते. त्याप्रमाणे यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१८३ प्रमाणे दि.२१/०८/२०१६ ते दि.२०/०७/२०१७ या ११ महीन्यांचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दि.२०/०७/२०१७ रोजी संपुष्टात आली असल्याने प्रसार भारती,भारतीय प्रसारण निगम,लघु प्रक्षेपण केंद्र,शिर्डी यांनी दि.१५/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये पुढील कालावधी दि.२१/०७/२०१७ ते दि.२०/०६/२०१८ या ११ महीने कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेकामी विनंती केली होती.

संस्थानचे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ व दि. ०५/१०/२००३ चे सभेतील निर्णयानुसार जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्रानुसार घेणेचे ठरलेले आहे व प्रत्येक ३ वर्षाने सदर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन खालीलप्रमाणे आकारणी करण्यात आलेली आहे.

१) पहिल्या टप्प्यातील ३ वर्षाचे दि.२१/०८/२००३ ते दि.२०/०८/२००६ अखेर रुपये ३३२५/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

२) दुस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००६ ते दि.२०/०८/२००९ अखेर रु.३३२५/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.३६५७-५० मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

३) तिस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००९ ते दि.२०/०८/२०१२ अखेर रु.३६५७-५० मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४०२४/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

४) चौथ्या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२०१२ ते दि.२०/०८/२०१५ अखेर रु.४०२४/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४४२७/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

५) पाचव्या टप्प्यातील तीन वर्षाचे कालावधीसाठी दि.२१/०८/२०१५ ते दि.२०/०८/२०१८ अखेर रु.४४२७/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४८७०/- मासिक भाडे आकारुन प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना पुढील दि.२१/०७/२०१७ ते दि.२०/०६/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्याकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीच्या सभेपूढे निर्णयार्थ सादर करणेत आलेला आहे. त्यात निर्णय क्रं.८१९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"प्रसार भारती ब्रॉडकास्टीग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना दि.२१/०७/२०१७ ते २०/०६/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मासिक परवाना फी रु.४,८७०/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे पूर्वपरवानगीने लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देणेस व त्यांचेबरोबर कायदेशीर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात आली."

त्याप्रमाणे प्रस्तुतचा प्रस्ताव मान्यतेसाठी इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/४३४५/२०१७ दि.२०/११/२०१७ अन्वये मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेत आलेला आहे. त्यास अनुसरुन त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१७/१९६८/ प्र.क्र.२२७/का.१६ दि.०१/०१/२०१८ अन्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी संस्थानची स्थावर मालमत्ता भाडेतत्वाने देण्याचे अधिकार समितीस असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. तथापि पुढील भाडेकरार करण्यापूर्वी सदर जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित करुन घेवून त्यानुसार भाडयाचा दर निश्चित करण्यात यावा" असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

त्यास अनुसरुन प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना भाडेपट्टयाने देण्यात आलेली जागा सन २००३ पासून एक-एक वर्षाच्या मुदतीने लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर वापरास दिलेली आहे. सदर वापरास दिलेली जागा जरी ११-११ महीन्याच्या कराराने वापरास दिली तरी त्याचा वापराचा कालावधी हा सलग एक वर्षापेक्षा जास्त होत असल्याची इकडील धारणा झाली असल्याने श्री साईबाबा संस्थान

विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) च्या अनुषंगाने प्रस्तुतचे प्रकरण शासनाचे विधी व न्याय विभागाकडे,प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना संस्थान मालकीची शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१४८ मधील ११४.३२ चौमी.बांधीव व २६६.२८ चौमी मोकळी जागा लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर दि.२१/०७/२०१७ ते दि.२०/०६/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी मासिक परवाना फी रु.४,८७०/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन वापरास देणेकामी मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव इकडील जा.क्रं.एसएसएसटी /मालमत्ता/५७५८/२०१८ दि.२७/०१/२०१८ अन्वये फेरसादर करणेत आलेले आहे. त्याबाबत शासनाकडून आदेश प्राप्त झालेले नाहीत. तथापि त्यापूर्वी शासनाकडील उपरोक्त दि.०१/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी संस्थानची स्थावर मालमत्ता भाडेतत्वाने देण्याचे अधिकार समितीस असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. तथापि पुढील भाडेकरार करण्यापूर्वी सदर जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित करुन घेवून त्यानुसार भाडयाचा दर निश्चित करण्यात यावा" असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

सदरची प्रस्तावित लिव्ह अॅण्ड लायसन्स कराराची मुदत दि.२०/०६/२०१८ रोजी संपुष्टात आलेली असलेने मा.सहायक अभियंता,भारतीय प्रसारण निगम,लघु प्रक्षेपण केंद्र,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र संख्या/ लप्रकें/दुरदर्शन/शिर्डी/१४ दि.१२/०९/२०१८ अन्वये "प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील सर्वे नं.१४८ मधील लघु प्रक्षेपण केंद्रासाठी मागील १५ वर्षांसाठी दरवर्षी लिव्ह अॅण्ड लायसन्स कराराने प्रत्येक तीन वर्षाने १०% भाडयात वाढ करुन जागा वापरास दिलेली आहे. सदर १५ वर्षांची व ११ महिन्यांची लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनाम्याची मुदत दि.२०/०६/२०१८ रोजी संपलेली आहे. तरी यापूर्वीप्रमाणेच १५ वर्षे मुदतीसाठी दर ३ वर्षांनी १०% भाडेवाढ करुन दर ११ महिन्यांच्या लिव्ह अॅण्ड लायसन्स करारावर व विद्युत बील वेगळे आकारुन GST सह मासिक भाडे आकारुन दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेस विनंती आहे," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

तदनुषंगाने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना संस्थान मालकीची शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१४८ मधील ११४.३२ चौमी.बांधीव व २६६.२८ चौमी. मोकळी जागा शासनाकडेस यापूर्वीच्या मुदतवाढी संदर्भात पाठविलेल्या फेरप्रस्तावाचे अनुषंगाने प्राप्त होणा-या आदेशास अधीन राहून लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडेदराने अथवा मागील मासिक भाडे दर रक्कम रु.४,८७०/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.५,३५७/- इतके यापैकी जे जास्त असेल ते भाडे निश्चित करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पूर्वीप्रमाणेच सदर निश्चित केलेल्या भाडेदरामध्ये पुढील १५ वर्षापर्यंत दर ३ टर्मनंतर १०% भाडेवाढ करणेच्या अटीवर लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला. त्यात विषय नं.१९ निर्णय क्रं.६५६ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना भाडेपट्टयाने देणेत आलेल्या जागेस लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक भाडे दर रक्कम रु.४,८७०/- मध्ये १०% वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली."

सदर निर्णयाचे अनुषंगाने प्रसार भारती विभागाबरोबर पत्रव्यवहार करणेत आलेला आहे. तथापि प्रसार भारतीचे उपरोक्त दि.२८/०८/२०१९ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता प्रसार भारती विभागास मा.व्यवस्थापन समितीनेनिर्णय क्रं.६५६ प्रमाणे निश्चित केलेले भाडे मान्य नसलेचे तसेच उपरोक्त कालावधीसाठी करावयाच्या करारनाम्याचे प्रारुप मान्य नसलेचे दिसून आले आहे. म्हणजेच सदरप्रमाणे निश्चित केलेले भाडे अदा करणेस व करारनामा करुन देणेस प्रसार भारती विभागाने असमर्थता दर्शविलेली आहे.

प्रसार भारती विभागास संस्थान मालकीच्या शिर्डी येथील वापरास दिलेल्या मिळकतीचा यापूर्वीच्या करारनाम्याची मुदत दि.२०/०६/२०१८ रोजी अलाहिदा संपलेली आहे व तदनंतर मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०१/११/२०१८ रोजीच्यासभेतील निर्णय क्रं.६५६ प्रमाणे उक्त जागा वापरास दिलेल्या पुढील मुदतीचा दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ हा कालावधी देखील संपुष्टात आलेला आहे.

प्रसार भारती विभागाने मा.व्यवस्थापन समितीने निर्णय क्रं.६५६ प्रमाणे दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी निश्चित केलेल्या भाडेदराची रक्कम रु.५,३५७/- इतकी संस्थानला अदा करणेस, तसेच संस्थानने संस्थान पॅनलवरील वकीलामार्फत तयार करण्यात आलेल्या लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्याचे प्रारुपाप्रमाणे लिव्ह ॲण्डलायसन्स करारनामा करुन देण्याचे नाकारलेले आहे. शिवाय संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीने निर्णय क्रं.६५६ अन्वये उक्त जागा वापराची दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या कालावधीसाठीची वाढवून दिलेली मुदत देखील दि.२०/०५/२०१९ रोजी संपुष्टात आलेली आहे. यास्तव प्रसार भारती विभागास वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या मालकीची मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१४८ मधील धर्मशाळा (सध्या साईनाथ रुग्णालय) मधील २६६.२८ चौमी. ही मोकळी जागा व ११४.३२ चौमी. बांधीव जागा अशी एकुण ३८०.६० चौमी जागा व रुम खाली करुन देणेकामी मा.उपसंचालक,प्रसार भारती दुरदर्शन अनुरक्षण केंद्र,आकाशवाणी कॉम्प्लेक्स, गंगापूर रोड,नाशिक यांना इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/२६५२ /२०१९ दि.०८/१०/२०१९ रोजीच्या पत्रान्वये अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

तदनुषंगाने मा.सहायक अभियंता,प्रसार भारती दुरदर्शन अनुरक्षण केंद्र,आकाशवाणी कॉम्प्लेक्स,गंगापूर रोड, नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.एफ नं.३५(१९)२०१९/ए/नासिक/२४७ दि.१३/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये भाडेदरा संदर्भात व लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्याचे प्रारुपाप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन देणेकामी मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.ॲडिशनल डायरेक्टर जनरल,ऑल इंडीया रेडीओ ॲण्ड दुरदर्शन,वरळी,मुंबई यांचेकडेस अलाहिदा सादर करणेत आलेला आहे,असेबाबत माहितीस्तव इकडेस कळविलेले आहे.

तथापि सदर पत्रात उक्त जागा वापराची मुदतवाढीबाबत प्रसार भारतीकडून काहीएक खुलासा केलेला नसल्याने इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३२८२/२०१९ दि.२६/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रसार भारती विभागास तसे कळविणेत आलेले आहे.

तदनुषंगाने डेप्युटी डायरेक्टर,प्रसार भारती,दुरदर्शन अनुरक्षण केंद्र,आकाशवाणी कॉम्प्लेक्स,गंगापूर रोड,नाशिक यांनी त्यांचेकडील जा.नं.F.No.35(19)2019/A/Nasik/269 दि.२९/११/२०१९ रोजीचे पत्रान्वये With reference to the above cited letter regarding to allotted said land Survey No.148,Dharmashala which is now in possession of Shree Saibaba Sansthan,Shirdi measuring 266.28 Sq.Mtrs. open place and 114.32 Sq.Mtrs. Built up i.e. total 380.60 Sq.Mtrs. extended period for leased property for the period from 21/05/2019 to 20/04/2020 (11Months) in favour of Prasar Bharati Broadcasting Corporation of India,Mumbai. Shree Saibaba Sansthan,Shirdi is kindly requested to grant permission for using the above said land w.e.f. 21/05/2019 to 20/04/2020 (11 Months) for Low Power Transmitter,Doordarshan,Shirdi, असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- प्रसार भारती विभागाने उपरोक्त पत्रान्वये जागा वापराची मुदत दि.२१/०५/२०१९ ते दि.२०/०४/२०२० या ११ महिने कालावधीसाठी वाढवून मिळणेकामी विनंती केलेली आहे. तथापि यापूर्वीच्या जागा वापराची दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या कालावधीसाठीची मुदत संपलेली असून सुध्दा सदर कालावधीचा करारनामा प्रसार भारती विभागाने करुन दिलेला नाही अथवा सदर कालावधीचे भाडे संस्थानला अदा केलेले नाही.

यास्तव डेप्युटी डायरेक्टर,प्रसार भारती,दुरदर्शन अनुरक्षण केंद्र,आकाशवाणी कॉम्प्लेक्स,गंगापूर रोड,नाशिक यांना त्यांचेकडील उपरोक्त दि.२९/११/२०१९ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने "प्रसार भारती विभागाने संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१४८ मधील धर्मशाळा (सध्या साईनाथ रुग्णालय मधील २६६.२८ चौमी.ही मोकळी जागा व ११४.३२ चौमी. बांधीव जागा अशी एकुण ३८०.६० चौमी. या जागा वापराचा दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या ११ महिने कालावधीसाठीचा करारनामा अद्यापपावेतो करुन दिलेला नाही अथवा सदर कालावधीचे जागा वापराचे भाडे देखील संस्थानला अदा केलेले नाही." अशा परिस्थितीत उक्त जागा वापराची पुढील दि.२१/०५/२०१९ ते दि.२०/०४/२०२० या कालावधीसाठीची मुदत वाढवून देणेकामीचे विनंतीचा विचार करता येणार नाही.

यास्तव उक्त जागा वापराचे भाडे प्रसार भारती विभागाकडून वसुल करुन संस्थानकडे तात्काळ जमा करुन घेता येईल व उक्त जागा व खोल्या तात्काळ खाली करुन घेता येतील.

प्रस्ताव- डेप्युटी डायरेक्टर, प्रसार भारती,दुरदर्शन अनुरक्षण केंद्र,आकाशवाणी कॉम्प्लेक्स,गंगापूर रोड,नाशिक यांना वापरास दिलेल्या संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१४८ मधील धर्मशाळा (सध्या साईनाथ रुग्णालय मधील २६६.२८ चौमी.ही मोकळी जागा व ११४.३२ चौमी. बांधीव जागा अशी एकुण ३८०.६० चौमी. या जागा वापराचे भाडे प्रसार भारती विभागाकडून वसुल करुन संस्थानकडे तात्काळ जमा करुन घेणेच्या व उक्त जागा व खोल्या खाली करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना दुरदर्शन व लघु प्रसारण केंद्र उभारणेसाठी वापरास देण्यात आलेली संस्थान मालकीची शिर्डी येथील जमिन सर्व्हे नं.१४८ पै.मधील ११४.३२ चौ.मी.बांधीव व २६६.२८ चौ.मी.मोकळी जागा अशी एकुण ३८०.६० चौ.मी.जागेचे लिव्ह ॲन्ड लायसेन्स कराराची मुदत दि.२०.०६.२०१८ ला संपलेली आहे. त्यानंतर करार केलेला नाही. त्यामुळे सदर जागा खाली करुन देण्याची व लायसेन्सी फीची रक्कम मागणीची नोटीस संबधीतांना देण्यात यावी, व ताबडतोब जागा खाली करुन घेण्याची कार्यवाही करावी. तसेच जागा खाली करण्याचे तारखेपर्यंतची लायन्सेसी फी दि.२१.०७.२०१७ ते दि.२०.०६.२०१८ या ११ महिन्याचे कालावधीसाठी ठरलेल्या मासिक परवाना फी रक्कम रु.४,८७०/- व मीटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा अशी वसुलीची कार्यवाही करावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०७** **मौजे निमगांव कोऱ्हाळे, ता.राहाता येथील जमीन गट नं.१९७ क्षेत्र २ एकर (०.८० आर) इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना कायम खरेदी देणेबाबत श्री.नरेंद्र सीताराम मते, निघोज, ता.राहाता यांचा दि.१३.१२.२०१९ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- श्री.नरेंद्र सिताराम मते,रा.निघोज,ता.राहाता यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.१३/१२/२०१९ रोजीच्या अर्जान्वये मौजे निमगाव-को-हाळे शिवारात गट नं.१९७ ही अर्जदार व त्यांचे भावांचे एकत्रित मालकीचे क्षेत्र असून ते नवीन शैक्षणिक संकुलालगत आहे. अर्जदार यांना योग्य मोबदला आल्यास २ एकर क्षेत्र ते साईबाबा संस्थानला देण्याचा विचार करीत असलेबाबत अर्जात नमुद केले असून सदर प्लॉट साईबाबा नवीन शैक्षणिक संकुलाच्या पश्चिम बाजूस असून संकुलालगत आहे. तरी याचा विचार व्हावा,असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

अर्जात नमुद केलेले क्षेत्र हे साईबाबा संस्थानच्या नवीन शैक्षणिक संकुलाजवळ असलेबाबत अर्जात नमुद केलेले आहे. यास्तव सदर क्षेत्राचा भविष्यात संस्थानला उपयोग होईल किंवा कसे अथवा सदर क्षेत्रात संस्थानचा एखादा प्रकल्प प्रस्तावित करता येईल किंवा कसे याकामी सदर क्षेत्राची भविष्यातील उपयुक्तता पडताळणी करुन अभिप्राय देणेकामी इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/२१६०/२०१९ दि.३०/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्र.कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग यांना कळविणेत आले.

त्याप्रमाणे बांधकाम विभागाने त्यांचेकडील पत्र जा.नं.बांधकाम/२२०७/२०२० दि.०३/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये "अर्जदार श्री.नरेंद्र सिताराम मते,रा.निघोज यांनी अर्जात नमुद केलेल्या मौजे निमगाव-को-हाळे शिवारात गट नं.१९७ पै. ०२ एकर क्षेत्र संस्थानचे नवीन शैक्षणिक संकुल प्रकल्पालगत असलेबाबत आपलेमार्फत खात्री करुन घेणेत यावी. सध्यस्थितीत प्रस्तावित असलेल्या कुठल्याही प्रकल्पासाठी सदरहू जागेची आवश्यकता नाही. तथापी सदरहु जागा ही शैक्षणिक संकुलाचे पश्चिमेला लगत असल्यास भविष्यात संस्थानचे प्रकल्पासाठी लॅंड बॅंक म्हणून याचा विचार करता येईल असे मत आहे", असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

संस्थानचे बांधकाम विभागाकडील उपरोक्त पत्रात मौजे निमगाव-को-हाळे शिवारात गट नं.१९७ पै. ०.२ एकर क्षेत्र संस्थानचे नवीन शैक्षणिक प्रकल्पालगत असलेबाबत आपलेमार्फत खात्री करुन घेणेत यावी,असेबाबत मालमत्ता विभागास उद्येशून पत्रात नमुद केलेले असलेने तदनुषंगाने संस्थानचे मालमत्ता विभागाकडील श्री.व्ही.एम.बर्गे,प्र.अधिक्षक, श्री.कृष्णा वालझाडे,कं.सल्लागार व श्री.बाळासाहेब जाधव, कं.मोजणीदार यांनी दि.२५/०१/२०२० रोजी समक्ष स्थळनिरीक्षण केले असता सदरचे क्षेत्र हे श्री साईबाबा

संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे निमगाव-को-हाळे येथील जमीन सर्वे नं.१८३ चे पश्चिमेस असलेल्या नांदुर्खी-निमगाव-को-हाळे रस्त्याच्या पश्चिमेस असलेचे दिसून येत आहे.

म्हणजेच सदरचे क्षेत्र हे संस्थान मालकीचे सर्वे नं.१८३ चे क्षेत्राला सलग येत नाही. तसेच सदरचे क्षेत्र हे अत्यल्प आहे. शिवाय बांधकाम विभागाकडील उपरोक्त दि.०३/०१/२०२० रोजीच्या पत्रात सध्यस्थितीत प्रस्तावित असलेल्या कुठल्याही प्रकल्पासाठी सदरहू जागेची आवश्यकता नाही, असेबाबत नमुद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील जमीन गट नं.१९७ पै. क्षेत्र ०.८० आर हे संस्थान मालकीचे सर्वे नं.१८३ चे क्षेत्राला सलग येत नाही. तसेच सदरचे क्षेत्र हे अत्यल्प आहे. शिवाय बांधकाम विभागाकडील उपरोक्त दि.०३/०१/२०२० रोजीच्या पत्रात सध्यस्थितीत प्रस्तावित असलेल्या कुठल्याही प्रकल्पासाठी संस्थानला सदरहू जागेची आवश्यकता नाही, असेबाबत अभिप्राय दिलेले आहेत. शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी जमीन खरेदी धोरण दि.२५/०६/२०१८ रोजीच्या निर्णयान्वये निश्चित केलेले आहे. त्यात नमुद केलेल्या अटी शर्तीत सदरचे क्षेत्र बसत नाही. यास्तव उक्त क्षेत्र संस्थानला खरेदी करता येणार नाही.

प्रस्ताव- मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील जमीन गट नं.१९७ पै. क्षेत्र ०.८० आर इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कायम खरेदी घेणे अथवा न घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०७** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** **(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०८** **कै.हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी, रा.साई समर्पण गुजराथी गेस्ट हाऊस, साईबाबा मंदिराचे गेट नं.२ समोर, मु.पो.शिर्डी यांचे दि.१७.०५.२०१८ रोजीचे नोंदणीकृत इच्छापत्राप्रमाणे त्यांचे मालकीचे मिळकत स्विकृत करणेबाबत मृत्युपत्र व्यवस्थापक सौ.हेमा तुषारभाई शहा,अहमदाबाद, ह.मु.शिर्डी यांचा दि.२४.१०.२०१९ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- मौजे शिर्डी येथील मयत हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी,रा.साई समर्पण गुजराथी गेस्ट हाऊस,साईबाबा मंदिराचे गेट नं.२ समोर, शिर्डी यांचे नावे मौजे शिर्डी येथे सर्वे नं.३/१७ क्षेत्र २७५ चौमी. याचा सिटी सर्वे नं.९०८ पैकी २७५ चौमी.क्षेत्र असून नगरपंचायत, शिर्डी मिळकत नं.७७७ पै.असा असून त्यात बांधलेल्या इमारतीचे उत्तरेकडील तळमजल्यातील पूर्व-पश्चिम २४ फुट ६ इंच व दक्षिण उत्तर २३ फुट ६ इंच अंदाजे मीटर ७.४२ सेंमी. व ७ मीटर १५ सेंमी. मापाची जागा व रुम इमारत अंदाजे बांधकाम क्षेत्र ५४ चौमी. हे यापूर्वीच दि.२५/०६/१९९२ रोजीचे बक्षिसपत्रान्वये श्रीमती हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना दान केलेले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीचा ताबा आज मितीस श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांचेकडेस आहे.

श्रीमती हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी रा.साई समर्पण गुजराथी गेस्ट हाऊस,साईबाबा मंदिराचे गेट नं.२ समोर,मु.शिर्डी या दि.०३/११/२०१८ रोजी शिर्डी येथे मयत झालेल्या आहेत. (सोबत मृत्यूचा दाखला जोडला आहे.) कै.हंसाबेन यांनी त्यांचे मालकीचे वरील क्षेत्रात केलेल्या बांधकामापैकीचे उर्वरित क्षेत्राचे व इतर मिळकतीचे दि.१७/०५/२०१८ रोजी मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचेसमोर नोंदणीकृत इच्छापत्र करुन ठेवलेले आहे. सदर इच्छापत्राची छायांकित प्रत मयत हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी यांच्या मृत्यपत्र व्यवस्थापक अर्जदार सौ.हेमा तुषारभाई शहा,रा.अहमदाबाद,ह.मु.साई समर्पण गुजराथी गेस्ट हाऊस,रा.शिर्डी यांनी त्यांचे उपरोक्त दि.२४/१०/२०१९ रोजीच्या अर्जासोबत सादर करुन त्यात सदर इच्छापत्रात कै.हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदीयांनी त्यांचे मालकीची उपरोक्त क्षेत्रातील इमारतीपैकी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना यापूर्वी दान केलेल्या रुम नं.५ व ६ चे वरील रुम नं.७ व ८ आणि टेरेस देखील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना दान करणेची इच्छा प्रकट केलेली आहे. तरी सदर इच्छापत्राप्रमाणे इच्छापत्रात नमुद केलेली मिळकत संस्थानचे नावे करुन घेणेकामी योग्य ती कार्यवाही करणेकामी विनंती आहे,असेबाबत नमुद केलेले आहे.

अर्जदार यांनी त्यांचे अर्जासोबत सादर केलेल्या कै.हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी यांचे मृत्यूपत्राचे अवलोकन केले असता त्यात कै.हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी यांनी यापूर्वी त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील सर्वे नं.३/१७ क्षेत्र २७५ चौमी. याचा सिटी सर्वे नं.९०८ पै. २७५ चौमी.क्षेत्र असून नगरपंचायत,शिर्डी मिळकत

नं.७७७ पै. असा असून त्यात बांधलेल्या  इमारतीचे उत्तरेकडील तळमजल्यातील पूर्व-पश्चिम २४ फूट ६ इंच व दक्षिण-उत्तर २३ फूट ६ इंच अंदाजे मीटर ७.४२ सेंमी व ७.१५ सेंमी. मापाची जागा व रुम इमारत अंदाजे बांधकाम क्षेत्र ५४ चौमी. हे दि.२५/०६/१९९२ रोजीचे बक्षिसपत्रान्वये संस्थानला दान केलेले आहे आणि आता उपरोक्त दि.१७/०५/२०१८ रोजीचे इच्छापत्रानुसार त्यांनी सदर मिळकतीवरील रुम नं.७ व ८ टेरेससह श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना दान करणेची इच्छा प्रकट केलेली आहे.

श्रीमती हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी,रा.शिर्डी यांनी दि.२७/०५/२०१८ रोजी केलेल्या मृत्यूप्रमाणे मृत्यूपत्रात नमुद केलेल्या मिळकतींवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे नाव महसुल दप्तरी लावणेकामी पुढील कायदेशीर प्रक्रियाबाबत संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेकडून इकडील दि.३१/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविणेत आले.

तदनुषंगाने ॲड.जे.के.गोंदकर यांनी त्यांचेकडील दि.०४/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये "मयत श्रीमती हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी यांनी दि.१७/०५/२०१८ रोजी मे.दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडे नोंदणीकृत इच्छापत्र करुन ठेवलेले आहे. सदरचे मृत्यूपत्रानुसार त्यांनी सदर मृत्यूपत्रात नमुद केलेली मिळकत रुम नं.७ व ८ टेरेससह आपणास दान करणेची इच्छा व्यक्त केलेली आहे. आता त्या  दि.०३/११/२०१८ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यामुळे आता त्यांचे मृत्यूपश्चात त्यांनी सदर मृत्यूपत्रात नमुद केलेल्या  मिळकती आपणास सदरचे मृत्यूपत्रानुसार मिळालेल्या आहेत. सौ.हेमा तुषारभाई यांनी सदर मृत्यपत्राची प्रत आपणाकडे दिलेली असून त्यांनी सुध्दा सदर मयताचे इच्छापत्राप्रमाणे मृत्यूपत्रात नमुद केलेली मिळकत स्विकृत करणेबाबत अर्ज दिलेला आहे. असे परिस्थितीत आता सदरचे मृत्यूपत्रानुसार मृत्यूपत्रात नमुद केलेल्या मिळकतीचे आपण कायदेशीर मालक होण्यासाठी आपण मे.कोर्टात दावा करुन मे.कोर्ट यांचेकडून सदर मृत्यूपत्रात नमुद केलेल्या मिळकतीचे साईबाबा संस्थान हे कायदेशीर मालक झालेले आहेत,असा जाहीर ठरावाचा (डिक्लेरेशनचा) दावा करणे जरुरीचे आहे व त्याप्रमाणे मे.कोर्टाकडून तसा जाहीर ठराव (डिक्लेरेशन) मंजूर झाल्यानंतर आपणास सदर नमुद मिळकतीस आपले नावाची मालकी हक्काची महसुल दप्तरी नोंद करता येईल. म्हणजे भविष्यात काही

वादविवाद सदर मृत्यूपत्रात नमुद केलेल्या मिळकतीबाबत उपस्थित झाल्यास त्याबाबत आपले मालकी हक्कास बाधा येणार नाही," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेकडील उपरोक्त अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे सदरचे मृत्यूपत्रानुसार, मृत्यूपत्रात नमुद   केलेल्या मिळकतीचे श्री साईबाबा संस्थान हे कायदेशीर मालक होण्यासाठी मे.कोर्टात दावा दाखल करुन मे.कोर्टाकडून सदर मृत्यूपत्रात नमुद केलेल्या मिळकतीचे, श्री साईबाबा संस्थान हे कायदेशीर मालक झालेले आहेत,असा जाहीर ठरावाचा (डिक्लेरेशनचा) दावा संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेमार्फत मे.कोर्टात दाखल करुन, मे.कोर्टाकडून तसा जाहीर ठराव (डिक्लेरेशन) मंजूर झालेनंतर संस्थानचे नावाची मालकी हक्काची महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला नोंदी करुन घेता येतील.

प्रस्ताव– संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचे अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे कै.हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी,रा.साई समर्पण गुजराथी गेस्ट हाऊस,मु.पो.शिर्डी यांचे दि.१७/०५/२०१८ रोजीचे मृत्यूपत्रानुसार मृत्यूपत्रात नमुद केलेल्या मिळकतीचे श्री साईबाबा संस्थान हे कायदेशीर मालक झालेले आहेत असा जाहीर ठरावाचा (डिक्लेरेशन) दावा मे.कोर्टात संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेमार्फत दाखल करणेच्या व सदर मृत्यूपत्रात संस्थानचे नावाने दर्शविलेली मिळकत स्विकृत करणेच्या व तदनुषंगाने होणा-या खर्चास मान्यता मिळणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कै.हंसाबेन विष्णुकुमार त्रिवेदी, रा.साई समर्पण गुजराथी गेस्ट हाऊस, मु.पो.शिर्डी यांनी दि.१७/०५/२०१८ रोजीचे नोंदणीकृत मृत्यूपत्रानुसार संस्थानला दान केलेल्या व मृत्यूपत्रात नमुद  केलेल्या मिळकतीचा ताबा घेण्यात येऊन महसुल व नगरपंचायत, शिर्डी यांचे दप्तरी मालमत्ता रजिस्टरला श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे नाव लावणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्रापैकीचे क्षेत्रात शिर्डी नगरपंचायत अतिक्रमण केलेल्या ६.२५ आर इतके क्षेत्र नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७ समितीचे कर्तव्ये व अधिकार यातील कलम १७(२)(छ) मध्ये विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची वेळोवेळी तपासणी करील किंवा तपासणी करण्याची व्यवस्था करील आणि अशा मालमत्तांवर कोणतेही अतिक्रमण झाले असल्यास ते दुर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करील,अशी तरतुद आहे.

तसेच कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

तसेच कलम २१(२)(दोन) यात स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतला सहाय्य करण्यासाठीची तरतुद आहे.

प्रकरणाची पूर्वपिठीका– शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या झोन क्रं.३ मधील जलकुंभाकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१०७ पै. उत्तर-पूर्व कोप-यात व झोन क्रं.२ मधील जलकुंभाकरीता सर्वे नं.१२६ पै. मधील नांदुर्खी रस्त्यालगत (प्रस्तावित विकास योजनेतील १८ मीटर वळण रस्त्यालगत) प्रत्येकी १२ आर इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या मालकीचे क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीस महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि/२००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ रोजीच्या शासन निर्णया प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६/४ पै. ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

उपरोक्त सर्वे नं.१२६/४ चे क्षेत्रात नगरपंचायतीने नव्याने बांधकामासाठी आखणी केलेचे दि.१६/०२/२०१९ रोजी निदर्शनास आलेवरुन बांधकाम विभागाकडील मुकादम श्री.गिरीश चोळके व मालमत्ता विभागाकडील कं.मोजणीदार श्री.बाळासाहेब जाधव यांना तात्काळ संस्थानचे उक्त क्षेत्राचे समक्ष स्थळनिरीक्षण करुन अहवाल सादर करणेबाबत सुचित करणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी दि.१६/०२/२०१९ रोजी उक्त क्षेत्राची समक्ष पाहणी करुन इकडेस अहवाल सादर केलेला आहे. त्यात त्यांनी “श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पैकी नांदुर्खी रस्त्यालगत क्षेत्र १२ आर इतके शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या झोन क्रं.२ मधील जल कुंभाकरीता देण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्याचवेळेस सदर क्षेत्राचा ताबा घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.त्या व्यतिरिक्त शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सदर क्षेत्रात कर्मचारी निवासस्थान बांधण्याचे व कंपांऊड करणेचे प्रस्तावित केलेले असलेचे आज दि.१६/०२/२०१९ रोजी आमचे निदर्शनास आले असून सदर जलकुंभाचे परिसरात कर्मचारी निवासस्थानाचे चुना फक्कीने लाईनआऊट केलेले असून कॉलमचे खड्डे घेतलेले असलेचे दिसून आले आहे. सदरचे लाईनआऊटचे निरीक्षण केले असता नगरपंचायत,शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थानचे क्षेत्रात उक्त बांधकाम प्रस्तावित केले असलेचे दिसून येत आहे.” असेबाबत इकडेस अहवाल सादर केलेला आहे.

मात्र संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे उर्वरित क्षेत्रात नगरपंचायतने तयांचे कर्मचारी निवासस्थान व कंपाऊंडचे बांधकाम प्रस्तावित केलेले असलेचे व त्याप्रमाणे लाईनआऊट केलेचे संस्थानचे दि.१६/०२/२०१९ रोजी निदर्शनास आलेले आहे. सदर आखणी करते वेळेस नगरपंचायतने संस्थानला कोणतीही पूर्वसुचना दिलेली नाही. यास्तव संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचाच वापर करावा. त्या व्यतिरिक्त संस्थानचे मालकीचे उर्वरित क्षेत्राचा वापर करु नये अथवा त्यात बांधकाम करु नये,असेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायतयांना इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/ ५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ अन्वये कळविणेत आलेले आहे.

तद्रुषंगाने मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नपं/टे-८/२/४९१/२०१९ दि.०१/०३/२०१९ अन्वये प्रस्तुत प्रकरणी इकडील जा.क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/५६५०/२०१९

दि.२३/०२/२०१९ च्या पत्रास अनुसरुन "शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सर्वे क्रं.१२६/४ पै. मधील १२.७९ आर जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.२४ निर्णय क्रं.३०५ नुसार व शासन निर्णय क्रं. सासंवि-२००६/५८०/ (७९)/का.सोळा दि.२० डिसेंबर २००६ अन्वये शिर्डी नगरपंचायतीस मिळालेली आहे. सदरजागेची महसुल दप्तरी ७/१२ उता-यावर नगरपंचायतची मालकी हक्क सदरी नोंद झालेली आहे. सदर जागेची उपअधिक्षक,भुमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन नकाशा प्राप्त करुन घेणेत आलेला आहे. सदरची जागा ही सुधारित (प्रारुप) शिर्डी विकास योजनेमध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी दर्शविलेली आहे. प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास

मा.सहसंचालक,नगररचना विभाग,नासिक यांचे शिफारशी नुसार सहायक संचालक,नगररचना विभाग,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.बां.प/मौ.शिर्डी, ता.राहाता/ स.नं.१२६/४ (१२६/१ जुना) ससंअ/२७७५/१८ दि.२०/०८/२०१८ अन्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे. मंजूर बांधकाम नकाशानुसार नगरपंचायत मालकीच्या सदर जागेतच बांधकाम चालू आहे. शिर्डी नगरपंचायतने नगरपंचायत मालकीचे जागेतच प्रस्तावित बांधकामाचे लाईन आऊट करुन बांधकाम सुरु केलेले असल्याने श्री साईबाबा संस्थानला पूर्वसुचना देण्याचा प्रश्नच उदभवत नाही,"असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

प्रस्तुत पत्राचे अवलोकन केले असता नगरपंचायतीने शिर्डी सुधारीत प्रारुप विकास योजनेमध्ये संस्थानचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रामध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी क्षेत्र प्रस्तावित केलेले असलेचे नमुद केलेले आहे. शिवाय प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहायक संचालक, नगररचना यांनी मंजुरीची शिफारस केलेली असलेचेही नमुद केलेले आहे. म्हणजेच सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर झालेली नाही व अंतिम झालेली नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६ पै. ०.१२ आर इतकेच क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकाम करणेकामी सन २००६ मध्ये दिलेले आहे व तदनुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांचे मालकीचे सध्यस्थितीत फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र आहे. तरीदेखील नगरपंचायतने सदर सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात सुधारीत (प्रारुप) विकास योजनेत प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे. मात्र सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर व अंतिम झालेली नाही. त्यामुळे नगरपंचायतीने त्यांना संस्थानने दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात बांधकाम करणे अथवा संस्थानचे उर्वरित क्षेत्राचा वापर करणे ही बाब विधीग्राहय नाही.

वास्तविक पाहता नगरपंचायतीने सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजनेस अंतिम मंजुरी प्राप्त झालेनंतर त्याप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन घेवून भुसंपादित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग झालेनंतर त्यात प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम करणे विधीग्राहय आहे.

मात्र नगरपंचायतीने उपरोक्तप्रमाणे प्रक्रिया पूर्ण न करता संस्थानचे जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम बेकायदेशीरपणे सुरु केलेले असलेचे निदर्शनास येत आहे. यास्तव सदरचे बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे आणि संस्थानची मालकीची जागा पूर्ववत करुन देणेत यावी. संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचे टाकीचे क्षेत्रासह जागेची निश्चिती करुन घेवून त्याव्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नयेअथवा संस्थानचे मालकीचे क्षेत्राचा वापर करु नये, असेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५८३८/२०१९ दि.०५/०३/२०१९ अन्वये पुन:श्च कळविणेत आले व प्रत संस्थानचे बांधकाम विभागास देणेत येवून शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत उपरोक्त ठिकाणी चालू असलेले बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे व संस्थान मालकीची जागा पूर्ववत करुन घेणेत यावी,असेबाबत सुचित केलेले आहे.

तदनुषंगाने संस्थानचे बांधकाम विभागाने त्यांचेकडील दि.१३/०३/२०१९ रोजीच्या कार्यालयीन टिपणी अन्वये मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ मधील संस्थान मालकीचे क्षेत्रापैकी ०.१२ आर क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकामासाठी देणेत आले होते. सदरहू जागेत नगरपंचायत,शिर्डी यांनी जलकुंभाचे बांधकाम सन २००६ मध्ये केले आहे. जलकुंभाचे पश्चिमेस नवीन रिंग रोड संस्थान निधीतून भुसंपादन करुन सन २०१०-१२ या कालावधीत विकसित करणेत आला आहे. या रस्त्याचे भुसंपादन व डिमार्केशन शिर्डी

नगरपंचायतीने केलेले आहे. त्यानुसार सदर रिंग रोडलगत उपरोक्त जलकुंभासाठी दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त संस्थानचे अंदाजे ०.६ आर क्षेत्र शिल्लक असलेचे दिसून येते. संस्थानचे मालमत्ता विभागाकडील दि.२३/०२/२०१९ व दि.०५/०३/२०१९ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने बांधकाम विभागाचे उपअभियंता,संरक्षण विभागाचे मुकादम,मालमत्ता विभागाचे लिपीक व कं.मोजणीदार यांनी उक्त साईटवर दि.०७/०३/२०१९ रोजी समक्ष जावून सदरचे बांधकाम बंद करणेबाबत साईटवरील ठेकेदार प्रतिनिधी यांना समक्ष सांगितले. त्यावर ठेकेदार प्रतिनिधींनी नगरपंचायतीकडून काम बंद करणेबाबत कोणत्याही प्रकारची सुचना नसल्याने काम बंद करणेस असमर्थता व्यक्त केली,असेबाबत निदर्शनास आणून दिलेले आहे.

याशिवाय मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थानने त्यांना निर्गत केलेल्या उपरोक्त पत्रास कोणताही प्रतिसाद दिलेला नसलेने प्रस्तुत प्रकरणा संदर्भात दि.०२/०४/२०१९ रोजी तहसिलदार,राहाता, मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी,उपअधिक्षक,भुमी अभिलेख,राहाता यांची बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीत मुख्याधिकारी,नगरपंचायत,शिर्डी यांनी"संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६ पै. चे शिर्डी-नांदुर्खी या १८ मी. रस्त्यालगत ०.१२ गुंठे जागा नगरपंचायतीचे शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या जलकुंभाकरीता सन २००६ मध्ये शासनाच्या मान्यतेने दिलेली आहे. त्याप्रमाणे नगरपंचायतचे नावाने नोंद झालेली आहे व सदर क्षेत्रात सन २०१३ मध्ये जलकुंभाचे बांधकाम पूर्ण करणेत आलेले आहे. संस्थानकडून नगरपंचायतला जलकुंभासाठी मिळालेल्या ०.१२ गुंठे जागेची मोजणी होवून निश्चिती करणेत आलेली नव्हती. त्यामुळे नगरपंचायतीने भुमी अभिलेख विभागाकडून नगरपंचायतीस मिळालेल्या जागेची मोजणी करुन घेतली असता सदर १८ मी. रस्त्यालगतच्या जागेपासून मोजमापानुसार संस्थानच्या जागेत सुमारे ५ ते ५.५ गुंठयात संस्थानच्या जागेकडे टाकी सरकलेली आहे. रस्त्याकडील जागेत शिर्डी सुधारीत प्रारुप विकास आराखडयात नगरपंचायतीचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे. त्या अनुषंगाने नगररचना विभागाकडून नगरपंचायतीने बांधकामास परवानगी घेतली आहे. त्यासाठी सुमारे २.५ कोटीचे टेंडर काढण्यात आलेले आहे आणि ठेकेदाराला कार्यारंभ आदेश देखील देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे टाकीचे दक्षिण बाजूकडील रस्त्यालगतच्या जागेत नगरपंचायतीचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम चालू करणेत आलेले आहे. सदरचे बांधकाम आता बंद करता येणार नाही. जलकुंभाचे बांधकाम संस्थानच्या जागेत सरकलेले आहे. सदरच्या अग्निशमन केंद्राचा उपयोग सार्वजनिक हितासाठीच होणार आहे. त्यासाठी सदरचे क्षेत्र नगरपंचायतीस संस्थानकडून मिळणेकामीचा प्रस्ताव नगरपंचायती मार्फत अलाहिदा सादर करणेत येईल व सदर जागेची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला अदा करेन. तरी सदरचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे चालू असलेले बांधकाम बंद करु नये,"असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी विनंती केली.

प्रस्तुत बैठकीत झालेल्या चर्चेत संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभासाठी देणेकामी सन २००६ साली शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र त्यावेळेस सदर क्षेत्राचा ताबा देणे-घेणेची कार्यवाही झालेली नसलेचे दिसून आले. तसेच शासन निर्णयामध्ये सदरचे ०.१२ आर क्षेत्र हे प्रस्तावित १८ मी. रुंदीच्या रस्त्यालगत पासून देण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र सदरचा रस्ता त्यावेळी अस्तित्वात नसल्याकारणाने त्यावेळेस सदर ०.१२ आर क्षेत्राचे हद्दी निशाण्या निश्चित झालेल्या नसलेचे दिसून येते. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सदर ०.१२ आर क्षेत्राची मोजणी करणेकामीची हद्द सध्यस्थितीत असलेल्या शिर्डी-नांदुर्खी रोडलगत पासून गृहीत धरुन त्या ठिकाणापासून मोजणी केली असल्याकारणाने नगरपंचायतीमार्फत बांधणेत आलेले जलकुंभ संस्थानच्या जागेत सरकलेले असलेचे दिसून येत आहे. नगरपंचायतने दि.०७/०४/२०१८ रोजीची मोजणी बेस धरुन संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्रात अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम सुरु केलेले आहे. सदरचे प्रस्तावित बांधकाम न करणेबाबत संस्थान प्रशासनाने नगरपंचायतीमार्फत सदर क्षेत्रात बांधकामासंबंधीची आखणी केली त्याचवेळेस लेखी कळविलेले आहे व तदनंतर देखील नगरपंचायतने सुरु केलेले बांधकाम संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राची निश्चिती होईपर्यंत बांधकाम करु नये,असेबाबत देखील नगरपंचायतीस संस्थानने लेखी कळविलेले आहे. तरीदेखील नगरपंचायतीने सदरचे बांधकाम सुरुच ठेवलेले आहे,असे निदर्शनास आलेले आहे.

नगरपंचायतमार्फत सुरु असलेले अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम हे सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून होत असलेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सांगितले असून त्यासाठीचे टेंडर काढून ठेकेदारास कार्यारंभ आदेश देखील पारित केला आहे व त्या ठिकाणी बांधकाम सुरु देखील करणेत आलेले आहे. अशा परिस्थितीत बांधकाम बंद करणे सार्वजनिक हिताचे दृष्टिने हितावह ठरणार नाही. सदर क्षेत्राची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला देणेस तयार आहे आणि जागा मागणीचा प्रस्ताव नगरपंचायत

संस्थानकडे सादर करणार असलेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सांगितलेने "नगरपंचायत,शिर्डी यांनी तसा जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे तात्काळ सादर करावा. तदनंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी," असे बैठकीत ठरले.

सदर बैठकीत ठरलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील उक्त सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त नगरपंचायतीने संस्थानचे क्षेत्रात प्रस्तावित केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झालेनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेकामीचे उक्त सभेत ठरलेप्रमाणेच्या निर्णयास मंजूरी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात सदरचा विषय स्थगित ठेवणेत येवून मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील बैठकीत सादर करणेत यावा, असे ठरले.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३१८ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त शिर्डी नगरपंचायतीने संस्थानचे क्षेत्रात प्रस्तावित केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झालेनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच नगर-मनमाड रस्ता ते १६ गुंठे पर्यंतचा जुना पिंपळवाडी रोड No Vehicles Zone व No Hawkers Zone म्हणून घोषित करणेसाठीचा प्रस्ताव मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांचेकडे पाठविण्यात यावा,असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/१६१०/२०१९ दि.३०/०७/२०१९ अन्वये मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना नगरपंचायतीने संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रातील नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थान मालकीचे इतर क्षेत्रात केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे तात्काळ सादर करणेत यावा,असेबाबत अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१६४/४ पै. चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्रापैकीचे क्षेत्रात नगरपंचायतने केलेल्या ०.०६.२५ आर इतके अतिक्रमण केलेले क्षेत्र नगरपंचायत,शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेकामीचा परिपूर्ण प्रस्ताव इकडेस सादर न केल्याने प्रस्तुत कामीचा परिपुर्ण प्रस्ताव सादर करणेकामी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३८४९/२०१९ दि.३१/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत येवून त्यात खालीलप्रमाणे पुर्तता करणेबाबत सुचित करणेत आलेले आहे.

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रात केलेल्या अतिक्रमित क्षेत्राचा वापर कोणत्या कारणासाठी केलेला आहे अथवा उक्त अतिक्रमित क्षेत्र ६.२५ आर हे नगरपंचायतीकडे वर्ग करणेचे प्रयोजन काय आहे. याबाबत प्रस्तावात उल्लेख करावा.

२) उक्त अतिक्रमित क्षेत्रात केलेल्या बांधकामाचा रेखांकन आराखडा व बांधकाम अंदाजपत्रक प्रस्तावासोबत सादर करावे.

३) सदर बांधकामास नगररचना विभागाने दिलेल्या अभिप्रायाचे पत्राची प्रत प्रस्तावासोबत सादर करावी.

४) सक्षम अधिकारी यांचा बांधकाम परवाना प्रस्तावासोबत सादर करावा.

५) उक्त अतिक्रमित क्षेत्राचा मोजणी नकाशा सादर करावा.

६) उक्त अतिक्रमित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग करणेबाबतचा नगरपंचायत कमिटीचा ठराव प्रस्तावासोबत सादर करावा.

७) सदरचे अतिक्रमित क्षेत्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-या रकमेस नगरपंचायत, घेण्यास तयार आहेत काय याबाबत प्रस्तावात खुलासा करावा.

तदनुषंगाने मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.०८/४१/२०२० दि.०६/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये इकडेस प्रस्ताव सादर केला असून त्यात त्यांनी "उक्त जलकुंभाकरीता

शिर्डी नगरपंचायतीस महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि २००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ नुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध करुन दिलेल्या १२ आर क्षेत्राव्यतिरिक्त उत्तर बाजूस असलेल्या विद्यमान पाण्याच्या टाकीखालील ६.२५ आर जागा मागणी प्रस्ताव सादर केला आहे. संदर्भ क्रं.४ अन्वये कळविण्यात आलेल्या पत्रानुसार खालीलप्रमाणे पुर्तता करण्यात येत आहे.

| अ.नं. | संस्थानद्वारे उपस्थित केलेला मुद्दा | नगरपंचायतीद्वारे पुर्तता केलेली. |
|---|---|---|
| १ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रात केलेल्या अतिक्रमित क्षेत्राचा वापर कोणत्या कारणासाठी केलेला आहे अथवा उक्त अतिक्रमित क्षेत्र ६.२५ आर हे नगरपंचायतकडे वर्ग करण्याचे प्रयोजन काय याबाबत प्रस्तावात उल्लेख करावा. | सर्वे नं.१२६/४ पै.मधील ६.२५ आर जागा ही विद्यमान पाण्याच्या टाकीकरीता वापरणेत येत आहे. तरी त्याखालील जागा ही विद्यमान पाण्याच्या टाकीसाठी वापरण्याचे प्रयोजन आहे. याबाबत नगरपंचायतने सादर केलेल्या प्रस्तावात सर्वे नं.१२६/४ खालील जागेत उत्तर बाजूस सरकलेली पाण्याच्या टाकीखालील जागा ६.२५ आर जागा नगरपंचायतकडे वर्ग करणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.<br>याबाबत संदर्भ क्रं.१ चे प्रस्तावात व त्यानंतरच्या झालेल्या पत्रव्यवहारामध्ये सदर जागा मागणी केलेले प्रयोजनाचा उल्लेख झालेला आहे.<br>सदर बाबत प्रस्ताव हा दि.०२/०४/२०१९ रोजी आपलेसोबत झालेल्या बैठकीत ठरलेप्रमाणे पाण्याच्या टाकीखालील संस्थानच्या जागेत असलेले अतिरिक्त क्षेत्र मागणी करणेबाबत ठरलेनुसार दाखल केला आहे. |
| २ | उक्त अतिक्रमित क्षेत्रात केलेल्या बांधकामाचा रेखांकन आराखडा व बांधकाम अंदाजपत्रक प्रस्तावासोबत सादर करावे. | ६.२५ आर जागा मागणी प्रस्तावातील विद्यमान पाण्याच्या टाकीचे बांधकाम हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत पाणीपुरवठा योजनेचे कामाचे वेळी संस्थान यांनी दर्शविण्यात आलेल्या जागेत पूर्ण करण्यात आलेले आहे. याबाबत पाण्याच्या टाकीचे बांधकामाचा आराखडा व प्रकल्प अहवालातील टाकीचे बांधकामाचे अंदाजपत्रक सोबत देण्यात येत आहे. |
| ३ | सदर बांधकामास नगररचना विभागाने दिलेल्या अभिप्रायाचे पत्राची प्रत प्रस्तावासोबत सादर करावी. | पाण्याच्या टाकीचे बांधकाम हे पाणीपुरवठा योजनेतील मंजुर उपांग असून सदर योजना ही महाराष्ट्र शासनाद्वारे मंजूर करण्यात आलेली असल्याने टाकीसाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेतलेले नाही. |
| ४ | उक्त अतिक्रमित क्षेत्राचा मोजणी नकाशा सादर करावा. | नगरपंचायतने मागणी केलेल्या प्रस्तावामध्ये ६.२५ आर जागा ही मोजणी नकाशावर दर्शविण्यात येवून सदर नकाशा नगरपंचायतने जा.क्रं.नपंटे-८/२५४/१/२०१९ दि.१९/०८/२०१९ रोजी प्रस्तावात जोडलेला आहे. त्याबाबत सदर नकाशाचे कृपया अवलोकन करण्यात यावे. |
| ५ | उक्त अतिक्रमित क्षेत्र नगरपंचायतकडे वर्ग करणेबाबतचा नगरपंचायत कमिटीचा ठराव प्रस्तावासोबत सादर करावा. | दि.२१/१२/२०१९ रोजी नगरपंचायत सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या ठरावाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. |
| ६ | सदरचे अतिक्रमित क्षेत्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-या रकमेस नगरपंचायत घेण्यास तयार आहेत काय, याबाबत प्रस्तावात खुलासा करावा. | ६.२५ आर जागा मागणी प्रस्तावातील विद्यमान पाण्याच्या टाकीचे बांधकाम हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत पाणीपुरवठा योजनेचे कामाचे वेळी संस्थान यांनी दर्शविण्यात आलेल्या जागेत पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर जागा ही विनामुल्य नगरपंचायतकडे वर्ग करणेबाबत प्रस्ताव आहे. |

संदर्भ क्रं.४ चे पत्रात नमुद ६.२५ आर क्षेत्राबाबत अतिक्रमित क्षेत्र असा वारंवार उल्लेख करण्यात आलेला असून त्याबाबत आक्षेप नोंदविण्यात येत आहे. नगरपंचायत सार्वजनिक पाण्याच्या टाकीचे बांधकाम करतेवेळी संस्थानचे संबंधीत अधिकारी यांचे उपस्थितीत सदर बांधकाम सुरु होवून मागील साधारण १० वर्षापासून सदर टाकीबाबत संसथानचे काहीही आक्षेप नव्हते. दि.०२/०४/२०१९ रोजीचे आपले समवेत व तहसिलदार,राहाता यांचेसह संस्थान उपमुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिका-यांच्या उपस्थितीत झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे ठरले आहे. सध्यस्थितीत उभा असलेला जलकुंभ हलविणे अगर त्याची अंशत:

जागा संस्थानला देणे शक्य नसल्याने सार्वजनिक हिताच्या दृष्टिने जलकुंभाचा जेवढा भाग संस्थानच्या जागेत गेलेला आहे तेवढया अतिरिक्त जागेची मागणी नगरपंचायद्वारे श्री साईबाबा संस्थानकडे करण्यात यावी. शिर्डी नगरपंचायतने संदर्भ क्रं.५ व ६ चे पत्रान्वये याबाबत सविस्तर खुलासा केलेला आहे. सदरबाबत दि.०२/०४/२०१९ रोजी आपलेसोबत झालेल्या बैठकीत ठरलेप्रमाणे नगरपंचायत पाण्याच्या टाकीखालील संस्थानच्या जागेत असलेले अतिरिक्त क्षेत्र मागणी करणेबाबत ठरलेनुसार सदर प्रस्ताव दाखल केला आहे. तरी विद्यमान पाण्याच्या टाकीखालील उत्तर बाजूस असलेली ६.२५ आर जागा शिर्डी नगरपंचायतकडे विनामुल्य हस्तांतर/वर्ग करणेबाबतची आवश्यक कार्यवाही पार पाडणेस विनंती आहे." असेबाबत नमुद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांनी सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावातील दि.०७/०४/२०१८ रोजीच्या मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता संस्थान मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्र १८.२५ आर इतके सध्यस्थितीत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचे ताब्यात असलेचे दिसून येत आहे. प्रत्यक्षात मात्र शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना उक्त सर्वे नं.१२६/४ पै. चे ०.१२ आर इतकेच क्षेत्र महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि/२००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे जलकुंभासाठी वर्ग करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थान मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रापैकी ६.२५ आर इतके क्षेत्रात जास्तीचे अतिक्रमण केलेले असलेचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

मात्र मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै.चे जागेत उत्तर बाजूस सरकलेली पाण्याचे टाकीखालील ०.०६.२५ आर जागा नगरपंचायतीकडे वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सदर प्रस्तावात पाण्याची टाकी सरकले बाबतचा केलेला उल्लेख संयुक्तिक वाटत नाही. सदर पाण्याच्या टाकीचे बांधकाम नगरपंचायतीने सन २००६ मध्येच पूर्ण केलेले आहे. त्यामुळे सदरची पाण्याची टाकी सरकण्याचा प्रश्न उदभवत नाही.

नगरपंचायत,शिर्डी यांना संस्थान मालकीचे उक्त क्षेत्रापैकी यापूर्वी जलकुंभासाठी ०.१२ आर क्षेत्र अलाहिदा वर्ग केलेले आहे व सदर क्षेत्रात नगरपंचायत,शिर्डी यांनी जलकुंभाचे बांधकाम त्याच वेळेस अलाहिदा पूर्ण केलेले आहे. आजमितीस नगरपंचायत,शिर्डी यांचे ताब्यात संस्थान मालकीचे उक्त सर्वे नं.१२६/४ पैकी ०.१८.२५ आर इतके क्षेत्र असलेचे मोजणी नकाशावरुन दिसून येत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी यापूर्वी नगरपंचायत,शिर्डी यांना फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र वर्ग केलेले आहे. म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांनी उक्त सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रात ६.२५ इतके अतिरिक्त क्षेत्रात अतिक्रमण केलेले असलेचे दिसून येत आहे. म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांना वर्ग केलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त ०.६.२५ आर इतके जास्तीचे क्षेत्रात अतिक्रमण केलेले असलेचे निष्पण्ण होत आहे.

प्रस्तुतचे अतिक्रमण संबंधात मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी /मालमत्ता/५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे उर्वरीत क्षेत्रात नगरपंचायतने त्यांचे कर्मचारी निवासस्थान व कंपांऊडचे प्रस्तावित केलेले बांधकाम करु नये व संस्थानचे मालकीचे उर्वरित क्षेत्राचा वापर करु नये असेबाबत अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

तदनुषंगाने शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०१/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदरची जागा हीसुधारित (प्रारुप) शिर्डी विकास योजनेमध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी दर्शविलेली आहे. प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहसंचालक,नगररचना विभाग, नाशिक यांचे शिफारशीनुसार सहायक संचालक,नगररचना विभाग,अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.२०/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे,वगैरेबाबत इकडेस कळविलेले आहे.

तदनुषंगाने मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५८३८ /२०१९ दि.०५/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये शिर्डी सुधारीत प्रारुप विकास योजनेमध्ये संस्थानचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रामध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी क्षेत्र प्रस्तावित केलेले असलेचे नमुद केलेले आहे.

शिवाय प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहायक संचालक,नगररचना यांनी मंजुरीची शिफारस केलेली असलेचेही नमुद केलेले आहे.

म्हणजेच सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर झालेली नाही व अंतिम झालेली नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६ पै. ०.१२ आर इतकेच क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकाम करणेकामी सन २००६ मध्ये दिलेले आहे व तदनुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांचे मालकीचे सध्यस्थितीत फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र आहे. तरीदेखील नगरपंचायतने सदर सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात सुधारीत (प्रारुप) विकास योजनेत प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे व त्याप्रमाणे बांधकाम सुरु केलेले असलेचे आमचे निदर्शनास आले आहे. मात्र सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर व अंतिम झालेली नाही. त्यामुळे नगरपंचायतीने, नगरपंचायतीस संस्थानने दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात बांधकाम करणे अथवा संस्थानचे उर्वरित क्षेत्राचा वापर करणे ही बाब विधीग्राहय नाही.

वास्तविक पाहता नगरपंचायतीने सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजनेस अंतिम मंजुरी प्राप्त झालेनंतर त्याप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन घेवून भुसंपादित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग झालेनंतर त्यात प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम करणे विधीग्राहय आहे.

मात्र नगरपंचायतीने उपरोक्तप्रमाणे प्रक्रिया पूर्ण न करता संस्थानचे जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम बेकायदेशीरपणे सुरु केलेले असलेचे निदर्शनास येत आहे. तरी सदरचे बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे आणि संस्थानची सदरची जागा पूर्ववत स्थितीत करणेत यावी व संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचे टाकीचे क्षेत्रासह जागेची निश्चिती करुन घेवून त्याव्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नयेअथवा कोणत्याही परिस्थितीत संस्थानचे मालकीचे क्षेत्राचा वापर करु नये. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेस तात्काळ सादर करावा,असेबाबत अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.०६/०१/२०२० रोजीच्या प्रस्तावात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात नगरपंचायत, शिर्डी यांनी अतिक्रमण केलेले क्षेत्र ०.०६.२५ आर इतके विनामुल्य वर्ग करणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि प्रस्तुत अतिक्रमणासंबंधात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय स्तरावर दि.०२/०४/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत सदर अतिक्रमित जागेची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला अदा करेल,असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सांगितलेले आहे. तेंव्हा संस्थानचे हिताचे दृष्टिकोनातून सदर अतिक्रमित क्षेत्र महाराष्ट्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-या मुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना वर्ग करणे विधीग्राहय ठरेल.

यास्तव शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रात अतिक्रमण केलेले ०.०६.२५ आर इतके क्षेत्र महाराष्ट्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-यामुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेस परवानगी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१८ मधील झालेल्या निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करता येईल.

प्रस्ताव - शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रात अतिक्रमण केलेले ०.०६.२५ आर इतके क्षेत्र महाराष्ट्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-यामुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेस परवानगी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१८ मधील झालेल्या निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०९** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१० आर्थिक वर्ष २०२०-२०२१ करीता पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणूक करणेकामी संस्थानच्या संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहारां संबंधीत केंद्र व राज्य शासनाकडुन विविध आर्थिक, आयकर, नव्याने लागु झालेला जीएसटी. इ. विषयक कायदे पारित होतात. या कायद्यातील नव-नवीन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो. वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी दैनंदिन आर्थिक व्यवहार लेखाविषयक, कर विषयक व मा.व्यवस्थापन तसेच शासनाच्या नियमांस अनुसरुन पुरवठादार व कार्य कंत्राटदार यांना बिले आदा करण्यासाठी दरवर्षी पुर्व लेखापरिक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यांचे मार्फत सर्व आर्थिक नियमांचे पालन होत असलेबाबत तपासणी केली जाते. काही अनियमितता असेल तर तात्काळ दुरुस्ती करुन व्यवहार पुर्ण केले जातात. त्यामुळे शासन नियुक्त व अंतर्गत लेखापरिक्षण अहवालात आक्षेपांचे प्रमाण कमी होते.

अशा प्रकारे संस्थान व रुग्णालये विभागांचे पुर्व लेखापरिक्षणाकरिता मा.व्य.स.निर्णय क्र.३४८/ दि.०१.०६.२०१८ अन्वये मे.उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट, नासिक यांची दि.०१.०७.२०१८ ते दि.३१.०३.२०१९ या कालावधीकरिता प्रत्येकी रु.१,००,०००/-अशी एकुण रु.२,००,०००/- वार्षिक फी वर पुर्व लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. मा.व्य.स.निर्णय क्र.७७/दि.३०.०१.२०१९ अन्वये दि.०१.०४.२०१९ ते दि.३१.०३.२०२० या कालावधीकरिता पुर्वीच्याच अटी शर्तींवर मुदतवाढ देण्यास आली होती. त्यांची मुदत दि.३१.०३.२०२० रोजी पुर्ण होत आहे.

पुढील कालावधी करिता रुग्णालये विभाग व संस्थान करिता पुर्व लेखापरिक्षक नियुक्ती करणेकामी नामांकित लेखापरिक्षण संस्थांकडून साधारणतः रु.४०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे/ट्रस्ट चे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून बंद पाकिटामध्ये त्यांचे मानधन/फि, ते पुरवणार असलेले तज्ञ मनुष्यबळ इ. माहिती मागविता येईल व मुदतीत आलेले प्रस्ताव मा.खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फिचा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्रायः- मे.उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट,नासिक यांची न्युनतम दरधारक म्हणुन पुर्व लेखापरिक्षक नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचा कालावधी १ वर्ष ९ महिने इतका होत आहे. संस्थानमधील विविध विभागातील आर्थिक बाबी व कामकाजांची त्यांना अनुभव आहे उदा.रुग्णालये विभाग, खरेदी विभाग, बांधकाम विभाग इ. तसेच ते पुर्वीच्याच अटी शर्तींवर पुढे १ वर्ष पुर्व लेखापरिक्षक म्हणुन कामकाज करण्यास तयार आहेत. शासनामार्फत वैधानिक लेखापरिक्षकांना तीन वर्ष सलग नियुक्ती देण्यात येते, त्यास अनुसरुन सदर लेखापरिक्षण संस्थेस दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०३.२०२१ पर्यंत १ वर्ष कालावधीकरिता पुर्वीच्याच अटी शर्तींवर पुर्व लेखापरिक्षक म्हणुन मुदतवाढ देणेस अथवा पुर्व लेखापरिक्षक नियुक्तीकरिता संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणुक करणेकामी प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर.

**निर्णय क्र.११० यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०२०-२०२१ करीता पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) म्हणून मे.उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट,नाशिक यांना दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०३.२०२१ पर्यंत १ वर्ष कालावधीकरीता पुर्वीच्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.११ आयकर विषयक मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय येथे Writ Petition, Special Leave Petition दाखल करणे व संस्थानची बाजू मांडणे इ.करीता विधिज्ञांचे पॅनल तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** आयकर विभागाने संस्थानला करनिर्धारण वर्ष २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१७-१८ व २०१८-१९ करनिर्धारण, फेर करनिर्धारणा संबंधीत नोटीसा दिल्या आहेत. करनिर्धारण वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ चे करनिर्धारण आदेशाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई व मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली Writ Petition, Special Leave Petition दाखल करण्यात आली होती. करनिर्धारण आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यास व दोन्हीही वर्षांची अपिल्स् एकत्रित सुनावणी करणेबाबत व तोपर्यंत देय कराला स्थगिती आदेश मा.उच्च न्यायालयाने दिला

आहे. सदर करनिर्धारण वर्षांची अपिल्स् आयकर विभागाकडे दाखल करण्यात आली असून त्यावर अद्याप सुनावणी झालेली नाही.

दरम्यानच्या कालावधीत आयकर विभागाने २०१७-१८ चे करनिर्धारण करुन दि.३०.१२.२०१९ रोजी रु.५८,४५,८०,७००/- देय कर कळविला आहे. संस्थान नियुक्त लेखापरिक्षक सीए आर.आर. मुनी ॲण्ड कं., मुंबई यांचेमार्फत करनिर्धारणाचे व आयकर विभागाकडे अपील दाखल करण्यात आले आहे. २०१४-१५ चे फेर करनिर्धारण करणेकामी आयकर विभागाने नोटीस दिली आहे, त्याविरोधात मा.उच्च न्यायालयात, मुंबई येथे दि.१४.१२.२०१९ रोजी विधिज्ञ मे.जुन्नारकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचेमार्फत Writ Petition दाखल करण्यात आले असून मा.सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.एस. गणेश, दिल्ली बाजू मांडत आहेत, पुढील सुनावणी दि.२५.०२.२०२० रोजी नियोजित आहे.

अशाप्रकारे आयकर विषयक सद्यस्थिती असून उर्वरीत करनिर्धारण वर्षांची करनिर्धारणे, फेर करनिर्धारणे आयकर विभागामार्फत करण्याचे नियोजन आहे. बाबत, सर्व संबंधीत व इतरही ज्येष्ठ विधिज्ञांकडून न्यायालयासंबंधीत आयकर विषयक कामकाज करण्यासाठी कामाच्या स्वरुपानुसार त्यांना अपेक्षित असलेली फी कळविणेबाबत दि.१२.१२.२०१९ व दि.२५.०१.२०२० रोजी ई-मेलद्वारे पत्रव्यवहार करण्यात आला होता. काही विधिज्ञांनी कामाचे स्वरुप व अपेक्षित फी कळविली आहे. तर काही विधिज्ञांनी प्रत्यक्ष दुरध्वनीवरुन कामाबाबत दरपत्रक देता येणार नाही तथापि काम करण्यास तयार असलेबाबत चर्चा केली आहे. अशाप्रकारे प्राप्त दर व कामाचे स्वरुप याबाबत काही विधिज्ञांनी खालीलप्रमाणे कळविले आहे :-

| Sr. No. | Name of Advocate/ Senior Counsel | Nature of Work | Last Year Fees | Quoted for AY 2014-15, AY 2017-18 |
|---|---|---|---|---|
| 1 | Lakshmikumaran&Sridharan Attorneys, Mumbai | Quoted for AY 2014-15 & AY 2017-18 CIT Appeal, High Court, Supreme Court work. | N.A. | Email dt.13.12.2019<br>1. Drafting, Drafting Appeal CIT(A), and Filling of Submission<br>2. Hearing/Appearance before AO Rs.25,000/-<br>3. Drafting & Filling Submission to Appellate Proceeding to CIT(A) & ITAT(A) Rs.40,000/- each.<br>4. High Court & Supreme Court Drafting and Filling Appeal before HC, SC Rs.75,000/- each.<br>5. Writ Petition – Rs.1 Lakh each.<br>6. Legal Research enclosed details<br>Plus GST & Out of Pocket Expenses. |
| 2 | Senior Counsel Porus F. Kaka | | N.A. | Discussed with Mr.DeveshChawla told will inform you. But not yet informed |
| 3 | Senior Counsel ParsiPardiwalla | | N.A. | Discussed with Adv. Parsi Pardiwalla, not ready to give quotation but ready to work, said will send on paper but not yet received. |
| 4 | Senior Counsel Bhupendra Shah, Mumbai | Appeal before CIT(A), ITAT | N.A. | Email dt.13.12.2019 For each Assessment Year Rs.2.50 Lakh + GST |
| 5 | Senior Advocate S. Ganesh, Delhi | Present on behalf of Sansthan in High Court, Supreme Court | Not charging Fees + Reimbursement of out-of-pocket. | Email dt.14.12.2019 Not charging Fees + Reimbursement of out-of-pocket. |
| 6 | M/s. Junnarkar and Associates, Mumbai | File Writ Petition in Hon'ble High Court | Not charging Fees + Reimbursement of out-of-pocket. | Ready to work but not given quotation of fees. |
| 7 | Adv. Mehul Gupta, Delhi, Hon'ble Supreme Court | File Special Leave Petition in Hon'ble Supreme Court, Delhi | Not charging Fees + Reimbursement of out-of-pocket. | Discussed ready to work but not giving quotation. Quotation not yet received. |

उपरोक्तप्रमाणे संबंधीत विधिज्ञांकडून आयकर विषयक कामकाजाकरिता मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय येथे Writ Petition, Special Leave Petition व संस्थानची बाजू मांडणे करिता अपेक्षित फी नमूद केली तर काही विधिज्ञांनी दरपत्रके देण्यास नकार दिला आहे. तथापि, काम करण्यास तयार असलेबाबत दुरध्वनीवर चर्चा केली आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१११** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१२** **जिल्हा परिषद अहमदनगर यांचे प्रस्तावानुसार शाळा खोल्यांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेऐवजी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अहमदनगर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी यांनी दि. २४.०५.२०१७ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रस्ताव सादर करून जिल्हा परिषद शाळांना ५०० वर्ग खोल्यांची आवश्यकता असून सन २०१६-१७ च्या डीएसआर नुसार एका खोलीला रक्कम रु.७,२०,०००/- मात्र एवढा, अशी एकूण रु.३६ कोटीची मागणी केली होती.

आर्थिक मदत करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय,यांचे अध्यक्षतेखालील बैठकीतील निर्देश:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्या कामकाजासंदर्भात वर्षा, मा. मुख्यमंत्री महोदय यांचे शासकीय निवासस्थान येथे दि. ०१ फेब्रुवारी २०१८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीतील मुद्दा क्रं. १ नुसार नविन वर्ग खोल्यांची आवश्यकता असलेल्या शाळांची तालुका निहाय यादी जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना सादर करावी. असे निर्देश दिलेले होते.

उपरोक्त निर्देशास अनुसरून जिल्हा परिषद अहमदनगर च्या प्राथमिक शाळांना नविन वर्ग खोल्या बांधकामासाठी रु. ३६ कोटी अनुदान देणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे, दि. ०४.०४.२०१८ रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला. सदर बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीतील निर्देशाप्रमाणे जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या बैठकीचे पत्र जा. क्रं. कार्या४/बांध/४२१/२०१८ दि. ०३.०४.२०१८ नुसार पाठविलेल्या इतिवृत्ताच्या प्रती सदस्यांना वाटप करण्यात आल्या. सदर इतिवृतात १०९२ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी एकूण रु. ६८,१६,४०,०००/- मात्र इतका निधी मिळणेबाबतची शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच इतिवृत्तात शाळांची नावे व नवीन बांधावयाच्या खोल्यांची संख्याही नमूद केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:-मा.व्यवस्थापन समितीच्या दि. ०४.०४.२०१८ रोजीच्या सभेतील इतिवृत्त कायम करतांना उपरोक्त विषयासंदर्भांत मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२.०५.२०१८ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

दि.०२.०५.२०१८ चे सभेतील विषय क्रं. १ निर्णय क्रं. २८७ (७) अन्वये चर्चा होऊन मा. मुख्यमंत्री महोदयांकडील बैठकीतील निर्देशाप्रमाणे जिल्हाधिकारी, अहमदनगर व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी जिल्हयातील १०९२ वर्ग खोल्यांच्या बांधकामासाठी रक्कम रु. ६८,१६,४०,०००/- मात्रचा प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना वर्ग खोल्या बांधकामासाठी रक्कम रु. ३० कोटी अनुदान देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली. सदरहू अनुदान टप्प्याटप्याने देण्यात यावे, पहिल्या टप्प्यासाठी रु. १० कोटी मात्र अनुदान देण्यात यावे. याकरिता जिल्हाधिका-यांच्या यादीतून शाळांची निवड स्थानिक उपसमितीने करावे, असे ठरले.

मा. स्थानिक उपसमितीचा निर्णय :- मा. स्थानिक उपसमितीचे इतिवृत्त कायम करतांना दि.०६.०९.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन सभेतील निर्णय क्रं. ५५७ (२०) नुसार सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

**१)** उपरोक्त मंजूर निधी जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडे वर्ग करणेत यावा व वर्ग खोल्यांचे बांधकाम शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावे.

**२)** सबंधीत तालुक्याचे उपअभियंता व गट शिक्षणाधिकारी यांनी मा. स्थानिक विश्वस्तांशी विचार विनिमय करून भुमिपुजनाचे कार्यक्रम आयोजित करावे.

**३)** वर्ग खोलीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे सन २०१८-१९ मध्ये प्राप्त निधीतून बांधण्यात आलेली वर्ग खोली असे नमूद करावे. अशा उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. तसेच जिल्हा परिषदेच्या १५९ खोल्यांसाठी सदर रु. १० कोटी इतके अनुदान देण्यात येत आहे, सदर खोल्यासांठी अनुदान कमी पडल्यास जास्तीची रक्कम जिल्हा परिषद/ग्रामपंचायत यांनी त्यांचेकडील उपलब्ध अनुदानातून खर्च करावी, तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्या समितीने विहीत केलेल्या मानांकानुसार अनुदान खर्च करावे, असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यानुसार शासन निर्णय क्रं. सासंवि-१०१८/८९३/प्र.क्र.८८/का.१६ दि. २६ जुन २०१८ पारीत झालेला आहे तो खालीलप्रमाणे

शासन निर्णय:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) , अधिनियम २००४ मधील कलम १७ (२) (ण) मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शाळेच्या नविन खोल्या बांधकामासाठी पहिल्या टप्यांत रुपये १० कोटी इतके अनुदान श्री साईबाबा संस्थानद्वारे देण्यास खालील अटींच्या अधिन राहून मंजुरी देण्यात येत आहे.

१) उपरोक्त मंजूर निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत जिल्हा परिषद, अहमदनगर यांना उपलब्ध करून देण्यात यावा.

२) जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या अखत्यारीतील शाळांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर यांचेमार्फत करण्यात यावे.

३) जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेमार्फत कामाच्या प्रगतीप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडे निधी वर्ग करण्यात यावा.

४) जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सादर केलेल्या यादीतील शाळांची निवड श्री साईबाबा संस्थानच्या स्थानिक समितीमार्फत करण्यात यावी. असा शासन निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:- दि.२०.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७२३ अन्वये तसेच , विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/८९३/प्र.क्र.८८/का.१६ दि.२६ जुन,२०१८ अन्वये, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शाळांच्या नविन खोल्या बांधण्यासाठी पहिल्या टप्प्यात रु.१० कोटी मात्र इतके अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. जिल्हा परिषद, अहमदनगर यांना नवीन शाळा खोल्या बांधकामासाठी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने कळविलेल्या शाळा खोल्यांच्या यादीमधून शाळांची निवड दि.०३.०९.२०१८ रोजीच्या स्थानिक उपसमितीचे सभेमध्ये करण्यात आली होती. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील अनुदान रक्कम रु.१० कोटी जिल्हा परिषद,अहमदनगर यांचेमार्फत शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर यांचेकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच जिल्हा परिषद, अहमदनगर यांना उर्वरीत रक्कम रु.२० कोटी अनुदान देणेबाबतच्या प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर, मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीकडून उर्वरीत शाळा खोल्यांची यादी मागविण्यात यावी. मा.जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या शाळा खोल्यांची निवड करण्यासाठी प्रस्ताव पुन्हा मा.स्थानिक उपसमितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा. मा.उपसमितीचे शिफारशीनुसार व मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने निवड करण्यात आलेल्या शाळा खोल्यांकरीता दुसऱ्या टप्प्यातील रक्कम रु.२० कोटी अनुदान जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेमार्फत शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर यांचेकडे वर्ग करण्यात यावे, असे ठरले. त्यानुसार जा. न. एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/३१४२/२०१८ दि. २८ सप्टेंबर २०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

तथापि, उपरोक्त मा. व्यवस्थापन समिती व शासननिर्णयाप्रमाणे कार्यवाही करून जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शाळांच्या नवीन वर्ग खोल्या बांधकामासाठी पहिल्या टप्प्यांतील रक्कम रु. १० कोटी अनुदान दि.२९.१२.२०१८ रोजी RTGS द्वारे आदा करण्यात आलेले आहे.

फेरप्रस्ताव:- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी सन २०१७ – २०१८ च्या DSR नुसार सर्वसाधारण क्षेत्रासाठी ६.२० लक्ष व अदिवासी डोंगराळ क्षेत्रासाठी रु. ६.७० प्रमाणे एकूण १०९२

वर्ग खोल्या बांधकामासाठी ६८ कोटीचा निधी मिळणेबाबत विनंती केली होती.त्यानुसार १५९ शाळाखोल्यांची यादी प्राप्त झाली असून त्यामधील अट क्रं. ८ अन्वये सर्वसाधारण क्षेत्रातील शाळेसाठी नवीन वर्ग खोल्या बांधकामासाठी प्रती वर्ग खोली अंदाजे ६ लक्ष २० हजार व अदिवासी / डोंगराळ क्षेत्रातील शाळांच्या बांधकामासाठी प्रती वर्ग खोली अंदाजे रुपये ६ लक्ष ७० हजार एवढा खर्च अपेक्षीत धरण्यात आलेला आहे. तसेच सदर नवीन वर्ग खोल्या बांधकामासाठी अनुदान कमी पडल्यास जास्तीची रक्कम जिल्हा परिषद/ग्रामपंचायत यांनी त्यांचेकडील उपलब्ध अनुदानातून खर्च करावी असे संस्थानचे आदेशात नमूद केले आहे.

तथापि, सन २०१८-२०१९ च्या DSR नुसार सर्वसाधारण क्षेत्रातील शाळेसाठी नवीन वर्ग खोली बांधकामासाठी प्रती वर्ग खोली अंदाजे रुपये ८ लक्ष व अदिवासी / डोंगराळ क्षेत्रातील शाळेतील नवीन वर्ग खोली बांधकामासाठी प्रती वर्ग खोली रुपये ८ लक्ष ५० हजार एवढा खर्च अपेक्षीत धरण्यात यावा. त्यानुसार १५९ वर्ग खोल्यांसाठी १२.८२ कोटी निधी आवश्यक आहे. सदरहू वाढीव रु. २.८२ कोटी निधी किंवा पहिल्या टप्प्यांतील १० कोटी रु. निधीतून उपरोक्त रु. ८.०० लक्ष व ८.५० लक्ष या तरतूदीप्रमाणे जितक्या वर्ग खोल्या होऊ शकतील तेवढयांची यादी सुधारीत होवून मिळणेबाबत जिल्हा परिषदेने विनंती केली होती.

संस्थानमार्फत मंजूर करण्यात आलेली रक्कम रु. ३० कोटी रकमेच्या शाळा खोल्यांसाठी एकदाच मंजूरी मिळावी तसेच शाळा निवडतांना एक खोली ऐवजी त्यातील सर्व खोल्यांना मंजूरी मिळावी म्हणजे किमान ती शाळा व्यवस्थितरित्या पुर्ण होईल. जिल्हा परिषद स्थायी समिती व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये याबाबत चर्चा झालेली आहे, असे जिल्हा परिषदेच्या पत्रात नमूद आहे. उपरोक्त फेरप्रस्तावाच्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीच्या दि. २६.०२.२०१९ निर्णय क्रं. १५९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:- जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शाळा खोल्या बांधकामासाठी संस्थानतर्फे ३० कोटी निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी १० कोटी निधी देण्यात आलेला आहे. सदरचा निधी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने कळविल्यानुसार साधारण क्षेत्रातील शाळेतील नवीन वर्ग खोली बांधकामासाठी प्रतिवर्ग अंदाजे रक्कम रु.६.२० लक्ष व अदिवासी / डोंगराळ क्षेत्रातील नवीन वर्ग खोली बांधकामासाठी प्रति वर्ग खोली अंदाजे रक्कम रु. ६.७० लक्ष या प्रमाणे १५९ वर्ग खोल्या बांधकामासाठी अनुदान वर्ग करण्यात आले आहे.

परंतु मुख्य कार्यकारी अधिकार, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी दि. २२.०१.२०१९ च्या पत्रानुसार सादर केलेल्या प्रस्तावानुसार सन २०१८-१९ च्या DSR नुसार साधारण क्षेत्रातील नवीन वर्ग खोली बांधकामासाठी प्रति वर्ग खोली रक्कम रु. ८.०० लक्ष व अदिवासी / डोंगराळ क्षेत्रातील नवीन वर्ग खोली बांधकामासाठी प्रति वर्ग खोली अंदाजे रक्कम रु. ८.५० लक्ष एवढा अपेक्षित खर्च धरण्यात यावा व त्यानुसार १५९ वर्ग खोलीसाठी वाढीव रक्कम रु. २.८२ कोटी निधी मिळणेस किंवा पहिल्या १० कोटी निधीतून उपरोक्त रु. ८.०० लक्ष व ८.५० लक्ष या तरतूदीप्रमाणे जितक्या वर्ग खोल्या होऊ शकतील तेवढयांची यादी सुधारीत होऊन मिळणेस विनंती केली आहे. तसेच मंजूर करण्यात आलेली रक्कम रु. ३० कोटी एकदाच मंजूर करावी व शाळा खोल्या निवडतांना एक खोली ऐवजी त्यातील सर्व खोल्यांना मंजूरी मिळावी म्हणजे किमान एक शाळा व्यवस्थीत रित्या पुर्ण होईल, असे जिल्हा परिषद स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत चर्चा झालेचे कळविले होते.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अनुदान वितरणाबाबत मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये खाचिका दाखल असल्याने व अनुदान वितरणास परवानगी नसल्याने सद्यस्थितीत वितरीत केलेल्या १० कोटी अनुदानानुसार तालुकानिहाय मंजूर केलेल्या शाळा खोल्यांची संख्या कमी करून त्यानुसार अनुदान सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करावे व तात्काळ वर्ग खोल्यांचे बांधकाम सुरू करण्यात यावे. यापूर्वी वितरीत १० कोटी अनुदानात नवीन डीएसआर नुसार जेवढया शाळा खोल्या बांधकामे पुर्ण होणे शक्य आहे, त्यानुसार शाळा खोल्यांची संख्या जिल्हा परिषदेने निश्चित करावी. मात्र असे करतांना संस्थानने यापूर्वी तालुकानिहाय मंजूर केलेल्या शाळा खोल्यांची संख्या प्रमाणशीर पद्धतीने कमी करणेबाबत जिल्हा परिषद, अहमदनगर यांना कळविण्यात यावे असा निर्णय झाला आहे.

याबाबत संस्थानने जा. न. एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/५९११/२०१९ दि. ०७.०३.२०१९ चे पत्रान्वये सन २०१८-२०१९ चे DSR नुसार जेवढया शाळा खोल्या बांधकामे पूर्ण होणे शक्य आहे त्यानूसार शाळा खोल्यांची संख्या निश्चित करावी मात्र असे करतांना संस्थानने यापूर्वी तालूकानिहाय मंजूर केलेल्या शाळा खोल्यांची संख्या प्रमाणशिर (Proportionate) पद्धतीने कमी करण्यात यावी. असे कळविले होते.

तथापि, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.०८.०३.२०१९ रोजी पत्र पाठवून विधी व न्याय विभागाच्या दि. २६ जुन २०१८ च्या शासन निर्णयान्वये शाळांची निवड श्री साईबाबा संस्थानच्या स्थानिक उपसमिती मार्फत करण्यात यावी असे कळविले आहे. तसेच त्यांनी यापूर्वी मंजूर केलेल्या १५९ खोल्यांची प्रमाणशिर (Proportionate) पद्धतीने खोल्या संख्या कमी करून १२४ खोल्यांच्या निवड कळविले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेने १२४ खोल्यांची निवड करणेबाबत स्थानिक उपसमितीने केलेली शिफारस दि.२६.०७.२०१९ निर्णय क्रं. ३८३ अन्वये मान्य करण्यात येऊन जिल्हा परिषद यांचे प्रस्तावानुसार शाळा खोल्या बांधाकामासाठी १५९ खोल्यांमधून तालुकानिहाय १२४ खोल्यांची खालीलप्रमाणे निवड करण्यात आली.

| अ.न. | तालुका | मंजूर वर्ग खोल्या | सन १८-१९ डीएसआर नुसार एकूण रक्कम (लाखात) | अनुदान एकूण रुपये लाखात | शेरा नवीन प्रस्तावानुसार प्रति शाळा खोली रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नेवासा | ०८ | ६४.०० | ६४.०० | ८.०० |
| २ | कर्जत | ०८ | ६४.०० | ६४.०० | ८.०० |
| ३ | पाथर्डी | ०८ | ६४.०० | ६४.०० | ८.०० |
| ४ | कोपरगांव | १७ | १३६.०० | १३६.०० | ८.०० |
| ५ | श्रीगोंदा | ०८ | ६४.०० | ६४.०० | ८.०० |
| ६ | जामखेड | ०८ | ६४.०० | ६४.०० | ८.०० |
| ७ | नगर | ०८ | ६४.०० | ६४.०० | ८.०० |
| ८ | श्रीरामपुर | ०९ | ७२.०० | ७२.०० | ८.०० |
| ९ | शेवगांव | ०८ | ६४.०० | ६४.०० | ८.०० |
| १० | पारनेर | ०८ | ६४.०० | ६४.०० | ८.०० |
| ११ | राहूरी | १० | ८०.०० | ८०.०० | ८.०० |
| १२ | राहाता | ०८ | ६४.०० | ६४.०० | ८.०० |
| १३ | संगमनेर | ०८ | ६८.०० | ६८.०० | ८.५० |
| १४ | अकोले | ०८ | ६८.०० | ६८.०० | ८.५० |
| | **एकूण** | **१२४** | **१०००.००** | **१०००.००** | |

उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये जा. न. एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/१५२६/२०१९ दि.२४ जुलै २०१९ अन्वये जिल्हा परिषद अहमदनगर यांना, १५९ शाळा वर्ग खोल्या- ऐवजी १२४ शाळा खोल्यांची तालुका निहाय यादी कळविण्यात येऊन विधी व न्याय विभागाचे दि. २६.जुन २०१८ चा शासननिर्णय व श्री साईबाबा संस्थानविश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अटी शर्तीनुसार अनुदान विनीयोग करणेबाबत कळविण्यात आले होते.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे पत्र:- मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर यांनी जा. क्र./प्रशा/८२९७/२०१९ दि. १६/११/२०१९ अन्वये अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर व पृष्ठांकित प्रत मा. कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांना पाठवून मनुष्यबळाअभावी काम करण्यास असमर्थता दर्शवून, सदर कामे जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांचेकडील उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाकडून करून घेणेबाबत कळविले होते. त्यानुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना जा. न. एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/३७९६/२०१९ दि. २८.१२.२०१९ अन्वये याबाबत उचित कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले होते.

मा.मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचे पत्र:- मा.मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद अहमदनगर जा. क्र. कार्या-४/बांध/४७/२०२० दि. १६.०१.२०२० अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून व विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेने जिल्हा परिषद अहमदनगर यांना शाळा वर्ग खोल्या बांधकामासाठी रक्कम रु. १० कोटी अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे. मात्र मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर यांनी जा. क्र./प्रशा/८२९७/२०१९

दि.१६/११/२०१९ अन्वये अहमदनगर जिल्हयाचे कार्यक्षेत्र व या कार्यालयाचे कार्यक्षेत्र, अपुरा तांत्रिक मनुष्यबळ या बाबी पहाता विषयांकित काम हाती घेणे व त्याचा उत्कृष्ट दर्जा राखणे या कार्यालयास शकय होणार नाही. तसेच सदर कामे ठेव अंशदान पद्धतीने करावी लागतील. यास सबंधीत विभागाकडून परवानगी घेणे कठीण आहे. या सर्व बाबींचा विचार करून सदर कामे जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांचेकडील उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाकडून करून घेणेबाबत कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय:-

**१)** जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या अखत्यारीतील शाळांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर यांचेमार्फत करण्यात यावे, अशी शासन निर्णयात अट आहे याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घ्यावी लागेल.

**२)** मा. मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी कळविल्याप्रमाणे जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत कामे करावयाची झाल्यास त्यास प्रथम तदर्थ समितीची मान्यता घ्यावी लागेल त्यानंतर विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/८९३/प्र.क्र.८८/का.१६ दि.२६ जुन,२०१८ दुरुस्ती झालेनंतर तसे जिल्हा परिषद अहमदनगर यांना कळविता येईल.

प्रस्ताव:- जिल्हा परिषद अहमदनगर यांचे प्रस्तावानुसार श्री साईबाबा संस्थानने १४ तालुक्यातील १२४ शाळा खोल्यांचे बांधकामासाठी वितरीत केलेल्या रु.१० कोटी निधीतून करावयाची शाळा खोल्यांची बांधकामे सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर यांचेऐवजी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत करण्याचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.११२** **यावर सविस्तर चर्चा झाली, समितीचे असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर यांनी दि.१६.११.२०१९ रोजीचे पत्रान्वये सदरचे काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानने १४ तालुक्यातील १२४ शाळा खोल्यांचे बांधकामासाठी वितरीत केलेल्या रु.१० कोटी निधीतून करावयाची शाळा खोल्यांची बांधकामे सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर यांचेऐवजी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा व मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.१३** **आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अर्थसहाय्य मागणीकरीता दररोज, नोंदणीकृत संस्था, शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था, तसेच वैयक्तीकरित्या अर्ज येत असतात. सदरच्या अर्जांद्वारे, १) बांधकाम, २) आश्रमातील लोकांचा खर्च, ३) वाचनालयासाठी पुस्तके-फर्निचर, ४) दवाखान्यासाठी मशिनरी / औषधे, ५) संमेलने, स्पर्धा, शिबिरे, ६) दुष्काळी भागाकरीता चारा/अन्नधान्य/पाणी ७) मुलांच्या शिक्षणासाठी मदत, ८) विधवा/निराधार/अपंग यांना दैनंदिन खर्चासाठी मदत, ९) व्यवसाय सुरू करणेकरीता मदत, १०) मुलांचे लग्नासाठी मदत, ११) जळीत झाल्याने मदत, अशाप्रकारे अनेक कारणासाठी अनुदान मागणी केली जाते.

संस्थान अधिनियम तरतुद:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम २००४ चे कलम २१(२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या विविध प्रयोजनासाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्कयापेक्षा अधिक नसेल एवढा भाग,समितीस वेळोवेळी खालील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

कलम २१ (२) (एक) " छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाचे पूर्व मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रूग्णालय, आधारगृह, किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था, अथवा

कला वा साहित्याशी संबंधित असलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांची स्थापना व देखभाल करून घेणेसाठी, अशी तरतुद आहे.

संस्थान कडे दाखल झालेले अर्ज:- दि.०१.०१.२०२० ते ३१.०१.२०२० कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | अनुदान मागणीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | आंबवडे सैनिक विकास मंडळ, महाड | शाळा इमारत बांधकाम | |
| २ | चिंचवड बधिर मूक विद्यालय पुणे | विद्यालयासाठी मदत | |
| ३ | श्री साई शिक्षण संस्था कांचनवाडी | शाळा इमारत नुतनीकरणासाठी | |
| ४ | जय योगेश्वर भगवान सामाजिक व शैक्षणीक मंडळ विंचूरे ता. सटाणा | शाळा इमारत बांधकामासाठी | |
| ५ | श्री हितेंद्र बारिया | दैनंदीन गरजेसाठी | |
| ६ | आदिशक्ती गौरक्षण संस्था, अकोला | गोशाळा मदत | |
| ७ | श्री हरिहरनाथ बहूउद्देशीय सेवाभावी संस्था, हिंगणी | सामूहिक विवाह सोहळा | |
| ८ | श्री माद्विरशैव पट्टशाली कोष्टी समाज विकास मंडळ सोलापूर | पार्किंग बांधकाम | |
| ९ | सन्मति नर्सिंग होम ॲम्बुलन्स फंड, माढा | इमारत बांधकाम | |
| १० | श्री चैतन्य विश्वास कुलकर्णी, दाढ | ट्रेकिंग प्रशिक्षणासाठी | |
| ११ | श्री एस. नारायण आयप्पा | अन्नदानासाठी मदत | |
| १२ | लक्ष्मी दिव्यांग जन सेवा संस्थान, वाराणसी | अनाथ असहाय्यांसाठी मदत | |
| १३ | श्री दिगंबर एस. गवळी, सोलापूर | मुलीचे लग्नासाठी मदत | |
| १४ | श्री साईनाथ सेवा मंडळ, सिंधुदुर्ग | मंदिराचे जिर्णोद्धारासाठी | |
| १५ | श्री सिद्धीविनायक मंदिर ट्रस्ट आवरे | मंदिराचे जिर्णोद्धारासाठी | |
| १६ | श्री शंकर नारायण आयप्पा | अन्नदानासाठी मदत | |
| १७ | श्री शंकर नारायण आयप्पा | अन्नदानासाठी मदत | |
| १८ | श्रीमती ममता महेंद्र भाटे, सांगली | उदर निर्वाहासाठी | |
| १९ | श्रीमती पूर्वा सिमा विकास प्रतिष्ठान | शाळेसाठी मदत | |
| २० | श्री अशोक सतीजा | आर्थिक मदत | |
| २१ | द ब्लाईन्ड ॲन्ड हयुमॅनिटी वेलफेअर सेंटर | अंधासाठी मदत | |
| २२ | श्री प्रसाद साटलकर | रेल्वेसाठी मदत | |
| २३ | श्रीमती रेखा दिलीप मंजुळ गंगापुर | उपजिवीकेसाठी | |
| २४ | श्री अमित डी. घोंगडे, कलबुर्गी | वैद्यकीय शिक्षणासाठी | |
| २५ | राजर्षी श्री शाहू प्रतिष्ठान, पुणे | शाळेसाठी मदत | |
| २६ | श्रीमती बसंतीबाई लक्ष्मीनारायण चांडक रिसर्च फौंडेशन ट्रस्ट, अकोला | डायलेसिस मशीनसाठी | |
| २७ | दाजी प्रतिष्ठान सोलापूर | संगणक साहित्यासाठी | |
| २८ | गुजरात असोशिएशन ऑफ द डेफ | बहि-यांसाठी मदत | |
| २९ | ग्रामपंचायत लाडेगांव, वाळवा | जलसंधारणासाठी | |
| ३० | सेलको सोलर लाईट प्रा. लि. बंगलोर | सोलर पॉवर प्रकल्प | |
| ३१ | द बेने इसरेल कॉन्फरन्स एज्युकेशन फंड | शिष्यवृत्तीसाठी मदत | |
| ३२ | मेवात क्षेत्र गौशाला समिती, हरियाणा | गोशाळा मदत | |
| ३३ | श्री चैतन्य विश्वास कुलकर्णी | शिखर चढण्यासाठी | आ. श्री राधाकृष्ण विखे पाटील विधानसभा सदस्य शिर्डी |
| ३४ | राष्ट्रीय स्वच्छ गंगा मिशन | स्वच्छ गंगा मिशनसाठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | श्री सतिष गोपाळ पाटील, | अपंग नातीच्या खुर्चीसाठी | |
| ३६ | श्री भगवान रामकृष्ण कोंढरे, निफाड | आर्थिक मदत | |
| ३७ | करवीर हायकर्स कोल्हापूर | शिखर चढण्यासाठी | |
| ३८ | श्रीमत सुंदरामुर्ती एज्युकेशन ट्रस्ट | सामाजिक कार्यासाठी | |
| ३९ | जनसेवा केंद्र, चन्दौसी यु. पी. | शाळा इमारतीसाठी | |
| ४० | श्री अथर्व धनंजय मोरे, नाशिक | शिक्षणासाठी मदत | |
| ४१ | मुक्ती श्रद्धांजली कल्याणकारी सेवा संस्था, नागपूर | शववाहिकासाठी | |
| ४२ | श्रीमती पुर्वा सिमा विकास | शाळेसाठी मदत | |
| ४३ | ब्राईट फ्युचर ऑर्गनाइजेशन फॉर ब्लाइन्ड | अंधासाठी मदत | |
| ४४ | श्री साईदत्त गोशाळा पांजरापोळ संस्था ,नाशिक | गोशाळा मदत | |

विभागाचा अभिप्राय :-

१) वैयक्तीक आर्थिक मदत देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतूद नाही.

२) आर्थिक मदत मागणीकरीता दिलेल्या अर्जाबाबतची सद्यस्थितीची अर्जदार विचारणा करीत असतात. त्याबाबत संबंधितांना त्यांच्या “अर्जाबाबतची सद्यस्थिती कळविणेबाबतच्या विषयावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र.७६६ अर्जदारास अर्जाची सद्यस्थिती कळविण्याची आवश्यकता नाही" असे ठरले आहे."

३) अधिनियम २००४ मध्ये ज्या बाबीसाठी अनुदानची स्पष्ट तरतूद आहे संस्थानने त्यासाठी योजना तयार केलेली आहे व अर्ज मागविले आहेत त्याच अर्जाचा अनुदान देतांना विचार व्हावा असे नम्र मत आहे.

प्रस्ताव:- दि.०१.०१.२०२० ते ३१.०१.२०२० या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीबाबत आलेले अर्ज अवलोकनार्थ व नस्तीबंद करण्याचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.११३** **या विषयाची सविस्तर चर्चा आयत्या वेळेचा विषय नं.०२ सह होऊन, दि.०१.०१.२०२० ते ३१.०१.२०२० या कालावधीत आलेले आर्थिक अनुदान मागणी अर्ज नस्तीबध्द करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१४** **Microsoft Licenses खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Cloudstrats Technologies Pvt.Ltd., Mumbai यांनी देऊ केलेल्या निम्नत्तम दरांबाबत चर्चा होऊन त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध विभागामध्ये कार्यरत असलेल्या संगणक संचासाठी Microsoft Licenses खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

<table>
<tr><td>०१</td><td>खरेदी करावयाचे साहित्य / वस्तूचा तपशिल.</td><td>Microsoft Licensesखरेदीकरणे.</td></tr>
<tr><td>०२</td><td>मागणी</td><td><table><tr><th>Sr.No</th><th>Description</th><th>Qty</th></tr><tr><td>01</td><td>Visio Pro 2019 SNGL OLP NL</td><td>04</td></tr><tr><td>02</td><td>MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty</td><td>50</td></tr><tr><td>03</td><td>WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL ChrtyUsrCAL</td><td>150</td></tr></table></td></tr>
<tr><td>०३</td><td>ईनिविदा प्रसिद्धी-</td><td>दिते दि २०१९.११.०४..१५२०१९.११.</td></tr>
<tr><td>०४</td><td>वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते ?</td><td>www.mahatenders.gov.in, संस्था न वेबसाईट (sai.org.in) व ई-मेलद्वारे</td></tr>
<tr><td>०५</td><td>तर तसे, कोणाला पाठविले ?</td><td>११ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे कळविले.</td></tr>
<tr><td>०६</td><td>निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ</td><td>दि.०४.११.२०१९ सकाळी ११:०० वा.<br>तांत्रिक निविदा- दि.२४.१२.२०१९<br>व्यावसायीक निविदा- दि.०७.०१.२०२०</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०२ (दोन) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०२ (दोन) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का ? | लागू नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का ? | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे . |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | लागू नाही . |

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर –

| अ. नं. | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर(प्रती नग रु.) | स्थिती |
|---|---|---|---|
| **Visio Pro 2019 SNGL OLP NL** | | **04 Nos Qty** | |
| 01 | M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik | 15,174.80 | L2 |
| **02** | **M/s Cloudstrats Technologies Pvt Ltd., Mumbai** | **14,900.20** | **L1** |
| **MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty** | | **50 Nos Qty** | |
| 01 | M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik | 7,363.20 | L2 |
| **02** | **M/s Cloudstrats Technologies Pvt Ltd., Mumbai** | **7,230.98** | **L1** |
| **WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL ChrtyUsrCAL** | | **150 Nos Qty** | |
| 01 | M/s Minitek Systems India Pvt Ltd, Nashik | 894.44 | L2 |
| **02** | **M/s Cloudstrats Technologies Pvt Ltd., Mumbai** | **876.48** | **L1** |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

| **Sr. No** | **Year-2017-2018** | **UOM** | **Amount** | |
|---|---|---|---|---|
| | | | **2017-2018** | **2018-2019** |
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | Nos | -- | -- |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | Nos | -- | -- |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL ChrtyUsrCAL | Nos | -- | -- |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल -

| अ.नं. | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | -- | -- |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | -- | -- |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL ChrtyUsrCAL | -- | -- |
| एकूण रक्कम | | | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक | निरंक |
| १६ | मागील खरेदी दर | अप्रमाणे १३ .नं. |

१७ मागील पुरवठादार

| अ.नं. | वस्तूचे वर्णन | पुरवठादाराचे नाव |
|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | -- |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | -- |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL ChrtyUsrCAL | -- |

१८ सध्याचे निम्नत्तम निविदाकाराने सादर केलेले दर

| **Sr. No.** | **Specification of Material** | **Amount** |
|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | 14,900.20 |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | 7,230.98 |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL ChrtyUsrCAL | 876.48 |

१९ सध्याचे निम्नत्तम

| **Sr. No.** | **Name of Bidder** | **Specification of Material** |
|---|---|---|
| 01 | M/s Cloudstrats | Visio Pro 2019 SNGL OLP NL |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | निविदाकाराचे नाव | 02 | Technologies Pvt Ltd., Mumbai | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty |
| | | 03 | | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL ChrtyUsrCAL |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करणेत आला आहे का ? | होय | | |
| २१ | सदर खरेदीचा प्रकल्प (प्रस्ताव) खरेदी समितीसमोर सादर करणेत आला असल्यास उपस्थितांची नावे | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.विभाग प्रमुख, आयटी विभाग. | | |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रक्कसम रुपये ----प्रति सेट मार्केट रेट रुपये ---- | | | |
| २३ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक जास्त/ने कमी %<br>रु-----------------.रु -----------.रु ----------------------.रु --------------. | | | |

| अ.नं. | तपशिल | मागील खरेदी दर | सध्याचे दर | फरक | % ने कमीजास्त/ |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | -- | 14,900.20 | -- | -- |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | -- | 7,230.98 | -- | -- |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL ChrtyUsrCAL | -- | 876.48 | -- | -- |

२४.संक्षिप्त टिप:- संस्थानचे विविध विभागामध्ये कार्यरत असलेल्या संगणक संचासाठी Microsoft Licenses खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत दोन वेळेस मुदतवाढी अंती प्राप्त झालेल्या दोन ई-निविदा खरेदी नियमावली मुद्दा क्र.४.४.३.१ यास अधिन राहुन उघडणेत आलेल्या आहेत. उघडणेत आलेल्या निविदांपैकी निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Cloudstrats Tech. Pvt Ltd., Mumbai यांनी देऊ केलेले निविदेतील सर्व लायसन्सेसचे दर अनुक्रमे रु.१४,९००.२०, ७,२३०.९८ व ८७६.४८ एकूण रक्कम रुपये ५,५२,६२१.८० (सर्व करांसहीत) हे निम्नत्तम आहेत.

तसेच सदर लायसन्सेसचे दराबाबत मायक्रोसॉफ्ट यांचे संकेतस्थळावर पडताळणी केली असता, पुढीलप्रमाणे दर निदर्शनास येतात.

| Sr.No. | Description | Rate |
|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | 39,599 |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | 25,499 |
| 03 | WinSvr CAL SNGL LicSAPk OLP NL ChrtyUsrCAL | 12,819 |

ई-निविदेद्वारे प्राप्त झालेले दर हे धर्मदाय संस्थेसाठीचे असल्याने सदर दरामध्ये अधिकची सुट दिलेली आहे. सबब, M/s Cloudstrats Technologies Pvt Ltd., Mumbai यांनी देऊ केलेल्या निम्नत्तम दरांबाबत त्यांचेबरोबर चर्चा होऊन त्यांना याकामीपुरवठा आदेश देणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.११४ सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर ठेवण्यात येऊन निम्नत्तम दरधारक यांना चर्चेसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.१५** **मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ, कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांची टोन्ड गाय दुध दरामध्ये वाढ मिळणेचे मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव व मे. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा.संघ, कोपरगाव यांनी खालीलप्रमाणे कॅन्टीन विभागासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या टोन्ड गाय दूध दरामध्येदरवाढ मिळणेची विनंती केलेली आहे.

मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तीसगाव यांनी दि. १४.१२.२०१९ रोजीचे पत्रान्वये " दुधाचे घटते प्रमाण पाहता शासनाने शेतक-यांच्या दुध खरेदी दरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केलेली आहे त्यामुळे संघ प्रशासनाने दुध विक्री दरामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तरी राजहंस दुधाचा दर प्रती लिटर ८.०० रु प्रती लिटरने वाढ करुन द्यावा " अशी विनंती केली आहे. तर मे. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा.संघ, कोपरगाव यांनी दि. ०६.१२.२०१९ रोजीच्या पत्राने सध्या दुष्काळी परिस्थिती व दुधाचे घटते प्रमाण पाहता सर्व दुध संघानी दुध उत्पादकांना दर वाढ करुन दिलेलीआहे.त्या दृष्टीने आपल्या संघाने देखील दुध संघानी दुध उत्पादक शेतकरी यांना दुध खरेदीमध्ये दरवाढ करुन रु. ३०/- प्रती लिटर प्रमाणे दरवाढ दिलेली आहे. त्यामुळे संघ प्रशासनाने विक्री दरात ही वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. करिता संस्थानला पुरवठा होणाऱ्या दुधात रु. ८/- प्रती लिटरने वाढ करुन देण्याची मागणी केली होती. मात्र त्यानंतर दि. १८.१२.२०१९ रोजीच्या पत्राने "देश व राज्यामध्ये अतिवृष्टीमुळे चारा उपलब्ध नसल्याने दुध उत्पादनाचे प्रमाणात घट झालेली आहे.त्याच बरोबर दुध उत्पानासाठी आवश्यक असणारे घटक जसे की पशुखाद्य,चारा,विद्युतबील,प्रोसेसिंग चार्जेस इ. बाबींमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे, त्यामुळे व्यावसायिक संघ एकत्र येऊन दुध विक्रीचे दर ठरवित आहे. सध्या संस्थानला होणाऱ्या दुधाच्या उत्पादकांकडील खरेदी दर रु. ३१/- ते ३२/- प्रती लिटर पर्यंत झालेला आहे. त्यावर वाहतुक, प्रक्रिया खर्च, पॉलिथीन याचा विचार करता रु. १२/- पर्यंत खर्च येत आहे. म्हणजेच दुधाची किंमत रु. ४३/- ते ४४/- प्रती लिटर इतकी झालेली आहे. व त्याप्रमाणे बाजारपेठे मध्ये दर वाढविण्यात आलेले आहे. त्याबाबतचे विविध दुध संघाचे दुध विक्री व दुध खरेदीचे दरपत्रक सोबत जोडुन देत आहोत. श्री साईबाबा संस्थान हे मोठ्या प्रमाणावर भाविकांचे श्रध्दा व सबुरीचे ठिकाण असल्याने व ते संघ कार्यक्षेत्रात असल्याने पुरवठा करण्यात येणाऱ्या पॅकिंग दुधाचा दर रु. ४३/- किंवा रु.४४/- या प्रमाणे नको आहे, तो दर रु.३९/- प्रती लिटर प्रमाणे मिळावा म्हणजेच रु.१०.२० पैसे प्रती लिटर वाढ मिळावी कारण संघ सहकारी तत्वावर दुग्ध व्यवसाय करीत असुन श्री साईबाबा संस्थानचे कार्यक्षेत्रातील दुध उत्पादकांना आर्थिक उत्पन्न मिळवुन देण्याचे काम करीत आहे" अशा आशयाची विनंती केलेली आहे. सदर ०३ ही पत्रे त्यासोबतच्या सह पत्रांसह या सोबत सादर केलेली आहेत.

वरील अर्जामध्ये सदर दोन्हीही पुरवठादारांनी रु. ८ प्रती लिटर दरवाढ मागितलेली आहे. तसेच मे. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा.संघ, कोपरगाव यांनी दि. १८.१२.२०१९ रोजीचे अर्जाने रु. १०.२० पैसे प्रती लिटर दरवाढ मिळणेची मागणी केली आहे. सदर अर्ज दि. ०९.०१.२०२० रोजी या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे. या अर्जासोबत त्यांनी विविध पेपर कात्रणे, महानंद डेअरी विक्री करावयाचे परिपत्रक,बिहार स्टेट मिल्क को – ऑप फेडरेशन लि. ऑफीस ऑर्डर, पंतजली दुध उत्पादकांसाठी दरपत्रक, पंचमहल जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ लि., गोधरा यांचे परिपत्रक वगैरे कागद पत्रे जोडूली आहेत.

सदर प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे :-

मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दूध उत्पादक संघ, कोपरगांव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स तिसगांव यांना अनुक्रमे पुरवठा आदेश जा नं.एसएसएस/वशी/खरेदी/८३६/२०१९ दि.११.०६.२०१९ आणि पुरवठा आदेश जा नं.एसएसएस/वशी/खरेदी/८३५/२०१९ दि.११.०६.२०१९ अन्वये कॅन्टीन विभागासाठीटोन्ड गाय दूध पुरविणेकामी विभागुन पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. त्यातील ३ तिमाहीचा कालावधी संपलेला आहे.

संस्थानने मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दूध उत्पादक संघ, कोपरगांव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स तिसगांव यांना दि.११ जून, २०१९ ते ३१ मार्च, २०२० या कालावधीसाठी त्यांचे दर समान असल्यामुळे विभागुन वार्षिक दूध पुरविण्यासाठी व या कालावधीसाठी ०४ तिमाहीचे एकत्रित पुरवठा आदेश दिलेले आहेत. त्या संदर्भात त्यांनी दूध दरवाढीची वरील मागणी केलेली आहे.

सध्या जानेवारी २०२० ते मार्च २०२० या तिमाहीचे कालावधीसाठी दुध पुरवठा सुरु आहे दिलेले पुरवठा आदेशाचा तपशील खालील प्रमाणे :-

अ) मे. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा.संघ, कोपरगाव

| अ. नं. | तपशिल | मागणी | दर प्रती लिटर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | टोन्ड गाय दूध (पाश्चराईज्ड, होमोनाईज्ड) ३.५ फॅट ८.५ SNF५०० मिली पॅकिंग दिवसातून दोन वेळेस- गोदावरी कालावधी जाने - मार्च २०२० अखेर | १,८९,००० लिटर | रु.२९/- | ५४,८१,०००/- |

ब) मे. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगाव

| अ. नं. | तपशिल | मागणी | दर प्रती लिटर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | टोन्ड गाय दूध (पाश्चराईज्ड, होमोनाईज्ड) ३.५ फॅट ८.५ SNF५०० मिली पॅकिंग दिवसातून दोन वेळेस- राजहंस कालावधी जाने - मार्च २०२० अखेर | १,८९,००० लिटर | रु.२९/- | ५४,८१,०००/- |

सन २०१९-२० चे सदरची ई-निविदा, पुरवठा आदेश व करारनामा यामध्ये खालीलप्रमाणे अटी शर्ती आहेत.

ई- निविदेतील अटी/ शर्ती:-

अट क्रं H-3) मागणी करणेत आलेले दर हे पुर्ण वर्षासाठी ४ टप्प्यांमध्ये मागविलेले असल्याने कृषकाळ व पृष्ठकाळाचे वेगवेगळे दर दिले जाणार नाहीत.मान्य दरामध्ये कोणत्याही कारणस्तव दरवाढ मिळणार नाही/ मागता येणार नाही. मंजूर दरामध्येच निविदापुरवठा कालावधीत दुधाचा पुरवठा करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

अट क्रं N-3) निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या ब्रॅन्डप्रमाणे दुध पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठादारास असणार नाही. अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठादाराने दुध पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा दुध पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेर निविदा मागणी करुन दुध खरेदी करावे लागल्यास जादा येणारा खर्च, नुकसान भरपाई म्हणुन पुरवठादाराकडुन वसुल केला जाईल.

अट क्रं N-4) निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा. युध्द, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भुकंप वगैरे) पुरवठादार दुधाचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थिती अनुरुप घेण्यात येईल.

पुरवठा आदेशातील अटी/ शर्ती:-अट क्रं. ५) दुधाचे पुरवठा दर हे पुर्ण वर्षासाठी ४ टप्प्यांमध्ये मागविलेले असल्याने कृषकाळ व पृष्ठकाळाचे वेगवेगळे दर दिले जाणार नाहीत.मान्य दरामध्ये पुरवठा कालावधीत अगर संस्थानची पुढील वर्षाची ई- निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत कुठलीही दरवाढ मिळणार नाही. सदर दुधाच्या पुरवठ्यापोटी कुठलीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

अट क्रं २६) संस्थानने मान्य केलेल्या दराने व निवडलेल्या ब्रॅन्डप्रमाणे दुध पुरवठा करणे बंधनकारक आहे. दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठादारास असणार नाही. अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठादाराने दुध पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा दुध पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेर निविदा मागणी करुन दुध खरेदी करावे लागल्यास जादा येणारा खर्च, नुकसान भरपाई म्हणुन पुरवठादाराकडुन वसुल केला जाईल.

अट क्रं २७) पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा. युध्द, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भुकंप वगैरे) पुरवठादार दुधाचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थिती अनुरुप घेण्यात येईल

करारनामा अटी/ शर्ती:-

अट क्रं १८) कराराचे मुदतीत पार्टी नं.२ यांनी मंजूर झालेल्या दराने टोन्ड गाय दूधाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पार्टी नं.२ यांना असणार

नाही. पार्टी नं.२ यांनी टोन्ड दूध पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास पार्टी नं.१ यांना बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन दूध खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पार्टी नं.२ यांचेकडून वसूल केली जाईल. त्याबाबतही पार्टी नं.२ ची तक्रार चालणार नाही.

अट क्रं २३) पार्टी नं. १ यांनी दुधाचे निविदा दर हे ०४ टप्प्यांमध्ये मागविल्यामुळे पुरवठा कालावधीत मंजूर दराने दुधाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. त्यामुळे कृषकाळ व पृष्टकाळाचे वेगवेगळे दर दिले जाणार नाहीत. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही/मागता येणार नाही. मंजूर दरामध्येच पूर्ण कालावधीत दूधाचा पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील.

अट क्रं २६) पार्टी नं. २ यांनी पार्टी नं. १ यांना मंजूर दराने व मंजुर ब्रॅन्डप्रमाणे दुध पुरवठा करणे बंधनकारक आहे.

मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पार्टी नं. २ यांना असणार नाही. अथवा अशा प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही. पार्टी नं. २ यांनी दुध पुरवठा करावयाचे नाकारल्या अथवा पुरवठा न केल्यास बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन दूध खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पार्टी नं.२ यांचेकडून वसूल केली जाईल.

अट क्रं २७) पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा. युध्द, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भुकंप वगैरे) पुरवठादार पार्टी नं. २ दुधाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पार्टीनं. २ पुरवठादाराने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थिती अनुरुप घेण्यात येईल.

संस्थानने वरील अटी/शर्ती प्रमाणे पुरवठा आदेश दिलेला असुन त्यासाठीचा करारनामा देखील केलेला आहे. त्यानुसार मे.गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव व स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांचेकडून सध्या पुरवठा आदेशाप्रमाणे शेवटच्या तिमाहीचा संस्थानला टोन्ड गाय दूध पुरवठा नियमित चालू आहे.

मे.गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव व स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी संदर्भिय पत्राद्वारे अनुक्रमे रु. १०.२० पैसे व रु. ८/- प्रती लिटर दूध दरवाढीची मागणी केलेली आहे.

संस्थानकडुन जानेवारी ते मार्च २०२० याकालावधीसाठी मे. गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव यांचे प्रती लिटर दरवाढीचे रु.१०.२० पैसे मागणी प्रमाणे दुध दरवाढ द्यावयाची झाल्यास अंदाजे १,८९,००० लिटर दुधासाठी रु. १०.२० पैसे प्रती लिटरने रुपये १९,२७,८००/- खर्च येईल तसेच स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांचे प्रती लिटर दरवाढीचे रु. ८/- मागणी प्रमाणे दुध दरवाढ द्यावयाची झाल्यास रुपये १५,१२,०००/ खर्च येईल. दोन्ही मिळुन अंदाजे एकुण रुपये ३४,३९,८००/- संस्थानला अतिरिक्त खर्च येईल. यामध्ये मागणी कमी-जास्त झाल्यास खर्चाची रक्कमही कमी-जास्त होईल.

संस्थानने ई-निविदा, पुरवठा आदेश व करारनामा यातील अटी/शर्तीमध्ये दरवाढ दिली जाणार नाही, अशा तरतुदी नमुद केलेल्या आहेत. तसेच पुरवठा कालावधी ही पुढील ०२ महिन्यात संपणार असुन नविन ई-निविदा प्रक्रीया करण्यात येणार आहे. तसेच दुध दरवाढ देण्याबाबत महाराष्ट्र शासनाने कुठलाही निर्णय घेतलेला नाही.

सध्या दुधाचा तुटवडा व त्यामुळे दरात झालेली दरवाढ ही वस्तुस्थिती असली तरी वरील निविदा, पुरवठा आदेश व करारनामा तरतुदी विचारात घेता मे.गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव व स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी केलेली दरवाढीची मागणी विचारात घेणे उचित होणार नाही असे वाटते.

तथापी मे. गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव व मे. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी केलेली दरवाढीची मागणी मा. तदर्थ (**Ad- hoc**) समितीपुढे उचित निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.११५** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१६** **संस्थानचे कर्मचारी गणवेश कापड खरेदीकामी ई-निविदेतील प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे कर्मचारी गणवेश कापड खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | संस्थानचे कर्मचारी गणवेश कापड खरेदी |
| ०२ | मागणी | संस्थानचे कर्मचारी गणवेश कापड |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. २५.११.२०१९ ते दि. १०.१२.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व १० निविदाधारकांना ई-मेल व्दारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | १० ईमेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – २५.११.२०१९<br>टेक्निकल बीड – १८.१२.२०१९<br>कमर्शियल बीड – ०७.०१.२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०८ (आठ) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ०२ निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. तर ०६ निविदाधारकांना MSME अंतर्गत सुट आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | खालील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे |

| **Sr. No** | **Description of Work / Item(s)** | **No.of Qty in Meter** | **KhadiGram udyogVikas Samiti** | **M B TRADING COMPANY** | **M/s Asha** | **PANAM INTERNATIONAL** | **MAHARSHTRA STATE POWER LOOMS CORPORATION LTD.** | **SONAL TEX** | **HIMALAYA EXIM AND TRADE** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सुटिंग कापड अधिकारी वर्ग | 123.00 | 252.00 | 207.00 | **131.00** | 450.00 | 216.00 | 185.00 | 214.90 |
| 2 | शर्टींग कापड अधिकारी वर्ग | 255.00 | 94.50 | 161.00 | **76.62** | 200.00 | 98.00 | 127.00 | 79.96 |
| 3 | सुटिंग कापड- (लिपीक टंकलेखक) - | 411.00 | 252.00 | 207.00 | **131.00** | 350.00 | 199.00 | 185.00 | 214.90 |
| 4 | शर्टींग कापड- (लिपीक टंकलेखक)- | 855.00 | 94.50 | 161.00 | **76.62** | 175.00 | 90.00 | 127.00 | 79.96 |
| 5 | सुटिंग कापड - रेग्युलर खाकी (सुरक्षा निरीक्षक व पहारेकरी) | 1014.00 | 252.00 | 207.00 | **123.43** | 350.00 | 204.00 | 185.00 | 214.90 |
| 6 | सुटिंग कापड - हाफ सफारी (मदतनीस/शिपाई) | 4883.00 | **94.50** | 207.00 | 133.11 | 250.00 | 190.00 | 185.00 | 214.90 |
| 7 | सुटिंग कापड-हाफ सफारी (सफाई कर्मचारी) | 998.00 | 252.00 | 207.00 | **133.11** | 250.00 | 199.00 | 185.00 | 214.90 |
| 8 | सुटिंग कापड - हाफ सफारी (वॉर्डबॉय / मदतनीस) | 668.00 | **94.50** | 207.00 | 133.11 | 250.00 | 199.00 | 185.00 | 214.90 |
| 9 | सुटिंग कापड- (तांत्रीक कर्मचारी व नवीन आलेले फायर सेफ्टी कर्मचारी) | 329.00 | 252.00 | 207.00 | **131.00** | 350.00 | 199.00 | 185.00 | 214.90 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | शर्टींग कापड तांत्रिक कर्मचारी व नवीन आलेले फायर सेप्टी कर्मचारी | 685.00 | 94.50 | 161.00 | **76.62** | 175.00 | 90.00 | 127.00 | 79.96 |
| 11 | सुटींगकापडफायर सेप्टी विभागातील कर्मचारी | 56.00 | 252.00 | 207.00 | **131.00** | 350.00 | 199.00 | 185.00 | 214.90 |
| 12 | शर्टिंग कापड फायर सेप्टी विभागातील कर्मचारी | 115.00 | 94.50 | 161.00 | **76.62** | 175.00 | 90.00 | 127.00 | 79.96 |
| 13 | पेटीकोट (परकर)कापड- १०० % कॉटन पॉपलीन | 595.00 | 84.00 | 80.00 | 72.72 | 110.00 | 85.00 | **55.00** | 64.98 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – --- | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - मागील वर्षी गणवेश कापड खरेदी करण्यात आलेले नाही. | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | ---- |
| १७ | मागील पुरवठादार | ---- |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे. आशा, नासिक, मे. खादी ग्रामोद्योग समिती, मुंबई, मे. सोनल टेक्स, मुंबई |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का ? - | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | मागील खरेदी    सध्याचे प्राप्त दर    फरक    % ने कमी/जास्त | |
| | ----    ---    ----    ---- | |

२३. संक्षिप्त टीप – (प्रस्ताव) - संस्थानचे कर्मचारी गणवेश कापड खरेदीसाठी ऑनलाईन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्याची मुदत दि. १०.१२.२०१९ रोजी संपलेली होती. या ई- निविदेत ०८ निविदाकारांनी भाग घेतला होता. दि. १८.१२.२०१९ रोजी या निविदेचे तांत्रिक बीड उघडण्यात आले आहेत. यामध्ये मे. दिवा सिव्हील कॉन्ट्रॅक्टर प्रा.लि.,मुंबई हे निविदाकार तांत्रिक दृष्टया अपात्र ठरले होते. त्यामुळे एकुण ८ प्राप्त निविदेपैकी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०७ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. ०७.०१.२०२० रोजीचे मा. खरेदी समिती सभेत उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे. आशा, नासिक यांचे अ.नं. १,२,३,४,५,७,९,१०,११ व १२ या items साठी तर मे. खादी ग्रामोद्योग समिती, मुंबई, यांचे अ.नं. ६ व ८ करिता आणि मे. सोनल टेक्स, मुंबई यांचे अ.नं १३ साठीचे दर न्युनतम आहेत.

तरी संस्थानचे कर्मचारी गणवेश कापड खरेदीसाठी न्युनतम निविदाधारक मे. आशा, नासिक, मे. खादी ग्रामोद्योग समिती, मुंबई, मे. सोनल टेक्स, मुंबई यांचे दर वरील नमुद केले प्रमाणे itemwise न्युनतम आहेत. त्यांचेशी त्यांनी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन अंतिम निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.११६** **प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक M/s Asha यांनी ई-निविदेतील नमुद दर अंतिम असुन सदरचे दर कमी करण्यास असमर्थ असल्याचे लेखी कळविले आहे. तसेच Khadi Gramudyog VikasSamiti यांनी ई-निविदेत नमुद केलेले अ.नं.६- सुटिंग कापड-हाफ सफारी (मदतनीस/शिपाई) व अ.नं.८- सुटिंग कापड-हाफ सफारी (वॉर्डबॉय/मदतनीस) याकरीताचे दर रु.९४.५० हे नजरचुकीने नमुद केलेले असुन त्याऐवजी रु.२५२/-हे दर ग्राहय धरण्यात यावे, असे लेखी कळविले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कर्मचारी गणवेश कापड खरेदीकामी खालील प्रमाणे निम्नतम दरधारक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**मे. आशा, नासिक**

| SR.No | Description of Work / Item(s) | No.of Qty in Meter | RATE PER METER |
|---|---|---|---|
| 1 | सुटिंग कापड अधिकारी वर्ग | 123 | 131.00 |
| 2 | शर्टींग कापड अधिकारी वर्ग | 255 | 76.62 |
| 3 | सुटिंग कापड - (लिपीक टंकलेखक) | 411 | 131.00 |
| 4 | शर्टींग कापड- (लिपीक टंकलेखक)- | 855 | 76.62 |
| 5 | सुटिंग कापड - रेग्युलर खाकी (सुरक्षा निरीक्षक व पहारेकरी) | 1014 | 123.43 |
| 6 | सुटिंग कापड - हाफ सफारी (सफाई कर्मचारी) | 998 | 133.11 |
| 7 | सुटिंग कापड- (तांत्रीक कर्मचारी व नवीन आलेले फायर सेप्टी कर्मचारी) | 329 | 131.00 |
| 8 | शर्टींग कापड- (तांत्रिक कर्मचारी व नवीन आलेले फायर सेप्टी कर्मचारी) | 685 | 76.62 |
| 9 | सुटींग कापड फायर सेप्टी विभागातील कर्मचारी | 56 | 131.00 |
| 10 | शर्टिंग कापड फायर सेप्टी विभागातील कर्मचारी | 115 | 76.62 |

**मे. सोनल टेक्स, मुंबई**

| SR.NO | Description of Work / Item(s) | RATE PER METER | TOTAL AMOUNT |
|---|---|---|---|
| 1 | पेटीकोट (परकर) कापड- १००% कॉटन पॉपलीन | 55 | 32725 |

**तसेच Khadi Gramudyog Vikas Samiti यांची संस्थानकडे अनामत रक्कम जमा असल्यास ती जप्त करण्यात येऊन, प्रस्तावातील अ.नं.६- सुटिंग कापड-हाफ सफारी (मदतनीस/शिपाई) व अ.नं.८-सुटिंग कापड-हाफ सफारी (वॉर्डबॉय/मदतनीस) याकरीता फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१७** **सन-२०२० चे साईलिला व्दैमासिके मराठी व हिंदी-इंग्रजी तसेच वितरणकामी पाकीटे छपाई करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील निम्नतम दर निश्चीत तसेच निम्नतम दरधारकांस कार्यादेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतुद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये " श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील,"अशी तरतूद आहे.

मा.तदर्थ समिती सभा निर्णयः-

१) मा.तदर्थ समिती दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३६- सन-२०२० साठी ०६ साईलिला अंक (द्वैमासिके) मराठी व व हिंदी-इंग्रजी व वितरणकामी पाकीटे छपाई करून घेणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.३१,७६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रास्तविक– सन-२०२० चे साईलिला मराठी व हिंदी-इंग्रजीद्वैमासिके तसेच वितरणकामी पाकीटे छपाईसाठी मा.तदर्थ समिती दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३६ नुसार रू.३१,७६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार साईलिला द्वैमासिके छपाई करणेसाठी दि.०८.०१.२०२० ते दि.२०.०१.२०२० या कालावधीत Online ई-निविदा मागविणेत आलेल्या आहेत. यामध्ये एकूण १० निविदाधारकांनी सहभाग नोंदविलेला आहे.

सदरील ई-निविदेचे Technical Bid दि.२४.०१.२०२० रोजी उघडणेत आलेले असून त्यात भाग घेतलेल्या एकूण १ निविदाधारकांचे कागदपत्रांची छाननी केली असता त्यातील पात्र/अपात्र निविदाकारांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १. | मे.गणेश आर्टस प्रिंन्टर्स, अ, नगर. | पात्र |
| २. | मे.हिरा प्रिन्ट सोलू. प्रा.लि.मुंबई | पात्र |
| ३. | मे.किंग ऑफ किंगस् प्रिंन्टर प्रा.लि.मुंबई | पात्र |
| ४. | मे.मधुरा प्रिंन्ट सोलू.प्रा.लि.नाशिक | पात्र |
| ५. | मे.ममता ऑफसेट, अ.नगर | पात्र |
| ६. | मे.प्रिंन्ट प्लस प्रा.लि.मुंबई | पात्र |
| ७. | मे.सॅप प्रिन्ट सोल्युशन प्रा.लि,मुंबई | पात्र |
| ८. | मे.सोहेल एन्टरप्रायजेस, मुंबई | पात्र |
| ९. | मे.टॅको व्हिजन प्रा.लि.मुंबई | पात्र |
| १०. | में.युनिटी प्रिंन्टींग प्रेस, मुंबई | पात्र |

मा.खरेदी समितीचे दि.२९.०१.२०२० रोजीचे सभेत सदरील ई-निविदेचे Commercial Bid उघडणेत आले असता, त्यामध्ये प्राप्त झालेल्या न्युनतम दराचा तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | श्री साईलिला द्वैमासिके – मराठी ३२ +४ = ३६ पाने ०५ अंक -२०२० | श्री साईलिला द्वैमासिके –हिंदी-इंग्रजी ३२ +४ = ३६ पाने ०५ अंक -२०२० | श्री साईलिला द्वैमासिके – मराठी ६४ +४ = ६८ पाने ०१ अंक -२०२० | श्री साईलिला द्वैमासिके –हिंदी-इंग्रजी ६४ +४ = ६८ पाने ०१ अंक -२०२० | साईलिला अंक मराठी पाकीटे | साईलिला अंक हिंदी-इंग्रजी पाकीटे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या | ३५,००० | ७७,५०० | ७,००० | १५,५०० | ४२,००० | ९३,००० |
| ०१ | मे.ममता ऑफसेट, अहमदनगर | १५.४५ | १४.४५ | २७.९५ | २५.४५ | १.८० | १.७६ |
| ०२ | मे.सॅप प्रिंन्ट सोलूशन प्रा.लि, मुंबई | १५.४२ | १३.९४ | २६.८६ | २३.९० | १.५२ | १.५२ |
| ०३ | मे.सोहेल एन्टरप्रायजेस.मुंबई | १५.७५ | १४.५० | २७.०० | २५.०० | **०.९७** | **०.९५** |
| ०४ | मे.युनिटी प्रिंन्टींग प्रेस, मुंबई | २२.७० | १९.५० | ३९.८० | ३४.८० | १.५५ | १.४० |
| ०५ | मे.प्रिंन्ट प्लस प्रा.लि.मुंबई | १५.२५ | १४.५० | २७.१५ | २५.२५ | १.४० | १.४० |
| ०६ | मे.मधुरा प्रिन्ट सोल्युशन प्रा.लि . अंबड, नाशिक | १४.९३ | १३.९६ | २६.३५ | २४.९२ | १.१७ | १.११ |
| ०७ | मे.किंग ऑफ किंगस् प्रिंटर प्रा.लि. मुंबई | १७.६४ | १५.४० | ३०.२४ | २५.७६ | १.९५ | १.९५ |
| ०८ | मे.हिरा प्रिंन्ट सोलूशन, मुंबई | १४.०० | **१२.००** | **१५.५०** | **१७.५०** | १.१० | १.१० |
| ०९ | मे.गणेश आर्ट प्रिंटर्स, अहमदनगर | **१३.२५** | १२.२५ | २३.२५ | २१.२५ | १.५० | १.३५ |
| १० | मे.टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई | १५.१० | १३.८५ | २५.८५ | २३.९५ | १.४० | १.३० |

विभागाचा अभिप्राय- प्रास्तविकात नमूद केलेल्या तक्त्यात प्राप्त झालेल्या दहा निविदाधारकांपैकी मे.गणेश आर्टस् प्रिंटर्स, अहमदनगर यांचे साईलिला द्वैमासिके- मराठी [३२ + ४ = ३६पाने - (०५ अंक)], मे.हिरा प्रिन्ट सोलू.प्रा.लि.मुंबई यांचे श्री साईलिला द्वैमासिके- हिंदी-इंग्रजी [३२ + ४ = ३६पाने - (०५ अंक)], साईलिला द्वैमासिके- मराठी [६४ + ४ = ६८पाने - (०१ अंक)] व श्री साईलिला द्वैमासिके- हिंदी-इंग्रजी [६४ + ४ = ६८पाने - (०१ अंक)]तसेच मे.सोहेल एन्टरप्रायजेस, मुंबई यांचे साईलिला द्वैमासिके मराठी पाकीटे व साईलिला द्वैमासिके हिंदी-इंग्रजी पाकीटे छपाईकामीचे दर न्युनतम आहेत. सदरचे दर गडद व अधोरेखित केलेले आहेत.Item wise न्युनतम दर असलेल्या निविदाधारकांना मा.तदर्थ समितीचे सभेत चर्चा वाटाघाटीसाठी बोलावून चर्चेत निम्नत्तम दर निश्चित करता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी विभागाच्या अभिप्रायात नमूद केलेप्रमाणे मा.तदर्थ समितीचे सभेत निम्नतम दरधारकांस चर्चा वाटाघाटीसाठी बोलावून चर्चेत निम्नत्तम दर निश्चित करणेसाठी सदर विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत आयत्या वेळचा विषय म्हणून निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.११७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०२० चे साईलिला व्दैमासिके मराठी व हिंदी-इंग्रजी तसेच वितरणकामी पाकीटे छपाई करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक यांचे खालील प्रमाणे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**मे.सोहेल एन्टरप्रायजेस.मुंबई**

| अ.नं. | तपशील | दर रु.पै. |
|---|---|---|
| ०१ | साईलिला अंक मराठी पाकीटे | ०.९७ |
| ०२ | साईलिला अंक हिंदी-इंग्रजी पाकीटे | ०.९५ |

**मे.हिरा प्रिन्ट सोलूशन, मुंबई**

| अ.नं. | तपशील | दर रु.पै. |
|---|---|---|
| ०१ | श्री साईलिला द्वैमासिके –हिंदी-इंग्रजी ३२ +४ = ३६ पाने ०५ अंक -२०२० | १२.०० |
| ०२ | श्री साईलिला द्वैमासिके – मराठी ६४ +४ = ६८ पाने ०१ अंक -२०२० | १५.५० |
| ०३ | श्री साईलिला द्वैमासिके –हिंदी-इंग्रजी ६४ +४ = ६८ पाने ०१ अंक -२०२० | १७.५० |

**मे.गणेश आर्ट प्रिंटर्स, अहमदनगर**

| अ.नं. | तपशील | दर रु.पै. |
|---|---|---|
| ०१ | श्री साईलिला द्वैमासिके – मराठी ३२ +४ = ३६ पाने ०५ अंक -२०२० | १३.२५ |

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.१८ निळवंडे धरण उधृदव घेऊन वाढीव श्री साईबाबा संस्थान,शिर्डी , नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगाव नगरपरिषद संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.२ चे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७(भाग-१)/का.१६, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मुख्य अभियंता (प्रभारी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.२५/०१/२०१८ रोजी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्धव घेऊन) योजनेस श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-१८ करीता सदर योजनेची निकड विचारात

घेऊन ही योजना टप्पा क्रं.१ (शिर्डी परिसरातील करावयाची WTP,ESR,Distribution Network व पाईपलाईनचे काम करणे)–अंदाजे मुल्य रु.२७,१३,०३,९८०/- आणि टप्पा क्रं.२ (निळवंडे धरण ते मौजे कनकरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत पाईपलाईन टाकणे) अंदाजे मुल्य रु.२०५,५९,८९,८०४/- या दोन स्वतंत्र टप्प्यात राबविण्यात येईल. सदर अंदाजित रकमेवर escalation charge व त्यावरील एकुण ५% P.M.C.charge यांची गणना करुन अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर योजनेसाठी एकुण रु.२६०.३९ कोटी इतक्या खर्चास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली असून या योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करुन मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन शुल्क ३% अशी एकुण ५% इतकी फी देखील आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

निळवंडे धरण उद्भव घेऊन वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजनेविषयी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे विक्रांत रुपेंद्र काले व इतर यांनी जनहितयाचिका क्रं.PIL-१३३-२०१६ दाखल करणेत आलेली आहे. सदरहू जनहित याचिका क्रं.PIL-१३३-२०१६ मधील सिव्हील ॲप्लिकेशन १४८४५-२०१८ बाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१९/१२/२०१९ रोजीचे आदेशामध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित केला आहे. (सोबत दि.१९/१२/२०१९ रोजीचे आदेशाची प्रत सादर केली आहे)

**48.** In view of the above, we permit the respondents No. 10 to 12 to go ahead with the work of Phase II of laying the pipeline from Nilwande Dam to Shirdi town (including Kopargaon), so that the allocation of water made from Nilwande Dam, to the respondents No. 10 to 12, as of date, can be properly utilised. Needless to say, that it would be open to the Authorities under the MWRRA Act, 2005, to review or modify the order dated 26/11/2018, as and when the need for being so, is brought to its notice and it is satisfed that any modifcation or review is called for

निळवंडे धरण उद्भव घेऊन वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे टप्पा क्रं.२ चे कामासाठी ई-निविदा सादर करावी लागणार आहे. परंतू दि.०७/०२/२०१८ रोजीचे शासन निर्णयात अट क्रं.२ खालीलप्रमाणे नमुद आहे.

"**...**योजनेसाठी आवश्यक उद्भव प्रमाणपत्र, पाणी आरक्षण, पाणी गुणवत्ता तपासणी, अहवाल, उपांगासाठी लागणा-या जमिनीची संमतीपत्रे व अनुषंगिक परवानग्या प्राप्त झाल्याशिवाय योजनेचे कार्यादेश देण्यात येऊ नयेत."

सदरहु अटी नुसार टप्पा क्रं.२ चे कामाकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे वाटते.

१) योजनेतील हेडवर्क्समधील इन्टेकवेल, ॲप्रोच चॅनल, कनेक्टिंग मेन, जॅकवेल व पंपगृह, ॲप्रोच ब्रिज ही उपांगे निळवंडे धरणाच्या बुडीत क्षेत्रामध्ये येत असल्याने उपरोक्त उपांगासाठी काम करण्यास जलसंपदा खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्से आवश्यक व जागा निश्चितीबाबत जलसंपदा खात्याचे पत्र घेणे आवश्यक आहे.

२) बीपीटी कर्मचारी निवासस्थाने हेडवर्क्स जवळ उंच टेकडीवर प्रस्तावित केलेली आहे. सदरची जागा जलसंपदा खात्याची असल्याने जलसंपदा खात्याकडून जागा निश्चिती प्रमाणपत्र वसदरची जागा योजनेच्या कामास वापरण्यासाठी ना हरकत दाखला प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

**३)** योजनेतील ६.५ लक्ष लिटर क्षमतेचा जी.एस.आर. तळेगांव दिघे ता.संगमनेर शिवारात खाजगी जागेत बांधण्याचे असून या जागेचे संमतीपत्र घेणे आवश्यक आहे.

४) कर्मचारी निवासस्थाने बांधणेसाठी शिर्डी संस्थानच्या मालकीची जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात निमगांव गट नं.२२१ मधील जागा उपलब्ध करुन देणेबाबत संस्थानचे संमतीपत्र, ठराव प्राप्त करुन व ७/१२ उतारा जोडणे आवश्यक आहे.

५) रस्त्याचे कडेने टाकावयाच्या १०१.१० किमी. लांबीच्या पाईपलाईनसाठी सा.बां/जि.प./रा.म./ यंत्रणेकडून रस्त्याच्या कडेने पाईपलाईन टाकणेस परवानगी मिळणेसाठीचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तसेच जवळपास एकुण ७४० मीटर लांबीमध्ये रस्ता क्रॉस करुन पाईपलाईन टाकावयाची असल्याने रोड क्रॉसिंग परवानगी प्रस्ताव संबंधीत यंत्रणेकडे सादर करुन परवानगी प्राप्त करणे आवश्यक आहे.

६) अशुध्द पाणी दाबनलिका, अशुध्द पाणी गुरुत्वनलिका यांचे एल सेक्शन नकाशे, तसेच Type Design Drawing of staff quarter महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडुन तयार करुन जोडणे आवश्यक आहे.

सदरहू योजनेसाठी पाणी आरक्षण प्रस्ताव मंजूर असून बिगर सिंचन पाणी पुरवठयासाठी करारनामा करणे आवश्यक आहे. करारनामा करण्यापुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, शिर्डी नगरपंचायत व कोपरगांव नगरपरिषद यांचेकडुन पायाभुत व तरंगती लोकसंख्या व त्यानुसार लागणारे पाणी यांचे दृढिकरण करुन घेणे आवश्यक आहे.

तरी निळवंडे धरण उद्भव घेऊन वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.२ बाबत मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दि.१९/१२/२०१९चे आदेशान्वये निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता देणेत आलेली असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना निविदा प्रक्रीया राबविणे व पुढील योग्य ती कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.११८ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग)**

---

**विषय नं.१९ "श्री रामनवमी उत्सव-२०२०" मध्ये दि.०१.०४.२०२० ते दि.०३.०४.२०२० अखेर श्री साई मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करणेस व देखावा उभारणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल :-

२१. (१) समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन ;

ख) रुढीनुसार व प्रथेनुसार,मंदिरातील धार्मिक विधी,पूजा-अर्चा,समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे ;

(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनसाठी व प्राथनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

वरील अधिनियम २१ (१) (ख) व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत सन १९७९ पासून श्री रामनवमी उत्सवात आजपावेतो गेली ४० वर्ष व श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात सन १९९२ पासून आजपावेतो गेली २७ वर्षे अशा ह्या दोन्ही उत्सवात मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई सोबत देखावा उभा केला जातो.

तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सवात साईराज डेकोरेटर्स, मुंबई यांचेमार्फत मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई केली जाते.

श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव या दोन्ही उत्सवात विद्युत रोषणाई व देखावा उभा करण्यासाठी (ट्रान्सपोर्ट+मटेरियल भाडे+भाडोत्री जनसेट+इंधन वगैरे ) प्रत्येक उत्सवात मिळून रु. ८ ते ९ लाख खर्च संस्थानमार्फत केला जातो. परंतु उत्सवात उभारण्यात येणा-या देखाव्यासाठी यापेक्षा जास्त खर्च येत असतो व त्याचा खर्च श्री व्दारकामाई मंडळाचे सहकारी स्वत: सहन करत असतात.

श्री व्दारकामाई मंडळ हे हौशी साईभक्तांचे मंडळ आहे. या मंडळामार्फत कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय केला जात नाही. तसेच हे मंडळ श्री साईंची सेवा घडावी म्हणून फक्त शिर्डी येथील उत्सवाचे वेळी मुंबईच्या विविध भागातील डेकोरेटर्सशी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, फोनव्दारे संपर्क साधून त्यांना शिर्डी येथील उत्सवाचे वेळी एकत्र आणून उत्सवातील तीन दिवस विद्युत रोषणाई करतात यापेक्षा जास्त दिवस ते विद्युत रोषणाई करु शकत नाही. कारण त्यांचेमार्फत येणारे डेकोरेटर्स यांची रोजी रोटी ही ते मुंबई येथे विविध कार्यक्रमांमधून करत असलेल्या लाईटींग डेकोरेशनवर अवलंबून असते. नवरात्र उत्सव, गणपती उत्सव, विविध सांस्कृतिक कार्यक्रम अशा वेगवेगळया उत्सवात ते मुंबई येथे डेकोरेशनची कामे करत असतात.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई चे अध्यक्ष श्री.रमेशभाई सेहेटा यांनी आता दि.०१-०१-२०२० रोजी संस्थानकडे पत्र सादर केले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

०१). दि.०१-०१-२०२० रोजीचे पत्र.

विषय:- “श्री रामनवमी उत्सव-२०२०” करीता प्रतिवर्षाप्रमाणे श्री साई मंदिर व मंदिर परीसरामध्ये विद्युत रोषणाई करणे व देखावा उभारणेबाबत . . . .

मा.महोदय,

आपण श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये विद्युत रोषणाई व सजावट करण्याच्या निमित्ताने श्री साईबाबांची सेवा करण्याची संधी आम्हाला दिली. याबद्दल श्री व्दारकामाई मंडळ आपले शतशः ऋणी आहे. प्रतिवर्षाप्रमाणे आम्ही, याहीवर्षी श्री रामनवमी उत्सव-२०२० करीता श्री साई मंदिर व मंदिर परिसरामध्ये विद्युत रोषणाई करणे व देखावा उभारणेस येत आहोत.

तसेच श्री साईबाबांचे मंदीर आणि संस्थान परिसर इ.ठिकाणी विद्युत रोषणाई करणे व सजावट करण्याकरीता व साहित्याची ने-आण करण्याकरीता हूड असलेल्या भाडोत्री ०६ (सहा) ट्रक आणि श्री साईबाबा संस्थानचा मोठा ट्रक लागणार आहे. देखाव्याचे व विद्युत रोषणाईचे मटेरीअल मुंबईहून आणतेवेळी दोन टप्प्यात आणावे लागणार आहे. यासाठी पहिला टप्पा दि.१३-०३-२०२० रोजी ०२ नग भाडोत्री ट्रक व संस्थानचा मोठा ट्रक व दुसरा टप्पा दि.२६-०३-२०२० रोजी ०४ नग भाडोत्री ट्रक व संस्थानचा मोठा ट्रक मुंबई येथे पाठविण्याचे करावे. तसेच उत्सव काळात ०३ नग भाडोत्री जनसेट (१२५ केव्हीएचे)-०३ दिवसाकरीता संस्थानमार्फत व्यवस्था करण्याची आम्ही आपणास विनंती करीत आहोत. व लागणा-या खर्चाचा तपशिल देत आहोत.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २३० कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४३० x २३० x २ | १,९७,८००/- |
| २ | उत्सवाचे शेवटचे दिवसापर्यंत भाडोत्री लाकडी फळयांचे भाडे, फ्रेम कपडा, फायबर मटेरीअल, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, लाकडी फ्रेम, सेरीज लाईट, वायर, स्पॉटलाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड वगैरे फळया, पीओपी, मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई मुंबई व शिर्डी (येतेवेळेस सामान मुंबई येथून भरणे, शिरडीला खाली करणे, उत्सव संपल्यावर सामान शिरडी येथून भरणे, मुंबईला खाली करणे.) | ३,००,०००/- |
| ३ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडी भाडे परतीसह ( रु. ४३० x रु. ४० x २ ) | ०,३४,४००/- |
| ४ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्याकाळातील फळयांचे, लॉगचे व इतर फोकस लाईटचे एकुण भाडे रु. ७०,०००/- होते. त्यापैकी निम्मी ५० टक्के रक्कम. | ०,३५,०००/- |
| | **एकुण रक्कम रु.** | **५,६७,२००/-** |

(०१). गोल्टे-१४ फूटी ३० नग, १६ फूटी ४० नग, १८ फूटी ३० नग, बांबु १५ ते १६ फुटाचे १०० नग.

(०२). कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी २० खोल्या व उत्सव कालावधीत २० ऐवजी १५ खोल्या विनामुल्य मिळाव्यात.

(०३). रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरात विनामुल्य मिळावा.

(०४). प्रतीवर्षाप्रमाणे सर्व कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची विनामुल्य सोय व्हावी. (पहिल्या टप्प्यात दि.१४-०३-२०२० रोजी १२५ कलाकार देखावा उभारणीकामी व दुस-या टप्प्यात दि.२७-०३-२०२० रोजी १०५ कलाकार विद्युत रोषणाई कामी शिर्डी येथे येणार आहेत.)

तसेच वरील खर्चाची रक्कम ही श्री व्दारकामाई मंडळाचे संचालक, श्री.सतिष राव यांचे बॅंक खातेवर मिळणेस विनंती.

श्री साईबाबा संस्थानचे मा.तदर्थ कमिटीचे सर्व सदस्य, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे गेल्या अनेक वर्षापासून श्री व्दारकामाई मंडळाला उत्तम प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे आणि श्री साईच्छेनुसार यापुढेही मिळत राहो, ही श्रींचे चरणी प्रार्थना.

आपला विश्वासू,
(रमेशभाई सेहेटा)

श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये विद्युत रोषणाई व उभारण्यात आलेल्या देखावा करीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना रक्कम रु. ५,६७,२००/- इतकी संस्थानमार्फत अदा करण्यात आलेली आहे. तसेच मटेरियल वाहतुकीसाठी प्रती ट्रक रु.२८,०००/- (रु.अठ्ठावीस हजार) मात्र प्रमाणे ६ (सहा) ट्रक्सचे भाडे रु.१,६८,०००/- इतका खर्च आलेला आहे. विद्युत रोषणाईचे विद्युतपुरवठयासाठी ०३ नग भाडोत्री जनसेटसाठी रक्कम रु. ४३,८००/- इतका खर्च आलेला आहे. उत्सव कालावधीतील डिझेल जनसेट इंधनकामी रक्कम रु.५१,५६०/- इतका खर्च आलेला आहे. श्री रामनवमी उत्सव-२०१९ करीता (विद्युत रोषणाई व देखावा खर्च + मटेरियल वाहतुक खर्च + भाडोत्री जनसेट + इंधन खर्च) सर्व मिळून एकत्रित खर्च रक्कम रु.८,३०,५६०/- झालेला आहे.

प्रत्येक उत्सवाचे खर्चाबाबत प्रशासन शाखेच्या शताब्दी विभागामार्फत संस्थानच्या सर्व विभागांकडून अपेक्षित खर्चाचा व मागील वर्षी झालेल्या खर्चाचा तपशिल मागवून घेऊन तो एकत्रित करुन शताब्दी विभागा मार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे तो मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला जात असतो.

यावर्षी शताब्दी विभागाकडे (शताब्दी विभागाकडील पत्र क्र.एसएसएस / शताब्दी / १८८३ / २०१९ दि.०३-१२-२०१९) विद्युत विभागामार्फत दि.०५-१२-२०१९ रोजी खालीलप्रमाणे खर्चाचा तपशिल कळविण्यात आला होता.

| अ.क्र. | तपशील | श्री रामनवमी उत्सव-२०१९ साठी अपेक्षित खर्च | श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये झालेला खर्च | श्री रामनवमी उत्सव-२०२० साठी अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | विद्युत रोषणाई | रु. ७,००,०००/- | रु. ५,६७,२००/- | रु. ६,७५,०००/- |
| २ | भाडोत्री जनसेट खर्च + त्यासाठी इंधन खर्च | रु. २,००,०००/- | रु. ९५,३६०/- | रु. १,२५,०००/- |
| ३ | वाहतुक खर्च | रु. ३,००,०००/- | रु. १,६८,०००/- | रु. २,००,०००/- |
| | एकुण :- | रु. १२,००,०००/- | रु. ८,३०,५६०/- | रु. १०,००,०००/- |

श्री रामनवमी उत्सव-२०२० मध्ये करावयाच्या विद्युत रोषणाईच्या अंदाजित खर्चाबाबत श्री व्दारकामाई मंडळ यांनी खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

अ) श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी श्री रामनवमी उत्सव-२०२० करीता कळविलेला खर्च :-

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २३० कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४३० x २३० x २ | १,९७,८००/- |
| २ | उत्सवाचे शेवटचे दिवसापर्यंत भाडोत्री लाकडी फळयांचे भाडे, फ्रेम कपडा, फायबर मटेरीअल, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, लाकडी फ्रेम, सेरीज लाईट, वायर, स्पॉटलाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड वगैरे फळया, पीओपी, मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई मुंबई व शिर्डी (येतेवेळेस सामान मुंबई येथून भरणे, शिरडीला खाली करणे, उत्सव संपल्यावर सामान शिरडी येथून भरणे, मुंबईला खाली करणे.) | ३,००,०००/- |
| ३ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडी भाडे परतीसह (रु. ४३० x रु. ४० x २ ) | ०,३४,४००/- |
| ४ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, | ०,३५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | त्याकाळातील फळयांचे, लॉगचे व इतर फोकस लाईटचे एकुण भाडे रु. ७०,०००/- होते. त्यापैकी निम्मी ५० टक्के रक्कम. | |
| | एकुण रक्कम रु.:- | ५,६७,२००/- |

ब). यात्यतिरिक्त श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केल्याप्रमाणे ०६ नग भाडोत्री ट्रक, १२५ केव्हीए क्षमतेचे ०३ नग भाडोत्री जनसेट तसेच जनरेटरसाठी लागणारे इंधन, संस्थानचे टेम्पोसाठी मुंबई येथे जाणे व येणेसाठी लागणारे इंधन, टोल व भाडोत्री १०० नग गोल्टे यासाठी अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | ६ नग भाडोत्री ट्रकसाठी अपेक्षित खर्च<br>(रु. २९,०००/- x ६ भाडोत्री ट्रक) | रु. १,७४,०००/- |
| २ | ०३ नग भाडोत्री जनरेटरसाठी अपेक्षित खर्च ३ दिवस<br>(रु. ७,५००/- x ३ दिवस x ३ जनसेट) | रु. ६७,५००/- |
| ३ | भाडोत्री जनरेटरसेट करीता अपेक्षित इंधन खर्च<br>(३ दिवसाकरीता) | रु. ६०,०००/- |
| ४ | संस्थानचे टेम्पोकरीता मुंबई येथे जाणे व येणेसाठी अपेक्षित इंधन खर्च<br>(प्रति फेरी रु.५,५२५/- x ४ फे-या = रु. २२,१००/-) +<br>टोलचा खर्च (प्रति फेरी रु.५००/- x ४ फे-या = रु. २,०००/-) | रु. २४,१००/- |
| ५ | भाडोत्री गोल्टे साठी लागणारा अपेक्षित खर्च<br>(गोल्टे संख्या १०० नग x दर रु. २.५० x ३६ दिवस) | रु. ९,०००/- |
| | एकुण अपेक्षित खर्च रक्कम :- | रु. ३,३४,६००/- |

क) संस्थानमार्फत श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना विनामुल्य पुरविणेकामी निवासस्थान, नाष्टा व चहा यासाठी अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १) | (अ). उत्सवाचे अगोदर साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे निवासव्यवस्थेसाठी लागणारा अपेक्षित खर्च कालावधी दि.१४-०३-२०२० ते दि. ३१-०३-२०२० अखेर २० रुम्स् (२० रुम्स् x१८ दिवस x भाडे रु.१५०/-प्रतिदिन=रु.५४,०००/-)<br>(ब). उत्सव काळात साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे निवासव्यवस्थेसाठी लागणारा अपेक्षित खर्च कालावधी दि.०१-०४-२०२० ते दि.०४-०४-२०२० अखेर १५ रुम्स् (१५ रुम्स् x४ दिवस xभाडे रु.१५०/-प्रतिदिन = रु.९,०००/-)<br>(क). उत्सवाचे अगोदर व्दारावती भक्तनिवास येथे निवासव्यवस्थेसाठी लागणारा अपेक्षित खर्च कालावधी दि.१४-०३-२०२० ते दि.०४-०४-२०२० अखेर ०२ रुम्स् (०२ रुम्स् x२२ दिवस x भाडे रु.५००/-प्रतिदिन=रु.२२,०००/-) | रु. ८५,०००/- |
| २) | (अ). दि.१४-०३-२०२० ते दि. २६-०३-२०२० अखेर नाष्टा पाकिटे साठी येणारा अपेक्षित खर्च. (कलाकार संख्या १२५ x१३ दिवस x दर रु.५/-= रु.८,१२५/-)<br>(ब). दि.२७-०३-२०२० ते दि.०४-०४-२०२० अखेर नाष्टा पाकिटे साठी येणारा अपेक्षित खर्च.(कलाकार संख्या १०५x ९ दिवस x दर रु. ५/- =रु.४,७२५/-) | रु. १२,८५०/- |
| ३) | (अ). दि.१४-०३-२०२० ते दि. २६-०३-२०२०अखेर चहा साठी येणारा अपेक्षित खर्च.<br>(कलाकार संख्या १२५ x १३ दिवस x ०३ वेळा x दर रु. २/- = रु.९,७५०/-)<br>(ब). दि.२७-०३-२०२० ते दि.०४-०४-२०२० अखेर चहा साठी येणारा अपेक्षित खर्च. (कलाकार संख्या १०५ x ९ दिवस x०३ वेळा x दर रु. २/-= रु.५,६७०/-) | रु. १५,४२०/- |
| | एकुण अपेक्षित खर्च रक्कम :- | रु. १,१३,२७०/- |

श्री रामनवमी उत्सव-२०२० करीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी उपरोक्तप्रमाणे (अ) श्री व्दारकामाई मंडळाने कळविलेली रक्कम रुपये ५,६७,२००/-+ (ब) भाडोत्री ट्रका, जनसेट, गोल्टे व इंधन खर्च रक्कम रुपये ३,३४,६००/- (क) कलाकारांवरील निवासव्यवस्था, चहा व नाष्टा याकरीता होणारा खर्च रक्कम रु.१,१३,२७०/- अशी एकुण रक्कम रु.१०,१५,०७०/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

संस्थानचा ०१ मोठा ट्रक ०४ वेळेस मुंबई येथे वेगवेगळया दिवशी विद्युत रोषणाईचे साहित्य आणणे व पोहोच करणेकामी पाठवावा लागणार आहे. तसेच संस्थानमार्फत देखावा उभारणीकामी गोल्टे-१४ फूटी ३० नग, १६ फूटी ४० नग, १८ फूटी ३० नग पुरवावे लागणार आहे. तसेच कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी ५०० रुम येथे २० खोल्या व उत्सव कालावधीत २० ऐवजी फक्त १५ खोल्या तसेच व्दारावती भक्तनिवास येथे ०२ नॉन ए.सी.खोल्या व रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरामध्ये विनामुल्य मिळावा अशी श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केलेली आहे. तसेच प्रतीवर्षाप्रमाणे २३० कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची सोय संस्थानमार्फत विनामुल्य करावी असे कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय:- श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये ( विद्युत रोषणाई+देखाव्यासाठी लागणारे सर्व साहित्य+मटेरियल वाहतुक+भाडोत्री जनसेट+भाडोत्री जनसेटसाठी इंधन खर्च) सर्व मिळून एकत्रित खर्च रक्कम रु. ८,३०,५६०/- इतका झालेला आहे. श्री रामनवमी उत्सव-२०२० मध्ये ३ दिवसांकरीता विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी दि.०१-०१-२०२० रोजीचे पत्रान्वये खर्चाचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केलेला आहे. सदर उत्सवामध्ये विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे (अ) श्री व्दारकामाई मंडळाने कळविलेली रक्कम रुपये ५,६७,२००/- + (ब) भाडोत्री ट्रका, जनसेट, गोल्टे व इंधन खर्च रक्कम रुपये ३,३४,६००/- (क) कलाकारांवरील निवासव्यवस्था, चहा व नाष्टा याकरीता होणारा खर्च रक्कम रु.१,१३,२७०/- अशी एकुण रक्कम रु.१०,१५,०७०/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

प्रस्ताव:- (०१) श्री रामनवमी उत्सव-२०२० मध्ये दि.०१-०४-२०२० ते दि.०३-०४-२०२० अखेर ०३ दिवसाकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घेणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे (अ) श्री व्दारकामाई मंडळाने कळविलेली रक्कम रुपये ५,६७,२००/-+(ब) भाडोत्री ट्रका, जनसेट, गोल्टे व इंधन खर्च रक्कम रुपये ३,३४,६००/- (क) कलाकारांवरील निवासव्यवस्था, चहा व नाष्टा याकरीता होणारा खर्च रक्कम रु.१,१३,२७०/- अशी एकुण रक्कम रु.१०,१५,०७०/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे. यावर निर्णय होणेस विनंती.

(०२) श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून श्री रामनवमी उत्सव-२०२० साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घेणेसाठी त्यांनी त्यांचे पत्रात मागणी केलेप्रमाणे ०३ दिवसाकरीता ०३ नग भाडोत्री जनसेटकरीता व ०६ नग भाडोत्री ट्रक्स करीता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

(०३) श्री रामनवमी उत्सव-२०२० साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.११९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, "श्री रामनवमी उत्सव-२०२०" मध्ये दि.०१.०४.२०२० ते दि.०३.०४.२०२० अखेर श्री साई मंदिर व मंदिर परिसरात श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घेणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१०,१५,०७०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२०** **व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील प्रत्येक रुममध्ये बसविण्यात येणाऱ्या ए.सी.तसेच टि.व्ही.संचाकरीता वायरींग काम करणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील न्युनतम दर निवीदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी होऊन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या तिस-या मजल्यावरील प्रत्येक रुममध्ये बसविण्यात येणा-या ए.सी.तसेच टि.व्ही.संचाकरीता वायरींग काम करणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल | व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या तिस-या मजल्यावरील प्रत्येक रुममध्ये बसविण्यात येणा-या ए.सी.तसेच टि.व्ही.संचाकरीता वायरींग काम करणे. | | |
| ०२ | मागणी | - | | |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.१८-११-२०१९ ते दि.०२-१२-२०१९ | | |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, दि.१७-११-२०१९ रोजी दै.पुण्यनगरी, पुणे व दै.लोकमत, अहमदनगर तसेच दि.१८-११-२०१९ रोजी दै.फ्रि प्रेस जर्नल, मुंबई या वर्तमानपत्रात व ठेकेदारांना ई-मेल व्दारे. | | |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | दि.१५-११-२०१९ रोजी ८५ ठेकेदारांना ई-मेलव्दारे. | | |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.१८-११-२०१९, वेळ सकाळी १०.०० वाजेपासून<br>टेक्निकल बीड दि. १८-१२-२०१९<br>कमर्शियल बीड दि. ०७-०१-२०२० | | |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | ०४ | | |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या. | ०४ | | |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | - | | |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. | | |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | ई-निविदेत नमूद केले आहे. | | |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | | | |
| | अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | ई-निविदा रक्कम रुपये | |
| | १ | मे.एस.जी.इलेक्ट्रीकल सर्व्हिसेस, नाशिक | रु. ४,९७,७००/- | |
| | **२** | **मे.लक्ष्मी एन्टरप्राईजेस, नाशिक** | **रु. ४,९५,४६०/-** | |
| | ३ | मे.साई सिद्धी एंटरप्राईजेस, राहाता | रु. ५,१३,६००/- | |
| | ४ | मे.डी.के.इलेक्ट्रीकल्स्, औरंगाबाद | रु. ५,१३,४६०/- | |
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर | | | |
| | अ.क्र. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
| | - | - | - | - |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल- | | | |
| | अ.क्र. | तपशिल | वर्ष | खर्च परिमाण |
| | - | - | - | - |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - | | |
| १६ | मागील खरेदी दर | - | | |
| १७ | मागील पुरवठादार | - | | |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | रु. ४,९५,४६०/- | | |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे.लक्ष्मी एन्टरप्राईजेस, नाशिक | | |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. | | |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितींची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत) | | |
| २२ | इस्टिमेट कॉस्ट | रु. ४,९८,७७२/- | | |
| २३ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अदांजे रु. ----- प्रति सेट मार्केट रेट रु. ---- | | | |
| २४ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
| | - | - | - | - |

२५). संक्षिप्त टिप:- विद्युत विभागाचे मागणीप्रमाणे व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या तिस-या मजल्यावरील प्रत्येक रुममध्ये बसविण्यात येणा-या ए.सी.तसेच टि.व्ही.संचाकरीता वायरींग काम करणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई-निविदेमध्ये ०४ निविदाकारांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या चार निविदाधारकांच्या कमर्शियल निविदा दि.०७-०१-२०२० रोजी उघडण्यात आल्या. यामध्ये उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले मे.लक्ष्मी एन्टरप्राईजेस, नाशिक यांचे न्युनतम दर रु. रु. ४,९५,४६०/- येत आहेत.

तरी न्युनतम दरधारक मे.लक्ष्मी एन्टरप्राईजेस, नाशिक यांचेशी ई-निविदेत दिलेल्या दराबाबत चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१२०** **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.लक्ष्मी एन्टरप्राईजेस,नाशिक हे आजचे सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते, तथापी त्यांनी ई-निविदेतील नमुद दर रु.४,९५,४६०/- ऐवजी रक्कम रु.४,८५,०००/-मात्र दर देत असल्याचे लेखी कळविले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील प्रत्येक रुममध्ये बसविण्यात येणाऱ्या ए.सी.तसेच टि.व्ही.संचाकरीता वायरींग काम करणेकामी निम्नतम निविदाधारक मे.लक्ष्मी एन्टरप्राईजेस,नाशिक यांनी देऊ केलेले सवलतीचे दर रक्कम रु.४,८५,०००/- मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical Substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकनात ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पुर्व कोपऱ्यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं.२/४,३/१ व ३/७ मधील १२७५ चौ.मिटर जागा ठेकेदार यांना उपलब्ध करुन देणेबाबत तसेच कनेक्टींग कॉरीडॉरचे कामासाठी सध्या कार्यरत असलेला Electrical Transformer स्थलांतरीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

प्रस्ताव:- साईप्रसाद नं. 01, साईप्रसाद नं. 02 तसेच जुने प्रसादालय या इमारती पाडून त्याठिकाणी साईभक्तांकरीता नवीन दर्शन लाईन कॉम्प्लेक्स बांधण्याचे काम ठेकेदार मे. भानू कंस्ट्रक्शन, मुंबई यांना बांधकाम विभागामार्फत देण्यात आलेले आहे. ठेकेदार मे. भानू कंस्ट्रक्शन, मुंबई यांना बांधकाम विभागामार्फत देण्यात आलेल्या कामामध्ये साईभक्तांकरीता बांधण्यात येत असलेल्या या नवीन दर्शन लाईन कॉम्प्लेक्समधील वातानुकूलित यंत्रणा, लाईटींग यंत्रणेकरीता सदरच्या कामामध्ये नविन सबस्टेशन व जनरेटर रुम बांधण्यात येणार असून यामध्ये 1500 के. व्ही. ए. क्षमतेचे 03 नग ट्रान्सफॉर्मर तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीज पुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीज पुरवठ्याकरीता 750 केव्हीए क्षमतेचे 03 नग डिझेल जनरेटर सेट, क्युबिकल पॅनेल तसेच मेन पॅनेलचा समावेश केलेला आहे.

01). दिनांक 17-02-2018 रोजी साईभक्तांकरीता बांधण्यात येणा-या नवीन दर्शन लाईन कॉम्प्लेक्स कामाबाबत मा. अध्यक्ष साहेब यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीमध्ये नविन दर्शन रांग कॉम्प्लेक्सच्या विद्युत लोडकरीता बसविण्यात येणारे 750 केव्हीए क्षमतेचे 03 नग डिझेल जनरेटर सेटची क्षमता मंदिर व मंदिर परीसरातील सध्याच्या लोडकरीता कमी पडणार असल्याने या 3 नग 750 केव्हीए या जनसेट व्यतिरिक्त जादा 1010 केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर सेट (ए. एम. एफ. पॅनेलसहीत) व मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल स्वतंत्र खरेदी करण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी तसेच या 1010 केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर सेटसाठी (ए. एम. एफ. पॅनेलसहीत) व मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेलकरीता सध्या बांधण्यात येणा-या नविन दर्शन लाईन कॉम्प्लेक्सच्या नविन जनरेटर रुममध्ये वरील 750 केव्हीए क्षमतेचे 03 नग डिझेल जनरेटर सेट व्यतिरिक्त जादा बांधकाम करण्याबाबत मा. अध्यक्ष साहेब यांनी निर्देश दिलेले आहेत.

यानंतर दिनांक 04-04-2019 रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे केबिनमध्ये नवीन दर्शन लाईन कॉम्प्लेक्स कामाकरीता मिटींग आयोजित करण्यात आलेली होती. सदरच्या मिटींगकरीता आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड कापरे असो., नवी दिल्ली, ठेकेदार मे. भानू कंस्ट्रक्शन, मुंबई तसेच विद्युत विभागाचे उप कार्यकारी अभियंता तसेच बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी झालेल्या चर्चेमध्ये नवीन दर्शन लाईन कॉम्प्लेक्स कामामधील नविन सबस्टेशन व जनरेटर रुमचे बांधकाम तातडीने सुरु करणेबाबत आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड कापरे असो., नवी दिल्ली यांना निर्देश देण्यात आलेले होते. यास अनुसरुन तसेच दिनांक 17-02-2018 रोजी मा. अध्यक्ष साहेब यांनी दिलेल्या निर्देशानुसार आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड कापरे असो., नवी दिल्ली यांनी दिनांक 13-04-2019 रोजीच्या ई-मेलद्वारे तयार केलेले नविन सबस्टेशन व जनरेटर रुमचे ड्रॉईंग पाठविलेले होते. सदरच्या ड्रॉईंगमध्ये आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड कापरे असो., नवी दिल्ली यांनी 1500 के. व्ही. ए. क्षमतेचे 03 नग ट्रान्सफॉर्मर, 750 केव्हीए क्षमतेचे 03 नग डिझेल जनरेटर सेट, क्युबिकल पॅनेल तसेच मेन पॅनेल सोबतच मा. अध्यक्ष साहेब यांनी दिलेल्या आदेशानुसार मंदिर व मंदिर परीसरातील वाढीव लोडकरीता संस्थानमार्फत खरेदी करण्यात येणा-या नविन 1010 के. व्ही. ए. क्षमतेचे दोन जनरेटर सेटकरीता फाऊंडेशनची व्यवस्था तसेच मेन पॅनेलकरीता जागा सोडलेली असून सदरच्या ड्रॉईंगला मान्यता देणेबाबत आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड कापरे असो., नवी दिल्ली यांनी कळविलेले होते. जेणेकरून ठेकेदार मे. भानू कंस्ट्रक्शन, मुंबई यांना नविन सबस्टेशन व जनरेटर रुमचे बांधकाम सुरु करता येईल.

तसेच आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड कापरे असो.,नवी दिल्ली यांनी पाठविलेल्या उपरोक्त ई-मेलमध्ये "मंदिर व मंदिर परीसरातील लोडकरीता नविन 1010 केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर सेट, इलेक्ट्रीक पॅनेल, केबल इत्यादी अनुषंगिक काम हे नविन दर्शन लाईन कामाचे ठेकेदार मे. भानू कंस्ट्रक्शन, मुंबई यांच्या स्कोपमध्ये नसल्याकारणाने मंदिर व मंदिर परीसरातील लोडकरीता नविन 1010 केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर सेट, इलेक्ट्रीक पॅनेल, केबल इत्यादी अनुषंगिक कामाकरीता विद्युत विभागामार्फत टेंडर प्रक्रिया राबविण्यात येऊन आस्थापित करण्यात यावे किंवा मे.भानू कंस्ट्रक्शन, मुंबई यांना कार्यादेश देण्यात येऊन त्यांच्यामार्फत सदरचे नविन 1010 केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर सेट, इलेक्ट्रीक पॅनेल,केबल इत्यादी अनुषंगिक कामे करण्यात यावे" असे कळविलेले होते.

02). परंतू दरम्यानच्या काळात बांधकाम विभाग यांचे जा. नं. एसएसएसटी/बांधकाम/35/2019 दिनांक 06-07-2019 रोजीचे पत्रानुसार नियोजीत श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकन ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील 1275 चौ. मिटर जागा ठेकेदार यांना उपलब्ध करुन देणेबाबतचे प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 06-06-2019 रोजी झालेल्या सभेतील खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय नं. 15 निर्णय क्र. 272 संमत झालेला असून यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकन ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील 1275 चौ. मिटर जागा सदर बांधकामाचे ठेकेदार यांना इलेक्ट्रीकल सबस्टेशनचे बांधकामासाठी उपलब्ध करुन देणेबाबत संस्थानचे विद्युत विभागाने तपासणी करुन कार्यवाही करावी,असे ठरले असून विद्युत विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतची सद्यस्थिती बांधकाम विभाग, विधी विभाग व मालमत्ता विभागास अवगत करणेबाबत बांधकाम विभागाने कळविलेले होते. त्यानुसार विद्युत विभागामार्फत दिनांक 30-07-2019 रोजीच्या टिपणीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली होती.

त्यानुसार अ).श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकन ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील 1275 चौ.मिटर जागेमधील सध्या असलेले वर्कशॉप तातडीने शिफ्ट करणेकरीता मेकॅनिकल विभागास जा.नं.एसएसएसटी / विद्युत / 1145 / 2019 दि.10-08-2019 रोजी पत्र पाठविण्यात आलेले होते.

ब). साईभक्तांकरीता बांधण्यात येत असलेल्या श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकन ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील 1275 चौ. मिटर जागेमध्ये नविन सबस्टेशन व जनरेटर रुम बांधण्याबाबत,

तसेच

क) मंदिर व मंदिर परीसरातील लोडकरीता नविन 1010 केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर सेट, इलेक्ट्रीक पॅनेल,केबल इत्यादी अनुषंगिक कामाकरीता स्वतंत्र ई-निविदा तयार करणेकरीता आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड कापरे असो., नवी दिल्ली यांना उपरोक्त संदर्भ क्र. 07 नुसार पत्र पाठविण्यात आलेले होते. परंतू याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

सध्या असलेल्या सबस्टेशन व जनरेटर रुममधील मेन पॅनेलमधून समाधी मंदिर व मंदिर परीसरातील सर्व मंदिरे, चावडी, व्दारकामाई, गुरुस्थान, दिक्षित वाडा, सभा मंडप, म्युझियम हॉल, शांतुनिवास व भक्तनिवासमधील सर्व कार्यालय तसेच चारही दर्शन हॉल, पिंपळवाडी रोडवरील दर्शनलाईन शेड, साईनाथ छाया इमारत, सेवाधाम इमारत, साईनिवास अतिथीगृह इमारत, मुख्य भांडार, सुलभ शौचालय इमारत, साईउद्यान इमारत, मंगल कार्यालय, शांतिनिकेतन इमारत इत्यादी सर्व इमारतींकरीता विज पुरवठा करण्याकरीता केबल टाकण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकन ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील 1275 चौ. मिटर जागा ठेकेदार यांना उपलब्ध करुन देणेकरीता सध्या या जागेवर असलेले वर्कशॉप तातडीने दुस-या जागेत शिफ्ट करावे लागणार आहे. तसेच दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील काही भागामध्ये सध्या असलेले सबस्टेशन कार्यान्वित आहे.

त्यामुळे सदरचे सबस्टेशन शिफ्ट करणे अगोदर श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकन ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील 1275 चौ. मिटर जागेमधील मोकळ्या जागेमध्ये सबस्टेशनचे काम सुरु करण्यात येऊन जसजसे सबस्टेशनचे काम पुर्ण होत जाईल तसतसे सध्या कार्यान्वित असलेल्या सबस्टेशनमधील एक एक केबल, पॅनेल नविन सबस्टेशन रुममध्ये शिफ्ट करता येईल.

03) दि.04-07-2019 रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळेचा विषय नं.29 निर्णय क्र.372 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.26-02-2019 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 163 मध्ये दि.06-06-2019 रोजीचे सभेत करण्यात आलेल्या दुरुस्त्यांबाबत आजचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन, सदरचा निर्णय सद्यस्थिती मध्ये रद्द करण्यात यावा असे ठरले. तसेच मौजे शिर्डी मोफत सर्व्हे नं.1 मधील 30 गुंठे मधील अतिक्रमण धारकांबाबत एस.एल.पी.नं.28596-28597 / 2017 मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.25-07-2018 रोजी आदेश करुन निकाली काढले आहे. याबाबत अध्यक्ष व समिती सदस्य ॲड.मोहन जयकर, डॉ.राजेंद्र सिंह यांनी महाराष्ट्र राज्याचे ॲडव्होकेट जनरल मा.श्री.आशुतोष कुंभकोणी यांचे समवेत चर्चा करुन त्यांचा लेखी अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर सदर अभिप्रायासह प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा असे ठरले.

04) यानंतर बांधकाम विभाग यांनी दिनांक 17-10-2019 रोजी सादर केलेल्या टिपणीनुसार मुद्दा क्र. 01). मा. अध्यक्ष साहेब यांनी दिनांक 21-08-2019 रोजीच्या सभेच्या वेळी ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकाम भुखंडाचे उत्तर हद्दीलगत साईनिवास इमारतीचे समोर नियोजित सांडपाणी प्रक्रिया सयंत्रालगत करणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत मौखिक सुचना दिली असून त्यानुसार नियोजीत ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकाम मंजुर रेखांकनात दर्शविलेल्या ॲमेनिटी स्पेसऐवजी सोबतचे मसुदा रेखांकनात दर्शविलेप्रमाणे भुखंडाचे उत्तर हद्दीलगत करणेबाबत संस्थानचे विद्युत विभागाने तांत्रिक सुसाध्यता (Technical Feasibility) तपासून त्यांचा अभिप्राय सादर करणेबाबत कळविलेले आहे. तसेच मुद्दा क्र. 02). कनेक्टींग कॉरीडॉरचे कामासाठी सध्या कार्यरत असलेला Electrical Transformer बाजूचे मेकॅनिकल विभागाचे वर्कशॉप शेडचे ठिकाणी स्थलांतरीत करणेबाबत संस्थानचे विद्युत विभागामार्फत खर्चाचे अंदाजपत्रकासह सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत कळविलेले आहे.

याबाबत बांधकाम विभाग यांनी दिनांक 17-10-2019 रोजी सादर केलेल्या टिपणीतील मुद्दा क्र. 01 व मुद्दा क्र. 02 नुसार कार्यवाही करावी असे निर्देश या टिपणीवर प्राप्त झाले असून त्यानुसार विद्युत विभागाचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

मुद्दा क्र. 01). नियोजीत ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकाम मंजुर रेखांकनात दर्शविलेल्या ॲमेनिटी स्पेसऐवजी सोबतचे मसुदा रेखांकनात दर्शविलेप्रमाणे भुखंडाचे उत्तर हद्दीलगत करणेबाबत तांत्रिक सुसाध्यता (Technical Feasibility) तपासून त्यांचा अभिप्राय खालीलप्रमाणे:-

अ) नियोजीत ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकाम हे मंजुर रेखांकनात दर्शविलेल्या ॲमेनिटी स्पेसऐवजी सोबतचे मसुदा रेखांकनात दर्शविलेप्रमाणे भुखंडाचे उत्तर हद्दीलगत जर करावयाचे असेल तर नविन सबस्टेशनच्या जागेच्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचा 11 के. व्ही. सप्लाय हा जवळ नसल्याने लांब अंतरावरून भुमिगत केबलकरीता आर. सी. सी. ह्युम पाईप अथवा ट्रेंचमधून 11 के. व्ही. सप्लाय आणावा लागेल. त्यामुळे एच. टी. केबलचा तसेच आर. सी. सी. ह्युम पाईप अथवा ट्रेंचचा खर्च वाढू शकतो.

ब) रेखांकनात दर्शविलेल्या ठिकाणी भुखंडाचे उत्तर हद्दीलगत नियोजित सांडपाणी प्रकल्प असल्याने तसेच सध्या जुना सेफ्टी टॅंक असल्यामुळे त्याठिकाणी गॅस तयार होत असल्याने कंट्रोल स्विचेस ऑन / ऑफ होते वेळेस स्पार्क झाल्यास आग लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच शॉर्ट सर्कीटमुळे पॅनेलचा स्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

क) सध्या असलेल्या सबस्टेशन व जनरेटर रुममधील पॅनेलमधून समाधी मंदिर व मंदिर परीसरातील सर्व मंदिरे, चावडी, व्दारकामाई, गुरुस्थान, दिक्षित वाडा, सभामंडप, म्युझियम हॉल, शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील सर्व ऑफिसेस तसेच चारही दर्शन हॉल, पिंपळवाडी रोडवरील दर्शन लाईन शेड, साईनाथ छाया इमारत, सेवाधाम इमारत, साईनिवास अतिथीगृह इमारत, मुख्य भांडार, सुलभ शौचालय इमारत, साईउद्यान इमारत, मंगल कार्यालय इमारत, शांतिनिकेतन इमारत इत्यादी इमारतींच्या वीज पुरवठाकरीता केबल टाकण्यात आलेल्या आहेत. परंतू जर सदरचे सबस्टेशन व जनरेटर रुम रेखांकनात दर्शविलेल्या ठिकाणी शिफ्ट केले तर उपरोक्त ठिकाणच्या इमारतींकरीता टाकण्यात आलेल्या केबलला जॉईंट मारुन नविन ठिकाणी न्याव्या लागतील. त्यामुळे जुन्या सबस्टेशनपासून भुखंडाच्या उत्तर हद्दी लगतच्या नविन सबस्टेशनपर्यंत केबल टाकाव्या लागतील. त्यामुळे केबलचा खर्च वाढू शकतो.

ड) सध्या असलेल्या सबस्टेशन व जनरेटर रुममधील पॅनेलमधून समाधी मंदिर व मंदिर परीसरातील सर्व मंदिरे, चावडी, व्दारकामाई, गुरुस्थान, दिक्षित वाडा, सभामंडप, म्युझियम हॉल, शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील सर्व ऑफिसेस तसेच चारही दर्शन हॉल, पिंपळवाडी रोडवरील दर्शन लाईन शेड, साईनाथ छाया इमारत, सेवाधाम इमारत, साईनिवास अतिथीगृह इमारत, मुख्य भांडार, सुलभ शौचालय इमारत, साईउद्यान इमारत, मंगल कार्यालय इमारत, शांतिनिकेतन इमारत इत्यादी इमारतींच्या वीज पुरवठाकरीता टाकण्यात आलेल्या केबल ह्या रेखांकनात दर्शविलेल्या (भुखंडाच्या उत्तर हद्दी लगत) ठिकाणच्या सबस्टेशन व जनरेटर रुमपर्यंत नेणेकरीता केबल ट्रेंच बांधावी लागणार आहे. त्यामुळे केबल ट्रेंचचाही खर्च वाढू शकतो.

ई) सध्या असलेल्या सबस्टेशन व जनरेटर रुमपासून भुखंडाच्या उत्तर हद्दी लगतच्या नविन सबस्टेशनपर्यंत केबल टाकल्यास केबलचे अंतर वाढू शकते. केबलचे अंतर वाढल्यामुळे व्होल्टेज ड्रॉप होऊन करंट वाढेल. त्यामुळे साई मंदिरात व्होल्टेजचा प्रॉब्लेम निर्माण होऊ शकतो. तसेच व्होल्टेज ड्रॉपमुळे केबल गरम होतील त्याचप्रमाणे करंट वाढून मेन पॅनलमधील मेनस्विचेस गरम होतील व त्यामुळे शॉर्टसर्कीटचा धोका निर्माण होऊ शकतो.

फ) सध्या असलेल्या सबस्टेशन व जनरेटर रुमपासून भुखंडाच्या उत्तर हद्दी लगतच्या नविन सबस्टेशनपर्यंत केबल टाकल्यास केबलचे अंतर वाढू शकते. केबलचे अंतर वाढल्यामुळे व्होल्टेज ड्रॉप होऊन करंट वाढेल. व्होल्टेज ड्रॉपमुळे ए. सी. यंत्रणा, संगणक, विद्युत उपकरणे यांना पुरेसे व्होल्टेज न मिळाल्यास त्या यंत्रणा व्यवस्थित काम देऊ शकणार नाही.

भ) बांधकाम विभागाच्या दिनांक 17-10-2019 रोजीच्या टिपणीनुसार श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकन ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील 1275 चौ. मिटर जागेऐवजी सदरील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकाम भुखंडाचे उत्तर हद्दीलगत साईनिवास इमारतीचे समोर नियोजित सांडपाणी प्रक्रिया सयंत्रालगत करावयाचे झाल्यास त्यासाठी प्रथम मा. तदर्थ समितीची मान्यता घेऊन सुधारीत रेखांकनास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व आवश्यकता भासल्यास महाराष्ट्र शासनाची मंजुरी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे सदरच्या कार्यवाहीस वेळ लागण्याची शक्यता आहे.

ज) श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकन ॲमेनिटी स्पेस म्हणून दर्शविलेली दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील 1275 चौ. मिटर जागेमध्ये सदरचे सबस्टेशन व जनरेटर रुमचे बांधकाम झाल्यास सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच सदरचे ठिकाण हे रोडलगत असल्याने काही अपघाती घटना घडल्यास

त्याकरीता अग्नीशमन वगैरे यंत्रणेसाठी उत्तम राहील. तसेच सदरची जागा ही समाधी मंदिर व मंदिर परीसरातील सर्व मंदिरे, चावडी, व्दारकामाई, गुरुस्थान, दिक्षित वाडा, सभामंडप, म्युझियम हॉल, शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील सर्व ऑफिसेस तसेच चारही दर्शन हॉल, पिंपळवाडी रोडवरील दर्शन लाईन शेड, साईनाथ छाया इमारत, सेवाधाम इमारत, साईनिवास अतिथीगृह इमारत, मुख्य भांडार, सुलभ शौचालय इमारत, साईउद्यान इमारत, मंगल कार्यालय इमारत, शांतिनिकेतन इमारत तसेच नव्याने बांधकाम सुरु असलेल्या नविन दर्शन रांग इमारत प्रकल्पाच्या मध्यावर्ती भागात येत असल्याने सदरच्या इमारतींच्या मेंटेनन्सकरीता तसेच तातडीच्या कामांकरीता त्वरीत संबंधित स्थळी पोहोचणे शक्य होणार आहे.

त्यामुळे उपरोक्त कारणांमुळे सदरील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकाम भुखंडाचे उत्तर हद्दीलगत साईनिवास इमारतीचे समोर नियोजित सांडपाणी प्रक्रिया सयंत्रालगत करणेऐवजी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 06-06-2019 रोजी झालेल्या सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. 15 निर्णय क्र. 272 अन्वये श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकन ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील 1275 चौ. मिटर जागेमध्ये नविन सबस्टेशन व जनरेटर रुम बांधणे योग्य राहील, असे वाटते.

मुद्दा क्र. 02) कनेक्टींग कॉरीडॉरचे कामासाठी सध्या कार्यरत असलेला Electrical Transformer बाजूचे मेकॅनिकल विभागाचे वर्कशॉप शेडचे ठिकाणी स्थलांतरीत करणेबाबत संस्थानचे विद्युत विभागामार्फत खर्चाचे अंदाजपत्रकासह सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे:-

नविन दर्शन लाईन कॉरीडॉर मार्गामध्ये मंदिर व मंदिर परीसराकरीता वीज पुरवठ्यासाठी असलेले ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, टु पोल स्ट्रक्चर येत असल्याने सदरील ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, टु पोल स्ट्रक्चर इत्यादी केबल वर्कसहीत शिफ्टींग करणे कामाचे अंदाजपत्रक मे. श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी संस्थानच्या बांधकाम विभागाकडे दिलेले असून सदरील कामाच्या खर्चाची रक्कम रु.20,41,876.24 इतकी रक्कम बांधकाम विभागाने दिनांक 17-10-2019 रोजीच्या टिपणीसोबत पाठविलेल्या कागदपत्रानुसार कळविलेली आहे. परंतु ठेकेदार मे. श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी बांधकाम विभागामार्फत संस्थानला सादर केलेले अंदाजपत्रक अपुर्ण असून शिफ्टींग कराव्या लागणा-या कामाचा विद्युत विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या सुधारीत अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| **PART A:- NEW WORK** | | | | | |
| 01) | 7-3-5 | Supplying , erecting & terminating 3 x 185 sq. mm. aluminium 11 kV(E), XLPE armoured cable on wall/ceiling or laid in provided trench / pipe in an approved manner as per specification no. CBHT | 200 Mtr. | 1700.00 | 3,40,000.00 |
| 02) | 7-6-7 | Supplying & laying (including excavation) 25 cm dia RCC Hume pipe of standard thickness at required depth up to 90 cms. Below road / ground surface, for covering provided cable & necessary back filling with light ramming to make the road/ground surface as it was (Except bitumen carpet). | 150 Mtrs. | 619.00 | 0,92,850.00 |
| 03) | 7-5-16 | Providing and erecting Heat shrinkable outdoor termination kit for 11 kV (UE)/ 22 kV ( E ) XLPE HT cable 3x120 to 185 sq. mm. with necessary material as per specification no. CB-JT/HT | 06 Nos. | 15775.00 | 0,94,650.00 |
| 04) | 16-5-9 | Supplying and erecting ISI mark GI pipe 100 mm dia. 'B' class at position with accessories complete. Specification no. CW-PLB/GP. | 24 Mtrs | 1440.00 | 0,34,560.00 |
| 05) | 9-2-2 | Supplying and erecting copper strip of required size used for earthing on wall and/or any other purpose with necessary copper clamps fixed on wall painted with bituminous paint in an approved manner with joints required. As per specification no. EA-EP. | 105 Kgs. | 733.00 | 0,76,965.00 |
| 06) | 9-1-5 | Supply, Installation, Testing and commissioning of maintenance free earthing comprising of Electrode of 17.2 mm diameter Low Carbon Steel with 250 micron molecular copper bonded earthing rod of Length 3m along with 25 kg Carbon based environment friendly back fill ground enhancing compound required to fill up the excavated earth with required quantity complete. Specification no. EA-MOBI | 14 Nos. | 12173.00 | 1,70,422.00 |
| 07) | 9-2-3 | Supplying and erecting GI strip of required size used for earthing on wall and/or any other purpose with necessary copper clamps fixed on wall painted with bituminous paint in an approved manner with joints required. As per specification no. EA-EP. | 350 Kgs | 191.00 | 0,66,850.00 |
| 08) | 5-9-8 | Supplying and erecting 11kV, 630A, vacuum circuit breaker of required rating, on provided MS channels / trench / foundation as per specification no SW-HTS / VCB | 01 Each | 509592.00 | 5,09,592.00 |
| 09) | 16-3-1 | Making transformer plinth (1.5 x 1.5 x 1.5) m in size with necessary excavation in ground with 150 mm. thick M- 10 PCC at the bottom and top and 250 mm. thick, burnt brick wall constructed at periphery and remaining hollow portion shall be filled with 40mm hard broken aggregate. External surface duly plastered by 12 mm thick including watering etc complete. | 01 Each | 12983.00 | 0,12,983.00 |
| 10) | 16-3-7 | Making cement concrete foundation including excavation (60 x 60 x | 4 | 5400.00 | 0,21,600.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 150) cm deep in 1:3:6 cement concrete, (20 to 25) mm stone metal with necessary curing and finishing complete.(for stay). | Cu. Mtr | | |
| 11) | Non CSR | Installation of 1000 KVA Transformer | 01Each | 15000.00 | 0,15,000.00 |
| 12) | 7-1-23 | Supplying, erecting & terminating XLPE armoured cable 3½ core 240 sq. mm. aluminium conductor with continuous 12.97 sq. mm. (8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 250 Mtrs. | 1164.00 | 2,91,000.00 |
| 13) | 7-7-11 | Supplying & erecting Siemens type brass cable glands for 3½ core 240 sq. mm. for XLPE armoured cable as per specification no. CB-GL | 10 Nos. | 313.50 | 0,03,135.00 |
| 14) | 6-4-2 | Supplying, erecting, testing, commissioning 11 KV HT metering cubical (compact type) approved by MSEDCL/licensee fabricated with 2 mm (14 SWG) M.S. sheets with supporting angle and channel, painted with powder coating / epoxy paint of required shade copper bus bar size 25x6 mm electronic security lock and heavy duty mechanical lock, with counter meter for measuring no of times the opening of doors, top side cover (CT,PT cover) interlock with meter doors, epoxy coated 3 nos CT having required ratio between 75/5 A to 100/5 A, VA10,class0.2S, 11000/V3/110/V3 VA 50, class 0.2 epoxy terminal block suitable for provided trivector meter, and provision for incoming and outgoing cables etc. complete duly tested by licensee with necessary test certificates and erected on provided plinth/ cc foundation | 01 Each | 137119.0 0 | 1,37,119.00 |
| 15) | 7-10-10 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 240 sq. mm. complete as per specification no. CB-CL/AL | 40 Nos. | 75.00 | 0,03,000.00 |
| 16) | 8-1-12 | Supplying and erecting rolled steel joist (girder) pole 100 x 116 mm (23 kg/m) with provided base plate in provided foundation as per specification no. OH-PL/RSJ | 11 Mtrs. | 1361.00 | 0,14,971.00 |
| 17) | 16-3-5 | Making cement concrete foundation in 1:2:4 cement concrete with foundation bolts and nuts complete. (cost of wooden box is included) (for pumps). | 05 Cu. Mtrs. | 4485.00 | 0,22,425.00 |
| 18) | 8-6-6 | Supplying and erecting porcelain disc type insulator with necessary hardware suitable for 11kV line, complete as per specification no. OH-INS/DI | 03 Nos. | 1042.00 | 0,03,126.00 |
| 19) | 8-7-3 | Supplying and erecting G.I. fly stay set for pole including straining screw, G.I. stay wire, 7/10 SWG (for to 15mtr. long) with pole clamp, made of 50 x 6 mm MS flat, complete erected on provided RSJ pole. | 01 Nos | 1836.00 | 0,01,836.00 |
| 20) | Non CSR | Reinforcement Steel for Beam | 0.3 Ton | 66000.00 | 0,19,800.00 |
| 21) | Non CSR | Providing & constructing (inclusive excavation) Brick Masonry Work (9" Brick Work) Inspection chamber 75x75x90cm internal side with 75 mm thick RCC cover, filling of screened sand & smooth internal plaster etc. including watering, streaking joint on expand faces, rocking at joint on exposed face & watering complete & cleaning the site by removing debris and making the site good. | 08 Nos. | 5000.00 | 0,40,000.00 |
| | | | | **Total Amount of Part A Rs.:-** | **19,71,884.00** |
| **PART B:- SHIFTING AND DISMENTALING** | | | | | |
| 01) | Non C. S. R. | Shifting of 1000 KVATransformer | 01Job | 10000.00 | 10,000.00 |
| 02) | Non C. S. R. | Dismentaling of Cubical Panel | 01Job | 5000.00 | 05,000.00 |
| 03) | Non C. S. R. | Dismentaling of 11 KV Line | 01Job | 3000.00 | 03,000.00 |
| 04) | Non C. S. R. | Dismentaling of Existing DP Structure | 01Job | 10000.00 | 10,000.00 |
| 05) | Non C. S. R. | Dismentaling of RSJ Pole | 02Nos. | 3000.00 | 06,000.00 |
| | | | | **Total Amount of Part B Rs.:-** | **34,000.00** |
| **PART C:- LIASONING** | | | | | |
| 01) | Non C. S. R. | Elecrical Inspector Office and MSEDCL Liasoning Charges | 01Job | 50000.00 | 50,000.00 |
| | | | | **Total Amount of Part C Rs.:-** | **50,000.00** |
| | | | | **Total Amount (A+B+C) Rs.:** | **20,55,884.00** |
| | | | | **GST 18 % Rs.:-** | **03,70,059.12** |
| | | | | **Net Amount Rs.:-** | **24,25,943.12** |
| | | | | **Round Up Rs.:-** | **24,25,943.00** |

उपरोक्तप्रमाणे नविन दर्शन लाईन कॉरीडॉर मार्गामध्ये मंदिर व मंदिर परीसराकरीता वीज पुरवठ्यासाठी असलेले ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, टु पोल स्ट्रक्चर येत असल्याने सदरील ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, टु पोल स्ट्रक्चर इत्यादी केबल वर्कसहीत तात्पुरत्या स्वरुपात शिफ्टींग करणे कामाकरीता अंदाजे रक्कम रु.24,25,943/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे. परंतू याच कामासाठी ठेकेदार मे. श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी संस्थानच्या बांधकाम विभागाकडे दिलेल्या अंदाजपत्रकाची रक्कम रु.20,41,876.24 इतकी कळविलेली असून त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रृटी आढळून आलेल्या आहेत.

01). ठेकेदार मे. श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये कॉरीडॉर मार्गामध्ये येणारी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीची 11 के. व्ही. क्षमतेची उच्च दाबाची ओव्हरहेड लाईन काढून उच्च दाबाची केबल भुमिगत करणेकरीता सहा इंची हाफ राऊंड आर. सी. सी. ह्युम पाईप दर्शविण्यात आलेला आहे. परंतू सदरच्या पाईपमधून जुनी केबल खराब झाल्यास व भविष्यात आणखी एखादी नविन केबल टाकावयाची ठरल्यास हाफ राऊंड आर. सी. सी. ह्युम पाईपमुळे केबल टाकता येणार नाही. तसेच हाफ राऊंडमुळे केबल मातीत जाऊन घूस-उंदीर यामुळे केबल खराब होऊ शकते. त्यामुळे सहा इंची हाफ राऊंड आर. सी. सी. ह्युम पाईपऐवजी 10 इंची साईजचा पुर्ण राऊंड आर. सी. सी. ह्युम पाईप घ्यावा लागणार आहे. त्यामुळे सदरच्या पाईपचा समावेश करुन सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

02). सदरची भुमिगत केबल टाकणेकरीता सुधारीत अंदाजपत्रकामध्ये सहा इंची हाफ राऊंड आर.सी.सी.ह्युम पाईपऐवजी 10 इंची साईजचा पुर्ण राऊंड आर. सी. सी. ह्युम पाईप घेण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरच्या

पाईपलाईनवर आर.सी.सी. कव्हर सह 08 नग चेंबर्स बांधावे लागणार असल्याने सदरच्या कामाचा समावेश करुन संस्थानमार्फत सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

03). मंदिर व मंदिर परीसरातील वीज पुरवठयाकरीता असणारे ट्रांसफॉर्मर क्युबीकल व एच.टी.पोल स्ट्रक्चर तसेच महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीची एच.टी. ओव्हरहेड लाईन नविन दर्शन लाईनच्या कॉरीडॉर मार्गामध्ये येत असल्याने सदरील ट्रान्सफॉर्मर,क्युबीकल नविन जागेत शिफ्ट करणे टू पोल स्ट्रक्चर काढून घेणे ओव्हरहेड एच.टी. लाईन काढून भुमिगत करणे ही कामे करण्याचे अगोदर महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी तसेच विद्युत निरीक्षक अहमदनगर यांची पुर्व परवानगी घ्यावी लागणार असून महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी तसेच विद्युत निरीक्षक यांचेकडे ट्रान्सफॉर्मर शिफ्टींग करणेसाठी लागणा-या कामाची फी, इन्स्पेक्शन फी तसेच महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडे उपरोक्त अंदाजपत्रकाच्या 1.3 % सुपरव्हीजन चार्जेसची ही रक्कम भरावी लागणार आहे. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यासाठी सिक्युरीटी डिपॉझीट, लाईन चार्जेस पोटीही अतिरिक्त रक्कम भरणेसाठी मागणी करू शकते. याकरीता प्रत्यक्ष खर्च हा साधारणपणे रक्कम रु. 50,000/- ते रु.1,50,000/- पर्यंत लागू शकतो. परंतू ठेकेदार मे. श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये सदरची रक्कम रु. 20,000/- इतकीच गृहीत धरलेली आहे.

04). ठेकेदार मे. श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये ट्रान्सफॉर्मरपासून मेन पॅनेलपर्यंत 400 sq. mm. ची 01 नग केबल 60 मिटरच घेतलेली आहे. परंतू प्रत्यक्षात आता ट्रान्सफॉर्मरपासून मेन पॅनेलपर्यंत लोडनुसार 240 sq. mm. च्या 03 नग केबल टाकलेल्या आहेत. त्यामुळे सुधारीत अंदाजपत्रकामध्ये ट्रान्सफॉर्मरपासून मेन पॅनेलपर्यंत 240 sq. mm. च्या 03 नग केबल टाकणेकरीता तसेच इतर कामाकरीता साधारणपणे 250 मिटर केबलची आवश्यकता असल्याने सदरच्या कामाचा समावेश करुन सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

त्यामुळे उपरोक्तप्रमाणे ठेकेदार मे. श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये तसेच संस्थानमार्फत तयार करण्यात आलेल्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये 3,84,067/- इतक्या रकमेची तफावत येत आहे.

याबाबत निर्णय होणेकरीता विद्युत विभागामार्फत दि.26-10-2019 रोजी टिपणी सादर करण्यात आलेली होती. विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या टिपणीवर मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दिलेल्या निर्देशानुसार दि.13-11-2019 रोजी उपकार्यकारी अभियंता (विद्युत) तसेच विद्युत पर्यवेक्षक- श्री.बा.द.खाडगीर यांनी समक्ष जाऊन मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी चर्चा केली. सदर चर्चेस अनुसरुन खालील अहवाल/मागणी अवलोकनार्थ व पुढील आदेशासाठी सादर करीत आहोत.

मागणी:- खालीलप्रमाणेः-

01). मुद्दा क्र. 01 चा सादर करण्यात आलेल्या खुलासा कारणांमुळे सदरील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकाम भुखंडाचे उत्तर हद्दीलगत साईनिवास इमारतीचे समोर नियोजित सांडपाणी प्रक्रिया सयंत्रालगत करणेऐवजी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 06-06-2019 रोजी झालेल्या सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. 15 निर्णय क्र. 272 अन्वये श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ESS (Electrical substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकन ॲमेनिटी स्पेस म्हणून दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) दर्शविलेली सर्व्हे नं. 2/4, 3/1 व 3/7 मधील 1275 चौ. मिटर जागेमध्ये नविन सबस्टेशन व जनरेटर रुम बांधणे योग्य राहील, असे वाटते. याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

02). (अ) मुद्दा क्र. 02 उपरोक्तप्रमाणे नविन दर्शन लाईन कनेक्टींगचे कॉरीडॉर मार्गामध्ये मंदिर व मंदिर परीसराकरीता वीज पुरवठ्यासाठी सध्या कार्यरत असलेला ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, टु पोल स्ट्रक्चर येत असल्याने सदरील ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, टु पोल स्ट्रक्चर इत्यादी केबल वर्कसहीत शिफ्टींग करणे कामाकरीता अंदाजे रक्कम रु. 24,25,943/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे.

(ब) परंतू ठेकेदार मे. श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी संस्थानच्या बांधकाम विभागाकडे दिलेल्या अंदाजपत्रकाची रक्कम रु. 20,41,876.24 इतकी असून विद्युत विभागामार्फत तयार करण्यात आलेली सुधारीत अंदाजपत्रकाची प्रत्यक्ष रक्कम रु. 24,25,943/- इतकी होत असल्याने त्याकरीता महाराष्ट्र शासन निर्णय परिच्छेद क्र. 4.1- खरेदी किंमत रु 3 लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले असल्याने सदरच्या नियमानुसार ई-निविदा मागविण्यात याव्यात किंवा कसे, तसेच ई-निविदा बोलाविण्यासाठी मा. तदर्थ समितीची मान्यता घेणे, मा. तदर्थ समितीची मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदा बोलावून कार्यादेश देणे व पुढील काम पुर्ण होणेसाठी कमीत कमी 04 महिन्याचा कालावधी लागणार आहे.

बांधकाम विभागाच्या दि.17-10-2019 च्या टिपणीत विद्युत रोहित्र (Transformer) स्थलांतरित करणेकामी मे. श्रीम भानु कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी दि.11-06-2019 रोजीचे पत्रान्वये रु. 20.42 लक्ष खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे. तरी कनेक्टिंग कॉरीडॉरचे तातडीचे कामासाठी सदरील काम हे ठेकेदार मे. श्रीम भानु कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेकडून करुन घ्यावे किंवा महाराष्ट्र शासनाच्या नियमावलीनुसार ई- निविदा मागवाव्यात किंवा कसे ? याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

(क) सध्याचा ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल पॅनेल, टु पोल स्ट्रक्चर इत्यादी केबल वर्कसहीत शिफ्टींग करणेसाठी महाराष्ट्र शासनाचे मा.विद्युत निरिक्षक, वर्ग-१ यांचेकडे अर्ज भरणे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे अर्ज भरणे व यानंतर शासनाच्या विविध विभागांच्या परवानग्या व त्यासाठी संबंधित विभागांनी मागणी केलेल्या शासकीय / इतर आकारांबाबत मा.तदर्थ समितीसमोर पुन्हा विषय ठेऊन त्यास मान्यता घेऊन पुढील कार्यवाही पूर्ण होणेसाठी कमीत कमी 03 ते 04 महिन्याचा कालावधी लागणार आहे.

03). (अ) तसेच ट्रान्सफॉर्मर शिफ्ट केल्यानंतर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करणेसाठीची जागेवरील मा. विद्युत निरिक्षक (वर्ग-१) अहमदनगर यांची इन्स्पेक्शन व्हिजीट व त्यानंतर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या एच.टी. मीटर टेस्टींग युनिटची व्हिजिट व तपासणी व शेवटी शिफ्ट केलेला ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करणेसाठी अहमदनगर

येथील मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि. यांचा, मा. उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि., राहाता यांना लेखी आदेश व शेवटी वीज पुरवठा चालु होणे यासाठी दोन ते तीन दिवस लागू शकतील व एवढ्या कालावधीत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा बंद राहिल्याने आपणाला संस्थान जनसेट सतत तेवढया कालावधीकरीता चालू ठेवावे लागतील व त्यासाठी इंधन खर्च वाढेल. याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

(ब) ट्रान्सफॉर्मर क्युबीकल व्हीसीबी इत्यादी सध्याचे वर्कशॉपचे जागेत शिफ्ट करुन बसवावे लागणार असल्याने त्या जागेवर असलेले मेकॅनिकल विभागाचे वर्कशॉप हे त्वरीत इतर जागेत शिफ्ट करुन जागा रिकामी करुन घ्यावी लागणार आहे. त्यासाठीही बराच कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याचप्रमाणे

(क) जर नविन जागेत जनरेटर सेट व सबस्टेशन रुम लवकर तयार झाली व त्यात ठेकेदार मे. श्रीम भानु कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना बांधकाम विभागामार्फत देण्यात आलेल्या कार्यादेशातील 2000 के. व्ही. ए. क्षमतेचा मंजूर असलेला ट्रान्सफॉर्मर बसवून तो कार्यान्वित करुन घेता येईल व त्यामुळे पर्यायाने संस्थानची रक्कम रु. 25 लाखाची बचत होऊ शकेल. याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

04) (अ). मंदिर परीसर नविन सबस्टेशन व जनरेटर रुम तयार नसल्यामुळे नविन दर्शनरांग प्रकल्पाकरीता विद्युतपुरवठा करणे शक्य होणार नाही. याकरीता प्रथम जनरेटर रुम बांधणे, नविन जनरेटर, ट्रान्सफॉर्मर, मिटरींग क्युबिकल, व्हीसीबी, कंट्रोल पॅनेल बसविणे, सध्याचे कंट्रोल पॅनेलमधील केबल शिफ्टींग करुन नविन पॅनेलमध्ये जोडून घेणे, नविन दर्शनलाईन कॉम्प्लेक्सच्या केबल्स जोडून घेणे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.व इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टरची परवानगी घेणे इ.कामे करावी लागणार आहेत.

(ब). वरीलप्रमाणे जनरेटर रुमचे बांधकाम सुरुवात होऊन 100 % काम पूर्ण होईपर्यंत साधारणत: 4 ते 6 महिने कालावधी लागू शकतो. जनरेटर रुम बांधून झाल्यानंतर नविन जनरेटर, ट्रान्सफॉर्मर, मिटरींग क्युबिकल, व्हीसीबी, कंट्रोल पॅनेल बसविणे, केबल कनेक्शन करणे, जुन्या केबल शिफ्ट करुन कनेक्शन करणे याकामी साधारणत: 3 ते 4 महिने इतका कालावधी लागू शकतो.

(क). नविन जनरेटर, ट्रान्सफॉर्मर, मिटरींग क्युबिकल, व्हीसीबी बसविण्यापुर्वी इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टर यांचेकडून नकाशे मंजुर करुन घेणे व बसवून झाल्यानंतर कार्यान्वित करणे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.तसेच इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टर यांची मान्यता घेणे याकरीता साधारण 3 महिने इतका कालावधी लागू शकतो.

(ड). वरील सर्व कामांचा कालावधी गृहीत धरल्यास जनरेटर रुमचे बांधकामास सुरुवात झाल्यापासून संपुर्ण काम पुर्ण होण्यास साधारणत: 8 ते 10 महिन्याचा कालावधी लागू शकेल. त्यामुळे दर्शनलाईन कॉम्प्लेक्सची इमारत जरी 100% बांधून पुर्ण झाली तरी उपरोक्त जनसेट रुम व सबस्टेशन याकामास विलंब होणार असल्याने नविन दर्शनलाईन कॉम्प्लेक्स इमारतीस विद्युतपुरवठा करता येणार नाही. याकरीता प्रथम जनरेटर रुमची व सबस्टेशनची उभारणी करुन नविन जनसेट व नविन सबस्टेशन कार्यान्वित करणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

05)    तसेच सदर जागेबाबत गेल्या वर्षापासून निर्णय सतत बदलत असल्याने दर्शनलाईन कॉम्प्लेक्सच्या सबस्टेशन व जनरेटर सेटचा रुमच्या बांधकामात विलंब होत आहे. त्यामुळे दर्शन लाईन प्रकल्प तयार होऊनही जर सबस्टेशन व जनरेटर रुम तयार नसेल तर दर्शन लाईन प्रकल्पाचे इमारतीसाठी वीजपुरवठा वेळेवर करणे अशक्य होणार आहे.. त्यामुळे सबस्टेशन व जनरेटर रुमसाठी त्वरीत जागा निश्चित होणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

तरी उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी सदर ठिकाणाची समक्ष पाहणी करुन याबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२२** **स्ट्रीट लाईट मेंटेनसकरीता ॲल्युमिनियम टिल्टेबल टॉवर एक्सटेंशन लँडर व ॲल्युमिनियम सेल्फ सपोर्टींग एक्सटेंशन लँडर खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास तसेच दरपत्रके मागविणे, संस्थानचे वेबसाईटवर दरपत्रक नोटीस प्रसारीत करणेबाबत .(अपेक्षीत खर्च रक्कम रु.२,८०,०००/-)**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ यात आणखी सुधारणा करण्यासाठीचा अध्यादेश दि.१३ जुलै, २०१७ अन्वये अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.०५ (घ) मुख्य कार्यकारी अधिका-यास, आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत, ज्यांच्याकरीता त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद केलेली नसेल आणि ते त्या विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांच्या परिरक्षणासाठी किंवा त्या संस्थानला भेट देणा-या यात्रेकरुंच्या सेवेसाठी किंवा त्यांच्या सुरक्षेसाठी, त्याच्या मते तात्काळ पार पाडणे किंवा करणे आवश्यक असेल, पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाचे कोणतेही काम पार पाडण्यासाठी किंवा कोणतेही कार्य करण्याचा निर्देश देता येईल आणि तसेच, असे काम पार पाडण्यासाठी किंवा ते कार्य करण्यासाठी लागणारी पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाची रक्कम,त्या विश्वस्त व्यवस्थेच्या निधीतून चुकती करता येईल.

शासन निर्णय परिच्छेद क्र.३.२.३– रु.५ हजार ते रु.३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

प्रस्ताव:- विद्युत विभागामार्फत श्री साई मंदिर परीसर, साईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम), शैक्षणिक संकुल, साईआश्रम, श्री साईबाबा हॉस्पिटल, द्वारावती, श्री साईनाथ हॉस्पिटल, साईनगर, श्री साईप्रसादालय, साईआश्रम, साई धर्मशाळा, सेवाधाम स्टॉफ क्वॅार्टर, शांतिनिकेतन, साईउद्यान, मंगल कार्यालय, कनकुरी साठवण तलाव व विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या श्री साईभक्त विसावा पालखी थांबे, या ठिकाणचे परीसराचे अंतर्गत रोडवरील स्ट्रीट लाईट फिटींग व परीसरातील इमारतींवर लावण्यात आलेल्या स्ट्रीट लाईट फिटींग शेडचे मेंटेनन्स केले जाते. सदरील मेंटेनन्स 30 ते 40 फुट इतक्या उंचीवर जाऊन करावे लागते. अशा वेळेस आवश्यकतेनुसार टिल्टेबल टॉवर लॅडर अथवा दोन चाकी लॅडरचा वापर करावा लागतो.

यापुर्वी स्ट्रीट लाईट फिटींगचे मेंटेनन्स करणेकरीता दिनांक 01-01-1986 रोजी दोन चाकी लॅडर खरेदी करण्यात आलेली होती. त्यानंतर दिनांक 06-06-1989 रोजी चार चाकी ॲल्युमिनियम लॅडर खरेदी करण्यात आली होती. तसेच दिनांक 16-07-2008 रोजी ॲल्युमिनियम टिल्टींग टॉवर लॅडर खरेदी करण्यात आली होती. सदरील तिन्ही लॅडर सततच्या वापरामुळे खराब झालेल्या असून त्या वापरणे धोक्याचे झालेले आहे. या खराब लॅडरचा वापर कदाचित आता प्राणघातक ठरू शकतो.

तसेच संस्थानच्या सर्व परिसरातील इमारतींमध्ये सतत वाढ होत असल्याने पुर्वीपेक्षा आता स्ट्रीट लाईट पोलची संख्या वाढली असून आपणास स्ट्रीट लाईट मेंटेनन्सकरीता ॲल्युमिनियम टिल्टेबल टॉवर एक्सटेंशन लॅडर दोन नग व ॲल्युमिनियम सेल्फ सपोर्टींग एक्सटेंशन लॅडर दोन नग खरेदी करणेकामी येणा-या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Sr. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | Supply of foldable Telescopic Extension Ladder with 4 Nos Legs & 2 Nos big wheels 36” dia, Handls, Detactable platform & safety ring Side ‘C’ section 65mm x 35mm step 25.4mm dia non slip corrugated tubing permanent punching in machine, fined & operate with | 02 Nos | Rs.50,000/- | Rs. 1,00,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (Nylon) polypropylene rope pully arrangement with bracket locable stoppers 36"ms solid wheel, solid rubber shoes & caps Ladder closed height 14ft. Extended height 25ft.<br>Make : Alco, Alba, Kalco. | | | |
| 02 | Supply of Tiltable Tower Extension Ladder,<br>Make : Alco, Alba, Kalco.<br>• Extra Heavy duty -66.6 mm x 31.75mm x 3mm. as per IS:733-per T-6<br>• Steps-Aluminium Round pipe of 25 mm IS:733-1983 temper T-6 at a distance of 300mm (12inch).<br>• Winch (Gear box)-2 Heavy duty winch. Weight capacity 1ton each.<br>• Plat form size-outer to outer 20inch x 20inch at the top covered with thee side made of Aluminium "C" section Platform Placed 3ft below from top. Platform made Aluminium chequered plate (thickness 3 mm). Tool Tray Size 6 inch x 2 ft.<br>• Trolly Size – 6ft x 10ft. Made from MS Channel of 100mm x 50mm x 6.5mm.<br>• Side Angle-M.S.angle 50mm x 50mm x 6.5mm.<br>• Steel Rope - Tested Rope of 8mm.<br>• Wheel 2x8 inch M.S. Forged solid Alloy wheels (2ft x 2 swivels) with Double ball Bearing.<br>• 4 parking jack will be attached to the trolley.<br>• 4 sides Steel Rope & Chain 6 mm to arrest swing of the ladder stabilizers to immobilize the trolley.<br>• Ladder cloused Height 22 feet. Extension Height – 40 feet. | 02 Nos. | Rs.90,000/- | Rs.1,80,000/- |
| | | **Total Rs. :-** | | **2,80,000/-** |

मागणी:- उपरोक्तप्रमाणे ॲल्युमिनिअम टिल्टेबल टॉवर एक्सटेंशन लॅडर - 02 नग व ॲल्युमिनिअम सेल्फ सपोर्टींग एक्स्टेंशन लॅडर - 02 नग खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये २,८०,०००/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे.

ॲल्युमिनिअम टिल्टेबल टॉवर एक्सटेंशन लॅडर - 02 नग व ॲल्युमिनिअम सेल्फ सपोर्टींग एक्स्टेंशन लॅडर - 02 नग खरेदी करणेकरीता येणा-या अंदाजे रक्कम रुपये २,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस, बाहेरील ठेकेदार यांना पोस्टाव्दारे कोटेशन पत्र पाठविणेस, संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ठेकेदारांना ई-मेलव्दारे कळविणेस तसेच खरेदीची नोटीस संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्ट्रीट लाईट मेंटेनसकरीता ॲल्युमिनियम टिल्टेबल टॉवर एक्सटेंशन लँडर व ॲल्युमिनियम सेल्फ सपोर्टींग एक्सटेंशन लँडर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,८०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच अशा खरेदीनंतर सदरची खराब झालेली तीनही लँडर वापरणे धोक्याचे असल्याने त्यांची भंगारात विक्री करणेची कार्यवाही उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२३** **नविन साठवण तलाव याठिकाणी नविन स्ट्रीट लाईट उभारणी करणे व इलेक्ट्रीकल पॅनेल बसविणेकामी कार्यादेश देण्यात आलेल्या ठेकेदारास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

प्रस्ताव:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मौजे निमगांव को-हाळे शिवारातील गट नं.२४५/१, २२१/१ व २२९ मध्ये साईभक्तांची दैनंदिन पाण्याची गरज भागविण्यासाठी साईभक्तांचे देणगी सहयोगातून साठवण तलावाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदरील साठवण तलावावर रात्रीचे प्रकाशव्यवस्थेकरीता स्ट्रीट लाईटची उभारणी करणे व मोटार पंपसेट करीता इलेक्ट्रीकल पॅनेल बोर्ड बसविणे इत्यादि कामाचा कार्यादेश मे.एकवीरा इलेक्ट्रीकल वर्क्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांना जा.क्र.एसएसएसटी/

इलेक्ट्रीक / २३७६ / २०१९ दि.१७-०९-२०१९ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. काम पुर्ण करण्याचा कालावधी ४ महिने म्हणजे दि.१६-०१-२०२० पर्यंत होता. ठेकेदार मे.एकवीरा इलेक्ट्रीकल वर्क्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांनी नविन साठवण तलावावर भूमिगत केबल टाकणेकरीता नाली खोदाई करुन RCC पाईप टाकणे, चेंबर बांधणे इत्यादि काम पूर्ण केलेले आहे.

पाणीपुरवठा तलाव याठिकाणी पाणीपुरवठा विभागामार्फत तलावात पाणी घेणे व पाणी उचलणे करीता पाईप लाईनचे काम करणे तसेच तलावाचे ठिकाणी फिल्टरेशन प्लॅंट उभारणी करणे काम प्रलंबित आहे. सदरील काम आता चालू झाल्यास ते पुर्ण होण्यास ४ ते ५ महिन्याचा कालावधी लागू शकतो. पाईप लाईन टाकणे, फिल्ट्रेशन प्लॅंट बांधणे व त्याबरोबरच विद्युतीकरणाची कामे ही एकाच वेळी होणे आवश्यक आहे. सध्या तलावाचे ठिकाणी संस्थानचा सुरक्षा कर्मचारी नेमण्यात आलेला नसल्याने व सदरील परिसर हा लोकवस्तीपासून दूर असल्याने स्ट्रीट लाईट करीता टाकण्यात येणा-या केबल्स, स्ट्रीट लाईट पोल तसेच पॅनेल बोर्डचे स्पेअर्स चोरी जाणे, केबल तोडणे, कनेक्टर बॉक्स तोडणे यासारखे प्रकार घडू शकतील.

मागणी:- त्यामुळे केबल टाकणे, पोल उभे करणे, पॅनेल बोर्ड बसविणे ही विद्युतीकरणाची कामे तलावाचे राहिलेले काम पुर्ण होण्याचे वेळेस करणे योग्य होईल असे मत आहे. नविन साठवण तलाव याठिकाणी नविन स्ट्रीट लाईट उभारणी करणे व इलेक्ट्रीकल पॅनेल बसविणेकामी विद्युतीकरण काम करणारे ठेकेदार मे.एकवीरा इलेक्ट्रीकल वर्क्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांना दि.३० जून, २०२० पर्यंत मुदतवाढ मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१२३ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२४ नव्याने बांधकाम करणेत आलेले शैचालयाचे 'पे ॲन्ड युज' तत्वावर चालविणेस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भिन्वये मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानचे परिसरामध्ये टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम विभागामार्फत साईभक्तांचे सोईसाठी खालील नमुद ठिकाणांवर शौचालयाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदरचे शौचालये साईभक्तांसाठी वापरण्यास सुरुवात केलेली असून देखभाल व स्वच्छता आरोग्य विभागामार्फत करणेत येत आहे.

| अ. नं. | ठिकाण | पुरुषांसाठी | | स्त्रीयांसाठी | |
|---|---|---|---|---|---|
| | | शौचालय | मुता-या | शौचालय | मुता-या |
| १. | सेवाधाम इमारत टॉयलेट ब्लॉक्स | ६ | १५ | ६ | १५ |
| २. | शिर्डी बसस्थानकासमोरील जुने ( स्वागत कक्ष) | ३ | ४ | ३ | -- |
| ३. | जुने प्रसादालय परिसरातील टॉयलेट ब्लॉक्स | ३ | ४ | ३ | -- |
| ४. | सा.भ.नि.परिसरातील टॉयलेट ब्लॉक्स | ३ | ४ | ३ | -- |
| | एकुण संख्या- | **१५** | **२७** | **१५** | **१५** |

उपरोक्त सदर ठिकाणांवरील शौचालयाची देखभाल व साफसफाई 'पे ॲण्ड युज' तत्वावर चालविणेस मिळणेबाबत संदर्भ क्र.३ अन्वये मे.सुलभ इंटरनॅशल सोशल सर्व्हीस ऑर्गानायझेशन, मुंबई, यांचे दि.२२/१०/२०१९ रोजीचे पत्रान्वये, शौचालये ५/- व मुतारी मोफत किमान १० वर्षे कराराने पाणी व वीज संस्थान मार्फत मोफत पुरवुन चालविणेस देणे बाबत विनंती केलेली आहे.

सध्या जुने साईप्रसाद परिसरातील शौचालये मे. सुलभ इंटरनॅशनल यांना, सन १९९६, पासून 'पे ॲण्ड युज'तत्वावर चालविणेस देण्यात आले असून सध्याचे दर प्रती शौचालय रु. २/- दराप्रमाणे व मुतारी मोफत असे आहेत, पाणी व वीज मे. सुलभ इंटरनॅशल हे स्वतः उपलब्ध करुन घेत आहेत.

अभिप्राय- सुलभ इंटरनॅशल यांना उपरोक्त ४ ठिकाणांवरील एकुण ३० शौचालये व ४२ मुता-या 'पे ॲण्ड युज' तत्वावर चालविणेस प्रती शौचालय रु.२/- दराप्रमाणे व मुतारी मोफत चालविणेस देवून संस्थान मार्फत पाणी व वीज मोफत पुरवून १० वर्षाचे कराराने चालविणेस देता येईल, असे मत आहे.

उपरोक्त सदर ठिकाणांवरील शौचालयांची साफसफाई व देखभाल करणेकामी ' पे ॲण्ड युज ' तत्वावर चालविणेस देणेस व मालमत्ता विभागामार्फत करारनामा करणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.१२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नव्याने बांधकाम करणेत आलेले शौचालये 'पे ॲन्ड युज' तत्वावर चालविणेस देणेकामी अशा प्रकारचे काम करणाऱ्या संस्था/व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.२५** **मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्यापासून तयार करणेत येणाऱ्या अगरबत्ती पाकीटावर संस्थानचे नावाचा उल्लेख करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद- अधिनियम २००४ मध्ये १४(२) (ग) समितीच्या अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य या बाबत असून त्या प्रमाणे "नाशवंत अर्पण वस्तुंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे." अशी तरतूद प्रस्तूत कलमा मध्ये नमुद केलेली आहे.

प्रस्तावना- उपरोक्त संदर्भीय विषयान्वे, आवक नं.८३२५ दि.०१/०७/२०१७ रोजीच्या पत्रानुसार इकोनिर्मिती इन्फ्रस्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस व जनसेवा फाऊंडेशन बचत गट यांनी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य मिळणेबाबत एकत्रित प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यानुसार दि. २५/०७/२०१७ रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ५३० अन्वये श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्यापासुन अगरबत्ती तयार करणेकामी जनसेवा फाऊंडेशन व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस यांचेबरोबर संयुक्त काम करणार असल्याचे सांगितले. यावर चर्चा होऊन संयुक्त प्रकल्पास ३ वर्षासाठी विनामुल्य देण्यात यावे. त्या बदल्यात जनसेवा फाऊंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस हे सदरहु अगरबत्ती विक्रीतुन मिळणा-या प्रतिमाह उत्पनाच्या १०% रक्कम संस्थानला वर्ग करतील तसेच पुढील ३ वर्षामध्ये जनसेवा फाऊंडेशन व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस यांना प्राधान्य देण्यात यावे, असे ठरले. त्यानुसार जनसेवा फाऊंडेशन बचत गट यांनी मिळणा-या उत्पन्नाच्या १० % रक्कम संस्थानला वर्ग केलेली आहे.

दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३० नुसार मंदिरातुन निघणारे निर्माल्यापासुन अगरबत्ती बनविणेबाबत इकोनिर्मिती, जनसेवा फाऊंडेंशन व संस्थान यांचेमध्ये दि. ०९/१०/२०१७ पासुन ०३ वर्षासाठी करारनामा झालेला आहे. त्यापैकी जनसेवा फाऊंडेशन, लोणी व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस यांनी एकत्रित १३ महिने संयुक्त प्रकल्प राबविला आहे. तदनंतर इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस यांचे संचालक श्री. सदाफळ यांनी राजीनामा दिलेला असुन त्यांनी या प्रकल्पातुन बाहेर पडल्याचे दि. १०/११/२०१८ चे पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी ठेवला असता दि. ३०/०१/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ३९ नुसार सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन जनसेवा फाऊंडेशन, लोणी यांचेशी व्दिपक्षीय करारनामा करुन घेण्यात यावा, व करारनामा करतांना सदरचा प्रकल्प हा संस्थानचा आहे व अगरबत्ती पाकिटावर " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी " या नावाचा उल्लेख करावा असे जनसेवा फाऊंडेशन, लोणी यांना कळविण्यात यावे असे ठरले.

त्यानुसार मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्यापासुन तयार होणारे अगरबत्ती बनविणेकामी जनसेवा फाऊंडेशन ,(महीला बचत गट) लोणी यांचेशी सदरचा प्रकल्प हा संस्थानचा असुन अगरबत्ती पाकीटावर " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी " या नावाचा उल्लेख करावा या अटीवर दि.१३/०२/२०१९ रोजी सुधारीत करारनामा करुन घेणेत आलेला आहे.

मालमत्ता विभागाने गाळे भाडयासंदर्भात ठेवलेल्या मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ५११ प्रमाणे मंदिरामधून निघणारे निर्माल्यापासून तयार करण्यात येणा-या अगरबत्ती उत्पादनाची विक्री करणेकामी वापरण्यात येणारा लोगो, संस्थानचे कॉपीराईट अधिकार इ. बाबींसह सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा असे सदर विषयाच्या अनुषंगाने ठरलेले आहे.

जा.नं.एसएसएसटी/वशी-बगीचा/१००/२०१९ दि. ०३/०१/२०२० अन्वये श्री साईबाबा संस्थानचा लोगो वापराबाबत कॉपीराइट अधिकार संस्थानला प्राप्त झालेले आहेत किंवा नाही याबाबत अभिप्राय घेणेकामी माहीती तंत्रज्ञान विभागास पत्र देणेत आलेले आहे त्यानुसार जा. नं. एसएसएसटी/वशी- आयटी/१६५/२०२० दि.०९/०१/२०२० अन्वये त्यांनी संस्थानचे अधिकृत प्रकाशने, संस्थानचे नाव व बोधचिन्ह यांचे स्वामित्व हक्क (copyright & Trademark) घेणेची कार्यवाही विभागामार्फत चालू आहे. सदर कार्यवाही अंतर्गत आजपावेतो एकूण १३ पुस्तकांचे कॉपीराईट सर्टिफिकेट व श्री साईनाथ ब्लड बॅंक या नावाने ट्रेडमार्क सर्टिफिकेटची स्कॅन

कॉपी संस्थानला प्राप्त झालेले असून उर्वरित कॉपीराइट संदर्भात काही त्रुटी/आक्षेप आल्याने सदर त्रुटी/आक्षेपांवर सुनावणीकामी कार्यवाही अद्याप चालू असलेबाबत कळविलेले आहे.

संस्थान अधिनियम ठरावया नुसार छाननी/,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान- सदरचा विषय हा धोरणात्मक स्वरुपाचा आहे .

मागणी-दिनांक ३०/०१/२०१९ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णय क्र. ३९ नुसार सदर प्रकल्प हा संस्थानचा आहे त्यामुळे मंदीरातून निघणा-या हार व फुलांचे निर्माल्यापासून बनविणेत येणा-या अगरबत्ती पाकीटावर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या नावाचा उल्लेख करणेबाबत ठरलेले आहे त्यानुसार सदर अगरबत्ती पाकीटावर जनसेवा फाउंडेशन महीला बचत गट यांनी अगरबत्ती पाकीटावर संस्थानचे नाव टाकलेले आहे. परंतु कॉपीराईट अधिकार याबाबत कुठलीही चर्चा किंवा उल्लेख झालेला नाही.

विभागाचा अभिप्राय- जनसेवा फाउंडेशन महीला बचत गट यांनी अगरबत्ती उत्पादनाची विक्री करणेकामी वापरलेला लोगो किंवा नाव हे त्यांचे उत्पादनाची विक्री करणेकामी सदर अगरबत्ती पाकीटावरुन काढून टाकावे किंवा कसे? याबाबतचा विषय मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.१२५ सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**विषय नं.२६ दि.१४.०३.२०२० ते दि.२३.०३.२०२० अखेर होणाऱ्या डॉ.सुभाष पाळेकर गुरुजी यांच्या नैसर्गीक शेती विषयक शिबीरासाठी साईआश्रम भकतनिवास विभागातील खोल्या व शताब्दी मंडप आरक्षित करुन ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) “ भक्तांना मंदिरात देवतेच्यादर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.” व (२) पोट-कलम (१) (ख) “भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.”

मा.व्यवस्थापन समिती ठरावः- मा.व्यवस्थापन समिती सभेच्या दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील विषय क्र.५२ निर्णय क्र.२२४

प्रस्ताविकः- दि.१६/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये श्री.माधवराव देशमुख यांनी डॉ.सुभाष पाळेकर गुरुजी यांचे नैसर्गिक शेती विषयक शिबीर दि.१४/०३/२०२० ते दि.२३/०३/२०२० अखेरसाईआश्रम विभागातील शताब्दी मंडपात आयोजित करण्यात येणार असलेबाबत कळविण्यात आले आहे.

सदर शिबीरासाठी साईआश्रम मधील शताब्दी मंडप व शिबीरासाठी येणा-या शेतक-यांसाठी खोल्या सशुल्क मिळणेची विनंती केली आहे.

प्रस्तावः-दि.१६/१२/२०१९ रोजीच्या पत्रात,आम्ही पद्मश्री डॉ.सुभाषजी पाळेकर गुरुजी यांचे नैसर्गिक शेती विषयाचे शिबीर साधारणतः १४ मार्च २०२० पासुन ९ दिवस कालावधीचे घ्यावयाचे ठरविले आहे. आम्ही यापुर्वी देखिल साईआश्रम मधील सभामंडपात शिबीर घेतले होते.

सर, आम्ही सभामंडपाचे भाडे व त्यावरील विज (लाईट) वापराचे बिल द्यावयास तयार आहे. तसेच साईआश्रम मधील ब-याचशा रुम आम्हास शेतक-यांसाठी लागतील, त्याचे देखिल भाडे आम्ही द्यावयास तयार आहोत. तरी कृपया आम्हास सभामंडप लाईट व्यवस्थेसह व शेतक-यांसाठी लागणा-या रुम भाड्याने मिळाव्यात. ही विनंती.असे पत्रात नमुद केलेले आहे.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः- या पुर्वी साईआश्रम भक्तनिवास विभागातील शताब्दी मंडपामध्ये मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने दिलेल्या किंवा नाकारलेल्या कार्यक्रमांचा तपशील.

| अ.नं | मा.व्यवस्थापन समिती निर्णय. | आयोजकाचे/संस्थेचे नाव | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | दि.०७/०३/२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.२०९ | इंटरनॅशनल साई फाऊंडेशन, नोएडा श्री साई दिव्य कथा (दि.२०/०९/२०१८ ते दि.२३/०९/२०१९) | धार्मिक कार्यक्रम |
| २ | दि.०१/११/२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.६८६ | अंबा वेलफेअर फाऊंडेशन यांचे मार्फत दादा भगवान निवासी सत्संग शिबीर आयोजित करण्यात आले. (दि.१०/०१/२०१९ ते दि.१३/०१/२०१९ अखेर) | धार्मिक कार्यक्रम |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-०५/१७७२ /२०१९<br>दि.११/११/२०१९ रोजीचा आदेश | श्री.मयुर चंदने, जीवनदान साधक, मनशक्ती यांचे व्याख्यान (दि.१९/११/२०१९ ते २२/११/२०१९) | संस्थान मधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी ताणमुक्त यशाचे विज्ञान या विषयावर |
| ४ | दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३८३ | अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभा,मुंबई यांचे कुर्मी समाज बांधवांसाठीचे अधिवेशन | सामाजिक कार्यक्रमा असल्याने अमान्य करण्यात आला. |

मा.व्यवस्थापन समिती सभेच्या दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील विषय क्र.५२ निर्णय क्र.२२४ अन्वये साईआश्रम भक्तनिवास विभागातील टेन्साईल फॅब्रीक शेड (शताब्दी मंडप) कोणकोणत्या कार्यक्रमांसाठी उपलब्ध करुन देता येईल व त्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क याबाबत स्वतंत्र नियमावली तयार करण्यात आलेली असुन त्यातील अ.नं.१ अन्वये "साईआश्रम भक्तनिवास विभागातील शताब्दी मंडप फक्त धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी नियमाप्रमाणे सेवाआकार घेऊन देता येईल. तसेच सदरील मंडपामध्ये लग्न समारंभ, सामाजिक, राजकिय व अनुषंगीक कार्यक्रमासाठी परवानगी दिली जाणार नाही."

यापुर्वी साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवामध्ये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १.०६.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५३ नुसार मंजुरी मिळाल्याने व शताब्दी कक्षाचे आदेशान्वये सदरहू कार्यक्रम साईआश्रम भक्तनिवास विभागातील मंडपामध्ये आयोजित करणेस परवानगी देण्यात आलेली होती व तोपर्यंत मंडप वापरास देणेबाबतच्या नियमावलीस मंजुरी मिळालेली नव्हती.

आता, मा.व्यवस्थापन समितीच्यादि.०६/०६/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२२४ अन्वये साईआश्रम भक्तनिवास विभागातील शताब्दी मंडप वापरास देणेकामीची नियमावली मंजुर झालेली असून त्यामध्ये फक्त धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रमासाठी मंडप वापरास दिला जात आहे.सदर कार्यक्रम हा धार्मिक/सांस्कृतीक नसल्याने जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/३८५३/२०१९ दि.३१/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदर शिबीरासाठी सभामंडप देता येणार नाही, तसेच निवासासाठी ऑनलाईन खोल्या आरक्षित करुन शिबीरास उपस्थित राहणा-या शेतक-यांची निवासव्यवस्था करण्यात यावी. अशा आशयाचे पत्र देण्यात आले आहे.

दि.०३/०१/२०२० रोजीच्या विनंती पत्रान्वये,सदरचा कार्यक्रम हा शेतक-यांसाठी झिरो बजेट अध्यात्मिक नैसर्गिक शेतीसाठी प्रबोधन व मार्गदर्शन करत असतात ते सदर कार्यक्रमासाठी कोणतेही मानधन घेत नाही आम्ही सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी येणारा खर्च सर्व शेतक-यांकडुन घेत असतो. त्यापासुन आम्ही कोणतेही उत्पन्न मिळवत नसतो. सदरचा कार्यक्रम संपुर्णतः धार्मिक/आध्यात्मिक स्वरुपाचा आहे. असे नमुद केलेले आहे.

तरी सदर कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत योग्य तो निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर करण्यात मान्यता असावी.

**निर्णय क्र.१२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१४.०३.२०२० ते दि.२३.०३.२०२० अखेर होणाऱ्या डॉ.सुभाष पाळेकर गुरुजी यांच्या नैसर्गीक शेती विषयक शिबीरासाठी साईआश्रम भकतनिवास विभागातील खोल्या व शताब्दी मंडप सशुल्क तसेच वीज वापराचे बिल स्वतंत्र आकारण्यात येऊन उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.२७** **संस्थानला माहे जुलै २०१९ ते सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तूप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०० अन्वये "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्या गावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी", असे ठरलेले आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार संस्थानला प्राप्त होणा-या गाईचे शुद्ध तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे.

वरील नमुद निर्णयाप्रमाणे, गाईचे शुद्ध तुपाचे सध्याचे पुरवठादार व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, ऊमरगांव, गुजरात, यांचेकडून संस्थानला प्राप्त होणा-या शुद्ध तूपाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह अश्वमेध इंजिनीअर्स अॅण्ड कन्सलटंटस, नासिक, (एन.ए.बी.एल. प्रयोगशाळा), जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा (राज्य शासकीय प्रयोगशाळा) व केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, (केंद्र शासन मध्यवर्ती प्रयोगशाळा) यांचेकडून करणेत येत आहे. तसेच खाद्यतेलाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह राज्य शासकीय प्रयोगशाळेकडून करणेत येत आहे.

वरील निर्णयानुसार संस्थानला माहे जुलै २०१९ ते सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुद्ध तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेंमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल तपशिलवार परिशिष्ठासह यासोबत सादर केले आहेत. त्यामध्ये

**अ)** उपरोक्त सर्व प्रयोगशाळेंचे तपासणी अहवालामध्ये शुद्ध तूपाचे व खाद्यतेलाचे सर्व नमुने अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार योग्य (**conform**) असल्याचे नमुद केलेले आहे.

**आ)** तसेच उपरोक्त परिशिष्ठामध्ये नमुद केलेल्या सर्व बॅचचे शुद्ध तुप व खाद्यतेलाचा साठा भांडार विभागामधून विनातक्रार संपलेला आहे.

तरी वरीलप्रमाणे तपासणी अहवालाच्या झेरॉक्स प्रती (पा.नं.०१ ते ४४) व दि.०४.०१.२०२० रोजीचे तपशिलवार परिशिष्ठ (पा.नं. १ ते ७) यासोबत सादर केलेले आहे, ते मा. व्यवस्थापन तदर्थ समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला माहे जुलै २०१९ ते सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तूप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासणी अहवालाचे अवलोकन करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**विषय नं.२८** **साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणी वाटप काम करत असलेले २८ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद - २१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते.

प्रस्तावीक - संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय श्री हावरे साहेब यांनी दि.११/१०/२०१६ रोजी मंदिर परिसर व दर्शनलाईन मध्ये राऊंड घेऊन पाहणी केली असता दर्शनलाईन व परिसरात साईभक्तांसाठी पिण्याचे पाणी वाटप व्यवस्था कायमस्वरुपी सुरु करणेबाबत आदेशीत केल्याने, प्रशासनाचे प्राप्त सुचनेनुसार इकडील विभागाकडील दि.१४/१०/२०१६ व दि.२७/१०/२०१६ चे मंजुर टिपणी नुसार पाणी वाटपासाठी कंत्राटी कर्मचारी मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करुन, सदर मंजुर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी कामगार विभागाकडे सादर करणेत आला होता.

त्यास अनुसरुन जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/२८८१/२०१६ दि.०९/११/२०१६ अन्वये मे.जय भवानी एंटरप्रायजेस यांना मे.बी.व्ही.जी.इंडिया व स्पिक अॅण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचे कडील उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांमधून प्रतिदिनी १६ आऊटसोर्स कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागास पुरविणे बाबत आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार साईभक्तांसाठी पाणीवाटप व्यवस्था कामकाज सुरु करणेत आले आहे.

तदनंतर जा.नं. एसएसएस/वशी-७ए/३०२४/२०१६ दि.१७/११/२०१६ मालमत्ता विभागाने दि.२१/१०/२०१६ चे टिपणीनुसार १२ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागाच्या मागणीप्रमाणे श्री साईभक्तांच्या चप्पल व बुट ठेवणेकामी, मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. व स्पिक अॅण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांच्याकडील उपलब्ध कर्मचा-यांच्या मधून प्रतिदिनी १२ कर्मचारी पुरविणेकामी मे.जय भवानी एंटरप्रायजेस, कॅम्प-शिर्डी यांना आदेशीत करण्यात आले होते.

दि.०२/०१/२०१८ चे इकडील विभागाच्या मंजुर टिपणीत मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०४/२०१७ च्या सभेतील निर्णय क्र.३५५ नुसार गेट नं.०१ व १६ गुंठे येथे सुरु असलेले चप्पल स्टॅंड

सोसायटीकडे वर्ग केल्याने व तेथे कार्यरत असलेले १२ आऊटसोर्स कर्मचारी रिक्त झालेने, सदर १२ आऊटसोर्स कर्मचारी मंदिर परिसरात नव्याने सुरु करण्यात आलेली पाणीवाटप पॉईंटवर नेमणे बाबत मान्यता प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.

वरील प्रस्तावास अनुसरुन जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/२५३२/२०१८ दि.२२/११/२०१८ ने कामगार विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/२८८१/२०१६ दि.०३/११/२०१६ चे आदेशातील १६ आऊटसोर्स कर्मचारी व जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/३०२४/२०१६ दि.१७/११/२०१६ चे आदेशातील मंजुर १२ आऊटसोर्स कर्मचारी असे एकूण २८ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी साईभक्तांना पाणीवाटप करणेकरीता दि.०१/१२/२०१८ पासून श्री साईप्रसादालय विभागाकडील कार्यरत असलेले आऊटसोर्स ठेकेदार मे.स्पिक ॲण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचेकडे वर्ग करण्यात आलेत.

मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हिसेस, मुंबई नवीन ठेकेदार यांनी तोंडी कळविले की, दि.०१/१२/२०१८ ते दि.१४/०९/२०१९ पर्यंत आमचेकडील २८ आऊटसोर्स कर्मचा-यांची बीले आजतागायत आदा करण्यात येत होती. मात्र, दि.१४/०९/२०१९ रोजी मे. स्पिक ॲण्ड स्पॅन सर्व्हिसेस मुंबई यांच्या कामकाजाची मुदत संपल्याने "आम्हाला फक्त प्रसादालयाकडील कामकाजाचे कंत्राट मिळाले असल्याने दि.१५/०९/२०१९ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणीवाटपासाठी कर्मचारी पुरवू शकणार नाही याची माहिती असावी" त्यास अनुसरुन इकडील विभागाकडील दि.१७/०९/२०१९ चे मंजुर टिपणीत खालील प्रमाणे कार्यवाही होणेस्तव मान्यता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता.

१. उपरोक्त ठिकाणी साईभक्तांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये याकरीता कामगार विभागामार्फत प्रतिदिनी २८ अकुशल कंत्राटी कर्मचारी तातडीने इकडील विभागास पुरविणेस आदेश होणेस विनंती.

२. उपरोक्त ठिकाणी साईभक्तांची पिण्याची पाण्याची गैरसोय होऊ नये याकरीता कामगार विभागाकडून कर्मचारी मिळणेपर्यंत तूर्त प्रतिदिनी ४० साई सेवक मिळावेत.

३. प्रसादालय विभागाकडून पाणीवाटपासाठी पुरविणेत आलेल्या २८ आऊटसोर्स कर्मचारी पुर्ववत प्रसादालय विभागाकडे आऊटसोर्स ठेकेदार यांच्याकडे वर्ग करणेस मान्यता घेणेत आली.

वरील प्रमाणे प्रस्तावास दि.१७/०९/२०१९ रोजी मान्यता मिळालेने, सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव कामगार विभागाकडे पाठविण्यात आला.

कामगार विभागाने जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/१७३३/२०१९ दि.३०/१०/२०१९ ने मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हिसेस, मुंबई यांना आदेशीत केलेल्या पत्रात प्यारा नंबर चार मध्ये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"सदर २८ आऊटसोर्स कर्मचा-यांचे मंजुरी व बोनस बाबत दरवर्षी अडचणी निर्माण होत असतात यापुर्वीचे कामगार विभागाचे जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/२५३२/२०१८ दि.२२/११/२०१८ अन्वये सदर २८ आऊटसोर्स कर्मचारी श्री प्रसादालय विभागाकडील आऊटसोर्स ठेकेदार यांच्याकडे वर्ग करणेत आले आहेत. तरी साईप्रसादालय विभागाने त्यांचेकडील आऊटसोर्स कर्मचा-यांचे कार्यादेशात सदर २८ अकुशल आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी साईभक्तांना पाणीवाटप करणे करीता पुरविणे बाबत नमुद करुन सदर कर्मचा-यांबाबत यापुढे मंजुरी घेण्यात यावी व साईप्रसाद निवासस्थानकडे सदर कर्मचारी पुरविण्याचे करावे. कामगार विभागामार्फत फक्त इनसोर्स कर्मचा-यांची कामे चालत असल्याने यापुढे कुठल्याही प्रकारचे आऊटसोर्स कर्मचा-यांचे कार्यवाही बाबत प्रस्ताव किंवा आदेश होणे बाबत टिपणी किंवा आदेशामध्ये कामगार विभागाचा उल्लेख करण्यात येऊ नये".

मागणी- इकडील विभागाकडील मंजुर प्रस्ताव व त्यास अनुसरुन कामगार विभागाकडील जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/१७३३/२०१८ दि.३०/१०/२०१९ चे आदेशातील प्यारा नंबर चार या मुख्य मथळयाचा आभ्यास करता २८ आऊटसोर्स कर्मचा-यांची सर्वतोपरी सर्वंकष कार्यवाही बाबत नमुद आहे.

परंतू सदर आदेश कामगार विभागाकडून थेट प्रसादालय विभागास न होता तो मे. मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हिसेस, मुंबई ठेकेदार यांना आदेशीत झालेने, सदर २८ आऊटसोर्स कर्मचा-यांचे वेतनाचा आर्थिक बोजा, बोनस व इतर अनुषंगीक बाबींवर विचार होत नसलेने, पाणीवाटप कर्मचा-यांचे माहे नोव्हेंबर २०१९ व डिसेंबर २०१९ चे पगार ठेकेदार यांनी केलेले नसल्याने सदर कर्मचा-यांना आर्थिक अडचणीस तोंड द्यावे लागत आहे.

करिता, मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हीसेस लि, मुंबई यांचे आ.नं.१४६२६ दि.१८/१२/२०१९ चे पत्रात प्रसादालयाच्या दराप्रमाणे (अकुशल कामगारांना प्रत्येकी दर रु.१२७५०/-) हा दर श्री साईप्रसादालय हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोल ई-निवीदेतील BOQ-B व प्रसादालयाकडील

कार्यादेशा नुसार कामगार खर्च (अकुशल कर्मचारी किमान वेतन, गणवेश, सानुग्रह अनुदान, ओळखपत्र, वर्कमॅन कॉम्पनसेशन व प्रा.फंडासह इत्यादि सर्व करासहीत) मंजूर दर आहे याप्रमाणे वेतन मिळणे बाबत पत्रात विनंती केली असून तसा लिखीत स्वरुपात कार्यादेश मिळणे बाबत पत्रात नमुद आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– वरील सर्व संदर्भांचा विचार करता सदर २८ आऊटसोर्स कर्मचारी यांचे वेतन सध्या प्रसादालयाकडील ई-निवीदा कालावधी दि.१५/०९/२०१९ ते दि.१४/०९/२०२० अखेर एक वर्ष पर्यंत असल्याने, तसेच सदर कर्मचा-यांचे माहे दि.१५/०९/२०१९ ते दि.३१/१०/२०१९ पर्यंतचे वेतन नवीन ठेकेदार मे फोकस फॅसेलिटी अॅण्ड सिक्युरीटी सर्व्हीसेस लि, मुंबई यांनी अॅडव्हांस म्हणून आदा केले आहे. सदर खर्चाची साईप्रसाद निवासस्थान व साईप्रसादालय विभागाचे बजेट मध्ये तरतूद नसल्याने अद्याप संबंधीत ठेकेदार यांना बीले आदा करणेत आलेली नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल असे मत आहे.

अ) सदर पाणीवाटपकडील २८ आऊटसोर्स कर्मचारी साईप्रसादालयाकडील दैनंदिन वाढपी कामासाठी लावण्यात येणा-या कामगारांमध्ये समावेश करण्यात येऊन (प्रसादालय ई-निवीदा अटी-शर्ती ७२ नुसार) प्रसादालयाकडून सदर कामासाठी प्रतिदिनी २८ कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे (प्रसादालय टेंडर कालावधी दि.१५/०९/२०१९ ते दि.१४/०९/२०२० अखेर एक वर्ष कालावधीसाठी) पाणीवाटपसाठी घेता येतील.

ब) प्रसादालयाकडील मंजुर दरानुसार सदर २८ आऊटसोर्स कर्मचा-यासाठी मासिक वेतन खर्च (एका कर्मचा-याकरीता रु.१२७५०/-) प्रमाणे २८ कर्मचा-यांसाठी दरमहा रु.३,५७,०००/- प्रमाणे निवीदा कालावधीसाठी एका वर्षाकरीता खर्च रक्कम रु.४२,८४,०००/-+१८% जी.एस.टी. धरुन वार्षिक एकूण रु.५०,५५,१२०/- (अक्षरी–पन्नास लाख, पंच्चावन हजार, एकशे वीस मात्र) खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करुन, मान्यतेनंतर खर्चाची अंदाजपत्रकीय तरतूद सन २०२०-२१ चे पुरवणी अंदाजपत्रकात सादर करता येईल. तात्पुरता सदरचा खर्च साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील कंत्राटी कर्मचारी खर्च सन २०१९-२० चे मंजुर बजेट मधून करता येईल.

क) येथून पुढे सदर २८ पाणीवाटप आऊटसोर्स कर्मचा-यांची याप्रकारे भविष्यात अडचण उद्भवू नये. करिता, श्री साईप्रसादालयाकडील दरवर्षी निघणा-या ई-टेंडर प्रक्रियेत सदर कर्मचा-यांचा प्रचलित पद्धतीने सामावेश करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त अ, ब व क प्रमाणे कार्यवाही करणेस व सदर खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.१२८ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-साईप्रसाद निवासस्थान विभाग)**

---

**विषय नं.२९ रविवार दि.२१ जुन,२०२० रोजी सुर्यग्रहण असल्याने मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

प्रस्तावना- श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत समाधी मंदिर येथे विविध उत्सव, स्थानिक उत्सव, सण, महोत्सव असे विविध कार्यक्रम साजरे करण्यात येतात. त्याचप्रमाणे चंद्रग्रहण व सुर्यग्रहण दिसणार असल्यास संस्थान प्रथेप्रमाणे ग्रहणाचे वेध पाळण्यात येत नाहीत अशी पूर्वीपासून प्रथा आहे. याबाबत मंदिर पुजारी- श्री.बाळासाहेब जोशी यांनी ग्रहण कालावधीबाबत अनुभवातून मत व्यक्त केले आहे. त्यामध्ये खालील गोष्टी नमूद केल्या आहेत.

दाते पंचांग पान नंबर २६ व ४२ (अहमदनगर) मध्ये दर्शविले नुसार, शके १९४२, जेष्ठ कृ.!! ३० रविवार, दि.२१/०६/२०२० रोजी कंकणाकृती सुर्यग्रहण आलेले आहे. ग्रहणकाल २१/०६/२०२० रोजी सकाळी १०.०१ ते १३:२८ असा एकूण ३ तास २७ मिनिटे आहे. प्रथेप्रमाणे ग्रहण काळात दर्शन,आरती इ.कार्यक्रम बंद

ठेऊन संस्थान पुजा-यांमार्फत मंत्रोच्चार करण्यात येतो. त्यामुळे ग्रहणकालावधीत खालील प्रमाणे कार्यक्रम घेता येतील.

| अ.नं. | वेळ | कार्यक्रम तपशिल |
|---|---|---|
| ०१ | सकाळी ०९:४५ वा. | श्रींचे दर्शन बंद होईल. |
| ०२ | सकाळी १०:०५ वा. | मंत्रोच्चार सुरु होईल. |
| ०३ | दुपारी १३:२० वा. | मंत्रोपच्चार संपेल. |
| ०४ | दुपारी १३:३५ वा. | श्रींचे मंगलस्नान. |
| ०५ | दुपारी १३:४५ वा. | श्रींची शिरडी माझे पंढरपुर आरती होईल. |
| ०६ | दुपारी १४:३० वा. | मध्यान्ह आरती |

टिप –श्रींचा नैवेद्य तयार करण्यास अवधी लागणार असल्याने ग्रहण मोक्षानंतर १४.३० वा. पर्यंत नैवेद्य तयार होईल व नंतर माध्यान्ह आरती होईल.

विभागाचा अभिप्राय- पूर्वीपासून सुर्यग्रहण, चंद्रग्रहण या कालावधीत मंदिरांचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करण्यात आलेले आहेत.

अ) प्रथेप्रमाणे ग्रहण कालावधीत श्रींचे समाधी चौथरा तुळस, हरळने झाकूण समाधी मंदिर गाभा-यात मंदिर पुजारी यांचेमार्फत मंत्रोच्चार करण्यात येतील. ग्रहण कालावधी संपलेनंतर श्रींचे मंगलस्नान सुरु झाल्यानंतर श्रींची शिरडी माझे पंढरपुर आरती होईल तसेच श्रींची मध्यान्ह आरती दुपारी १४:३० वाजता होईल.

ब) ग्रहण कालावधीत इतर मंदिरातील दर्शन बंद ठेवावे लागेल.

क) अभिषेक पुजा, साईसत्यव्रत पुजेची सकाळी फक्त १ली बॅच घेता येईल, पुढील बॅचेस बंद ठेवाव्या लागतील.

ड) अभिषेक पुजा व साईसत्यव्रत पुजा तिकीटांची ऑनलाईन विक्री होत असल्याने दि. २१/०६/२०२० रोजी सदर बुकींग बंद ठेवणेबाबत साधारण ०२ महिने अगोदरच संस्थानचे आय.टी. विभाग व लेखाशाखा विभागास आदेशित करावे लागेल.

प्रस्ताव- तरी रविवार, दि.२१ जुन, २०२० रोजी सुर्यग्रहण असलेने उपरोक्तप्रमाणे निर्देशित केलेनुसार मंदिरांचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करणेकामी सदरहू प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रविवार दि.२१ जुन,२०२० रोजी सुर्यग्रहण असल्याने उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग/जनसंपर्क विभाग/लेखाशाखा/माहिती तंत्रज्ञान विभाग/संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.३०** **साईभक्तांना वाटण्यात येणाऱ्या उदी पॅकेटचे पॅकींगकरीता प्लास्टीक रोल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल. कलम क्र.२१(१) ग मध्ये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.१७(१) मध्ये भक्तगणांना आवश्यकत्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे, अशी तरतुद आहे.

प्रस्तावना:- श्रींचे द्वारकामाईतील पवित्र धुनीमधुन प्राप्त होणा-या उदीचा सर्व साईभक्तांना लाभ मिळावा याकरीता संस्थानमार्फत उदीचे पॅकेट तयार करुन सर्व साईभक्तांचे दर्शन झालेनंतर दर्शनरांगेतुन बाहेर येणा-या साईभक्तांना बुंदी वाटपाचे ठिकाणी उदी पॅकेट वितरीत करण्यात येते. श्रींचे उदी पॅकेट पॅकींग करणेकामी मंदिर विभागाकडे ०५ नग उदी पॅकींग मशीन आहेत. या उदी पॅकींग मशीनने प्लॅस्टीक रोलच्या सहाय्याने पॅकेटमध्ये उदी पॅकींग केली जाते. मंदिर विभागामार्फत दररोज सरासरी अंदाजे ५५,००० ते ६०,००० उदी पाकीटांचे साईभक्तांना वितरण करण्यात येते. गर्दीचे कालावधीत ७०,००० ते ७५,००० उदीचे पाकीटे वाटण्यात येतात. यासाठी महिन्यामध्ये अंदाजे ४०० किलो प्लॅस्टीक रोलचा वापर केला जातो.याकामी आवश्यक असणारे प्लॅस्टीकचे रोल देणगीदार यांचेकडुन स्विकारण्यात येत होते, आता सध्या खरेदी विभागामार्फत वार्षिक खरेदी करुन वापरण्यात येत आहे.

विभागाचा अभिप्राय:- यापुर्वी श्रींचे उदी वाटणेकरिता प्लॅस्टीक रोल ब-याच वेळेस साईभक्त देणगी स्वरुपात पुरवित होते. परंतु त्यांनी काही कारणास्तव प्लॅस्टीक रोल पुरविणेकामी असमर्थता दर्शविल्या नंतर प्लॅस्टीक रोलची खरेदी वार्षिक ई-टेंडरनेखरेदी विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/१५४०/दि.२५/०७/२०१९ अन्वये मे.हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचेकडून खरेदी करणेत येत आहे. एप्रिल-२०१९ ते आजतागायतपर्यंत उदी पॅकेटकरीता साधारण ६००० किलो प्लास्टिक रोलचा वापर झालेला आहे. आता सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरीता खालीलप्रमाणे प्लॅस्टिक रोल खरेदी करावे लागेल.

| Sr. No. | Material Description | Width | Structure | Approx. Requirement | Aprox. Rate/Kg | Approx. Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Plastic Roll- Single Color Printed and Multilayered film packaging material. The packaging material shall be more than 50 micron thickness.<br>(To be printed the name on roll as श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी & Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi) | 90 mm | 12 PET/ 25 LD | 7000 Kg | 200/- | **14,00,000/-** |

प्रस्ताव:- तरी उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद केलेनुसारमंदिर विभागासाठी वार्षिक प्लॅस्टीक रोल विहित पध्दतीने /ई-टेंडरद्वारे/ शासन नियमानुसार खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस तसेच याकामी येणा-या अंदाजे एकूण रुपये १४,००,०००/- (अक्षरी रुपये चौदा लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना वाटण्यात येणाऱ्या उदी पॅकेटचे पॅकींगकरीता प्लास्टीक रोल खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१४,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदर प्लास्टीक रोलचे micron thicknes ५० पेक्षा जास्त असावे ही बाब तपासुन घेण्यात यावी, अशी सुचना यावेळी देण्यात आली.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.३१** **समाधी मंदिरातील चौथऱ्याप्रमाणेच गुरुस्थान व नंदादीप येथे तसेच दत्त मंदिराचे कळसास, गोपूरास (घुमटास) सोन्याचा मुलामाचे काम देणगी स्वरुपात करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद–अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०३/२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.१७, निर्णय क्र.८९ "प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीगुरुस्थान, नंदादीप, दत्तमंदिर, शनि मंदिर, शिव मंदिर, गणपती मंदिर या मंदिरांचे कळसांना तसेच गोपूरांना (घुमटांना) साईभक्त श्री.बी.विजयकुमार, है.बाद यांचे देणगीतून सोन्याचा मुलामा देणेस मान्यता देण्यात आली."

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.५५, निर्णय क्र.३१२"साईभक्त बी.विजयकुमार, है.बाद यांनी देणगी स्वरुपात श्रींचे समाधी चौथ-यास सोन्याचा मुलामा देण्याची इच्छा असल्याचे ई-मेलव्दारे कळविले आहे. त्यांचेकडून श्रींचे समाधी चौथ-यास सोन्याचा मुलामा देणगी स्वरुपात करुन घेण्यास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना– उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०३/२०१५ रोजीचे सभेतीलनिर्णयान्वये सन २०१५ मध्ये देणगीदार साईभक्त श्री.बी.विजयकुमार, है.बाद यांनी त्यांचेकडील कारागीर आणून देणगी स्वरुपात श्रीगुरुस्थान, नंदादीप, दत्तमंदिर, शनि मंदिर, शिव मंदिर, गणपती मंदिर या मंदिरांचे कळसांना तसेच गोपूरांना

(घुमटांना) सोन्याचा मुलामाचे काम देणगी स्वरुपात करुन दिलेले होते. सदरहू कामास जास्त कालावधी झालेला असल्याने ब-याच ठिकाणी खराब झालेले आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील विषय नं.५५, निर्णय क्र.३१२ अन्वये दि.१२/०८/२०१९ ते दि.१३/०८/२०१९ रोजीदेणगीदार साईभक्त श्री.बी.विजयकुमार, है.बाद यांनी श्रींचे समाधी चौथ-याचे खराब झालेल्या सोन्याच्या मुलामाचेही काम देणगी स्वरुपात करुन दिलेले आहे.

आता देणगीदार यांनी आवक क्र. १६८८७ दि.२२/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये मंदिर परीसरातील गुरुस्थान, दत्तमंदिर व नंदादिप या मंदिरांचे कळसास तसेच गोपूरास (घुमटास) समाधी चौथ-याप्रमाणे तसेच पुर्वीप्रमाणेच सोन्याचा मुलामा (Gold plating patch work) देणगी स्वरुपात करुन देणार असल्याचे तसेच सदर काम करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त नमुद मंदिर परीसरातील गुरुस्थान, दत्तमंदिर व नंदादिप या मंदिरांचे कळसास तसेच गोपूरास (घुमटास) सोन्याच्या मुलामाचे काम देणगीदार यांचेकडून पुर्वीप्रमाणेच देणगी स्वरुपात करुन घेता येईल. तसेच सदरचे काम सुरु असतांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून संरक्षण विभागामार्फत एक सुरक्षा कर्मचारी, सदर कामाची फोटोग्राफी करणेकामी सीसीटीव्ही विभागाकडील एक कर्मचारी तसेच त्यांचे कारांगीरांचे मदतीकरीता बांधकाम विभागामार्फत एक कर्मचारी उपस्थित रहाणेबाबत कळविता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव– तरी मंदिर परीसरातील गुरुस्थान, दत्तमंदिर व नंदादिप या मंदिरांचे कळसास तसेच गोपूरास (घुमटास) सोन्याच्या मुलामाचे काम (Gold plating patch work) साईभक्त श्री.बी.विजयकुमार, है.बाद यांनी विनंती केलेनुसार त्यांचेकडून देणगी स्वरुपात करुन घेणेस मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिरातील चौथऱ्याप्रमाणेच गुरुस्थान व नंदादीप येथे तसेच दत्त मंदिराचे कळसास, गोपूरास (घुमटास) सोन्याचा मुलामा देण्याचे काम साईभक्त श्री.बी.विजयकुमार, हैद्राबाद यांचेकडून देणगी स्वरुपात करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर कामाची संस्थानचे पॅनलवरील सोनारांकडून पडताळणी करुन घेण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.३२** **अधिक मासानिमित्त "श्रीविष्णूयाग यज्ञ" व "श्रीमद भागवत कथा" चे आयोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद – अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल तसेच १७ (१) मध्ये प्रामुख्याने मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य आहे, अशी तरतुद आहे.

श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी वर्षात श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था मार्फत अधिक मासानिमित्त दि.१७/०५/२०१८ ते दि.१९/०५/२०१८ अखेर ०३ दिवस श्रीदत्त मंदिराचे प्रांगणात " श्रीविष्णूयाग यज्ञ " आयोजीत करण्यात आला होता. सदरहू श्रीविष्णूयाग यज्ञाचे पौरोहित्य श्रीउपासनी कन्याकुमारी स्थान, साकुरी, ता.राहाता यांचेमार्फत करण्यात आले होते.

आता याही वर्षी सप्टेंबर, ऑक्टोंबर या कालावधी मध्ये अधिक मास (पुरुपोत्तम मास) आलेला आहे. सदरहू कालावधीत श्रीविष्णूयाग यज्ञ व श्रीमद भागवत कथाचे आयोजन करणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी मौखिक निर्देश दिलेले आहे.

अ) मागीलप्रमाणे सदरहू कालावधीत ०३ दिवस श्रीविष्णूयाग यज्ञ करता येईल. या यज्ञाकरीता अंदाजे रु.५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे.

ब) तसेच अधिक मासानिमित्त त्याकाळात एकूण ०७ दिवस श्रीमद भागवत कथाचे आयोजन करता येईल. सदरहू भागवत कथाचे आयोजनाकरीता नामांकीत भागवतकार यांना आमंत्रित करावे लागेल. भागवत कथाचे आयोजनाकरीता अंदाजे २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त अ) व ब) मध्ये नमुदप्रमाणे यावर्षी येणा-या अधिक मासामध्ये श्रीविष्णूयाग यज्ञ हा मागील वर्षीप्रमाणेच श्रीदत्त मंदिराचे प्रांगणात करणेस व श्रीमद भागवत कथाचे आयोजन एका नामांकीत भागवतकार यांचेकडून करुन घेणेस तसेच त्या दोन्ही कार्यक्रमाचे नियोजनाकामी येणा-या एकत्रित अंदाजे रु.२,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अधिक मासानिमित्त "श्रीविष्णूयाग यज्ञ" व "श्रीमद भागवत कथा" चे आयोजन करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,५०,०००/-मात्र व इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.३३** **दर्शन/आरती पासेसचे देणगी शुल्कात वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद - महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकार" या शिर्षकाखाली अधिनियमि नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक- श्रींच्या दर्शनासाठी येणा-या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्ती तसेच मान्यवरांच्या शिफारशीनुसार येणा-या व्यक्तींना जनसंपर्क विभागामार्फत देण्यात येणा-या व्ही.आय.पी. पासेससाठी शुल्क आकारणेबाबत संदर्भ क्रमांक १ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक २७२ अन्वये गुरुवार, शनिवार व रविवार या दिवशी दर्शन आरती पासेसवर जनसंपर्क कार्यालयामार्फत शुल्क आकारणेबाबत निर्णय झालेला आहे. संदर्भ क्रमांक २ नुसार मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३०९ अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेसची अंमलबजावणी प्रत्यक्षात दिनांक १३.०३.२०१० पासून सुरु करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ३ नुसार मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३५८ (२५) अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेस सुविधेतुन गुरुवारचा दिवस वगळण्यात आलेला आहे. तसेच साईटेक प्रकल्पांतर्गत दिनांक १४ जुलै २०११ पासून ऑनलाईन दर्शन/आरती सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ४ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ अन्वये सर्व आरत्या करिता शुल्क आकारणेबाबत निर्णय झालेला असून संदर्भ क्रमांक ५ अन्वये दिनांक ०१.०४.२०१५ पासून जनसंपर्क विभागामार्फत व्ही.आय.पी. व्यक्तींकरीता देण्यात येणारे दर्शन पास प्रायोगिक तत्वावर आठवडयातील सातही दिवस शनिवार, रविवारच्या धर्तीवर सध्याच्या प्रचलित पध्दतीने देणगी शुल्क आकारणेत येऊन वितरीत करणेबाबत निर्णय झालेला आहे. संदर्भ क्रमांक ६ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०२.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक १२१ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन/आरती पासेस घेणारांची संख्या कमी होऊन, दर्शन रांगेमधून येणा-या साईभक्तांना लवकरात लवकर दर्शन मिळावे, याकरीता ऑनलाईन व जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन/आरती पासेसचे दि.०१ मार्च-२०१६ पासून खालीलप्रमाणे शुल्क आकारणेत यावे, असे ठरले.

| दर्शन / आरती | आकारावयाचे शुल्क |
|---|---|
| दर्शन | रु.२००/- |
| काकड आरती | रु.६००/- |
| माध्यान्ह आरती | रु.४००/- |
| धूपारती | रु.४००/- |
| शेजारती | रु.४००/- |

प्रस्ताविक– मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०२.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक १२१ चे निर्णयानुसार दर्शन पाससाठी प्रतिव्यक्ती २००/- रुपये, काकड आरतीसाठी प्रतिव्यक्ती ६००/- रुपये तसेच माध्यान्ह, धुपारती व शेजारतीसाठी प्रतिव्यक्ती ४००/- रुपये प्रमाणे शुल्क आकारण्यात येते. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) मार्फत व्ही.आय.पी. दर्शन/आरतीचे पासेस करीता शुल्क आकारणे ही सुविधा सुरु केल्यामुळे, जगाच्या व देशाच्या काणाकोप-यातील साईभक्तांना या सुविधेमुळे वेळेचे नियोजन करणेही सोपे झाले आहे. तसेच या सुविधेमुळे व्ही.आय.पी. दर्शन पासेसाठी श्री साईभ्क्तांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, त्यामुळे संस्थानला मोठया प्रमाणत देणगी शुल्क प्राप्त होत आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार जनसंपर्क विभागामार्फत दर्शन/आरतीचे पासेस वितरीत करण्यात येतात. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०२.२०१६ चे सभेतील निर्णयानुसार दिनांक ०१.०३.२०१६ पासून आरती पासेससाठी सध्याचे शुल्क व सुधारीत शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे.

१) जनसंपर्क विभाग-

| सुविधा | साईभक्तांची संख्या | सध्याचे शुल्क | रक्कम | सुधारीत शुल्क | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| व्ही.आय.पी.दर्शन | १६,३०,४७८ | २००/- | ३२,६०,९५,६००/- | ३००/- | ४८,९१,४३,४००/- |
| माध्यान्ह,धुप व शेजारती | १,५५,५७५ | ४००/- | ६,२२,३०,०००/- | ८००/- | १२,४४,६०,०००/- |
| काकड आरती | ६०,३७८ | ६००/- | ३,६२,२६,८००/- | १०००/- | ६,०३,७८,०००/- |
| एकूण- | १८,४६,४३१ | | ४२,४५,५२,४००/- | | ६७,३९,८१,४००/- |

२) ऑनलाईन दर्शन/आरती-

| सुविधा | साईभक्तांची संख्या | सध्याचे शुल्क | रक्कम | सुधारीत शुल्क | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ऑनलाईन दर्शन | ६,१७,२९६ | २००/- | १२,३४,५९,२००/- | ३००/- | १८,५१,८८,८००/- |
| माध्यान्ह, धुप व शेजारती | १,५९,०८५ | ४००/- | ६,३६,३४,०००/- | ८००/- | १२,७२,६८,०००/- |
| काकड आरती | ५२,५२७ | ६००/- | ३,१५,१६,२००/- | १०००/- | ५,२५,२७,०००/- |
| एकूण- | ८,२८,९०८ | | २१,८६,०९,४००/- | | ३६,४९,८३,८००/- |

दिनांक ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ या आर्थिक वर्षात सध्याचे शुल्कानुसार जनसंपर्क विभागामार्फत व ऑन लाईन सुविधेव्दारे दर्शन/आरती पासेसचे एकत्रीत वितरणातून संस्थानला ६४,३१,६१,८००/- रुपये उत्पन्न प्राप्त झाले आहे. तसेच प्रस्तावित वाढीव शुल्क आकारल्यास जनसंपर्क विभागामार्फत व ऑन लाईन सुविधेव्दारे दर्शन/आरती पासेसचे एकत्रीत तुलनात्मक रक्कम रुपये १०३,८९,६५,२००/- इतके उत्पन्न प्राप्त होईल. म्हणजेच मागिल आर्थिक वर्षातील साईभक्तांची संख्या विचारात घेता सुधारीत शुल्कानुसार रक्कम रुपये ३९,५८,०३,४००/- इतके वाढीव वार्षिक उत्पन्न संस्थानला प्राप्त होऊ शकते असे मत आहे.

तथापि, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व्दारे शिर्डी येथे येणा-या साईभक्तांकरीता विविध सोयी-सुविधा पुरविण्याकरीता विविध प्रकल्पांची कामे चालू आहेत. श्री साई प्रसादालयात दररोज मोफत अन्नदान केले जात असुन याकामी सुमारे ३५ ते ४० कोटी रुपये इतका वार्षिक खर्च केला जातो. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात मोफत औषधांसह वैद्यकीय उपचार केले जात असुन गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय अनुदान दिले जाते. याकामी व रुग्णालयातील कर्मचा-यांच्या वेतनासह सुमारे ९० ते १०० कोटी रुपये इतका वार्षिक खर्च संस्थानच्या वतीने केला जातो. या कामांकरीता दर्शन/ आरतीच्या वाढीव शुल्काचा वापर करता येईल.

मागणी– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन/आरती पासेसचे शुल्कात वाढ करणेबाबत.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या दर्शन पासेसाठी रुपये २००/- ऐवजी रुपये ३००/- प्रति व्यक्ती व सर्व आरत्यांच्या पासेसचे शुल्कात दुप्पट वाढ म्हणजे काकड

आरतीसाठी रुपये ६००/- ऐवजी रुपये १,०००/- प्रति व्यक्ती, माध्यान्ह, धुपारती व शेजारतीसाठी रुपये ४००/- ऐवजी रुपये ८००/- प्रति व्यक्ती प्रमाणे शुल्क आकारल्यास मागील वर्षाच्या प्राप्त झालेल्या पासेसच्या देणगी शुल्काच्या तुलनेत अंदाजे ४० ते ४५ कोटी रुपयांची वाढ होईल. या प्राप्त होणा-या वाढीव देणगी रक्कमेचा संस्थानच्या विविध विकास प्रकल्पांसाठी, श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णांचे मोफत उपचारांसाठी व श्री साईप्रसादालयात दररोज मोफत अन्नदानासाठी उपयोग होवुन ह्या सुविधा मोठया प्रमाणात साईभक्तांना पुरवता येतील. तसेच या प्राप्त होणा-या वाढीव देणगी रक्कमेमुळे भविष्यात यासारख्या अनेक उपक्रम व योजना साईभक्तांकरीता राबविता येतील, असे मत आहे.

तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणा-या व्ही.आय.पी. दर्शन पासेसाठी रुपये २००/- ऐवजी रुपये ३००/- प्रति व्यक्ती व सर्व आरत्यांच्या पासेसचे शुल्कात दुप्पट वाढ म्हणजे काकड आरतीसाठी रुपये ६००/- ऐवजी रुपये १,०००/- प्रति व्यक्ती, माध्यान्ह, धुपारती व शेजारतीसाठी रुपये ४००/- ऐवजी रुपये ८००/- प्रति व्यक्ती प्रमाणे शुल्क वाढ करणेस तसेच सदरची शुल्कवाढ ऑनलाईन दर्शन/आरती पासेससाठी करणेबाबत मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सविस्तर चर्चा होऊन निर्णय हाणेस विनंती.

**निर्णय क्र.१३३** **सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**विषय नं.३४** **श्रींचे मंदिरात व व्दारकामाई येथे दर्शनासाठी, आरतीचे वेळी, पालखी मिरवणूकीसाठी तसेच संस्थानचे उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थित असणाऱ्या स्थानिक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२२/११/२०१८ रोजी श्रींचे गुरुवारचे नित्याचे पालखीचे वेळी पालखीचे मागे व पुढे न राहणे बाबत सुचना देवूनही पालखी समवेत व पालखी समोर चाललेले ०७ ग्रामस्थ १) श्री शिवाजी अमतृराव गोंदकर २) श्री दिलीप कन्हैयालाल संकलेचा ३) श्री कैलास जाधव ४) श्री स दा गोंदकर ५) श्री राजेंद्र हरीभाऊ गोंदकर ६) श्री अमोल पोपटराव गायके ७) श्रीकृष्णा आढाव यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांना जा.क्र.एसएसएसटी/संरक्षण/९१०/२०१८दि.२७/११/२०१८चे पत्राने कळविणेत आले होते. त्यानुसार पोलीस विभागामार्फत संबंधीतांना कलम १४९ नुसार नोटीस बजावण्यात आली होती. सदर नोटीस संदर्भात श्री शिवाजी अमृतराव गोंदकर, रा. शिर्डी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे कोर्टात, श्री.शिवाजी अमृतराव गोंदकर, शिर्डी यांनी महाराष्ट्र शासन, मा.जिल्हाधिकारी साहेब, अ.नगर, मा.अप्पर पोलीस अधिक्षक, पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विरुध्द क्रिमीनल रिट पिटीशन क्र.-३७५/२०१९ अन्वये दाखल केलेले होते. सदर रिट पिटीशन संबंधी नोटीसांच्या प्रती संस्थानला दि.१८/०४/२०१९ रोजी प्राप्त झालेल्या होत्या..

सदरचे रिट पिटीशन मध्ये याचीकाकर्त्याने खालील प्रमाणे कोर्टास विनंती केली होती.

A) Criminal Writ Petition may kindly be allowed.

B) The impugned Notice bearing Out ward no Shirdi Pose/4422/2018 Dtd. 29/11/2018 issued by the respondent No.4 U/s 149 of Cr.P.C. thereby initiated preventive action against petitioner may kindly be quashed and set aside :

C) Pending hearing and final disposal of this criminal Writ Petition, Notice bearing Out ward No.ShirdiPo.Ste/4422/2018 dated 29/11/2018 issued by the respondent No.4 U/s 149 of Cr.P.C. may kindly be stayed & petitioner may be permitted to take part in the traditional weekly (i.e. on every Thursday) Palkhi ceremonies / festivals at Sai Baba Sansthan at Shirdi.

D) The Respondent authorities may kindly be directed to give adequate compensation to the petitioner for violating his fundamental right by fixing individual responsibility.

E) Pass such orders as this Honorable High Court deems fit and proper.

सदर प्रकरणी संस्थानचे वतीने कामकाज पाहणेसाठी जा.नं.एसएसएस/वशि/संरक्षण/३६३/२०१९ दि.०१/०५/२०१९रोजीचे पत्राने ॲड. संजय चौकीदार यांची नेमणुक करण्यात आली होती. सदरचे क्रिमीनल

रिटपिटीशनमध्ये वेळोवेळी कोर्टाच्या तारखा होऊन मा.न्यायालयाने दि.२६/०६/२०१९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

1. Rule. Rule Made returnable forthwith. Heard Finally with consent of learned counsels for the parties.

2. The proceeding if filed to challenge the notice given by respondent No.4 Police Inspector, Police Station, Shirdi, TalukaRahata, District Ahmednagar, under Section 149 of the Code of Criminal Procedure, 1973 (Cr.P.C.) In the notice it is mentioned that on 22/11/2018, when there was Palkhi Procession of ShriSai Baba, The present petitioner was walking along side the Palkhi and ahead of Palkhi when he was not authorized to do so. It is mentioned that during the Palkhi procession, he

entered in the ChavadiMandir and due to that some villagers become angry and they made complaint against him. It is mentioned that in future if he enters in the Palkhi procession then there will be some problem of law and order. In notice, it is also mentioned that, ShriSai Baba Sansthan had made application for taking action against the petitioner and due to that notice was given. It is mentioned that if in future he or his associate does any act during Palkhi procession and due to that there is breach of public peace and there is question of law of order, action will be taken under provision of the Bombay Police Act, 1951.

3. Learned counsel for the petitioner submitted that there are no rules, as such and as a devotee, he has right to walk along sidePalkhi Procession on Palkhi Marg. This matter was adjourned last time to give an opportunity ot the learned counsel of ShirdiSansthan to show the rules with regard to Palkhi procession. Today, Mr. Chowkidar, leared counsel for respondent No.5 – Sansthan submitted that he is ready with the reply, but the reply is not approved by the committee of respondent No.5. He is not able to show the rules made with regard to Palkhi Procession. Today, learned counsel for the respondent No.5 made statement that the petitioner is not claiming any right to carry and hold Palkhi. In view of such statement, this Court holds that relif needs to be given.

4. In the notice given under Section 149 of the Cr. P.C. there is mention that the petitioner was not authorized to do such thing. Such opinion can be formed, only when there are rules. When there are no rules, such opinion can not be formed and it is unfortunate that only because, on request, such notice was issued against petitioner.

5. In the result, petition is allowed. The aforesaid notice is quashed and set aside. Rule made absolute.

वरील प्रमाणे आदेशामध्ये मा.कोर्टाने पालखी सोहळ्याकामी नियमावली बनविणेचे निर्देश दिलेले आहेत. तत्पुर्वी मा.व्यवस्थापन समिती दि.२०/११/२०१८ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१ श्री राजेंद्र सोपानराव जगताप, (विद्युत पर्यवेक्षक, प्र.पाणी पुरवठा विभाग प्रमुख (अतिरीक्त कार्यभार, प्र.अधिक्षक मंदिर विभाग) यांचे विरोधात शिर्डी पोलीस स्टेशनला दाखल झालेल्या प्रथम माहिती अहवाल व निवेदनाबाबतचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.७१४ अन्वये श्रींचे मंदिरात व द्वारकामाई येथे दर्शनासाठी, आरतीचेवेळी, पालखी मिरवणूकीसाठी तसेच संस्थानचे उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थीत असणाऱ्या स्थानीक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेमध्ये मान्यतेसाठी सादर करावी, असे ठरले. तसेच पुढील पालखीचे दरम्यान होणाऱ्या गर्दीचे वेळी सुरक्षा व्यवस्था चोख ठेवून कोणताही अनुचीत प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावे, असे ठरले होते.

त्यानुसार संरक्षण विभागामार्फत श्रींचे मंदिरात व द्वारकामाई येथे दर्शनासाठी,आरतीचे वेळी,पालखी / रथमिरवणूकीसाठी तसेच स्थानीक उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थीत असणाऱ्या स्थानीक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करुन मा.व्यवस्थापन समिती दि.०४/०७/२०१९चे सभेत आयत्या वेळेचा

विषयनं.२२ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदरचा प्रस्ताव निर्णय क्र.३६५ नुसार स्थगित ठेवण्यात आला आहे.

मा.न्यायालयाने पालखी सोहळयाकामी नियमावली बनविणे बाबत निर्देश दिलेले असून श्रीचे रथ / पालखी मिरवणूकीचे वेळी श्री गोंदकर किंवा इतर मानकरी यांना प्रवेश द्यावा किंवा कसे याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये चर्चा होऊन नियमावली अंतीम करणे आवश्यक आहे.

श्रींचे गुरुवारचे पालखी व इतर वेळी होणारी गर्दी कमी करण्यासाठी व श्रींचे पादुका, सटका व फोटोचे पावीत्र्य राखण्यासाठी करावयाची नियमावली खालील प्रमाणे तयार करणेत आली आहे.

१. ज्या ग्रामस्थांना पालखीसाठी हजर रहावयाचे असेल त्यांनी ९.०० वाजेपूर्वीच दर्शन घेऊन व्दारकामाई व चावडी परिसरात बॅरीगेटींगचे आत जाऊन बसावे. पालखी पूर्वी १० मिनिटे कोणालाही पालखी मार्गातून समाधी मंदिरात दर्शनासाठी सोडले जाणार नाही.इतर साईभक्तांनी सध्याचे प्रचलीत पध्दतीप्रमाणे बॅरीगेटचे बाहेर पालखी सोहळा पाहणेकामी बसावे.

२. पालखीसाठी येणारे ग्रामस्थांनी दिव्यांग गेटने प्रवेश करुन दर्शन झालेनंतर व्दारकामाईचे किंग गेटने द्वारकामाई व चावडी चे परिसरात पालखीचे वेळी बसून रहावे.

३. पालखी वेळी दर्शनलाईन ऑफीस बाजू दोन लाईनने मागे काढावी. पादुका बाजु दोन लाईनमध्ये ग्रामस्थांना दर्शनासाठी सोडावे, सदर ग्रामस्थांनी नमूद दोन दर्शन रांगमध्ये दर्शनानंतर थांबून येत तसेच गाभा-यातून दर्शनासाठी जावू नये.

४. संस्थानचे पालखी सोहळयासाठी नेमणुक केलेले कर्मचारी व्यतीरीक्त कोणीही कर्मचारी हे स्वत: किंवा त्यांचे कुटूंबीय समाधी मंदीर ते द्वारकामाई या मार्गात पालखीच्या मागे-पुढे चालणार नाहीत. त्यांनी द्वारकामाई व चावडी समोरील जागेत पालखीसाठी बसावे.

५. श्रींच्या गुरुवार पालखी मिरवणूकीचे वेळी पालखीसमोर, मागे व समाधी गाभारा ते व्दारकामाई यामार्गात अधिकृत व्यक्ती (कै.तात्या पाटील कोते यांचे ०१ वंशज व कै.बयाजी पाटील कोते यांचे ०१ वंशज, छत्री धरणे करीता कै. भागोजी शिंदे यांचे ०१ वंशज, बत्तीधारक ०२, डफ वादक ०२, ताशा वादक ०२, अब्दागिरीधारक ०१, शिंग वादक ०२, पालखी सेवेकरी ०४, व बंदोबस्त कर्मचारी, भजनीमंडळ) यांचे शिवाय कोणीही चालु नये अथवा उभे राहु नये.

६. ग्रामस्थांनी पालखी सोहळा/मिरवणूक संपलेनंतर बाहेर जाणेकरीता व्दारकामाईचे किंग लहान गेट व दिव्यांग गेट यांचा वापर करावा.

७. रात्रौ. ८.३०वा. चार पैकी पादुका बाजु दोन दर्शन रांगा भक्तांना दर्शनासाठी बंद कराव्यात. फक्त ऑफीस बाजु दोन दर्शन रांगा चालू ठेवाव्यात. गर्दीचा अंदाज घेऊन बायोमेट्रीक पास वितरण बंद करणेबाबत निर्णय घ्यावा.

८. श्रींची पालखी व्दारकामाई व चावडी येथे जातांना व पुन्हा समाधी मंदिराकडे परत येतांना जाळी बाहेरील भाविकांना श्रींचे पालखी मिरवणुक सुलभतेने बघता यावी याकरीता ग्रामस्थांनी पालखी मार्गात उभे न राहता चावडी व व्दारकामाई समोरील मोकळया जागेत खाली बसावे.

९. पालखीचे वेळी फोटो धरण्याकरीता कै.तात्यापाटील कोते यांचे ०१ वंशज व कै.बयाजीपाटील कोते यांचे ०१ वंशज, छत्री धरणेकरीता कै. भागोजी शिंदे यांचे ०१ वंशज, बत्तीधारक०२, डफ वादक ०२, ताशा वादक ०२, अब्दागिरीधारक ०१, शिंग वादक ०२, पालखी सेवेकरी०४ हजर राहतील. त्यापैकी कोणी गैरहजर असल्यास किंवा आवश्यकता असल्यास मंदिरातील चोपदारांनी नमूद काम करावे.

१०. श्रींच्या पादुका व सटका एक पुजारी यांचे हातात राहील. त्यांचे बाजूला मंदिर अधिक्षक/पर्यवेक्षक यांचेकडे श्रींचा कोट असेल. श्रींच्या फोटोसमोर दोन पुजारी चौरी हलवतील. त्यांचे दोन्ही बाजूला मंदिर डयुटीचे पुजारी व चोपदार व संरक्षण डयुटीचे गार्ड हजर राहतील.

११. स्थानीक उत्सव / मुख्य उत्सवाचे वेळी देवधिकांचा फोटो (उदा. विठ्ठलाचा फोटो किंवा श्रीराम प्रभुंचा फोटो किंवा श्रीकृष्णाचा फोटो, इत्यादी) पादुकांच्या मागे संस्थान पुजारी धरतील.

१२. भजनी मंडळामध्ये चालण्यासाठी मंदिर विभागाने दिलेले कार्ड सोबत ठेवावेत. भजनी मंडळात ०७ टाळकरी व मंदिर विभागाचे एक मृदुंग वादक हजर राहतील.

१३. भजनीमंडळाचे पुढे स्थानिक झांजपथकाचे जास्तीत जास्त २० सदस्य व त्यापुढे शाळकरी मुले लेझीम पथकाचे २० मुले यांना मागणीनुसार परवानगी देता येईल. सदर इच्छुकांनी आपली नावे पालखी पूर्वी मंदिर व संरक्षण विभागाकडे द्यावीत. पालखी चावडीत गेल्यानंतर चावडीतील आरतीनंतर बाबा चावडीमध्ये विश्रांतीसाठी

थांबत असल्यामुळे पालखी चावडी मधून समाधी मंदिरात माघारी येताना कोणतेही वाद्य वाजवू नये. सर्व वाद्य वादक हे चावडी परिसरातच थांबून राहतील. त्यांनी पालखी बरोबर माघारी समाधी मंदिरात येवू नये. बाहेर जाण्यासाठी त्यांनी दिव्यांग गेट किंवा गुरुस्थान गेटचा वापर करावा.

१४. स्थानीक गांवकरी, कर्मचारी यांनी समाधीमंदिर ते द्वारकामाई गेट दरम्यान थांबू नये. ज्यांना पालखीसाठी हजर रहावयाचे आहे त्यांनी द्वारकामाई, मुखदर्शन हॉल, चावडी परिसर येथे पालखी पूर्वीच जावून बसावे. ग्रामस्थांची जास्त गर्दी झाल्यास सदर संख्या बाबत वेगळे आदेश काढण्यात येतील.

१५. चावडीमध्ये श्रींचा फोटो व पादुका नेलेनंतर चावडीमध्ये चिलीमसाठी फोटो धरणारे व छत्री धरणारे व्यक्तींशिवाय कोणीही ग्रामस्थांनी थांबु नये.

१६. सर्व आरतीचे वेळी जाळीचे पुढे, जाळीचे आत महत्वाचे/अतिमहत्वाचे व्यक्ती/देणगीदार यांना जनसंपर्क विभागाचे निर्देशानुसार ठरवून दिलेल्या जागीच उभे करावे. ग्रामस्थांनी आरतीचे वेळी जाळीचे पुढे उभे राहू नये. याकामी जनसंपर्क विभाग, मंदिर विभाग व संरक्षण विभागाचे कर्मचारी संयुक्तीक जबाबदारी पार पडतील.

१७. फोटो/छत्री धरणारे मानकरी यांना सुतक/वृध्दी असल्यास अथवा गैरहजर असल्यास सर्व अधिकार मंदिर अधिक्षक / पर्यवेक्षक यांना राहील.

१८. श्रींचे तिनही मुख्य उत्सव किंवा स्थानीक उत्सवाचे वेळी शिर्डी गावातून पालखी व रथ मीरवणुकीचे वेळी वरीलप्रमाणे सर्व कामकाज चालेल.

१९. पालखी/रथ/आरती/दर्शन व्यवस्था नियमामध्ये बदल करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

श्रींचे मा.व्यवस्थापन समिती दि.२०/११/२०१८ चे सभेतील निर्णय क्र.७१४ व मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबादचा दि.२६/०६/२०१९चे आदेशानुसार गुरुवारचे नित्याची पालखीकरीता वरीलप्रमाणे नियमावली तयार करणेत आलेली आहे. रथ/पालखीचे सोबत मिरवणुकीचे वेळी पादुका/फोटो/सटका/रथ/पालखीचे जवळ कोणास प्रवेश द्यावा, कोणास प्रवेश देऊ नये हे निश्चीत नसल्याने भविष्यात कायदा व सुव्वस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता नियमावली अंतीम होणे आवश्यक आहे. तरी सदर पालखी नियमावली अंतिम करणे कामी सविस्तर चर्चा होऊन नियमावलीमध्ये वाढ करणे अथवा नियम कमी करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१३४ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला. (कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.३५ साई मंदिर सुरक्षेकरीता CIFS/CRPF ची सुरक्षा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** सी.आय. एस. एफ. यांचे मार्फत सुरक्षा यत्रंणा घेणे बाबतची यापूर्वी कार्यवाही – तत्कालीन मा.श्री राधाकृष्ण विखे पा मंत्री कृषी व पणन,महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे दि.०२.०८.२०१२ रोजीचे पत्राद्वारे तत्कालीन मा नामदार श्री पृथ्वीराज चव्हाण सो,मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांना पत्राद्वारे कळविले होते की, " श्री साई मंदिराच्या सुरक्षेसाठी मंदिराची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल (CISF) कडे सोपविण्यातबाबत उचित कार्यवाही करावी "तद्नंतर दि.०८.१०.२०१२ चे मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये आयत्यावेळेचा विषय नं.०४ ने निर्णय क्रं.८५७ नुसार श्री साई मंदीराचे सुरक्षेकरीता केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांचेशी पत्रव्यवहार करुन संस्थानसाठी संरक्षण यंत्रणा शक्य तेवढया लवकर कार्यान्वीत करणेत यावी.असा निर्णय झालेला होता.तसेच.मा मंत्री कृषी व पणन,महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांचे पत्र कार्यासन अधिकारी विधी व न्याय विभाग यांना प्राप्त झालेले पत्राचे अनुषंगाने क्रं.सासंवि-२०१२/संदर्भ -५६७/का.सोळा,विधी व न्याय विभाग यांचे दि.२० नोव्हेंबर २०१२ रोजीचे पत्राद्वारे सदर विषयाबाबत अभिप्रायासह वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करणे बाबत कळविले होते.त्यानुसार श्री साईबाबा संस्थान सी आय एस एफ सुरक्षा यंत्रणा घेण्यास तयार असले बाबत अभिप्राय विधी व न्याय विभागास सादर करण्यात येऊन जा.नं.एसएसएस/वशि/ संरक्षण/ ३८८३/२०१२ दि.२७/११/२०१२ नुसार Director General, CISF, New Delhi यांचेशी पत्रव्यवहार केल्यानुसार त्यांचे वरिष्ठ प्र.शा.अधिकारी, CISF यांचे क्र.१२०१३(१०)/१९/१२/ आईएन्डपी/२०१३ दि.०४/०२/२०१३ चे पत्र. प्रमाणे श्री जे.के.बागडी,वरिष्ठ प्र.शा. अधिकारी(प्रवनी) यांनी "सदरचा प्रस्ताव गृहमंत्रालय, भारत सरकार यांचेकडे पाठविलेचे इकडील कार्यालयास कळविले. तद्नंतर जा नं.एसएसएस/वशी-संरक्षण /५२३९/१३ दि.१०.०२.२०१३ अन्वये कार्यासन अधिकारी विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांना दिलेले पत्र. रितु अरोरा, DIG, CISF यांचे क्र.ID/१२०१३(१०)६३/१२/I&P/१९७ दि.१४/०२/२०१५ चे पत्र.

चे पत्राद्वारे रितु अरोरा, डेप्युटी इन्सपेक्टर जनरल,(I&P) डायरेक्टर जनरल CISF,गृह विभाग,यांनी No.ID-12013 (10) /163/12 /I&P/197 Dt.14, Feb,2014 चे पत्रान्वये,

"The Government of Maharashtra may continue to provide security to the temple and the Central Armed Police Force could be requisitioned for assisting the State Government in law & order duties for a specific short period as and when required." असे संस्थानला कळविले होते.

त्यानंतर:- श्री शिवदत्त कुमार, Dy.com. CISF India Security Force,नाशिक यांचे पत्र क्र. इ-४२०९९ केऔसुब/आईएसपी ( ना ) १४/४०३२ दि.०७/१०/२०१४ चे पत्रा अन्वये उप कमान्डन्ट केंद्रीय औदयागिक सुरक्षा बल भारतीय टाकसाळ ,छापखाना,नाशिक यांचे दि.०७.१०.२०१४ रोजीचे पत्रामध्ये त्यांनी नमुद केले आहे की,श्री साईबाबा संस्थानला सुरक्षा संदर्भात सी आय एस एफ च्या मागर्दर्शनाची सल्ल्याची आवश्यकता असेल व ती त्यांना हवी असेल तर आमची सदर सेवा पुरविण्याची तयारी आहे .त्यानुसार सी आय एस एफ यांचे मार्फत सुरक्षा मार्गदर्शन सल्ल्याची आवश्यकता असल्याने सादर विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला त्यावर दि.०९/१०/२०१४ रोजीचे मा.व्य.समिती चा सभेतील निर्णय. नुसार दि.०९.१०.२०१४ रोजी मा.व्य .स.सभेपुढे विषय नं.१७ व निर्णय क्रं.९०२ ने मुद्दा १. केंद्रीय औ.सु.बल संस्थेकडून संस्थानला मार्गदर्शन घेण्याची अवश्यकता असल्याने सदर संस्थेची विनामुल्य अथवा मानधन तत्वावर कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणेकामी त्यांचेकडे सविस्तर विचारणा करणे बाबत कळविले होते त्याचप्रमाणे मुद्दा २. त्यांचे मार्फत मंदिर व मंदिर परिसराच्या सुरक्षेसाठी सुरक्षा कर्मचारी घ्यावायाचे झाल्यास त्यांचे वेतन व मानधन यावर किती खर्च येईल याबाबत सविस्तर प्रस्ताव सभसमोर सादर करणेत यावा असा निर्णय झाला.त्यास अनुसरून मुद्दा क्रं.०१ श्री शिवदत्त कुमार, डेप्युटी कमांडंट,CISF, इंडीया सिक्युरिटी फोर्स यांचेकडे कन्सलटंन्सी सेवा पुरविणेबाबत व सुरक्षा पुरविणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्याकामी त्यांना जा..नं.एसएसएस/वशि/संरक्षण/३३८७/२०१४ दि.१७/१०/२०१४ ने श्री शिवदत्त कुमार, डेप्युटी कमांडंट, CISF नाशिक यांना चे पत्रान्वये कळविण्यात आले होते त्यावर त्यांनी श्री सुमत सिंग, असिस्टंट इन्स्पेक्टर जन., दिल्ली यांचे दि.०२/१२/२०१४ चे पत्राने कन्स्लटंन्सी सेवा पुरविणेकामी रु. ३ लाख २५ हजार इतका खर्च कळविला सदर खर्चास मा.व्य समितीची मान्यता घेण्यात आली व त्याप्रमाणे त्यांचे समवेत वेळोवेळी पत्रव्यवहार व मिटींग आयोजीत करण्यात येऊन त्यांचे मार्फत सुरक्षा विषयक मार्गदर्शन घेण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी केलेला पहाणी अंती ऑडीट रिपोर्ट सादर केला आहे.

परंतु मुद्दा क्रं.०२ नुसार जा.नं.एसएसएस/वशि/संरक्षण/४८८७/२०१५ दि.०६/०१/२०१५ ने AIG, CISF, दिल्ली यांना दिलेले पत्र. श्री सुमंत सिंग आसि.इन्स्पेक्टर जनरल /टेक महानिदेशक केंद्रिय औ.सुरक्षा दल यांना संस्थानला एकुण मंदिर सुरक्षेकरीता ऑफीसर ग्रेडचे अधिकारी-01, सुपरवाझर ग्रेडचे-03 व सिक्युरिटी गार्ड ग्रेडचे 113 असे एकुण 117 कर्मचारी पुरविणेकामी खर्चाचा अंदाज कळविणे व मिटींग आयोजीत करणेकामी कळविणेत आलेले आहे. सदरचे पत्राचे अनुषंगाने उप महानिर्देशक(प्रवनी) CISF यांचे क्र.आईडी १०)/१६३/१२/आईएन्डपी/२०१५-१३३ दि.०६/०२/२०१५ चे पत्रा प्रमाणे उप महानिरीक्षक (प्रवनी) यांनी पत्र क्र.आईडी-12013(10)163/12/आईएन्डपी/2015 133/ दि.06/02/2015 चे पत्रानुसार.

"The Government of Maharashtra may continue to provide security to the temple and the Central Armed Police Force could be requisitioned for assisting the State Government in law & order duties for a specific short period as and when required." असे कळविले आहे. यावरुन असे सिध्द होते की,महानिर्देशक केंद्रीय औद्योगीक सुरक्षा बल (गृहमंत्रालय) दिल्ली यांचे समवेत झालेल्या पत्रव्यवहारावरुन त्यांनी वेळोवेळी केंद्रीय सुरक्षा बल श्री साईबाबा संस्थान यांना State Government in law & order प्रमाणे देणे शक्य नाही असेच कळविलेले आहे.

त्यानंतर:- १) मा.श्री राधाकृष्ण विखे पाटील,विरोधी पक्ष नेता ,महाराष्ट्र विधानसभा मुंबई यांचे दि.०५.०२.२०१५ चे पत्रावर कार्यवाही होणे बाबत अपर जिल्हादंडाधिकारी अहमदनगर यांचे क्र.डीसी /कार्या. ९ब/२०५६/२०१५ दि.०४.०८.२०१५ चे पत्र जा नं एसएसएस/वशी/संरक्षण /२५८५/२०१५ दि.०७.०८.२०१५ रोजी मा.जिल्हाधिकारी सो, अहमदनगर यांना दिलेले पत्र. अवर सचिव,गृह विभाग,महाराष्ट्र शासन यांचे क्रं.एसएसए ०३१५/प्र.क्र.१७/विशा-४ गृह विभाग मंत्रालय मुंबई यांचे दि.१३.०७.२०१५ रोजीचे पत्र मा जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांना प्राप्त होऊन सदर पत्राची प्रत इकडील कार्यालयास झाली त्यामध्ये श्री साईबाबा मंदिरासाठी सी आय एस एफ सुरक्षा दलामार्फत सुरक्षा पुरविण्यात यावी. सदर सुरक्षेकरीता आवश्यक तो

निधी श्री साईबाबा संस्थान शिर्डी करणार आहे. त्यामुळे राज्य शासन व केंद्र शासनावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही.असे विरोधी पक्ष नेते महाराष्ट्र शासन यांचे दि.५.१२.२०१५ चे पत्रान्वये कळविले आहे तथापि सदर त्यानुसार श्री शिर्डी संस्थानचे ठरावाबाबतचे कोणतेही पत्र शासनाकडे दिसून येत नाही.तसेच विधानसभेतील अश्वासन क्रं.६९४ तसेच लोकसभा अतारंकित प्रश्न क्रं.५७०२ हे दोन्ही विषय याच विषयास अनुसरुन असल्याने ते प्रलंबित आहेत.तरी श्री शिर्डी संस्थान खर्च करण्यास तयार आहे किंवा कसे याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास तात्काळ सादर करण्यात यावा असे कळविले होते.

२) त्याप्रमाणे जा नं एसएसएस/वशी/संरक्षण /२५८५/२०१५ दि.०७.०६.२०१५ रोजी मा जिल्हाधिकारी सो,अहमदनगर यांना सविस्तर अहवालासह सादर करण्यात येऊन कळविण्यात आले आहे की, साई मंदिर सुरक्षेकरीता सी आय एस एफ यांचे मार्फत सुरक्षा व्यवस्था घेणेबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तयार आहे.त्याकामी श्री सुमंत सिंग, असि.इन्स्पेक्टर जनरल (टेक्नी) न्यु दिल्ली यांचेशी ११७ कर्मचा-यांचा खर्च कळविणेबाबत पत्रव्यवहार केलेला असुन त्यांचेकडून खर्चाचा अंदाज प्राप्त झालेनंतर सी आय एस एफ ची सुरक्षा व्यवस्था बाबत निर्णय घेण्यात येईल.

३) सी.आय एस.एफ यांचे बेरोबर वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येऊन उप-महानिदेशालय/प्रवेश व नीति यांचे पत्रांकः आईडी-१२०१३ (१०)१६३/१२/आईएन्डपी/२०१६-८७ दि.२५ जानेवारी २०१६.. उप-महानिदेशालय/प्रवेश व नीति यांचे पत्रांकः आईडी-१२०१३ (१०)१६३/१२/आईएन्डपी/२०१६-८७ दि.२५ जानेवारी २०१६ दि.२५ जानेवारी २०१६ रोजीचे पत्रात,श्री साईबाबा संस्थान,शिर्डी (महाराष्ट्र) यांनी दि.२७/११/२०१२ च्या पत्रानुसार केंद्रीय औदयोगिक सुरक्षाबल नेमणुक करणेबाबत विंनती केली होती ती या संचालनास प्राप्त झाली आणि पुढे मिनिस्ट्री ऑफ होम अफेयर्स यांचेकडे विचार करण्याकरीता आणि पुढील आदेशासाठी पाठविण्यात आली या विषयी झालेल्या निर्णयाबाबत आपणास यापुर्वी सुध्दा आमच्या संचानलयाच्या पत्र क्र.(१९७)दि.१४.०२.२०१४ व्दारे कळविण्यात आले होते झालेला निर्णय.

"The Government of Maharashtra may continue to provide security to the temple and the Central Armed Police Force could be requisitioned for assisting the State Government in law & order duties for a specific short period as and when required." या प्रमाणे निर्णय असल्याने श्री साईबाबा मंदिर परिसर येथे केंद्रीय औदयोगिक सुरक्षाबलाची कायमस्वरूपी नियुक्ती करणे योग्य नाही पंरतु जेंव्हा गरज पडेल तेंव्हा एका छोटया वेळेसाठी कायदा आणि सुरक्षा कायम ठेवण्यासाठी बोलावू शकतात .असे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे समवेत केलेले पत्रव्यवहार. - महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचे मार्फत सुरक्षा कर्मचारी घेणेकामी करण्यात आलेले कार्यवाहीचे एकत्रित पत्रव्यवहार

तथापी श्रींचे शताब्दी महोत्सव २०१८ चे नियोजनकामी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ ,मुंबई यांचे मार्फत CISF ची सुरक्षा मिळेपर्यंत तातडीची गरज म्हणून मंदिराचे महाव्दार व दर्शनरांग प्रवेशव्दार तसेच ज्या ठिकाणी संस्थानचे आर्थिक व्यवहार चालतात अशा ठिकाणी बंदुक/शस्त्रधारी सुरक्षा कर्मचारी घेणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ ,मुंबई यांचे मार्फत सुरक्षेची तजवीज करावयाची झाल्यास खर्चाचा अंदाज घेणेसाठी त्यांना पत्र देऊन प्रतीमहा किती वेतन द्यावे लागेल याबाबत प्रस्ताव जा नं एसएसएस वशी संरक्षण /५४२७/२०१५ दि.३१.१२.२०१५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानंतर जा नं.मरासुम/२०१/२०१६ दि.१६.०१.२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले.

त्यावर वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येऊन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

दि.१६.०८.२०१६ रोजी झालेल्या मा.व्य.समितीचे सभेमध्ये विषय नं.०४ मंदिर व मंदिर परिसर व संस्थानचे इतर विभागातील सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा घेणेबाबत .यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.५१३ अन्वये सुरक्षा कर्मचारी घेण्यासाठी सिक्युरिटी ऑडीट करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.सुरक्षा ऑडीट अंती एकुण २०४ कर्मचारी यांची आवश्यकता असले बाबत ठरले..

दि.२५.०७.२०१७ रोजी झालेल्या मा.व्य.समितीचे सभेमध्ये विषय नं.२० यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की,सध्या संस्थानचे कायम व कंत्राटी सुरक्षा रक्षकांची संख्या जास्त असल्यामुळे संस्थानला मोठया प्रमाणावर आर्थिक भार पडत आहे.तथापि मंदिर सुरक्षा हाही अतिशय प्राधान्याचा विषय आहे.त्यामुळे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे ५० सुरक्षा कर्मचारी व एक सुरक्षा अधिकारी एवढे मनुष्यबळ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने सुरुवातीस एक वर्ष (दि.०१ ऑक्टोंबर २०१७ ते दि.३० सप्टेंबर २०१८

कालावधीसाठी घेणेत यावे.व त्यांना कामाच्या अनुभवानुसार गरज पाहुन मनुष्यबळ वाढविणेबाबत पुढील निर्णय घेण्यात यावा.

त्यानंतर वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येऊन

दि.२५.०९.२०१७ रोजी विषय नं.१० नुसार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे मार्फत श्री साई मंदिर सुरक्षेकामी प्रायोगिक तत्वावर ३ महिने कालावधीसाठी १०० सुरक्षा कर्मचारी व त्यानुसार आवश्यक असलेले अधिकारी घेण्यात यावे तसेच या महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या कर्मचा-यामध्ये संस्थान कर्मचा-यांचीही नेमणुक करणेत यावी.असे निर्णय ८४० ने ठरले.

त्यावर त्यांनी ०३ महिने कालावधीसाठी सुरक्षा कर्मचारी पुरविणेस समती दर्शविली नाही.

१) दि.०८.०१.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८४० अन्वये महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे मार्फत श्री साईमंदिर सुरक्षेकामी प्रायोगिक तत्वावर ०३ महिणे कालावधीसाठी १०० सुरक्षा कर्मचारी व त्यानुसार आवश्यक असलेले अधिकारी घेण्यात यावे.असे ठरले आहे.त्यानुसार महाराष्ट्र मंडळ यांचेबरोबर पत्रव्यवहार केला असता त्यांनी दि.२७.११.२०१७ रोजीचे पत्रान्वये त्यांचेकडील ४ अधिकारी व १२८ सुरक्षा रक्षकांसाठी आवश्यक डिपॉझीट +१ महिन्याचे वेतनाकरीता रु.१,११,७७,३२०/- मात्र रकमेची मागणी केलेली आहे.

परंतु सध्या समाधी शताब्दी वर्षास सुरुवात झालेली असून अपेक्षेप्रमाणे साईभक्तांची गर्दी नसल्यामुळे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे मार्फत सुरक्षा कर्मचारी घेणेबाबतचा निर्णय रद्द करणेत यावा असे ठरले.

सद्यस्थिती:- १) डॉ राजेंद्र बाली सिंग यांचे सा.प्र.शा विभागाकडील आवक.क्रं. ११४१० दि.१७/१०/२०१९ रोजीचे प्राप्त पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी “साईबाबा मंदिर ,शिर्डी येथिल सुरक्षा आणि सतर्कते विषयी ब-याच वेळा मी SSST बोर्ड मिंटींग मध्ये आणि ईतर मेंबर्सना ब-याच वेळा मी CISF अथवा CRPF यांच्याकडून सुरक्षा घेण्याविषयी माझे मत माडंले आहे परत एकदा देशातील काही मंदिरांना तोडफोड आणि दंगे करण्याविषयी भितीचे पत्र पाठविले आहे. मी असे सुचवू ईच्छीतो की मंदिर परीसरात CISF/CRPF यांच्याकडून सुरक्षा घ्यावी. त्या एजन्सीस देशाच्या विविधतेने आणि कुशलतेने सज्ज आहेत, अगदी विचित्र आणि संवेदनशिल स्थिथीत देशातील दुर्गम भागात संसाधनांना सुरक्षा पुरवितात.कृपया मी केलेली सुचना लक्षात घेऊन श्री साईबाबा मंदिर आणि भक्तांना शांततेने दर्शनासाठी सुचविलेली सुरक्षा यंत्रणा पुरवावी.” असे नमुद केलेले आहे.

२) पोलीस निरीक्षक कार्यालय शिर्डी,यांचे सा.प्र.शा.वि.आवक क्र.१३३३८ दि२८/११/२०१९चे पत्र. पोलीस निरीक्षक कार्यालय शिर्डी,यांचे सा.प्र.शा.विभागाकडील आवक क्र. १४३११ दि.१३/१२/२०१९ चे पत्र. साई मंदिर सुरक्षा (पोलीस ) यांचे सा.प्र.शा.विभागाकडील आवक क्र. १५३३१ दि.३०/१२/२०१९ चे पत्र नुसार पोलीस निरीक्षक कार्यालय,शिर्डी,तसेच साई मंदिर सुरक्षा ता.राहाता यांचे गोपनीय जावक क्रमंक –शिर्डी पोस्टे ३१५/२०१९ दि.२८/११/२०१९ आन्वये.पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असुन सदर पत्रात त्यांनी साईबाबा मंदिर सुरक्षा आणि संरक्षणासाठी मंदिरास केंद्रीय औदयोगिक सुरक्षा दल (CISF),केद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) यांची सुरक्षा व्यवस्था पुरविणेबाबत मत नोंदविल्याचे कळविलेले आहे.या आगोदर संस्थानास विनाशी धमकी देणारे पत्र आणि देशातील काही मंदिरात हिंसाचाराचा देण्यात आलेला इशारा या अनुषंगाने सी आय एस एफ व सी आर पी एफ या देशातील बहुकुशल सुरक्षा संस्था आहेत.ज्या देशातील विविध गंभीर आणि संवेदनशील पायाभुत क्षेत्रांना विविध क्षेत्रांत सुरक्षा प्रदान करण्यासाठी कटीबध्द आहेत.त्या अनुशंगाने श्री साईबाबा संस्थान शिर्डी हे सदरची सुरक्षा व्यवस्था घेणेस तयार आहे अगर कसे याचा स्पष्ट लेखी अहवाल मिळणेस विंनती केलेली आहे.

CISF यांनी यापूर्वी श्री साईबाबा संस्थानला सुरक्षा देता येत नाही असे, महानिदेशालय, केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल (गृहमंत्रालय) यांचे पंत्राक आई डी-१२०१२ (१०)/१६३/१२/आईएन्डीसी/ २०१६/ ८७/ दि.२५/०१/२०१६ चे पत्रान्वये कळविलेले असुन CISF यांची सेवा घ्यावयाची झाल्यास त्यासाठी येणारा खर्च तसेच तरतूदी व त्यांची मागणी (requirements) बाबत त्यांनी आजपर्यंत कळविलेला नाही. परंतु श्रींचे दर्शनार्थी साईभक्तांची वाढती गर्दी, देशात घडणारे घातपात लक्षात घेता मंदिर व मंदिर सुरक्षा तसेच साईभक्तांची सुरक्षितता ही बाब अतिशय संवेदनशिल आहे.

करीता पुनश्चः मंदिर सुरक्षा करीता CISF अथवा CRPF यांचे समवेत सुरक्षा घेणेकामी पत्र व्यवहार करुन पाठपुरावा करणे आवश्यक असल्याने सुरक्षा हा विषय धोरणात्मक बाब असून या अगोदर संस्थानास विनाशी धमकी देणारे पत्र आणि देशातील काही मंदिरात हिंसाचाराचा देण्यात आलेला इशारा या अनुषंगाने सी आय एस एफ व सी आर पी एफ या देशातील बहुकुशल सुरक्षा संस्था आहेत.ज्या देशातील विविध गंभीर आणि

संवेदनशील पायाभुत क्षेत्रांना विविध क्षेत्रांत सुरक्षा प्रदान करण्यासाठी कटीबध्द आहेत याकामी The Director General, Central Industrial Security Force, New Delhi यांना पत्र देणे आवश्यक आहे.

तरी साई मंदिराचे महाव्दार तसेच दर्शन रांगेचे प्रवेशव्दारावर साईभक्तांची चेंकींग कामी CISF अथवा CRPF यांचे सुरक्षा व्यवस्था घेणे अत्यंत जरूरीचे असल्याने सदर धोरणात्मक बाब म्हणुन श्री साईबाबा मंदिरासाठी CISF अथवा CRPF यांचे मार्फत सुरक्षा घेणेस संस्थान तयार आहे किंवा नाही त्याकामी सदर सुरक्षेकरीता आवश्यक तो निधी श्री साई संस्थान मार्फत देणेस तसेच त्यांचे समवेत पत्र व्यवहार करुन पाठपुरवठा करणे इत्यादी बाबींवर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई मंदिर सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेकडे पत्रव्यवहार करणेत येऊन सविस्तर माहितीसह प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.३६** **श्री.रघुनाथ भागाजी आहेर,उपकार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग यांना देणेत आलेल्या कारणे दाखवा नोटीसीचे दि.११.०१.२०२० रोजीचे खुलाशाबाबत.**

**प्रस्ताव-** अ) विषयाची पूर्वपिठीका:- श्री.आर.बी.आहेर हे श्री साईबाबा संस्थानमध्ये उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) या पदावर कार्यरत असुन, त्यांचेकडेस दि.१९.१२.२०१८ पासुन प्र.कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार देणेत आलेला आहे. त्यांचे अखत्यारीतील बांधकाम विभागाने श्री साईप्रसादालय इमारतीचे छतास बसविण्यात आलेले जुने खराब झालेले पॉलीकार्बोनेट शिट काढून त्याऐवजी नवीन शिट बसविणे कामाचे अंतिम देयक रक्कम रु.२२,६५,४६०/- मात्र मंजुर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.४,२०,६५५/- मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मंजुरी देणेबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर केलेला होता.

उपरोक्त दि.०४.१२.२०१९ चे सभेतील निर्णय क्रं.४८७ अन्वये,“ श्री साईप्रसादालय इमारतीचे छतास बसविण्यात आलेले जुने खराब झालेले पॉलीकार्बोनेट शिट काढून त्याऐवजी नवीन शिट बसविणेचे काम पुर्ण करणेसाठी करारनाम्यानुसार ठेकेदार स्टॉल्वर्ट आर्किटेक्चरल सोलुशन्स,नवी मुंबई यांना दि.२०.०३.२०१९ अखेर मुदत होती. प्रत्यक्षात ठेकेदार यांनी दि.१६.०५.२०१९ रोजी सदरचे काम पुर्ण केले आहे. ठेकेदार यांना काम पुर्ण करणेस एकुण १०२ दिवस विलंब झालेला आहे.ई-निविदेतील अटी शर्तीमध्ये कामास विलंब झाल्यास प्रति दिन रक्कम रु.५००/- मात्र दंड म्हणून आकारण्यात येईल अशी तरतुद आहे.त्यामुळे सदर कामाचे एकुण बिलाची रक्कम रु.२२,६५,४६०/- मात्र पैकी निव्वाळ देय रक्कम रु.४,२०,६४४/- मधुन दंडाची रक्कम रु.५१,०००/- (५००x१०२) वजा करुन उर्वरीत रक्कम रु.३,६९,६५५/-मात्र सदर कामाचे ठेकेदार स्टॉल्वर्ट आर्किटेक्चरल सालुशन्स,नवी मुंबई यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच सदरचे कामास विलंब झाल्याने दंडाची रक्कम वसुल करणेबाबत उपरोक्त प्रस्तावात नमुद न केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबधीतांवर योग्य ती कारवाई करावी, असे ठरले.”

उपरोक्त मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार श्री.आर.बी. आहेर, प्र.कार्यकारी अभियंता (मुळ पदनाम उप कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग) यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२१५९/२०१९ दि.३०-१२-२०१९ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता.

(ब) त्यास अनुसरुन श्री.आर.बी. आहेर यांनी दि.११.०१.२०२० रोजीचा लेखी खुलासा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केला असून, त्यात त्यांनी,खालीलप्रमाणे वस्तुस्थिती नमुद केली आहे:-

“दि.०६/०९/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र.५५७ अन्वये श्री साईप्रसादालय इमारतीस नविन पॉलीकार्बोनेट शिट बसविण्याचे काम ठेकेदार स्टॉल्वर्ट आर्किटेक्चरल सोलूशन्स, नवी मुंबई यांचेकडून रक्कम रुपये ३७,०३,६२०/- मात्र रक्कमेस करुन घेण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार इकडील जा.नं.२८४७/२०१८ दि.१४/०९/२०१८ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. सदरहु काम पूर्ण करणेसाठी दि.२०/०३/२०१९ अखेर (अखेर ०६ महिने) मूदत देणेत आलेली होती. प्रत्यक्षात ठेकेदार यांनी दि.१६/०५/२०१९ रोजी सदरचे काम पूर्ण केले . दिलेल्या मुदतीपेक्षा ठेकेदार यांना १०२ दिवसांचा वाढीव कालावधी लागला होता. ठेकेदार यांनी दिनांक २२/०७/२०१९ रोजी सदरहु कामाचे दुसरे रनिंग बिलाची मागणी केली असता इकडील विभागाचे दिनांक ०५/१०/२०१९ बिल रिपोर्टनुसार निविदाशर्तीप्रमाणे ठेकेदार यांचे

बिलातून कामाचे विलंबापोटी दंड म्हणून रक्कम ५१,०००/- मात्र रक्कम कपात करुन ठेकेदार यांना सदरहू बिलापोटी रक्कम ९,६३,४३०/- मात्र अदा करण्यात आली होती.

ठेकेदार यांनी त्यांचे दि.१०.०७.२०१९ रोजीचे पत्रान्वये १० एम एम जाड पॉलीकार्बोनेट शिटचे मटेरीअल पुरवठा करणेसाठी विलंब झालेला असल्याने सदरहू काम पूर्ण करणेसाठी विलंब झाला असून या कामासाठी मला दंड आकारणी करणेत येऊ नये अशी विनंती केली होती.

श्री साई प्रसादालय इमारतीचे छतास बसविण्यात आलेले जुने खराब झालेले पॉलीकार्बोनेट शिट काढून त्याऐवजी नवीन शिट बसविणे कामाचे अंतिम देयक रक्कम रु. २२,६५,४६०/- मात्र मंजूर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु. ४,२०,६५५/- मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मंजुरी देणेबाबात मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/१२/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर केला होता. त्यावर सदरहू सभेत वरीलप्रमाणे निर्णय क्र. ४८७ संमत झालेला आहे.

माझे रजेच्या कालावधीत श्री. डी.एम. देसाई, उप अभियंता यांनी दिनांक २६/१०/२०१९ रोजी ठेकेदार यांचे अंतिम बिल देणेबाबत तसेच सदरहु कामास दि.१६/०५/२०१९ अखेर मूदतवाढ मंजूर होऊन बिल अदा करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेकामी टिपणी सादर केली असता सदरहु टिपणीवर मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "सदर काम मुदतीत पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही तरी मुदतवाढ देणेकामी तसेच दंड आकारणी या संदर्भात विषय मा. व्यवस्थापन समितीपुढे ठेऊन त्यामधील निर्णयानुसार बिल आदा करावे किंवा कसे यावर निर्णय घेणे योग्य राहील असे मत आहे." असा शेरा नोंदविला आहे. परंतू ठेकेदार यांचेकडून दंडाची रक्कम ही दुसरे ॲडव्हान्स बिलामध्येच वसुल करण्यात आली होती. सदरहु प्रस्तावात विलंबापोटी होणा-या दंडाचे रकमेचा उल्लेख केलेला नाही. तथापी ठेकेदार यांना सदरचे काम पूर्ण करणेस एकूण १०२ दिवसांचा विलंब झाल्याचे नमूद केले होते. तसेच ठेकेदार यांना दि. १६/०५/२०१९ अखेर मूदतवाढ मंजूर होणेबाबत प्रस्तावित करणेत आले आहे.

दिनांक १७/१०/२०२० रोजीचे आदेशान्वये माझा प्र.कार्यकारी अभियंता या पदाचा कार्यभार श्री डी.एम. देसाई यांचेकडे देण्यात आला होता. सदर माझे रजा कालावधीत कनिष्ठ अभियंता, उप अभियंता तथा प्र.कार्यकारी अभियंता यांचेमार्फत वर नमूद दि.२६/१०/२०१९ रोजीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरहू कामाचे यापुर्वी अदा करण्यात आलेल्या द्वितीय रनिंग बिलातून दि.०५/१०/२०१९ रोजीच्या मंजूर टिपणी नुसार १०२ दिवसाच्या विलंबापोटी रु.५०० प्रति दिन याप्रमाणे रु.५१,००० इतकी रक्कम कपात करण्यात आली आहे.

तरी मी संपुर्ण प्रामाणिकपणा व सेवेशी एकनिष्ठता कायम राखली आहे. तसेच राखत आहे. त्याचबरोबर माझे नियंत्रणाखाली संस्थानच्या सर्व कर्मचा-यांचा प्रामाणिकपणा आणि सेवेशी एकनिष्ठता कायम राहील याची काळजी घेत आहे. वर नमूद वस्तुस्थिती – तथा- खुलाश्यावरुन असे दिसून येईल की, मी माझे कामात टाळाटाळ, हलगर्जीपणा अथवा निष्काळजीपणा केलेला नाही. साईभक्तांना चांगल्या प्रकारची सुविधा मिळावी यासाठी मी सातत्याने व प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहे. तसेच उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (वर्तणूक) विनीयम २०१३ चे कलम ३ (१ व २ ) चे उल्लंघन केलेले नाही हे नम्रपणे नमूद करतो. तरी मला कुठलेही शासन करण्यात येऊ नये व वरील संदर्भिय नोटीस निकाली काढण्यात यावी ही विनंती." असे म्हटले आहे.

(क) गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनियम,२०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत-

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील

पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत-

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते. वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

(ड) श्री.रघुनाथ भागाजी आहेर, उप कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन श्री.आहेर यांनी दि.११/०१/२०२० रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला असुन, दिनांक दि.१७/१०/२०१९ रोजीचे आदेशान्वये प्र. कार्यकारी अभियंता या पदाचा कार्यभार श्री डी.एम. देसाई यांचेकडे देण्यात आला होता. सदर माझे रजा कालावधीत कनिष्ठ अभियंता, उप अभियंता तथा प्र. कार्यकारी अभियंता यांचेमार्फत वर नमूद दि.२६/१०/२०१९ रोजीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरहू कामाचे यापुर्वी अदा करण्यात आलेल्या द्वितीय रनिंग बिलातून दि.०५/१०/२०१९ रोजीच्या मंजूर टिपणी नुसार १०२ दिवसाच्या विलंबापोटी रु.५०० प्रति दिन याप्रमाणे रु.५१,०००/- इतकी रक्कम कपात करण्यात आली आहे असे नमुद आहे.सोबत, करारनाम्यानुसार ठेकेदार स्टॉल्वर्ट आर्किटेक्चरल सोलुशन्स,नवी मुंबई याचेकडुन रु.५१,०००/- इतका दंड वसुल केलेची संदर्भाकिंत दि.०५.१०.२०१९ रोजीचे बांधकाम विभागाकडील टिपणीची छायांकित प्रत अवलोकनार्थ जोडली आहे.

श्री.आहेर यांना उपरोक्त मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार देण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस व त्यांनी दि.११.०१.२०२० रोजीचा सादर केलेला लेखी खुलासा याबाबत सामान्य प्रशासन शाखा (वशी-शिस्त) विभागामार्फत दि.२३.०१.२०२० रोजी टिपणी सादर करणेत आलेली होती.सदरचे टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, वस्तुस्थिती तदर्थ समितीस कळवा,असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदरचा वस्तुस्थिती दर्शक अहवाल प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे अवलोकनार्थ तथा यथायोग्य निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.१३६** **सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३७** **श्री.एम.बी.गायकवाड, सहाय्यक अभियंता श्रेणी-१, गोदावरी उजवा तट कालवा,उपविभाग राहाता यांना निवासासाठी संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. एम.बी. गायकवाड, सहाय्यक अभियंता श्रेणी - १, यांनी दि.०१/०१/२०२० रोजीचे अर्जाने मी, गोदावरी उजवा तट कालवा, उप विभाग राहाता येथे कार्यरत असून, राहाता उपविभागात शासकीय निवासस्थान नसल्याने मला आपल्या भक्तनिवास ५०० रुम जवळील निवासस्थानात राहण्यासाठी रुम मिळावी अशी विनंती केली आहे.

अ) संस्थानने साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) परिसरात संस्थानचे अधिकारी व श्री साईनाथ व साईबाबा हॉस्पीटलकडील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांचेकरीता निवासस्थानाचे बांधकाम केलेले आहे. सदर निवासस्थान संस्थानचे अधिकारी, तसेच आवश्यकतेनुसार संस्थान रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी यांना निवासासाठी उपलब्ध करुन देणेत येत आहे.

याशिवाय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५९८ व दि.०७/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६६७ अन्वये,

खालील पदनामाच्या शासकीय अधिकाऱ्यांना शासनाकडून मिळत असलेले प्रतिमहा घरभाडे भत्ता व नियमाप्रमाणे होणारा विद्युत आकार संस्थानकडे जमा करेणेचे अटीवर उपलब्धतेनुसार निवासासाठी संस्थान

निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच या पदनामाच्या अधिका-यांची इतरत्र बदली झाल्यास त्यांचेकडून त्वरीत निवासस्थान खाली करुन घेण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.

१. पोलीस इन्स्पेक्टर,शिर्डी. २. मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी.
३. तहसिलदार, राहाता. ४. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी.
५. उपविभागीय पोलीस अधिकारी,शिर्डी. ६. पोलीस निरिक्षक, वाहतूक शाखा, शिर्डी पोलीस स्टेशन.
७. पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा. ८. राज्य गुप्तवार्ता अधिकारी.

ब) तसेच, मा. शासनाचे दि.१४ जुलै, २०१६ रोजीचे पत्रातील निर्देशानुसार संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७ (३) नुसार भविष्यात संस्थानच्या मालकीची निवासस्थाने संस्थान अधिकारी / कर्मचारी यांच्याखेरीज अन्य कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांना भाडेतत्वावर अथवा ११ महिन्यांच्या कराराने अथवा Leave & License तत्वावर अशा कोणत्याही स्वरुपात शासन मान्यतेशिवाय देण्यात येऊ नयेत, संस्थानची निवासस्थाने भाडेतत्वावर द्यावयाची झाल्यास त्याकरीता प्रथम शासनाची मान्यता घ्यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

मा. शासनाचे उपरोक्त निर्देशानुसार परिच्छेद ‘अ’ मध्ये नमूद शासकीय अधिकारी यांना शासनाचे पुर्व मान्यतेने त्यांना शासनाकडून मिळत असलेले प्रतिमहा घरभाडे भत्ता व नियमाप्रमाणे होणारा विद्युत आकार संस्थानकडे वेळेच्या - वेळी जमा करेणेचे अटीवर संस्थान निवासस्थाने उपलब्धतेनुसार निवासाकरीता उपलब्ध करुन देणेत येत आहे.

क) संस्थानकडे उपलब्ध असलेले अधिकारी निवासस्थानची संख्या ही मर्यादीत असून संस्थान रुग्णालयाकडील बरेच वैद्यकीय अधिकारी निवासस्थान उपलब्धते अभावी अद्याप प्रतिक्षायादीवर आहेत. उपरोक्त परिच्छेद ‘अ’ व ‘ब’ मध्ये नमूद बाबींचा विचार करता, श्री. एम.बी. गायकवाड, सहाय्यक अभियंता श्रेणी - १, गोदावरी उजवा तट कालवा, उप विभाग राहाता यांना संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देता येत नाही, असे मत आहे.

तथापी, सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१३/०१/२०२० रोजीचे टिपणीवर मा. वरिष्ठ अधिकारी यांनी “ श्री. एम.बी. गायकवाड, यांना संस्थान निवासस्थान भाडे तत्वावर उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास प्रथम मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन त्यास मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई याची मान्यता घ्यावी लागेल ” असे अभिप्राय वजा निर्देश दिलेले आहे.

तरी, श्री. एम.बी. गायकवाड, सहाय्यक अभियंता श्रेणी - १, गोदावरी उजवा तट कालवा, उप विभाग राहाता यांना निवासासाठी भाडेतत्वावर संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणेस तसेच, याकामी मा. शासनाचे दि.१४ जुलै, २०१६ रोजीचे पत्रातील निर्देशानुसार शासनाची पुर्व मान्यता घेणेसाठी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१३७ सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३८ शैक्षणिक वर्ष-२०२०-२०२१ करीता ज्युनियर केजी वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविणेस व ज्युनियर केजी वर्गासाठी मर्यादीत एकुण २५० प्रवेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि.१७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी कायम विनाअनुदानीत तत्वावर चालविली जाते. शाळेची प्राथमिक विभागाची इ. १ ली ते ७ वी पर्यंत व माध्यमिक विभागाची इ.८ वी ते १० वी पर्यंत नियमानुसार शालेय मान्यता घेण्यात आलेली आहे. सन १९९० पासून शाळा सुरु करण्यात आली तेव्हापासून आपल्या शाळेत पुर्वप्राथमिक विभाग ज्यु. केजी व सि. केजी. वर्गानां प्रवेश देण्यात येत आहेत. शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर आकृतीबंधात पुर्व प्राथमिक विभागासाठी एकूण ०८ सहा. शिक्षक पदे मंजूर करुन घेण्यात आलेले आहेत. सन १९९० ते सन २००७ पर्यंत ज्यु. केजीच्या ०३ वर्ग तुकडी कार्यरत होत्या परंतू संस्थानचे प्रशासन व तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने

त्यांचे अखत्यारीत त्यावेळी निर्णय घेऊन व पालकांचे मागणीनुसार ज्यु. केजी तुकडी संख्येत वाढ केली. सन २०१० ते २०२० अखेर ज्यु. केजी तुकडी संख्येत वाढ होऊन आजमितीस ज्यु. केजीच्या ०५ व सिनीयर केजीच्या ०५ अशा पुर्व प्राथमिक विभागाच्या एकूण १० वर्ग तुकडी कार्यरत झालेल्या आहेत. केजी चे हेच विद्यार्थीपुढे इयत्ता १ ली साठी प्रविष्ट करुन घेतले जातात.

सन १९९० ते २०२० अखेर ज्यु. केजीचे वर्ग तुकडीवाढी बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | सन | ज्यु. केजी कार्यरत तुकडी | ज्यु. केजी कडे वाढ झालेली तुकडी संख्या | ज्यु. केजी कडे कमी झालेली तुकडी संख्या | ज्यु. केजी विभाग एकूण कार्यरत तुकडी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९९० ते १९९८ | ०२ | --- | -- | ०२ |
| २ | १९९९ ते २००३ | ०२ | ०१ | -- | ०३ |
| ३ | २००४ ते २००६ | ०२ | --- | ०१ | ०२ |
| ४ | २००६ ते २००७ | ०२ | ०१ | -- | ०३ |
| ५ | २००८ ते २००९ | ०३ | ०२ | -- | ०५ |
| ६ | २००९ ते २०१० | ०३ | --- | ०२ | ०३ |
| ७ | २०१० ते २०१३ | ०३ | ०३ | -- | ०६ |
| ८ | २०१३ ते २०२० अखेर | ०५ | -- | ०० | ०५ |

शैक्षणिक वर्ष २०१९- २० अखेर पुर्व प्राथमिक ( केजी विभाग) एकूण विद्यार्थी ४५८ आहे. प्राथमिक विभाग इयता १ ली ते ७ वी एकूण विद्यार्थी संख्या १७७१ आहे व इयत्ता ८ वी ते १० वी एकूण विद्यार्थी संख्या ५२५ आहे. शाळेत एकूण २७५४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एकूण ३५ वर्गखोल्यांमध्ये ५७ वर्ग तुकडीचे अध्यापनाचे काम अविरतपणे करण्यात येत आहे. सन २०१७-१८ पासून शालेय वेळेत बदल करण्यात आला असून सकाळ सत्रात प्राथमिक विभाग व दुपार सत्रात पुर्व प्राथमिक व माध्यमिक विभाग भरविले जातात.

शैक्षणिक वर्ष २०१९- २० मध्ये ज्यु. केजी वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविणेकामी वेळापत्रक तयार करुन ज्यु. केजीचे वर्गासाठी नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देणेबाबत दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेत आयत्या वेळेचा विषय नं. ०९ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – दि. २६.०२.२०१९ रोजीची सभा निर्णय क्र. १४८ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, " शैक्षणिक वर्ष २०१९- २० मध्ये ज्युनियर के.जी. करीता ०३ वर्ग तुकडीसाठी प्रति वर्ग तुकडी ५० विद्यार्थी प्रमाणे वयात बसलेले नियम व अटी शर्तीस अधिन राहून मर्यादीत एकूण १५० प्रवेश या प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली ".

मा. व्यवस्थापन समिती दि. २६.०२.२०१९ रोजीची सभा निर्णय क्र. १४८ नुसार प्रवेशाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात आली परंतू सन २०१९-२० मध्ये शिर्डी परिसरातील जवळपास आणखी १०० गरीब विद्यार्थी शिक्षणापासून व शालेय प्रवेशापासून वंचित राहत असल्याने पालकांनी संस्थान प्रशासनाकडे ज्यु. केजीच्या ०२ वर्ग तुकडीत वाढ करणेबाबत मागणी केली. पालकांची मागणी विचारात घेता व परिसरातील गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी शालेय प्रशासनाकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता प्रत्येकी ५० विद्यार्थ्यांच्या वाढीव २ वर्ग तुकडयां मंजूरीकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यात आला.

मा. व्यवस्थापन समिती दि. ०६.०६.२०१९ रोजीची सभा निर्णय क्र. २४१ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, " शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता ज्युनिअर केजी वर्गाच्या ०२ वाढीव तुकडीस मान्यता देण्यात आली. तसेच प्रति वर्ग तुकडी ५० विद्यार्थी प्रमाणे वयात बसलेले नियम अटी शर्तीस अधिन राहून मर्यादीत एकूण १०० प्रवेश याप्रमाणे प्रवेश प्रक्रीया राबविण्यात यावी, असे ठरले".

मागणी– शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ज्यु. केजी साठी एकूण २२७ विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे. ज्यु. केजी च्या एकूण ५ वर्ग तुकडी तयार करण्यात आल्या असून प्रत्येक वर्ग तुकडीत किमान ४५ ते ४६ विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्येही मागील वर्षाप्रमाणे प्रवेश नियमांच्या अटी-शर्तीस अधिन राहून प्रत्येकी ५० विद्यार्थीप्रमाणे ०५ वर्ग तुकडीत किमान २५० प्रवेश देता येईल.
शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मध्ये खालील वेळापत्रकानुसार व नियमावलीनुसार शालेय प्रवेश प्रक्रीया राबविण्यात यावी असे नम्र मत आहे.

| अ.न. | प्रक्रिया सन २०१९ - २० | तपशिल | वेळ |
|---|---|---|---|
| १ | दि. ०६ एप्रिल २०२० ते<br>दि. ११ एप्रिल २०२० अखेर | प्रवेश अर्ज वाटप व अर्ज स्विकृती | अर्ज वाटपाची वेळ<br>स.१०.३० ते १.३०<br>प्रवेश अर्ज स्विकृती<br>दु. ३.०० ते ५.०० |
| २ | दि. १३ एप्रिल २०२० ते<br>दि. १८ एप्रिल २०२० अखेर | प्राप्त अर्जाची छाननी,प्रवेश पात्र -अपात्र ठरविणे | कार्यालयीन वेळेत |
| ३ | दि. २० एप्रिल २०२० ते<br>दि. २८ एप्रिल २०२० अखेर | प्रवेशासाठी पात्र ठरलेले विद्यार्थ्यांची पहिली यादी जाहिर करुन प्रवेश कार्यवाही चालू केली जाईल. पालकांनी शालेय व स्कुलबस शुल्क भरुन पाल्यांचा प्रवेश निश्चित करणे. | स.१०.३० ते १.०० |
| ४ | दि. ३० एप्रिल २०२० | प्रवेशासाठी रिक्त राहिलेल्या जागांसाठी परिस्थितीनुसार प्रवेशाबाबतची पुढील कार्यवाही करणे. | कार्यालयीन वेळेत |

उपरोक्त प्रवेश प्रक्रीया राबवितांना खालील बाबींचा विचार व्हावा.

1. सन २०२० – २०२१ शैक्षणिक वर्षात ज्यु. केजी साठी मर्यादीत २५० प्रवेश देऊन प्रति वर्ग तुकडी ५० विद्यार्थी प्रमाणे एकूण ५ वर्ग तुकडया करण्यात याव्यात. दि. ०६ एप्रिल २०२० ते दि. ११ एप्रिल २०२० पर्यत सकाळी १०.३० ते ०१.३० यावेळेत शाळेच्या कार्यालयातून प्रवेश अर्जाचे मोफत वाटप करण्यात यावे व दुपारी ०३.०० ते ०५.०० यावेळेत प्रवेश अर्जांची स्विकृती शाळेच्या कार्यालयात करुन घेण्यात यावी. शालेय व्यवस्थापनात अडचणी निर्माण होऊ नये म्हणुन उपरोक्त नमूद केलेले वेळापत्रकानुसारच दिलेल्या मुदतीत प्रवेश अर्ज वाटप व प्रवेश अर्ज स्विकृती करण्यात यावी .

2. शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-९८१४/प्र.क्र.१६०/एस.डी. १ दि.२५ जानेवारी,२०१७ अन्वये या पुढे शाळेत प्रवेश देतांना सर्व शाळांनी ३० सप्टेंबर हा मानिव दिनांक गृहीत धरुन मुलांचे वय निश्चित करण्यात यावे असे ठरले आहे.२१ जानेवारी २०१५ चे शासन निर्णयानुसार प्ले ग्रुप/ नर्सरी ( इयत्ता १ ली पूर्वीचा ३ रा वर्ग) साठी किमान वयोमर्यादा ३+ अशी असून इयत्ता १ ली साठी किमान वयोमर्यादा ६+अशी निर्धारीत करण्यात आलेली आहे. उपरोक्त निर्णयाचा आधार घेऊन आपल्या शाळेत ज्यु. केजी प्रवेशासाठी किमान वयोमर्यादा ४+अशी ठेवण्यात आलेली आहे, तसेच कमाल वयोमर्यादाही ४.११ पर्यंत आपण निश्चित केलेली आहे. जेणेकरुन सदर विद्यार्थ्यांचे सिनीयर केजी मध्ये शिक्षण घेतांना वय ५ +होत आहे. ज्यु. केजी करीता पाल्यांचा वयोगट ४.०० ते ४.११ या पर्यत असावा म्हणजे जन्मतारीख (१ ऑक्टोंबर २०१५ ते ३० सप्टेंबर २०१६ ) या कालावधीतील असावी.

3. शिरडी गांव व परिसरातील गोरगरीबांचे विद्यार्थी असून त्यांना इतर परिसरातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांची फी खर्च परवडत नाही. श्री साईबाबा इं.मि.स्कुल शाळेत कमी खर्चात चांगले प्रतीचे इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मिळत असल्याने पालकांची प्रवेशासाठी प्रत्येक वर्षी मोठी धडपड असते प्रवेशासाठी अग्रही असतात. प्रत्येक वर्षी अटी व नियमास अधिन राहून वयात बसलेले किमान २२० ते २३० इतके प्रवेश ज्यु. केजी साठी होतात. केजी वर्गाच्या प्रवेशासाठी वारंवार प्रक्रीया करणे यामध्ये प्रशासनाचाही मोठा वेळ खर्च होतो करीता मागील वर्षाचा अनुभव विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ज्यु. केजीच्या वर्ग तुकडी साठी वर्गखोल्याही उपलब्ध असून ०५ वर्ग शिक्षकही उपलब्ध आहेत तरी वयात बसणा-या किमान २५० विद्यार्थ्यांना ज्यु. केजी साठी प्रवेश देऊन ०५ वर्ग तुकडी प्रवेश देणेस हरकत नाही.

**4.** ज्यु. केजी प्रवेशासाठी संस्थान कायम कर्मचारी पाल्य, कंत्राटी कर्मचारी पाल्य, आऊटसोर्स कर्मचारी पाल्य व शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रहिवाशी पाल्य असा प्राधान्य क्रम ठेवावा. शिर्डी नगर पंचायत हद्दीतील तसेच नगरपंचायत हद्दीचे बाहेरील ( राहाता, साकुरी, निघोज, निमगांव, पिंपळवाडी, नांदुर्खी, डो-हाळे, को-हाळे, सावळीविहीर, रुई ) इ. गावांतील रहिवाशी विदयार्थ्यांचा मूळ जन्म दाखला ( ग्रामपंचायत/नगरपालिका/ महानगरपालिका ) यांनी प्रमाणित केलेला असावा. तसेच शिरडी गावातील आधारकार्ड ,मतदान कार्ड/नगर पंचायत रहिवासी दाखला/रेशनकार्ड/लाईटबील/भाडेकरु तत्वावर राहत असलेल्या रहिवाशी (खोली मालकाचे लाईट बील प्रत व प्रतिज्ञापत्र) ही कागदपत्र तपासून प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात यावेत.

**5.** प्रवेश निश्चितकरतांना उपरोक्त सर्व कागदपत्र पडताळणी करणेकामी शालेय प्रशासनातून समिती तयार करण्यात यावी. या समितीने पडताळणी केलेनंतरचा पात्र / अपात्र प्रवेशाबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात यावा. तसेच विदयार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व स्कुलबस शुल्क एकाच वेळी दिलेल्या मुदतीत भरुन घेण्यात यावे व जे पालक मुदतीचे आत शुल्क भरणार नाहीत त्यांचे पाल्यांचा प्रवेश रद्द करण्यात यावा.

6. स्कुलबस सुविधा ही उपलब्धतेनुसार विद्यार्थ्यांना पुरविण्यात येतील परंतू पुरेशा प्रमाणात बसमध्ये सिट उपलब्ध नसतील तर अशावेळी पालकांना स्वतः पाल्यांची शाळेत ने-आण करण्याची सोय करावी लागेल या अटीवर त्यांना प्रवेश देण्यात यावा.

7. ज्यु. केजी प्रवेशासाठी अटी/ शतीस अधिन राहून प्रवेश दिला जाईल. प्रवेश मर्यादेपेक्षा जास्त होत असतील तर सदर वर्गात प्रवेश देणे अथवा नाकारणे हा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान– ज्यु.के.जी प्रवेशाबाबत उपरोक्त नियमावलीनुसार प्रक्रिया राबविण्यात आली तर प्रशासनावर रोष राहणार नाही तसेच शिक्षणापासून गरीब विद्यार्थी वंचित राहणार नाही.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मध्ये ज्यु. केजीच्या वर्गाकरीता ०५ वर्ग तुकडीसाठी प्रति वर्ग तुकडीत ५० विद्यार्थी संख्या प्रमाणे वयात बसलेले नियम व अटी शर्तीस अधिन राहून मर्यादीत एकूण २५० प्रवेश देणेस, नियमावली व कालावधी नुसार ज्यु. केजीच्या वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ज्यु.केजीच्या वर्गाकरीता ०५ वर्ग तुकडीसाठी प्रति वर्ग तुकडीत ५० विद्यार्थी संख्येप्रमाणे वयात बसलेचे नियम व अटी शर्तीस अधिन राहून मर्यादीत एकूण २५० प्रवेश देण्यास तसेच नियमावली व कालावधीनुसार ज्यु.केजीच्या वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.३९** **शैक्षणिक वर्ष जुन २०१५ पासून ते मे २०२० अखेर इयत्ता १ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ (RTE Act,2009) अन्वये एकुण दिलेले मोफत प्रवेश व जिल्हा परिषद शासनाकडून शाळेला येणे असलेल्या एकुण शुल्क प्रतिपुर्ती तपशिलाबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि.१७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेल्या अधिनियमामधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक– शासनाचे आर.टी.ई. कायदा २००९ (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम कायदा) अन्वये २५ % प्रवेश देणे, यामध्ये वंचित गटातील व दुर्बल घटकातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी मोफत प्रवेश दिला जातो. वंचित गटातील बालक याचा अर्थ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती बालके व दुर्बल घटकांतील बालके याचा अर्थ ज्या बालकांच्या माता पित्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी असे विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या धार्मीक अल्पसंख्याकसह इतर बालके असा होय. अशा इयत्ता १ ली ते ८ वी प्राथमिक विभागातील बालकांना प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देणे चालू ठेवणेत यावे असे अधिनियमात नमूद केलेले आहे.

संदर्भ क्रं. ०३ अध्यादेश मुद्दा क्रं. ०२ नुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार दुर्बल व वंचीत घटकातील बालकांना खाजगी विना अनुदानीत व खाजगी कायम विना अनुदानीत शाळांमध्ये (Private unaided Non-minority schools, PrivatePermanent Unaided non- minority schools) किमान २५ % ठेवण्याची तरतुद आहे. तसेच अशा प्रवेशित बालकांचे प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्याची तरतुद आहे.

सन २०१५ -१६ ते सन २०१९-२० अखेर पासून आर.टी.ई. नियमानुसार शाळेत मोफत प्रवेशाबाबतची प्रक्रीया राबविण्यात आली आहे. याबाबतचा तपशिलवार तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| शैक्षणिक वर्ष | इयत्ता | ३ तुकडी मान्यतेनुसार झालेले एकूण झालेले प्रवेश | २५ % प्रमाणे पात्र ठरलेले एकूण मोफत झालेले प्रवेश | मा. व्य. समितीने संबधित वर्षात प्रशासकीय मंजूरीने ठरवून दिलेले शालेय शुल्क | यादी जाहिर होणेपुर्वी पालकांनी भरलेली शालेय फी विद्यार्थी संख्या | यादी जाहिर होणेपुर्वी पालकांनी भरलेली शालेय फी एकूण रक्कम | शासनाकडून शाळेला संबधित वर्षाचे बाकी येणे असलेले एकूण शालेय शैक्षणिक शुल्क | शासनाकडून शाळेला संबधित वर्षात आज पर्यंत जमा झालेले एकूण शालेय शैक्षणिक शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| **२०१५-१६** | **१ ली** | १५६ | ३९ | रु. ३२७०/- | **३९** | १२७५३० | १,२७,५३० | १,२७,५३० |
| **सन २०१५-१६ मध्ये पालकांनी भरलेली शै. फी रु. १,२७,५३०/- दि. ०१/०६/२०१८ रोजीचे प्रशासकीय मंजूर टिपणीने संबधित ३९ पालकांचे बॅंक खाती रक्कम जमा करणेत आलेली आहे. कार्यवाही पूर्ण** | | | | | | | | |
| **२०१६-१७** | **१ ली** | १५६ | ३९ | रु. ३६००/- | **०५** | १६२०० | १,४०,४०० | १,४०,४०० |
| **२०१६-१७** | **२ री** | १५६ | ३८ | रु. ३६००/- | **११** | ३२४०० | १,३६,८०० | १,३५,९०७ |
| **एकूण रु.** | ------ | ------ | **७७** | ------ | | ४८६०० | **२,७७,२००** | **२,७६,३०७** |
| **सन २०१६-१७ इ. २ री १ विद्यार्थी शाळा सोडून गेला आहे.** | | | | | | | | |
| **सन २०१६-१७ मध्ये पालकांनी भरलेली शै. फी एकूण रु. ४८६००/- दि. ०१/०६/२०१८ रोजीचे प्रशासकीय मंजूर टिपणीने संबधित १६ पालकांचे बॅंक खाती रक्कम जमा व उर्वरीत रक्कम संस्थान खाती जमा आहे.** | | | | | | | | |
| **सन २०१७ -१८** | | | | | | | | |
| **२०१७-१८** | १ ली | १५६ | ३९ | रु. ३९६० /- | **---** | ---- | **१,५४,४४०** | **-----** |
| **२०१७-१८** | २ री | १५६ | ३९ | रु. ३९६० /- | **---** | ---- | **१,५४,४४०** | **-----** |
| **२०१७-१८** | ३ री | १५६ | ३७ | रु. ४१००/- | **०१** | ४१०० | **१,५१,७००** | **-----** |
| **एकूण रु.** | ------ | ------ | **११५** | ------ | ०१ | ४१०० | **४,६०,५८०** | **-----** |
| **सन २०१७-१८ इ. ३ री २ विद्यार्थी शाळा सोडून गेले आहेत.** | | | | | | | | |
| **यादी जाहिर होणेपुर्वी १ विद्यार्थ्यांने फी भरलेली असून ती रक्कम रु. ४१००/- परत करावी लागणार आहे.** | | | | | | | | |
| **सन २०१८-१९** | | | | | | | | |
| **२०१८-१९** | १ ली | १५६ | ३९ | रु. ४३६० /- | **०६** | २६१६० | **१,७०,०४०** | **-----** |
| **२०१८-१९** | २ री | १५६ | ३७ | रु. ४३६० /- | **००** | ०० | **१,६१,३२०** | **-----** |
| **२०१८-१९** | ३ री | १५६ | ३८ | रु. ४५१०/- | **००** | ०० | **१,७१,३८०** | **-----** |
| **२०१८-१९** | ४ थी | १५६ | ३४ | रु. ४५१०/- | **००** | ०० | **१,५३,३४०** | **-----** |
| **एकूण रु.** | ------ | ------ | **१४८** | ------ | **०६** | २६१६० | **६,५६,०८०** | **-----** |
| **सन २०१८-१९ इ. २ री – २ विद्यार्थी , इ. ३ री – १ विद्यार्थी, इ. ४ थी - ५ विद्यार्थी असे एकूण ८ विद्यार्थी शाळा सोडून गेले आहेत.** | | | | | | | | |
| **यादी जाहिर होणेपुर्वी ६ विद्यार्थ्यांनी फी भरलेली असून ती रक्कम रु. २६१६०/- परत करावी लागणार आहे.** | | | | | | | | |
| **सन २०१९-२०** | | | | | | | | |
| **२०१९-२०** | १ ली | २३३ | ६१ | रु. ४८००/- | ०४ | **१२०००** | **२, ९२, ८००** | **-----** |
| **२०१९-२०** | २ री | १५६ | ३९ | रु. ४८००/- | **---** | **---** | **१, ८७, २००** | **-----** |
| **२०१९-२०** | ३ री | १५६ | ३७ | रु. ४९६०/- | **---** | **---** | **१,८३,५२०** | **-----** |
| **२०१९-२०** | ४ थी | १५६ | ३६ | रु. ४९६०/- | **---** | **---** | **१,७८,५६०** | **-----** |
| **२०१९-२०** | ५ वी | १५६ | **३४** | रु. ५३२०/- | **---** | **---** | **१,८०,८८०** | **-----** |
| **एकूण रु.** | **---** | ---- | **२०७** | ----- | ०४ | **१२०००** | **१०,२२,९६०** | **-----** |

| | | |
|---|---|---|
| **सन २०१९- २०२० इ. ३ री – २ विद्यार्थी, इ. ४ थी - ३ विद्यार्थी , इयत्ता ५ वी – ५ असे एकूण १० विद्यार्थी शाळा सोडून गेले आहेत.** | | |
| **यादी जाहिर होणेपुर्वी ४ विद्यार्थ्यांनी फी भरलेली असून त्यामध्ये ०३ विद्यार्थ्यांनी रु. २४००/- व १ विद्यार्थी रु. ४८००/- अशी एकूण रु. १२०००/- इतकी रक्कम शैक्षणिक फी जमा आहे ती रक्कम परत करावी लागेल.** | | |

विभागाची मागणीः- खालील तक्त्यात नमूद केले प्रमाणे शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमानुसार शासनाकडून संबधित वर्षाकरीता प्राप्त झालेली रक्कम व येणेबाकी असलेली एकूण रक्कम तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| शैक्षणिक वर्ष २५ %मोफत दिलेले प्रवेश | इयत्ता वर्ग | शासनाकडून येणे असलेले संबधित वर्षाचे एकूण शैक्षणिक शुल्क रुपये | शासनाकडून आज अखेर प्राप्त झालेले एकूण शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती | शासनाकडून उर्वरीत येणे बाकी असलेले एकूण शैक्षणिक शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | १ ली | -------- | **१,२७,५३०/-** | -------- |
| २०१६-१७ | १ ली ,२ री | **८९३/-** | **२,७६,३०७/-** | **८९३/-** |
| २०१७-१८ | १ ली, २ री, ३ री | **४,६०,५८०/-** | ---- | **४,६०,५८०/-** |
| २०१८-१९ | १ ली, २ री, ३ री, ४थी | **६,५६,०८० /-** | ---- | **६,५६,०८० /-** |
| २०१९-२० | १ ली, २ री, ३ री,४ थी, ५ वी | **१०,२२,९६०/-** | ---- | **१०,२२,९६०/-** |
| **एकूण** | | **२१,४०,५१३/-** | **४,०३, ८३७/-** | **२१,४०,५१३/-** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे संबधित शैक्षणिक वर्षात नमूद केलेप्रमाणे इयत्ता १ लीच्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTEAct, 2009) अन्वये एकूण दिलेले मोफत प्रवेश करण्यात आलेले असून व शासनाकडून येणेअसलेल्या शुल्क प्रतिपुर्ती बाबतचा तपशिल सादर केलेला असून सदर रक्कमेचा तपशिल मा. व्यवस्थापन समितीचे सभेत अवलोकन व्हावे असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान – आर्थिक व प्रशासकीय बाब म्हणून करणे गरजेचे आहे.

विभागाचा अभिप्रायः- शैक्षणिक वर्ष २०१५-१६, सन २०१६-१७, सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात प्रत्येक वर्षी इयत्ता १ ली चे विद्यार्थ्यांना आर. टी. ई अंतर्गत मोफत प्रवेश देण्यात आलेले असून शासनाकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० अखेर शैक्षणिक शुल्कापोटी एकूण रु. २१,४०,५१३/- ( अक्षरी रुपये एकवीस लाख चाळीस हजार पाचशे तेरा मात्र ) इतकी रक्कम येणे बाकी असून शालेय प्रशासनामार्फत वेळोवेळी पत्रव्यवहार करुन शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती रक्कमेची मागणी करण्यात येत आहे.

शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTEAct, 2009) अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० अखेर एकूण दिलेले मोफत प्रवेश व शासनाकडून येणे असलेल्या शुल्क प्रतिपुर्ती रक्कमे बाबतचा तपशिल मा. व्यवस्थापन समितीला अवगत होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.१३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये शैक्षणिक वर्ष जुन २०१५ पासून ते मे २०२० अखेर इयत्ता १ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act,2009) अन्वये दिलेले एकुण मोफत प्रवेश व शासनाकडून येणे असलेल्या शुल्क प्रतिपुर्ती रकमेचे अवलोकन करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.४० सन २०१९-२०२० शैक्षणिक वर्षात शालेय व स्कुलबस शुल्कात १० टक्के वाढीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि.१७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांकः- नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक-

संदर्भः- १) दिनांक १५/०३/२०१४ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सभेत सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन श्री साईबाबा इंग्लिश मिडियम करीता सन २०१४-१५ शैक्षणिक वर्षासाठी शालेय शुल्कात १०% व स्कुल बस शुल्कात १०% वाढ करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सन २०१४-१५ नंतर पुढील शैक्षणिक वर्षाकरिता प्रती वर्षी शालेय शुल्कात १०% व स्कुल बस शुल्कात १०%ने वाढ करण्यात यावी असे ठरले.

संदर्भः- २ ) दिनांक ०७ /०३/२०१८ रोजीचे सभेत सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील शालेय शुल्कात नवीन स्लॅब नुसार १०% व स्कुल बस शुल्कात १०% वाढ करुन , सुधारित शुल्क शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये आकारणेत यावे, असे ठरले.

मागणी-

१) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०२/२०१९ निर्णय क्र. ११६ नुसार शैक्षणिक वर्ष २०१९ -२० मध्ये घेण्यात आलेल्या शालेय शुल्क रक्कमेवर १०% वाढ करावयाची झाल्यास शैक्षणिक वर्ष २०२० -२०२१ साठी खालीलप्रमाणे शालेय शुल्कात वाढ करावी लागणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२० -२०२१ करीता १०% प्रस्तावित वाढ करुन घेण्यात येणारे शालेय शुल्क खालीलप्रमाणे.

| अ.नं | वर्ग | श्री साईबाबा इं.मि.स्कुल शैक्षणिक वर्ष २०१९ - २० वार्षीक शालेय शुल्क | सदयस्थितीमध्ये शालेय शुल्कात १०% प्रस्तावित वाढ | मागील शुल्क+१०% प्रस्तावित वाढ करुन होणारी रक्कम | दोन सत्रांची पुर्णाकीत करुन येणारे (१०चे पटीत) एकुण वार्षीक शालेय शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१९- २० | | | २०२०-२१ |
| १ | ज्यु के.जी | ४४४० | ४४४ | ४८८४ | ४८८० |
| २ | सि.के.जी | ४४४० | ४४४ | ४८८४ | ४८८० |
| ३ | इ.१ली | ४८०० | ४८० | ५२८० | ५२८० |
| ४ | इ.२ री | ४८०० | ४८० | ५२८० | ५२८० |
| ५ | इ.३री | ४९६० | ४९६ | ५४५६ | ५४६० |
| ६ | इ.४थी | ४९६० | ४९६ | ५४५६ | ५४६० |
| ७ | इ.५वी | ५३२० | ५३२ | ५८५२ | ५८५० |
| ८ | इ.६वी | ५३२० | ५३२ | ५८५२ | ५८५० |
| ९ | इ.७वी | ५३२० | ५३२ | ५८५२ | ५८५० |
| १० | इ.८ वी | ६२०० | ६२० | ६८२० | ६८२० |
| ११ | इ.९ वी | ६२०० | ६२० | ६८२० | ६८२० |
| १२ | इ.१०वी | ६३९० | ६३९ | ७०२९ | ७०३० |

३. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०२/२०१९ निर्णय क्र. ११६ नुसार शैक्षणिक वर्ष २०१९ - २०२० मध्ये घेण्यात आलेल्या स्कुलबस शुल्क रक्कमेवर १०% वाढ करावयाची झाल्यास शैक्षणिक वर्ष २०२० -२०२१ साठी खालीलप्रमाणे स्कुलबस शुल्कात वाढ करावी लागणार आहे.

| अ.नं | शाळेपासून संबधित स्टॉप पर्यंत स्लॅब नुसार ठरविलेले किलोमीटरचे अंतर | सध्या घेण्यात येत असलेले स्कुलबस वार्षीक एकूण शुल्क सन२०१९- २० | मा. व्यवस्थापन समिती निर्णय नुसार १०% प्रस्तावित वाढ | मागील शुल्क + १०% प्रस्तावित वाढ करुन होणारी वार्षीक रक्कम | पुर्णाकींत रक्कम करुन (१०चे पटीत ) आकारण्यात येणारी वार्षीक स्कुल बस शुल्क सन २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१ ते ०६ किलोमीटर | २८२० | २८२ | ३१०२ | ३१०० |
| २ | ०७ ते ११ किलोमीटर | ३१३० | ३१३ | ३४४३ | ३४४० |
| ३ | १२ ते १५ किलोमीटर | ४३६० | ४३६ | ४७९६ | ४८०० |
| ४ | १६ ते २० किलोमीटर | ५४६० | ५४६ | ६००६ | ६००० |
| ५ | २१ ते २५ किलोमीटर | ५९५० | ५९५ | ६५४५ | ६५४० |

शैक्षणिक वर्ष २०१९- २० मध्ये स्कुलबस करीता घेण्यात येणारे शुल्क किलोमीटर व अंतरानुसार खालीप्रमाणे .

| अ.नं | स्कुल बस स्टॉपचे नाव | शाळेपासुन जाणे व येणे कि.मी अंतर | सध्या असलेले स्कुलबस एकूण वार्षीक शुल्क सन २०१९- २० | मा. व्यवस्थापन समिती निर्णय नुसार १०% प्रस्तावित वाढ | मागील शुल्क + १०% प्रस्तावित वाढ करुन होणारी रक्कम | पुर्णाकींत रक्कम करुन (१०चे पटीत ) आकारलेली स्कुल बस फी सन २०२०- २०२१ |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **(४+५) ६** | **७** |
| १ | शिरडी /परिसर | ०६ कि.मी | २८२० | २८२ | ३१०२ | ३१०० |
| २ | लुटे वस्ती | ०८ कि.मी | ३१३० | ३१३ | ३४४३ | ३४४० |
| ३ | नांदुर्खी बुद्रक | ०९ कि.मी | ३१३० | ३१३ | ३४४३ | ३४४० |
| ४ | राहाता | १०कि.मी | ३१३० | ३१३ | ३४४३ | ३४४० |
| ५ | नांदुर्खी खुर्द | १० कि.मी | ३१३० | ३१३ | ३४४३ | ३४४० |
| ६ | सावळीविहिर | ११ कि.मी | ३१३० | ३१३ | ३४४३ | ३४४० |
| ७ | बन (बिरेंगांव ) | १२ कि.मी | ४३६० | ४३६ | ४७९६ | ४८०० |
| ८ | कनकुरी | १२ कि.मी | ४३६० | ४३६ | ४७९६ | ४८०० |
| ९ | नवनाथनगर | १२ कि.मी | ४३६० | ४३६ | ४७९६ | ४८०० |
| १० | साकुरी | १२ कि.मी | ४३६० | ४३६ | ४७९६ | ४८०० |
| ११ | पिंपळवाडी | १३ कि.मी | ४३६० | ४३६ | ४७९६ | ४८०० |
| १२ | डो-हाळे | १५ कि.मी | ४३६० | ४३६ | ४७९६ | ४८०० |
| १३ | को-हाळे | १८ कि.मी | ५४६० | ५४६ | ६००६ | ६००० |
| १४ | रुई | १८कि.मी | ५४६० | ५४६ | ६००६ | ६००० |
| १५ | चांदेकसारे -पानमळा | २१ कि.मी | ५९५० | ५९५ | ६५४५ | ६५४० |

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–तरी शैक्षणिक वर्ष २०१९ – २० चे शुल्कामध्ये स्लॅब नुसार वार्षीक शालेय शुल्कात १०% व स्कुलबस शुल्कात १०% वाढ करुन शैक्षणिक वर्ष २०२० -२०२१ मध्ये सदरचे वार्षीक शुल्क पालकांकडुन घेणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.१४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२० - २०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रवेश देणेकामी शालेय व स्कुलबस शुल्कात वाढ न करता शैक्षणिक वर्ष २०१९-२० प्रमाणे शालेय व स्कुलबस शुल्क आकारण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.४१** **विविध टेलीकॉम कंपन्यांचे प्रिपेड मोबाईल सेवेबाबत प्राप्त झालेल्या दरास अनुसरुन व गठीत समितीचे अहवालास अनुसरुन शासन नियुक्त अधिकारी तसेच संस्थान अधिकारी/कर्मचारी यांची वर्गवारी निश्चित करुन त्यांना त्यांचे मासीक पगारात टेलीफोन अलौन्स रक्कम देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांना दैंनदिन कार्यालयीन कामकाजाकरीता संस्थान अंतर्गतव बाहेरील दुरध्वनीसंपर्कासाठी BSNLच्या ग्रुपमोबाईल सेवेऐवजी Idea कंपनीची पोस्टपेड ग्रुपमोबाईल सेवा सुरु करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसारमान्यता मिळालेली आहे. त्यानुसारसंस्थान अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता आयडीया कंपनीचा रु.९९/- चा CUG पोस्टपेड ग्रुपमोबाईल प्लॅन घेण्यात आलेला आहे.सदरहू प्लॅनला अनुसरुन आयडीया कंपनीकडुन एकुण १०० मोबाईल सीमकार्ड७७२००७७२०० ते ७७२००७७२९९ या क्रमांकाचे तसेच ७ डेटा कार्डही खरेदी करण्यात आलेले आहेत.सदर सीमकार्ड हे संस्थान आस्थापनेवरील मंजूर पदाकरीता पदाकरीता तसेच वेळोवेळी वरीष्ठांचे आदेशानुसार त्यांनी निर्देशित केलेल्या कर्मचा-यांना तत्कालीनमा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मान्यतेने संबधित अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजाचे वापरासाठी देण्यात आलेलेआहेत.

तथापी,सद्यस्थितीत आयडीया व वोडाफोन या दोन्ही कंपनीचे एकत्रीकरण झाल्याने हया दोन कंपन्यांची वोडाफोन- आयडीया नावाने एकच कंपनी स्थापित झालेली आहे. वोडाफोन-आयडीया कंपनीची कार्यरत असलेली ग्रुपमोबाईल सेवा व्यवस्थित मिळत नसुन,आयडीया कंपनीचे किंवा संस्थान ग्रुपचे मोबाईल लवकर लागत नाही. श्रींचे मंदिर परीसरात गर्दी झालेनंतर नेटवर्क जाम होऊन मोबाईल सेवा खंडीत होऊन जात असल्यामुळे संस्थानचे कार्यालयीन कामकाजात संपर्कासाठी अडचण निर्माण होत असल्याने तसेच गर्दीचे वेळेस श्री साईभक्तांचे सुविधेच्यानियोजनासाठी संस्थान अधिकारी व कर्मचारी यांना एकमेंकांशी मोबाईलवर संपर्क होत नसल्याने व्यत्यय निर्माण होत असल्याने सदरचे सेवेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी नाराजी व्यक्त करुन दि.२६/०७/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्रं.१४ निर्णय क्रं.३९६ नुसार सविस्तर चर्चा होऊन “श्री साईबाबा संस्थान करीता कार्यान्वीत असलेली आयडीया पोस्टपेड ग्रुपमोबाईल सेवा बंद करण्यात यावी,व त्याऐवजी प्रिपेड सेवेबाबत सर्व कंपनीचे प्रतिनिधीसमवेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष चर्चा करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा” असे ठरले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व दि.१४/०८/२०१९ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान करीता कार्यान्वीत असलेली आयडीया पोस्टपेड ग्रुपमोबाईल सेवा दि.२१/०८/२०१९ पासून बंद करण्यात आलेली होती. परंतु, मा.मुख्य  कार्यकारी अधिकारी महोदय यांचे तातडीचे निर्देशानुसार अधिकारी/कर्मचारी यांचेशी संपर्कासाठी व्यत्यय निर्माण होत असल्याने सदर बंद करणेत आलेली आयडीया ग्रुपमोबाईल सेवा पुनश्च दि.२६/०८/२०१९ रोजीचे पत्रान्वये पुर्ववत सुरु करणेत आलेली आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे निर्देशानुसार दि.१६/०८/२०१९ रोजी प्रि-पेड मोबाईल सेवा पुरविणा-यासर्व कंपन्यांचे प्रतिनिधींशी समक्ष चर्चा करुन त्यांना नविन सुधारीत दर देणेबाबत निर्देश दिलेले होते.त्यानुसार मोबाईल कंपन्यांनी  प्रि-पेड मोबाईल सेवेबाबत आपले दर देऊ केलेले आहेत.

तथापी, संस्थानची ग्रुपमोबाईल सेवा शासन नियुक्त अधिकारी, संस्थानचे अधिकारी/ अत्यावश्यक सेवेतीलकर्मचारी यांना देणेकामी व त्यांची पदनिहाय विगतवारी निश्चीत करणेकामी समिती गठीत करणेस वसमितीने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन अंतीम प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे दि.२५/०९/२०१९ रोजीचे टिपणी अन्वये सादर करण्यात आला होता. सदर टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी उप-मुख्य कार्यकारी अधिकारी,प्रशासकीय अधिकारी, सी.सी.टी.व्ही. प्रमुख, आय.टी.प्रमुख यांची समिती नेमावी, असे निर्देश दिलेले होते.

सदरहु निर्देशानुसार संस्थानची ग्रुपमोबाईल सेवा शासन नियुक्त अधिकारी, संस्थानचे अधिकारी/अत्यावश्यक सेवेतीलकर्मचारी यांना देणेकामी त्यांची पदनिहाय विगतवारी निश्चीत करणेकामी दि.२१/१०/२०१९ रोजीच्या आदेशान्वये समिती गठीत करुन गठीत समितीस अहवाल एकत्रीत करुन प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार गठीत समितीने दि.०१/११/२०१९ रोजी विषयांकीत प्रकरणी सविस्तर चर्चा करुन दि.१२/११/२०१९ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर मा.प्रशासकिय अधिकारी यांचेशी झालेले समक्ष चर्चेअंती सर्व मोबाईल कंपन्याचेपुनश्च: नविन सुधारीत दर ई-मेलव्दारे मागविणेत यावेत, असे निर्देश दिलेले होते.त्यानुसार मोबाईल कंपन्यांनी पुनश्च: नविन सुधारीत दर ई-मेलव्दारे पाठविलेले आहेत.

गठीत समितीने सभेमध्ये झालेल्याचर्चेस अनुसरुन मुद्देनिहाय संक्षिप्त अहवाल दि.१४/०१/२०२० रोजी खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

१) समितीमध्ये सर्वानुमते चर्चा झालेनुसार प्रि-पेड सेवा पुरविणा-या BSNL,Vodafone Idea व JIO यांचे पुनश्च: सुधारीत दर ई-मेलव्दारे मागविणेत यावे.

२) त्यानुसार उपरोक्त मुद्दा क्र.१नुसार भारत संचार निगम लिमिटेड यांचे प्रि-पेड सेवेचे दि.०९/१२/२०१९ रोजीचे प्राप्त ई-मेलनुसार खालीलप्रमाणे प्लॅन उपलब्ध आहेत.

प्रि-पेड मोबाईल सेवेबाबत खालीलप्रमाणे प्राप्त झालेले भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) यांचे वार्षिक प्रि-पेड सीमकार्ड करीता रक्कम रुपये १६९९/- देऊ केले असून, त्यामध्ये Unlimited Voice (Local/STD) Roaming Calls including (Mumbai & Delhi), unlimited data with speed reduced to 80 kbps after 2 GB /Day,100 SMS/ Day देऊ केलेले आहे. (सदरची सेवा 3G Network ची आहे)

(अ) भारत संचार निगम लिमिटेड (BSNL)

| **Sr. No.** | **Plan Amount** | **Validity Period** | **Calling Benefits** | **Data Benefits** | **SMS Benefits** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 429/- | 81 Days | Unlimited Voice(Local/STD)Roaming Calls including (Mumbai & Delhi) | 1 GB/Day | 100 SMS Per Day |
| 2 | 485/- | 90 Days | Unlimited Voice(Local/STD)Roaming Calls including (Mumbai & Delhi) | 1.5 GB/Day | 100 SMS Per Day |
| 3 | 666/- | 134 Days | Unlimited Voice(Local/STD)Roaming Calls including (Mumbai & Delhi) | 1.5 GB/Day for 122 days | 100 SMS Per Day |
| **4** | **1699/-** | 365 **Days** | **Unlimited Voice in home LSA and National Roaming including (Mumbai & Delhi)** | **Unlimited data with speed reduced to 80 kbps after 2 GB/day** | **100 SMS Per Day** |

भारत संचार निगम लिमिटेड यांचे वार्षिक प्रि-पेड कार्ड करीता रक्कम रुपये १६९९/- मध्ये Unlimited Voice (Local/STD)Roaming Calls including(Mumbai & Delhi),2 GB/Day,100 SMS/ Day देऊ केलेले आहे. त्यामुळे BSNL ची प्रि-पेड सेवा घेतल्यास प्रतिमहा १४१.५८ रुपये इतका खर्च एका सीमकार्डसाठी अपेक्षित आहे.

(ब) वोडाफोन-आयडीया (Vodafone-Idea)

३) प्रि-पेड मोबाईल सेवेबाबत दि.१६/१२/२०१९ रोजीचे प्राप्त ई-मेलनुसार आयडीया (Idea)कंपनीने ३६५ दिवसाकरीता प्रि-पेड सीमकार्ड करीता रक्कम रुपये २३९९/- मध्ये Unlimited Calls +1.5 GB/Day+100 SMS/ Day देऊ केले आहे. (सदरची सेवा 4G Network ची आहे)

| Sr. No. | Plan Amount | Validity Period | CallingBenefits | Data Benefits | SMS Benefits |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 219/- | 28 Days | Unlimited Calls +1GB/Day+ 100 SMS/ Day | 1GB for 28 Days | 100 SMS Per Day |
| 2 | 299/- | 28 Days | Unlimited Calls +2GB/Day+ 100 SMS/ Day | 2 GB/ Days | 100 SMS Per Day |
| 3 | 449/- | 56 Days | Unlimited Calls +2GB/Day+ 100 SMS/ Day | 2 GB/ Days | 100 SMS Per Day |
| 4 | 699/- | 84 Days | Unlimited Calls +2GB/Day+ 100 SMS/ Day | 2 GB/ Days | 100 SMS Per Day |
| 5 | 2399/- | 365 Days | Unlimited Calls +1.5GB/Day +100 SMS/ Day | 1.5 /Days | 100 SMS Per Day |

Vodafone-Idea यांचे वार्षिक प्रि-पेड कार्ड करीता रक्कम रुपये २३९९/- मध्ये Unlimited Calls + 1.5 GB/Day+100 SMS/ Day देऊ केले आहे.त्यामुळे Vodafone Idea ची प्रि-पेड सेवा घेतल्यास प्रतिमहा १९९.९१ रुपये इतका खर्च एका सीमकार्डसाठी अपेक्षित आहे. त्यामुळे सदरची सेवा ही BSNL पेक्षाही महाग असल्याचे दिसून येत आहे.

(क) जीओ (JIO)

४) प्रि-पेड मोबाईल सेवेबाबत प्राप्त झालेलेजीओ (JIO)कंपनीचे नविन प्रति सीमकार्ड करीता रक्कम रुपये ९९/-+१९९/-=२९८/-मध्ये Unlimited Voice (FUP for offnet in 1000 mins.) २८ दिवसाकरीता देऊ केले आहे. त्यामुळे जीओ (JIO)ची प्रि-पेड सेवा घेतल्यास २८ दिवसाकरीता रु.१९९.०० रुपये इतका खर्च एका सीमकार्डसाठी अपेक्षित असून जीओ कंपनीने दि.२४/१२/२०१९ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे. (सदरची सेवा 4G Network ची आहे)

| Category | MRP | Plan Benefit | | |
|---|---|---|---|---|
| | | Data | Unlimited Voice (FUP for offnet in mins. | Validity (Days) |
| 1- Months | 99+199 | 1.5 GB/Day | 1000 | 28 |
| 2- Months | 99+399 | 1.5 GB/Day | 2000 | 56 |
| | 99+444 | 2 GB/Day | 2000 | 56 |
| 3- Months | 99+555 | 1.5 GB/Day | 3000 | 84 |

उपरोक्त तिनही कंपन्यांचे दरांचा वार्षिक व दरमहा प्रि-पेड प्लॅनचा तुलनात्मक विचार करता, **Vodafone Idea** यांचे वार्षिक प्रि-पेड कार्ड करीता दर रक्कम रुपये २३९९/- मध्ये Unlimited Calls+1.5 GB/Day+100 SMS/ Day देऊ केले आहे.परंतु, Vodafone Idea यांचे सेवेत दिवसेंदिवस अडचणी निर्माण होत आहे. तसेच,जीओ (JIO) यांचे सुधारीत प्लॅनचे दरामध्ये वाढ झाल्याने सदरहु सेवा ही खर्चीक झालेली असुन नविन प्रति सीमकार्ड करीता रक्कम रुपये ९९/- + १९९/- = २९८/-इतका खर्च एका सीमकार्ड करीता २८ दिवसाकरीता येणार आहे.

तरी, भारत सरकार मान्य भारत संचार निगम लिमिटेड (BSNL)यांचे वार्षिक प्रि-पेड कार्ड करीता रक्कम रुपये १६९९/- मात्र मध्ये Unlimited Voice in home LSA and National Roaming including (Mumbai & Delhi),Unlimited data with speed reduced to 80 kbps after 2 GB/days,100 SMS/ Dayदेऊ केलेले आहे.

५) दि.०५/०६/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालील अधिकारी, विभागप्रमुख व इतर कर्मचारी यांचे Vodafone-Ideaपोस्ट पेड ग्रुप मोबाईलचे सेवेचे बिल संस्थानमार्फत आदा करुन उर्वरीत बिलाची सर्व रक्कम ही संबधीत अधिकारी व कर्मचारी यांचे मासिक पगारातुन पगारबिल विभागामार्फत वसुल करणेत येत आहे.

१) मा.अध्यक्ष साहेब व मा.उपाध्यक्ष साहेब सर्व बील सवलत (सवलतीचा लाभ घेत नाही)

२) मा.मुख्यकार्यकारी अधिकारी सर्व बील सवलत

३) मा.उप मुख्यकार्यकारी अधिकारी सर्व बील सवलत

४) मा.प्रशासकिय अधिकारी रु.७००/- पर्यंत सवलत (भाडे १००+ टॉक टाईम २००+ नेट ४००)

५) डॉक्टर्स व सर्व विभागप्रमुख रु.३००/- पर्यंत सवलत (१००+२००)

६) पर्यवेक्षक रु.२५०/- पर्यंत सवलत (१००+१५०)

७) तांत्रिक सहाय्यक, वरिष्ठ लिपीक रु.२००/- पर्यंत सवलत (१००+१००)

८) वाहन चालक व सुरक्षा पर्यवेक्षक रु.१५०/- पर्यंत सवलत (१००+५०)

६) परंतु, उपरोक्त मुद्दा क्रमांक २ ला अनुसरुन खालील संस्थान अधिकारी/कर्मचारी यांनाच त्यांचे वेतनात वार्षिक रक्कम रुपये १६९९/- मात्र प्रतिवर्षाला आदा करुन त्यांना त्यांचे स्वतःचे वैयक्तीक नावावर BSNLकंपनीकडुनदेय क्रमांकावर,त्यांचे वैयक्तीकप्रि-पेड BSNL सीम क्रमांकास अथवा इतर कुठल्याही कंपनीचे प्रि-पेड सीम क्रमांकासतसेच सद्यस्थितीतील संस्थान ग्रुप मोबाईल सेवेत कार्यरत असलेले Vodafone Idea Post Paid सीम भारत संचार निगम लिमिटेड कंपनीस पोर्ट करुन ते संबंधीत शासन नियुक्त

अधिकारी,सस्थान अधिकारी/कर्मचारी यांचे वैयक्तिक (खाजगी) नावावर करुन देणेकामी Vodafone Idea कपनीस संस्थानमार्फतपत्रव्यवहार करुन सदर क्रमांकास टेलिफोन भत्ता देय करुन सुविधा कार्यरत करता येईल. सदर पदाव्यतिरीक्त कुठल्याही कर्मचा-यास त्याचे वेतनात टेलिफोन भत्ता देय असणार नाही.

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब
२) मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब
३) मा.प्रशासकीय अधिकारी, मुख्य लेखाअधिकारी
४) वैद्यकीय संचालक, वैद्यकीय प्रशासक,वैद्यकिय अधिक्षिका
५) सर्वविभाग प्रमुख व प्र.विभाग प्रमुख
६) बांधकाम अभियंते ,मॅनेजर्स

७) उपरोक्त मुद्दा क्र.६ मध्ये नमुद केलेल्या शासन नियुक्त अधिकारी,सस्थान अधिकारी/कर्मचारी नमूद/धारण केलेल्या पदावरुन इतरत्र दुस-या पदावर बदली झाल्यास तसेच सदरचे पद उपरोक्त नमुद केलेल्या विगतवारीतील नसल्यास त्यास टेलिफोन भत्ता देय असणार नाही.

८) शासन नियुक्त अधिकारी यांचे व्यतिरीक्त संस्थान आस्थापनेवरील कोणकोणते अधिकारी व कर्मचारी यांना सदर सेवेचा लाभ द्यावयाचा याची वर्गवारी करुन त्यांचे पदनिहाय धोरणात्मक निर्णय होणे अत्यावश्यक आहे.जेणेकरुन सदर अधिकारी/कर्मचारी यांचे मासीक पगारात टेलीफोन भत्ता देता येईल.

| **Drosheet (Green, 75"x50")** | **3000** | **Nos** | **160.0000** | **160.0000** |
| **Bigsheet Cotton (Green, 120"x60")** | **300** | **Nos** | **220.0000** | **220.0000** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Mattress Simple (Foam, 75"x35½"x4")** | **100** | **Nos** | **2100.0000** | **2100.0000** |
| **Solapuri Chadder Cotton weight more than 1100 gms. (Morepankhi, 60"x90")** | **500** | **Nos** | **260.0000** | **255.0000** |
| **Curtain Cloth (Polyster, Colour - Light Blue)** | **600** | **Mtr** | **70.0000** | **68.0000** |

**M/s. VICTORY MATTRESSES PVT LTD**

| Item Description | Quantity | Units | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder Rs. P | Rate After Negotiation |
|---|---|---|---|---|
| **Mattress Double fold (Foam, 75"x35½"x4")** | **250** | **Nos** | **2171.5624** | **2136.5624** |
| **Mattress Tirple fold (Foam, 75"x35½"x4")** | **50** | **Nos** | **2251.6200** | **2216.6200** |

**M/s. MB TRADING COMPANY NASHIK ROAD NASHIK**

| Item Description | Quantity | Units | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder Rs. P | Rate After Negotiation |
|---|---|---|---|---|
| **Napkeen (Colour - Dark Brown / Marun, 22"x15")** | **500** | **Nos** | **33.0000** | **----** |

**M/s. KUMAR TAILORS AND EMBROIDERS AHMEDNAGAR**

| Item Description | Quantity | Units | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder Rs. P | Rate After Negotiation |
|---|---|---|---|---|
| **Linen Trolley bag (Green big size 36"X60")** | **150** | **Nos** | **183.7467** | **----** |
| **Trolley Cover, Plastic (Braun 40"X32")** | **250** | **Nos** | **78.7500** | **----** |

**M/s. KHADI GRAMUDYOG VIKAS SAMITI**

| Item Description | Quantity | Units | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder Rs. P | Rate After Negotiation |
|---|---|---|---|---|
| **Plain Greensheet (Green Cotton, 75"x45")** | **500** | **Nos** | **160.0000** | **----** |

**M/s. CRITICAL CARE SYSTEMS PUNE**

| Item Description | Quantity | Units | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder Rs. P | Rate After Negotiation |
|---|---|---|---|---|
| **Door Mat (Rubber, 28”x15”)** | **200** | **Nos** | **141.8775** | **----** |
| **Pillow (Pink, 18”x24”) Foam Material** | **500** | **Nos** | **132.0135** | **----** |

**तसेच उपरोक्त प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद अ.नं.०२ - Streture Mattress Full rexine cover with Wall crow (Colour-Blue/Chocolaty colour,७२“x३०“ ) (पूर्ण खोळ) ५० याकरीता निम्नतम दरधारक खादी ग्रामोद्योग विकास समिती यांनी तसेच अ.नं.१३- Patient parker+Shirt With Button, polister, (colour-Marun) ५०० नग करीता निम्नतम दरधारक मे.अमरदिप उद्योग यांनी पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली असल्याने सदरचे लिनन खरेदी कामी फेर दरपत्रके मागविण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५१** **रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजिनिअरींग विभागाकरीता अत्यावश्यक कर्मचारी भरणेबाबत बायोमेडीकल विभागाचे दि.१४.०९.२०१९ रोजीचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम कलम २००४ तरतुद– कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवाकर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ –“सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतानासमितीनेसदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी.”तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये “समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही” असे नमुद आहे.

प्रस्ताविक- जा.नं.एसएसएस/प्र.अ.कक्ष/०२६/२०१९ दि. १४/०९/२०१९ (स्मरणपत्र २) अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील रिक्त असलेले ज्यु बायोमेडीकल इंजिनीअर्सचे ०२ पदे (कायम कर्मचारी) तातडीने भरणेबाबत कळविले आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाचे आकृतीबंधात बायोमेडीकल इंजिनिअर पदाची पदसंख्या, सद्यस्थिती व डीन, बी.जे. मेडीकल कॉलेज पुणे यांनी प्रस्तावीत केलेली पात्रता खालीलप्रमाणे आहे.

| रूग्णालय | पदनाम | शैक्षणिक पात्रता | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| साईनाथ | ज्यु मेडीको इंजिनिअर | 1) Age not more than 38 for open &43 for Reserved category.<br>2) Degree/ Diploma in Biomedical Engineering / Electronics from any Government recognized University.<br>3) MS-CIT | ०१ | ०० | ०१ |
| साईबाबा | ज्यु बायोमेडीकल इक्विमपेंट | 1) Age not more than 38 for open &43 for Reserved category.<br>2) Degree / Diploma in Biomedical | ०३ | ०२ | ०१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | इंजिनिअरर्स | Engineering / Electronics Engineering from any Government recognized University.<br>3) MS-CIT | | | |

यापुर्वी, दि. २३/०७/२०१८, २७/०८/२०१८ व दि. ०७/११/२०१८ रोजीचे पत्रान्वये ज्युनिअर बायोमेडीकल इंजिनिअर्सची ०२ रिक्त पदे तातडीने भरणेबाबत बायोमेडीकल इंजिनीअर विभागाने मागणी केलेली आहे. तसेच दि. १७/०९/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्र वैद्यकीय अधिक्षीका, श्री साईनाथ रूग्णालय यांनी श्री साईनाथ रूग्णालयाकडील बायो.इंजि.विभागाला ०३ आयटीआय (इलेक्ट्रीकल) शैक्षणिक पात्रता असलेले कर्मचारी तातडीने उपलब्ध करणेबाबत कळविले होते. एच आर विभागाची दि. २४/१२/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीस अनुसरून कामगार विभागाने दि. २१/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये मे. बी. व्ही. जी. लि. पुणे, कॅम्प-शिर्डी यांना श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये ०२ बायोमेडीकल इंजिनिअर पुरविणेबाबत कळविले.

त्यानंतर पुन्हा बायोमेडीकल विभागाने एच आर मॅनेजर यांना दि. १९/०४/२०१९ (स्मरणपत्र १) अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील रिक्त असलेले ज्यु बायोमेडीकल इंजिनीअर्सचे ०२ पदे (कायम कर्मचारी) तातडीने भरणेबाबत कळविले होते. त्यास अनुसरून एच आर विभागाचे दि. २३/०४/२०१९ रोजीचे मंजुर टिपणीनुसार कामगार विभागाने दि.१७/०५/२०१९ रोजीचे पत्रान्वये, मे. बी. व्ही. जी. लि. पुणे, कॅम्प-शिर्डी यांना श्री साईबाबा हॉस्पिटल विभागाचे मागणीप्रमाणे व देण्यात आलेल्या आदेशानुसार आपण अद्यापपावेतो श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता बायोमेडीकल इंजि. यांची नेमणूक केलेली नाही. तरी आपणास कळविण्यात येते की, सदर पत्र मिळताच उपरोक्त नमुदप्रमाणे ०२ बायोमेडीकल इंजिनिअर बाह्ययंत्रणेमार्फत (आऊटसोर्सिंगद्वारे) त्वरीत पुरविण्याचे करावे अन्यथा करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग केलेबाबत आपणावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे कळविलेले आहे. तथापि अद्यापही ठेकेदारामार्फत कर्मचारी पुरविणेत आलेले नाही.

आता पुन्हा, बायोमेडीकल विभागाने एच आर मॅनेजर यांना दि. १४/०९/२०१९ (स्मरणपत्र २) अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील रिक्त असलेले ज्यु बायोमेडीकल इंजिनीअर्सचे ०२ पदे (कायम कर्मचारी) तातडीने भरणेबाबत कळविले आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करून अनुमान-

प्रति कर्मचारी एकत्रित मासिक वेतन रू. १७,७६९/- याप्रमाणे ०२ पदांचे रू.३५,५३८/-.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ०१ व श्री साईनाथ रूग्णालयात ०१ असे एकुण ०२ रिक्त असलेले ज्यु बायोमेडीकल इंजिनीअर्सचे पदावर बाह्ययंत्रणेमार्फत (आऊटसोर्सिंगद्वारे) सेवा पुरविणेबाबत संस्थानमध्ये कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारास कामगार विभागामार्फत कळविणेत आलेले आहे. मात्र अद्यापपावेतो कर्मचारी मिळालेले नसल्याने बायोमेडीकल विभागाने एच आर मॅनेजर यांना स्मरणपत्र -२ द्वारे इंजिनिअर्सची मागणी केली आहे.

तरी, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ०१ व श्री साईनाथ रूग्णालयात ०१ असे एकुण ०२ रिक्त ज्यु बायोमेडीकल इंजिनीअर्सचे पदावर, संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत बाह्ययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिंगद्वारे) सेवा घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.१५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजिनिअरींग विभागाकरीता अत्यावश्यक कर्मचारी भरणेबाबत अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५२** **सध्याचे वेतनात वाढ व वाढीव मिळालेल्या वेतनात दरवर्षी वाढ होणेसाठी ठेकेदारामार्फत कार्यरत फिजिओथेरपिस्ट यांचे दि.२८.१२.२०१९ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** मा व्यवस्थापन समिती निर्णय क्र-

१) मा. व्यवस्थापन समिती दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र १७३.

श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही रूग्णालयांकरिता Physiotherapist, MRI Technician, Dialysis Technician, Jr PFT Technician, Jr Biomedical equipment engineer pharmacist या पॅरामेडिकल पदांवर कंत्राटदारांमार्फत नेमणूकामी उमेदवारांच्या घेण्यात आलेल्या मुलाखतींना पुष्टी देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समिती दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१.- संस्थानमध्ये बाह्ययंत्रणेमार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१ एप्रिल, २०१७ पासून त्यांच्या प्रतीदिन वेतनावर ४०% वाढ देण्यात आली. तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६ नुसार, श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणेच दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ मधील अटीस अधीन राहून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्निशियन कर्मचा-यांना त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात यावी

३) मा व्यवस्थापन समिती दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२८/४.

महाराष्ट्र दुकाने व व्यपारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना द्यावयाच्या सोयी सवलतीबाबत समिती सदस्य मा ॲड मोहन जयकर यांनी अभ्यास करून त्याबाबत शिफारस करावी, असे ठरले होते. सदर विषयावर कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात आली. कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) अनुज्ञेय असल्याने कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१/१२/२०१८ पासून भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) देण्यास मान्यता देण्यात आली.

४) मा. व्यवस्थापन समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५६६.

यावर सविस्तर चर्चा होऊन, असे निदर्शनास आले आहे की असे कुशल परिचारक/ परिचारीका कौशल्य प्राप्त करून योग्य मानधन नसल्यास काम सोडून जातात अशा परिस्थितीत श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ठेकेदारामार्फत कार्यरत असलेले कुशल परिचारक/परिचारीका यांना दि.०१/१०/२०१९ पासून मासिक रू. १७५००/- एकत्रित वेतन निश्चित करून त्यामध्ये प्रतिदीन रू. १५ स्पेशल अलाऊन्स देण्यास तसेच येथून पुढे वेळोवेळी अधिसुचनेद्वारे होणा-या स्पेशल अलॉन्सची वाढ सदर कर्मचा-यांचे निश्चीत केलेल्या एकत्रित वेतनावर देण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना- श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कार्यरत ज्योती विखे, राखी आहुवालीया, विश्वजित गायकवाड यांचा दि. २८/१२/२०१९ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

"वरील विषयास अनुसरून कारणे विनंती आम्ही कंत्राटी फिजीओथेरपिस्ट (Bachelor of physiotherapy) अर्ज करतो की, आम्ही अनेक वर्षापासून श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल शिर्डी मध्ये कार्यरत असून आम्हाला कोणत्याही प्रकारची वेतन वाढ झाली नाही.

आमचे शिक्षण हे डिगरी कोर्स झालेले आहे. आम्ही तिघांनीही Bachelor of physiotherapy हा ४ १/२ (साडेचार) वर्षाचा कोर्स केलेला आहे. तरी आम्हाला २५,००० ते ३०,०००/- वेतन मिळावे. साईबाबा संस्थानमध्ये आम्हाला ११,००० वेतन वरती घेतले होते. नंतर त्यात ४० टक्के वाढ करून आम्हाला १५,४०० वेतन दिले जात व नंतर आम्हाला आठवडा सुट्टीचा पगार दिला गेला व आमचे वेतन १७,७९० रू. महिना झाले. परंतु जी दर वर्षाची वेतनवाढ येते ती आम्हाला दिली जात नाही आमचे शिक्षण कुशल कर्मचारी पेक्षा, उच्च दरजाचे आहे. आम्ही डॉ म्हणून काम करतो व कुशल कर्मचारी व आमच्या कामात खुप तफावत आहे. आम्हाला किमान २५,००० ते ३०,००० रू वेतन मिळावे. तरी मा मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांना कळकळीची विनंती की, आपण या विषयावर गांभीर्याने विचार करावे आम्हाला नियमीत वेतनवाढ मिळावी ही विनंती. आपणाकडून योग्य त्या कार्यवाहीची अपेक्षा आहे."

उपरोक्त कर्मचा-यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

मा व्यवस्थापन समिती दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र १७३ नुसार, श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही रूग्णालयांकरिता फिजिओथेरपिस्ट, एमआरआय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन, ज्यु पीएफटी टेक्निशियन, ज्यु बायोमेडीकल इक्विपमेंट इंजिनिअर व फार्मासिस्ट या पॅरामेडीकल पदांवर कंत्राटदारांमार्फत नेमणूककामी उमेदवारांच्या मुलाखती घेणेत आल्या होत्या सदर मुलाखतीतुन निवड केलेल्या

उमेदवारांना प्रत्येकी मासिक रू.११,०००/- मेहनताना देणेबाबत ठरले. यापैकी सध्या फिजिओथेरपिस्ट, एमआरआय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन कार्यरत आहेत.

उपरोक्त कर्मचा-यांव्यतिरीक्त बाह्ययंत्रणेमार्फत कार्यरत असलेल्या इतर (कुशल व अकुशल) कर्मचा-यांचा कामगार विभागामार्फत किमान वेतन दराने एकत्रित वेतन देण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६ नुसार, श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणेच दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ मधील अटीस अधीन राहून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्निशियन कर्मचा-यांना त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ दि.०१/०४/२०१७ पासून देण्यात आली. सदर निर्णयानुसार ज्या कर्मचा-यांना ११,०००/- मासिक एकत्रित वेतन देण्यात येत होते त्यांचे वेतन १५,४००/- इतके झाले. त्यानंतर मा व्यवस्थापन समिती दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२८/४ नुसार, महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना द्यावयाच्या सोयी सवलतीबाबत समिती सदस्य मा ॲड मोहन जयकर यांनी अभ्यास करून त्याबाबत शिफारस करावी, असे ठरले होते. सदर विषयावर कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात आली. कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) अनुज्ञेय असल्याने कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१/१२/२०१८ पासून भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) देण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार कंत्राटी कर्मचारी यांना माहे ०१/१२/२०१८ पासुन भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) लागु केलेली असुन वेतन कमी करण्यात आले नसुन सध्या रू. १७,७६९/- वेतन देण्यात येत आहे.

उद्योग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसुचनेनुसार कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत इतर कर्मचारी यांचे प्रतिदीन वेतनात दर सहा महिन्यांनी स्पेशल अलाऊंन्समध्ये वाढ होत असते मात्र सदरची वाढ उपरोक्त अर्जदार कर्मचारी यांचे वेतनात होत नाही कारण त्यांना एकत्रित वेतन देण्यात येत आहे.

आता, उद्योग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि. २४/०७/२०१९ रोजीचे अधिसूचनेनुसार किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं ३ ला अनुज्ञेय असणारे कंत्राटी अकुशल / कुशल कामगारांचे मुळ वेतनामध्ये सुधारणा करणेत आलेली असुन दि.०५/०८/२०१९ रोजीचे अधिसुचनेनुसार विशेष भत्ता / स्पेशल अलौन्स मध्ये प्रतिदीन १५ रूपयाने दि.२४/०७/२०१९ पासून वाढ करणेत आलेली आहे.

उपरोक्त अर्जदार ठेकेदारामार्फत कार्यरत कुशल तंत्रज्ञ यांना मासिक रू.१७५००/- या एकत्रित वेतन देऊन प्रतिदीन १५ रूपयाने स्पेशल अलाऊन्स दिल्यास त्यांना प्रतिमहा रू. १७९५०/- वेतन मिळेल.

उपरोक्त लेबर ठेकेदारामार्फत कार्यरत अर्जदार ज्या पदाचे काम करत आहेत त्याच पदासाठी सातव्या वेतन आयोगानुसार सुरवातीचे वेतन खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र १**

| अ क्र | पदाचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | | रिक्त पदे | ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | मुळ वेतन | महागाई भत्ता (१२%) | सुरवातीचे एकुण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थायी | ठेकेदारा मार्फत | | | | | |
| १ | सिनीअर फिजिओथेरपिस्ट | २ | ०१ | ०० | ०१ | पे बॅन्ड ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० L1-S15 (41800-132300) | ४१८०० | ५००० | ४६८०० |
| २ | ज्युनिअर फिजिओथेरपिस्ट | ३ | ०० | ०२ | ०१ | पे बॅन्ड ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० L1-S13 (35400-112400) | ३५४०० | ४२४८ | ३९६४८ |
| ३ | एमआरआय टेक्निशियन | ३ | ०२ | ०१ | ०० | पे बॅन्ड ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००L1-S13 (35400-112400) | ३५४०० | ४२४८ | ३९६४८ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | डायलेसिस टेक्निशियन | ५ | ०२ | ०३ | ०० | पे बॅन्ड ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० L1-S13 (35400-112400) | ३५४०० | ४२४८ | ३९६४८ |

सध्या कार्यरत असलेले फिजिओथेरपिस्ट, एमआरआय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन यांचा वेतन तपशिल खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र २

| अ नं. | नेमणूकीचा प्रकार | कर्मचारी संख्या | | एकूण | सध्याचे प्रती दिन वेतनदर रूपये | सध्याचे मासिक वेतन रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | साईबाबा | साईनाथ | | | |
| १ | लेबर ठेकेदारामार्फत कंत्राटी तंत्रज्ञ | ०६ | ०१ | ०७ | ५९२.३१ | १७७६९ |

यापुर्वी श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील परिचारीकांचे वेतनवाढीबाबतचे अर्जावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ५६६ नुसार, यावर सविस्तर चर्चा होऊन, असे निदर्शनास आले आहे की असे कुशल परिचारक/ परिचारीका कौशल्य प्राप्त करून योग्य मानधन नसल्यास काम सोडून जातात अशा परिस्थितीत श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ठेकेदारामार्फत कार्यरत असलेले कुशल परिचारक / परिचारीका यांना दि.०१/१०/२०१९ पासून मासिक रू. १७,५००/- एकत्रित वेतन निश्चित करून त्यामध्ये प्रतिदीन रू. १५ स्पेशल अलाऊन्स देण्यास तसेच येथून पुढे वेळोवेळी अधिसुचनेद्वारे होणा-या स्पेशल अलॉन्सची वाढ सदर कर्मचा-यांचे निश्चीत केलेल्या एकत्रित वेतनावर देण्यास मान्यता देण्यात आली.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- उपरोक्त श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले तंत्रज्ञ यांना मा व्यवस्थापन समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५६६ नुसार, दि. ०१/१०/२०१९ पासून मासिक रू. १७,५००/- एकत्रित वेतन निश्चित करून त्यामध्ये प्रतिदीन रू. १५ स्पेशल अलाऊन्स देण्यास तसेच येथून पुढे अधिसुचनेद्वारे वेळोवेळी संस्थानमधील इतर कुशल कर्मचा-यांना देण्यात येणा-या स्पेशल अलाऊन्सची वाढ सदर कर्मचा-यांचे निश्चीत केलेल्या एकत्रित वेतनावर देणेस निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.१५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले तंत्रज्ञ यांचा वेतनवाढीबाबतचा एकत्रित प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५३** **दोन्ही रुग्णालयासाठी देणगीदाखल घेण्यात येणारी संगणक प्रणाली रद्द करुन, नव्याने कार्यवाही सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमधील सर्व कामकाज संगणकीकृत करणेसाठी मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. व मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या कंपन्यांनी एकत्रीत येऊन मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर Hospital Management Information System (HMIS) संगणकीय प्रणाली व Picture Archiving and Communication System (PACS) सिस्टीमचे सादरीकरण दाखविले असता, त्यावर दि. 02/05/2018 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेच्या विषय नं. 13 वरील निर्णय क्र. 342 पुढीलप्रमाणे पारित झालेला आहे.

“ सदरहुकामी कंपनीस देणगी स्वरुपातील मिळणारी रक्कम कोणाकडून मिळणार आहे व त्याचा विनियोग कशा प्रकारे करण्यात येईल याची माहिती संस्थानला देण्यात यावी. सदरहू सॉफ्टवेअर एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर चालविण्यात यावे, असे ठरले. तसेच सदर सॉफ्टवेअर घेण्यापुर्वी सध्या सदर सॉफ्टवेअर ज्या रुग्णालयात कार्यान्वित आहे त्या रुग्णालयास संस्थानच्या डॉक्टर, संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्या पथकाने पाहणी करून सदर सॉफ्टवेअरच्या उपयुक्ततेबाबत खात्री करुन घ्यावी, असे ठरले तसेच सदर सॉफ्टवेअरच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक हार्डवेअर खरेदीसाठी रु. 50 लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. ”

उपरोक्त निर्णयामध्ये नमुद असलेप्रमाणे, संस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांच्या पथकाने सदर सॉफ्टवेअरच्या उपयुक्ततेबाबत खात्री करण्यात येऊन, त्याबाबतचा अहवाल दि. 22/05/2018 रोजीचे टिपणीअन्वये सादर करण्यात आलेला आहे. तसेच देणगी स्वरुपातील रक्कमेबाबत व त्याच्या विनियोगाबाबत कंपनीस जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/ई.डी.पी./ 1001/2018 दि.14/06/2018 रोजीचे पत्राअन्वये कळविलेप्रमाणे, कंपनीमार्फत दि. 24/06/2018 व दि. 27/06/2018 रोजीचे ई-मेलद्वारे सदरची माहिती व दोन्ही रुग्णालयांकरीता लागणारे संगणके व संगणकीय साहित्यांची Specification यादी Budgetory सह संस्थानला प्राप्त झालेली होती.

त्यानुसार ई.डी.पी. विभागाने मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सदरचा विषय यथायोग्य निर्णय होणेस्तव सादर केला असता, त्यावर दि. 30/06/2018 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेच्या विषय नं. 13 वरील निर्णय क्र. 453 घेण्यात आलेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होवून, मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. व मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. यांनी रक्कमेबाबतचा विनियोग कळविलेला असून स्वत: कंपनीच सदरहू HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम संस्थानला 10 वर्षाकरीता विनामुल्य देणगी स्वरुपात देणार असलेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार देणगी कोणाकडून मिळणार आहे याची माहिती व त्याचा विनियोगाबाबतची नोंद मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये घेऊन, सदरची संगणकीय प्रणाली स्विकारणेस व कार्यान्वित करणेस मान्यता देण्यात आली. प्रस्तावामध्ये नमुद असलेप्रमाणे कंपनीने संस्थानकडून मागणी केलेल्या मुद्दा क्र. 1 ते 13 व तांत्रिक बाबींबाबत कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल या दोन्ही रुग्णालयांचे संगणकीकरण करणेकामी संगणके, प्रिंटर्स, यु.पी.एस, सर्व्हर, O.S Licences, नेटवर्क व संगणकीय साहित्य इ. खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजीत एकुण रक्कम रु. 1,82,41,050/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू साहित्य खरेदीकामी ई-निविदा प्रक्रीया राबविणेत यावी, असे ठरले. "

उपरोक्त निर्णय पारित झालेनंतर, ई-निविदा प्रक्रीयेद्वारे संगणके, प्रिंटर्स, यु.पी.एस, सर्व्हर, O.S Licences, नेटवर्क व संगणकीय साहित्य इ. खरेदी करणेबाबत तसेच HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम कार्यान्वित करणेबाबत, खालील नमुद " अ " व " ब " प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

अ – दोन्ही रुग्णालयांचे संगणकीकरण करणेकामी संगणके, प्रिंटर्स, यु.पी.एस, सर्व्हर, O.S Licences, नेटवर्क व संगणकीय साहित्य इ. खरेदी करणेकामी करण्यात आलेली कार्यवाहीचा तपशिल पुढीलप्रमाणे,

दोन्ही रुग्णालयांकरीता HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम 10 वर्षाकरीता विनामुल्य देणगी स्वरुपात देत असलेल्या सॉफ्टवेअर कंपनीकडून दि. 27/06/2018 रोजीचे ई-मेलअन्वये प्राप्त झालेल्या यादीनुसार मा. व्यवस्थापन समतीचे सभेमध्ये अंदाजीत खर्चास मान्यता घेतलेनंतर, पुनश्च: कंपनीकडून दि. 27/08/2018 व दि. 11/12/2018 रोजीचे ई-मेलअन्वये हार्डवेअर Specification ची नविन यादी प्राप्त झालेली होती.

त्यांनी कळविलेल्या यादीप्रमाणे, सर्व हार्डवेअरबाबतचे Specification एकत्रीत करण्यात येऊन, सदरची यादी दि. 19/12/2018 रोजीचे पत्राअन्वये संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत तपासून घेण्यात येऊन, माहिती तंत्रज्ञान विभागाने कळविलेले बदल सदर यादीमध्ये समाविष्ट करून, सदरची यादी "ई-निविदा मसुदा समितीचे समोर" तपासून, तत्कालीन उपजिल्हाधिकारी यांनी तोंडी दिलेल्या निर्देशानुसार ई-निविदेचे Part – A, B, C व D असे 4 भाग करण्यात येऊन, सदरहू ई-निविदेबाबतची जाहिरात दि. 05/02/2019 ते दि. 05/04/2019 पर्यंत www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आली होती.

त्यानुसार, प्राप्त झालेल्या ई-निविदेंच्या संख्येचा तपशिल व तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या पुरवठाधारकांच्या संख्येचा तपशिल पुढीलप्रमाणे,

| अ. क्र | टेंडरचे नाव | ऑनलाईन प्राप्त झालेल्या ई-निविदा | तांत्रिक पात्र झालेल्या ई-निविदा |
|---|---|---|---|
| 1. | **Part A –** Servers, Peripherals and Software Licenses. | 07 | 04 |
| 2. | **Part B –** Desktops, Laptops and UPS. | 03 | 02 |
| 3. | **Part C –** Printers, Scaners and Peripherals. | 01 | - |
| 4. | **Part D –** Active and Passive Networking. | 04 | 03 |

उपरोक्त तक्यातील Part- A,B,C,D पैकी Part - C चे टेंडरकरीता तीनपेक्षा कमी पुरवठाधारकांनी निविदा भरलेली असल्यामुळे, सदर ई-निविदा प्रक्रीया रद्द करून, पुनश्च: फेर ई-निविदा प्रक्रीया राबविणेस दि. 20/05/2019 रोजीचे टिपणीअन्वये मान्यता घेण्यात आलेली होती, व Part - B चे ई- निविदेकरीता राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रीयेमध्ये देखील दोनच पुरवठाधारक पात्र झालेले असल्यामुळे सदरहू ई- निविदेच्या वाणिज्यीक निविदा (Commercial Bid) उघडण्यात आलेले नाहीत.

तसेच, Part – A व Part – D चे ई-निविदेच्या तांत्रिक तक्यातील पात्र पुरवठाधारकांचे वाणिज्यीक निविदा (Commercial Bid) दि. 28/06/2019 रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेसमोर उघडण्यात आले असता, त्यामध्ये Part – A करीता निम्नत्तम रक्कम रु. 88,70,188/- (कर विरहीत) मात्र व Part – D करीता निम्नत्तम रक्कम रु. 91,62,465/- (कर विरहीत) मात्र असून दोन्हीही ई-निविदेमध्ये Racca Infotech Pvt.Ltd हे पुरवठाधारक निम्नत्तम आलेले आहे.

परंतु, Part - A, B, C, D चे ई-निविदेकरीता मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये एकुण रक्कम रु. 1,82,41,050/- खर्चास मान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार Part - A व Part - D चे ई-निविदेकरीता दोन्ही मिळवून एकुण रक्कम रु. 2,12,78,530/- (कर सहीत) मात्र इतक्या निम्नत्तम दराची ई-निविदा आलेली आहे. या खर्चामध्ये Part – B व C चा खर्च नमुद नाही. तरी ही आलेली ई-निविदेतील निम्नत्तम दराची रक्कम रु. 2,12,78,530/- (कर सहीत) मात्र ही मा. व्यवस्थापन समितीने दि. 30/06/2018 रोजीच्या निर्णय क्र. 453 चे मंजुर एकुण रक्कम रु. 1,82,41,050/- मात्र पेक्षा खुपच जास्त आलेचे दिसून येत आहे. शिवाय Part – B व C चे साहित्य खरेदी करणेसाठी मंजुर रक्कम शिल्लक राहत नाही.

तसेच, शासनाच्या खरेदी नियमावलीमध्ये मुद्दा क्र. 4.4.3.1 मध्ये “ ब ” प्रमाणे खालील नियम नमुद आहे.

“दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-) 20 टक्के ते (+) 10 टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. या किंमत श्रेणीमध्ये (Price Band) किंमती न आल्यास फेरनिविदा काढावी ”

त्या अनुषंगाने, Part – A, B, C व D निविदेमधील, Part – A व Part– D या ई-निविदेमध्ये निम्नत्तम असलेले Racca Infotech Pvt.Ltd या पुरवठाधारकाची बयाना (EMD) रक्कम www.mahatenders. gov.in या संकेतस्थळावर जमा ठेऊन, Part-A, Part-B व Part-D मधील उर्वरीत पुरवठाधारकांनी बयाना (EMD) रक्कमेच्या वेळोवेळी केलेल्या मागणीप्रमाणे व प्राप्त झालेल्या ई-मेलनुसार, त्यांना शासनाच्या संकेतस्थळावर Online जमा असलेली प्रत्येकी रु.1,00,000/- मात्रची बयाना (EMD) रक्कम दि. 21/09/2019 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये परत करणेत आलेली आहे.

तसेच संगणकीय प्रणाली देणगी देत असलेल्या मे.एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. व मे.सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या दोन्ही कंपन्यांच्या प्रतिनिधींना संस्थानमध्ये दि. 21/08/2019 रोजी बोलावून, त्यांनी संगणकीय साहित्यांसाठी दिलेल्या यादीप्रमाणे एकुण रक्कम व प्रत्यक्षात ई-निविदाद्वारे Part – A व D साठी आलेले निम्नत्तम दर यामधील रक्कमेमध्ये फार मोठी तफावत का झाली या संदर्भात समक्ष विचारणा करण्यात आली असता, त्यांना त्याबाबत कोणतेही समर्पक उत्तर देता आले नाही. तसेच सदर रक्कम कशामुळे वाढली याचा लेखी खुलासा संबंधीत कंपनीमार्फत मागविला होता.

परंतु, कंपनीने दि. 13/08/2019 रोजीचे ई-मेलद्वारे हार्डवेअर व संबधीत साहित्यांची सुधारीत यादी व त्याची अंदाजीत रक्कम रु. 4,96,29,889/- (करसहीत) मात्रच्या खर्चाची यादी संस्थानला पाठविलेली असून, वाढलेल्या रक्कमेबाबत लेखी खुलासा अद्यापी कंपनीने दिलेला नाही.

ई.डी.पी. विभागाने संगणक प्रणाली विकसीत करणाऱ्या कंपनीकडून हार्डवेअर प्राप्त झालेली यादी व त्यावरील खर्च हे संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाकडे जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/ई.डी.पी./32/2019 दि.27/09/2019 रोजीचे पत्राअन्वये तपासणेकामी पाठविली असता त्यांनी जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/118/2019 दि. 16/10/2019 नुसार खालीलप्रामाणे पत्र दिलेले आहे.

“हार्डवेअरचे तांत्रिक तपशिलबाबत, प्रणाली विकसीत केलेल्या मे.एन.कार्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. व मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या कंपनीमार्फत संबंधीत पुरवठा धारकांशी चर्चा करूनच अंतीम साहित्यांचे दर पुरवठाधारकांकडून प्राप्त करून घ्यावे लागणार आहेत. त्यानुसार मे.एन.कार्ड हेल्थ कार्ड

एल.एल.पी. व मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या कंपनींचे समन्वयाने पुरवठाधारकांशी संपर्क करून आवश्यक साहित्याचे अंदाजीत दर प्राप्त करून घ्यावे", असे माहिती तंत्रज्ञान विभागाने कळविलेले आहे.

ब - दोन्ही रुग्णालयांमध्ये मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. व मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या कंपनींची देणगीदाखल मिळालेली HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम कार्यान्वित करणेकामी करण्यात आलेली कार्यवाहीचा तपशिल पुढीलप्रमाणे,

दि. 30/06/2018 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 453 नुसार मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. व मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या कंपनींची HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम (Maintenance व Support सहीत) 10 वर्षांकरीता देणगी स्वरुपात घेण्याचे ठरले आहे. संस्थानमार्फत दोन्हीही कंपनींस SSST/SSBH/EDP/2290/2018 दि. 11/08/2018 रोजीचे पत्राअन्वये दि. 01/09/2018 रोजी समक्ष LETTER OF AWARD देण्यात आलेले असून, दि. 11/10/2018 व दि. 23/07/2019 रोजीचे पत्राअन्वये दोन्हीही कंपन्यांचे LETTER OF ACCEPTANCE संस्थानला प्राप्त झालेले आहेत.

दि.20/09/2018 रोजी मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीचे प्रतिनीधींचे समवेत श्री साईनाथ रुग्णालयांतील सर्व विभागांचा सर्व्हे केलेला असून, सर्व विभागांची माहिती तसेच विभागामध्ये Manually चालणाऱ्या दैनंदिन कामकाजाबाबतची माहिती कंपनीचे प्रतिनीधींनी घेतली आहे.

तसेच मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीने दि. 03/01/2019 रोजीचे ई-मेलअन्वये कळविलेनुसार, सदरहू कंपनीमार्फत दि. 07/01/2019 ते दि. 23/01/2019 रोजी पर्यंत व मे सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या कंपनीमार्फत दि. 14/01/2019 ते दि. 15/01/2019 रोजीपर्यंत सॉफ्टवेअरचे Gap Analysis करण्यात आलेले आहे. त्यामध्ये संगणकीय प्रणालीमधील तृटी/आवश्यक बदल/ नव्याने काही असल्यास इ. माहिती कंपनीचे प्रतिनीधींना देण्यात येऊन, दि. 16/02/2019 रोजीचे ई-मेलअन्वये सॉफ्टवेअरमध्ये Customization करणेबाबतची कार्यवाही सुरु करणेबाबत दोन्हीही सॉफ्टवेअर कंपनीस कळविण्यात आलेले आहे. तसेच दि. 10/06/2019 रोजी मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनींचे प्रतिनीधींशी झालेल्या चर्चेनुसार, दि. 07/02/2019 रोजीचे परिपत्रकाअन्वये सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावे ई.डी.पी. विभागाकडे नोंदविण्यात आलेली आहे.

दि.05/11/2019 रोजी मे सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या कंपनीबरोबर सॉफ्टवेअर बाबतचा करारनामा झालेला असून मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीचे प्रतिनीधी यांना वेळोवेळी कळवून सुद्धा सदर दिवशी करारनामा करणेकामी उपस्थित राहीलेले नाहीत. तसेच त्यांनी अद्यापपावेतो संस्थानशी करारनामा केलेला नाही.

क – रुग्णालये संगणकीय प्रणाली विकसीत करणा-या दोन देगणीदार कंपनींपैकी मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी.या कंपनीमार्फत अपुर्ण राहीलेल्या कार्यवाहीचा तपशिल पुढीलप्रमाणे,

1. रुग्णालये संगणकीय प्रणाली विकसीत करणेकामी संस्थान कर्मचाऱ्यांना प्रणालीचे प्रशिक्षण देणेबाबत कळवून देखील मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीने प्रशिक्षण देणेबाबतचे वेळापत्रक (Schedule) संस्थानला पाठविलेले नाही.
2. मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीमार्फत रुग्णालयांत करण्यात आलेल्या संगणक प्रणालीचे Gap Analysis व Customization याबाबतचा अहवाल संस्थानला अद्यापपावेतो त्यांनी दिलेला नाही.
3. मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीने रुग्णालये संगणकीय प्रणाली विकसीत करण्याच्या करारनाम्यावर अद्यापपावेतो स्वाक्षरी केलेली नाही. त्यांना वेळोवेळी कळवून देखील ते प्रसिसाद देत नसल्याचे दिसून येत आहे.
4. सदर कंपनीच्या प्रतिनीधींना हार्डवेअर खरेदीबाबत त्यांनी पुर्वी दिलेल्या यादीमधील अंदाजीत रक्कम व प्रत्यक्षात ई-निविदेद्वारे प्राप्त झालेली किंमत यात मोठी तफावत का झाली, याबाबत त्यांना समक्ष दि. 21/08/2019 रोजी विचारणा करून त्यांना त्याचा लेखी खुलासा देणेस सांगीतले होते. परंतु तो त्यांनी दिलेला नाही.

उपरोक्त नमुद असलेली कार्यवाही पुर्ण करणेसाठी ई.डी.पी. विभागामार्फत मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीस वेळोवेळी दि. 22/05/2019, दि. 01/06/2019, दि. 05/08/2019, दि.07/08/2019 दि.03/10/2019, दि. 14/10/2019, दि.28/10/2019, दि.02/11/2019, दि.06/11/2019, दि. 19/11/2019,

दि.23/12/2019 रोजी ई-मेल केलेले असून, सदर कंपनीकडून संस्थानला याबाबत कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

ड-मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीबाबत अत्यंत महत्वाची माहिती ई.डी.पी. विभागास प्राप्त झाली असून सदर माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे,

मे.एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीस दि. 30/08/2019 रोजी भारत सरकारचे ED (ENFORCEMENT DIRECTORATE) मार्फत समन्स (SUMMONS) बजावण्यात आलेली आहे. तसेच दि. 11/04/2019 रोजी कंपनीस DIRECTORATE OF ENFORCEMENT, MUMBAI ZONAL OFFICE, MINISTRY OF FINANCE DEPT. OF REVENUE, GOVERNMENT OF INDIA मार्फत Investigation under the provisions Prevention of Money Laundering Act, 2002 against M/s Royal Twinkle Star Club, M/s Citrus Check Inns Ltd. & M/s Twinkle Enviro Tech Limited Company and its Directors देण्यात आलेल्या पत्राअन्वये, सदर कंपनीवर Prevention of Money Laundering Act, 2002 नुसार चौकीशी सुरु आहे.

दि.29/08/2019 रोजीचे पुणे येथील प्रेस नोट (Prees Note) मध्ये नमुद असलेप्रमाणे, कंपनीमधील 25+ कर्मचारी यांचे मासिक वेतन मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. कंपनीने अदा केलेले नसलेमुळे, सदर कर्मचाऱ्यांनी त्यांचे कंपनी विरोधात कोर्टात दावे दाखल केल्याचे समजते.

मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. कंपनीचे पुर्वीचे सुरवातीपासुन संस्थानमध्ये येणारे प्रतिनीधी ज्यांनी सध्या विविध कारणांमुळे कंपनी सोडलेली आहे. त्यांनी दुरध्वनीद्वारे मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. कंपनीबाबत इतरही काही महत्वाची माहिती संस्थानला दिली.

ई.डी.पी. विभागामार्फत मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. कंपनीमधील सध्या कार्यरत असलेल्या प्रतिनीधींशी वेळोवेळी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांचेकडून संस्थानला कोणताही प्रतिसाद मिळत नाही.

इ - संस्थानच्या दोन्ही रुग्णालयांसाठी HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम कार्यान्वित करणेबाबत, दि. 02/05/2018 व दि. 30/06/2018 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र. 13 वरील निर्णय क्र. 342 व निर्णय क्र. 453 प्रमाणे संस्थानला मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. व मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या दोन्ही कंपन्या देणगी म्हणुन पुढीलप्रमाणे संगणक प्रणालीतील मॉडयुल्स देणार आहेत –

A. - मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीकडून –

LIST OF DELIVERABLES FOR NCORD Health Card LLP

1. Implementation of eHealthSystem - Health Information Exchange Platform
2. HMIS & Integration with NCORD's eHealthsystem.
3. Installation, Setup, Customization and Demonstration at Shri Sainath & Saibaba Hospitals including MIS reports & dashboards
4. Integration with third party vendor's PACS.
5. Android & iOS eHealth App API integration with mobile app.
6. Upgradation of the HIMS based on the requirement of the Client made from time to time
7. Training to the Hospital Staff, during the initial period of six months and as and when required.
   a. Includes hands-on Training, classroom training, remote web based training, videos, etc.
8. Data Migration from existing system to new system
   a. Limited to Patient's demographic data (Name, Address, Mobile, DoB, Gender, etc.) as provided by hospital and if it is in the csv/excel format required for successful migration
9. Support & Maintenance
   a. Help Desk and Technical Support for the daily operation of the HIMS
   b. Support will be provided except hardware related issues

c. On all working days from 10 am to 6 pm IST except Sunday

d. On urgent basis, in case of emergency situation like completely unusable system, support will be provided remotely over phone, email, chat, issue tracker, etc. However, occasional limited support will be provided locally as and when required.

B. - मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या कंपनीकडून –

LIST OF DELIVERABLES FOR IMAGESMART PACS BY CellBeans Healthcare Informatics Pvt. Ltd.

1. Picture Archiving and Communication System (PACS) & Server License (1)
2. PACS Viewer Campus License (Web Viewer) (1)
3. PACS Diagnostics Viewing Software (6)
4. DICOM Store License (26)
5. DICOM MPPS License (25)
6. Radiology Information System (RIS) & Server License (1)
7. RIS Client Software License (20)
8. DICOM Print License (2)
9. DICOM Work List License (25)
10. HL7 Interface (1)

दोन्ही रुग्णालयांसाठी विकसीत करावयाच्या संगणकीय प्रणाली व तद्:संबंधीत कामासंबंधी उपरोक्त नमुद दोन्ही कंपन्यांकडून संस्थानला देणगी म्हणून त्यांचेकडे असलेली संगणक प्रणाली व त्यामध्ये संस्थानसाठी आवश्यक असलेले विशिष्ट बदल करून संगणक प्रणाली चालू करणेबाबत, संस्थानने दोन्हीही कंपनींस एकत्रपणे SSST/SSBH/EDP/2290/2018 दि. 11/08/2018 रोजीचे पत्राअन्वये दि. 01/09/2018 रोजी समक्ष LETTER OF AWARD देण्यात आलेले आहे.

रुग्णालयाच्या ई.डी.पी. विभागाचा अभिप्राय– संस्थानच्या दोन्ही रुग्णालयांकरीता HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम कार्यान्वित करणेबाबत तसेच नविन संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेबाबतची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे–

1) HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम –

मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. व मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या दोन्ही कंपनींस HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टिम (Maintenance व Support 10 वर्षांकरीता) देणगी स्वरुपात स्विकारले बाबत एकत्रीतरीत्या SSST/SSBH/EDP/2290/2018 दि.11/08/2018 रोजीचे पत्रान्वये दि.01/09/2018 रोजी समक्ष LETTER OF AWARD देण्यात आलेले आहे.

HMIS संगणकीय प्रणाली देणगी देत असलेल्या मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीशी वेळोवळी संगणकीय प्रणाली व करारनामा करणेबाबत अपुर्ण राहीलेली कार्यवाही पुर्ण करणेकामी वेळोवेळी ई-मेलद्वारे संपर्क केला असता, सदर कंपनी संस्थानला कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देत नाही. तसेच प्रास्ताविकेतील “ ड ” मधील नमुद असलेले सदर कंपनीची माहिती पाहता व कंपनीमधील बरेचशे संगणकीय प्रणाली विकसीत करणारे कर्मचारी काम सोडून गेलेले असलेमुळे, सदर कंपनी संस्थानच्या दोन्ही रुग्णालयांसाठी HMIS संगणकीय प्रणाली (Maintenance व Support 10 वर्ष) कार्यान्वित करणेबाबत शास्वती वाटत नाही.

तसेच मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. कंपनीबाबत मिळालेल्या माहितीनुसार संस्थानने त्यांच्या सेवा स्विकारणेही योग्य वाटत नाही. त्यांचेसोबत अद्यापपर्यंत करारनामा झालेला नाही. परंतु त्यांना देण्यात आलेल्या SSST/SSBH/EDP/2290/ 2018 दि.11/08/2018 चे LETTER OF AWARD रद्द करावे, असे नम्र मत आहे.

तसेच दि. 02/05/2018 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र. 13 वरील पारित झालेला निर्णय क्र. 342 चा ठराव व दि. 30/06/2018 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र. 13 वरील पारित झालेला निर्णय क्र. 453 चा ठराव रद्द करणे आवश्यक आहे.

तसेच, दि. 05/11/2019 रोजी मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. या कंपनीबरोबर PACS सिस्टमबाबतचा करारनामा झालेला असून मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. कंपनी PACS सिस्टीम कार्यान्वित करणेस तयार आहे किंवा कसे याबाबत त्यांना विचारणा करावी, असे मत आहे.

**2**) संगणके व संगणकीय साहित्य - दोन्ही रुग्णालयांकरीता संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी Part - A, B, C, D नुसार ई- निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली असून, सदरच्या 4 ई-निविदेमधील सर्व संगणकीय साहित्यांचे Specification हे HMIS संगणकीय प्रणाली देणगी देत असलेल्या मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. या कंपनीमार्फत प्राप्त झालेले असून, सदरचे साहित्य मुख्यत: त्यांचे HMIS संगणकीय प्रणालीस सुसंगत असल्यामुळे मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. कंपनीचे LETTER OF AWARD रद्द केल्यास ई-निविदेद्वारे प्राप्त होणारे संगणक व संगणकीय साहित्य आलेल्या ई-निविदेतील निम्नत्तम (L1) पुरवठाधारकाकडून खरेदी करणे योग्य होणार नाही.

तसेच सदरचे हार्डवेअर साहित्य खरेदी करणेसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदेतील अंदाजीत खर्चाची रक्कम व प्रत्यक्षात ई-निविदेतील निम्नत्तम (L1) ची आलेली रक्कम यामध्ये मोठी तफावत असल्याने शासनाच्या खरेदी नियमावलीमधील मुद्दा क्र. 4.4.3.1 मध्ये " ब " नियमाप्रमाणे सदरहूकामी फेरनिविदा प्रक्रीया राबवावी लागणार आहे.

त्यामुळे हार्डवेअर संबंधीत राबविण्यात आलेल्या Part–A,B,C,D च्या ई-निविदा प्रक्रीया रद्द करून त्यामध्ये सहभागी झालेल्या सर्व निविदा धारकांची निविदा रक्कम व बयाना रक्कम परत करावी लागेल.

मागणी -

1) संस्थानचे दोन्ही रुग्णालयांत देणगी दाखल मिळणाऱ्या HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम सुरु करणेबाबत, यापुर्वीचे दि. 02/05/2018 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र. 13 वरील पारित झालेला निर्णय क्र. 342 चा ठराव व दि. 30/06/2018 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र. 13 वरील पारित झालेला निर्णय क्र. 453 चा ठराव व त्यानुसार या कंपन्यांस देण्यात आलेले SSST/SSBH/EDP/2290/ 2018 दि. 11/08/2018 चे LETTER OF AWARD रद्द करणेच्या मान्यतेस्तव,
2) मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. व मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. यांनी दिलेल्या यादी व अंदाजीत खर्च याप्रमाणे काढण्यात आलेल्या ई-निविदेतील निम्नत्तम (L1) निविदाधारकांची रक्कम शासनाच्या खरेदी नियमावलीमधील मुद्दा क्र. 4.4.3.1 मध्ये "ब" नियमाप्रमाणे नसल्याने, संपुर्ण Part – A,B,C,D ची ई-निविदा प्रक्रीया रद्द करून आलेल्या सर्व निविदाधारकांचे निविदा रक्कम व बयाना रक्कम त्यांना परत करणेच्या मान्यतेस्तव,
3) रुग्णालयाच्या ई.डी.पी. विभागामार्फत दोन्ही रुग्णालयांसाठी HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम सुरु करणेबाबत नव्याने प्रस्ताव सादर करणेच्या मान्यतेस्तव,

सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय होणस्तव सादर.

**निर्णय क्र.१५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल या दोन्ही रुग्णालयासाठी देणगीदाखल घेण्यात आलेली संगणक प्रणाली रद्द करण्यात येऊन मे. एन.कॉर्ड हेल्थ कार्ड एल.एल.पी. व मे. सेलबिन्स हेल्थकेअर इन्फॉरमॅटीक प्रा.लि. यांना देण्यात आलेले दि.11/08/2018 रोजीचे LETTER OF AWARD तसेच संगणकीय हार्डवेअर करीता राबविण्यात आलेली संपुर्ण ई-निविदा प्रक्रिया रद्द करण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल या दोन्ही रुग्णालयांसाठी HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम सुरु करणेबाबत अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५४** **श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. विभागाकरीता C-Arm Machine with Accessories खरेदीकामी रु.४८,१६,२८२/-चे खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-दिनांक ०४.१२.२०१९ रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत निर्णय क्र.५६९ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागांकरीता आवश्यक असणारे Consumable Material, Equipment, Furniture, Radiation Protection Material, Instrument, Air Condition खरेदीकामी प्रत्येकी स्वतंत्र अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा, असे ठरलेले आहे.

प्रास्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागाकारीता लागणारे Consumable Material, Equipment, Machinery, Furniture, Radiation Protection Material, Instrument, Epoxy Flooring, etc. ची मागणी वेळोवेळी खरेदी विभागाकडे पाठविण्यात येत असते. परंतु दि.०२/०३/२०१९ रोजीच्या परीपत्रकान्वये सर्व वार्ड/विभागांना पुढील एक वर्षाकरीता लागणारे Consumable Material, Equipment, Machinery, Furniture, Radiation Protection Material, Instrument, etc. ची मागणी दि.१५/०३/२०१९ अखेर खरेदीविभागाकडे पाठविण्यात यावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू काही विभागाची मागणी प्राप्त न झालेमुळे वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षिका यांचे आदेशान्वये पुन्हा दि.२०/०५/२०१९ रोजीचे स्मरणपत्रान्वये दि.०५/०६/२०१९ अखेर मागणी पत्रक पाठविणे बाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T.या विभागाने मागणीपत्रकान्वये C-Arm Machine with Accessoriesची मागणी केलेली आहे.

C-Arm Machine with Accessories हे X-ray चे Advance Version असून त्यामुळे ऑपरेशन चालू असतांना रुग्णाच्या अवयवांची सुक्ष्म पहाणी करुन त्यानुसार ऑपरेशन व्यवस्थित करता येतील.सध्या श्री साईबाबा रुग्णालयातीलNeuro O.T.या विभागात वापरात असलेले C-Arm Machine सन २००९ मध्ये रु.१०,५०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करणेत आलेले होते, सदर केपनीने संबंधीत मशिनसाठी August २०१९ पर्यंत Service देणार असल्याचे कळविले आहे तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची संख्या वाढल्यामुळे Neuro O.T.विभागाने Advance Version चे C-Arm Machine with Accessories ची मागणी केलेली आहे. सदर C-Arm Machine with Accessories खरेदीकामी येणा-या अंदाजे खर्चाचा करीता बायोमेडीकल विभागाकडून मशिनची ५ वर्षे वॉरंटी व त्यानंतर पुढील ५ वर्षाकरीता LAMC च्या दराचे कोटेशन प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार दोन पुरवठाधारकांचे प्राप्त झालेले कोटेशनचे दरानुसार सरासरी अंदाजे किंमत काढण्यात येऊन सदर प्रस्ताव एकत्रितरित्या मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला होता. त्यानूसार दि.०४/१२/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे विषय नं. ९० निर्णय क्र.५६९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर खरेदीकामी प्रत्येकी स्वतंत्र अभ्यासपुर्वक प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा असे ठरले. त्यानूसार श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T.या विभागाने मागणी केलेले विविध प्रकारचे C-Arm Machine with Accessories खरेदीकामी स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No | Description | Qty | Wipro GE, Bangalore | Simence | Total Amt in Rs. | Avg Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | C-Arm Machine with Accessories | 1 | 5880000.00 | 3752563.00 | 9632563.00 | 4816281.50 | 4816281.50 |
| | | | | | | **Total Amt. in Rs.** | **4816281.50** |

त्यानुसार सदर C-Arm Machine with Accessories खरेदीकामी पूर्णांकित रु.४८,१६,२८२/- (अक्षरी रक्कम रु. अठ्ठेचाळीस लाख सोळा हजार दोनशे ब्याऐंशी मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी–श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाने C-Arm Machine with Accessories ची मागणी पत्रकान्वये मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. १ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रू.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात

याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवरखरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकारीता लागणारे Consumable Material, Equipment, Machinery, Furniture, Radiation Protection Material, Instrument, Epoxy Flooring, etc. खरेदीकामी एकत्रितरित्या प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला होता. त्यानूसार दि.०४/१२/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे विषय नं. ९० निर्णय क्र.५६९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर खरेदीकामी प्रत्येकी स्वतंत्र अभ्यासपुर्वक प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा असे ठरले. त्यानूसार श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T.या विभागाने मागणी पत्रकान्वये C-Arm Machine with Accessories ची मागणी केली आहे.

C-Arm Machine with Accessories हे X-ray चे Advance Version असून त्यामुळे ऑपरेशन चालू असतांना रुग्णाच्या अवयवांची सुक्ष्म पहाणी करुन त्यानुसार ऑपरेशन व्यवस्थित करता येतील. सध्या श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T.या विभागात वापरात असलेले C-Arm Machine सन २००९ मध्ये रु.१०,५०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करणेत आलेले होते, सदर केपनीने संबंधीत मशिनसाठी August २०१९ पर्यंत Service देणार असल्याचे कळविले आहे तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची संख्या वाढल्यामुळे Neuro O.T.विभागाने Advance Version चे C-Arm Machine with Accessories ची मागणी केलेली आहे. सदर C-Arm Machine with Accessories ची अंदाजे किंमत ३ लाखापेक्षा जास्त आहे त्यामुळे ते विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही असे मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T.या विभागाने मागणी केलेले C-Arm Machine with Accessories ची अंदाजे किंमत ३ लाखपेक्षा जास्त आहे त्यामुळे ते विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४८,१६,२८२/- (अक्षरी रक्कम रु.अठ्ठेचाळीस लाख सोळा हजार दोनशे ब्याऐंशी मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. विभागाकरीता C-Arm Machine with Accessories साईभक्तांकडून देणगी स्वरुपात घेणेबाबत पडताळणी करण्यात यावी. त्यानंतर सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५५** **श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S.-1 विभागांकरीता Modular Multiparameter (Cardiac) खरेदीकामी रु.१४,३४,९०२/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- दिनांक ०४.१२.२०१९ रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत निर्णय क्र.५६९ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागांकरीता आवश्यक असणारे Consumable Material, Equipment, Furniture, Radiation Protection Material, Instrument, Air Condition खरेदीकामी प्रत्येकी स्वतंत्र अभ्यासपुर्वक सविस्तरप्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा, असे ठरलेले आहे.

प्रास्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागाकारीता लागणारे Consumable Material, Equipment, Machinery, Furniture, Radiation Protection Material, Instrument, Epoxy Flooring, etc. ची मागणी वेळोवेळी खरेदी विभागाकडे पाठविण्यात येत असते. परंतु दि.०२/०३/२०१९ रोजीच्या परीपत्रकान्वये सर्व वार्ड / विभागांना पुढील एक वर्षाकरीता लागणारे Consumable Material, Equipment, Machinery, Furniture, Radiation Protection Material, Instrument, etc. ची मागणी दि.१५/०३/२०१९ अखेर खरेदीविभागाकडे पाठविण्यात यावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू काही विभागाची मागणी प्राप्त न झालेमुळे वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षिका यांचे आदेशान्वये पुन्हा दि.२०/०५/२०१९ रोजीचे स्मरणपत्रान्वये दि.०५/०६/२०१९ अखेर मागणी पत्रक पाठविणे बाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार श्रीसाईबाबारुग्णालयातीलC.V.T.S. O.T.–1 या विभागाने मागणीपत्रकान्वये विविध प्रकारच्या Modular Multiparameter Monitor (Cardiac)ची मागणी केलेली आहे.

सध्या श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S. O.T.–1 या विभागात वापरात असलेले Modular Multiparameter Monitor (Cardiac) हे सन २००६ पासून वापरत असून ते वारंवार दुरुस्ती करावा लागत असून त्यात असणारे Software देखील कालबाह्य झालेले आहे. त्यामुळे Monitorचा वापर हा फक्त Operation Theater मधून पेशंटला संबंधीत वार्डमध्ये घेऊन जाण्यासाठी होऊ शकतो. रुग्णांची वाढती संख्या बघता नविन अत्याधूनिक Modular Multiparameter Monitor (Cardiac)ची मागणी केलेली आहे. सदर Modular Multiparameter Monitor (Cardiac)मध्ये संबंधीत विभागाला आवश्यक तेवढे Module जोडुन Parameter वाढविता येतात. उदा - ECG,SPO2,NIBP,Temp.,Resp.,HR, IBP-2 Nos., ETCO2, etc त्यामुळे सदर Modular Multiparameter Monitor (Cardiac)खरेदी करणे आवश्यक आहे. सदर Modular Multiparameter Monitor (Cardiac)खरेदीकामी येणा-या अंदाजे खर्चाचा करीता बायोमेडीकल विभागाकडून 1 वर्षाचा वॉरंटी कालावधी व त्यानंतर पुढील ५ वर्षाकरीता LAMC चे दराचे कोटेशन प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार दोन पुरवठाधारकांचे प्राप्त झालेले कोटेशनचे दरानुसार सरासरी अंदाजे किंमत काढण्यात येऊन सदर प्रस्ताव एकत्रितरित्या मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला होता. त्यानूसार दि.०४/१२/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे विषय नं.९० निर्णय क्र.५६९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर खरेदीकामी प्रत्येकी स्वतंत्र अभ्यासपुर्वक प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा असे ठरले. त्यानूसार श्रीसाईबाबारुग्णालयातीलC.V.T.S. O.T.–1 या विभागाने मागणी केलेले Modular Multiparameter Monitor (Cardiac) खरेदीकामी स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No | Description | Qty | Micronics Instrument, Nashik | Wipro GE, Bangalore | Total Amt in Rs. | Avg Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Modular Multiparameter Monitor (Cardiac) | 1 | 1631875.00 | 1237929.00 | 2869804.00 | 1434902.00 | 1434902.00 |
| | | | | | | **Total Amt. in Rs.** | **1434902.00** |

त्यानुसार सदर Modular Multiparameter Monitor (Cardiac) खरेदीकामी पूर्णांकित रु.१४,३४,९०२/- (अक्षरी रक्कम रु. चौदा लाख चौतीस हजार नऊशे दोन मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी–श्रीसाईबाबारुग्णालयातील C.V.T.S. O.T.–1 या विभागाने Modular Multiparameter Monitor (Cardiac)ची मागणी पत्रकान्वये मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस –२०१४/ प्र.क्र.८२/ भाग–३/ उद्योग–४, दि.१ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३. २.– नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रू.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवरखरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईबाबाव श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकारीता लागणारे Consumable Material, Equipment, Machinery, Furniture, Radiation Protection Material, Instrument, Epoxy Flooring, etc. खरेदीकामी एकत्रितरित्या प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला होता. त्यानूसार दि.०४/१२/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे विषय नं. ९० निर्णय क्र.५६९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर खरेदीकामी प्रत्येकी स्वतंत्र

अभ्यासपुर्वक प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा असे ठरले. त्यानूसार श्रीसाईबाबारुग्णालयातीलC.V.T.S. O.T.–1 या विभागाने मागणी पत्रकान्वये Modular Multiparameter Monitor (Cardiac) ची मागणी केली आहे.

सध्या श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S. O.T.–1 या विभागात वापरात असलेले Modular Multiparameter Monitor (Cardiac) हे सन २००६ पासून वापरत असून ते वारंवार दुरुस्ती करावा लागत असून त्यात असणारे Software देखील कालबाह्य झालेले आहे. त्यामुळे Monitor चा वापर हा फक्त Operation Theater मधून पेशंटला संबंधीत वार्डमध्ये घेऊन जाण्यासाठी होऊ शकतो. रुग्णांची वाढती संख्या बघता नविन अत्याधूनिक Modular Multiparameter Monitor (Cardiac) ची मागणी केलेली आहे. सदर Modular Multiparameter Monitor (Cardiac)मध्ये संबंधीत विभागाला आवश्यक तेवढे Module जोडुन Parameter वाढविता येतात. उदा - ECG,$SPO_2$,NIBP,Temp.,Resp.,HR, IBP-2 Nos., $ETCO_2$, etc त्यामुळे सदर Modular Multiparameter Monitor (Cardiac) खरेदी करणे आवश्यक आहे. सदर Modular Multiparameter Monitor (Cardiac)ची अंदाजे किंमत ३ लाखापेक्षा जास्त आहे. त्यामुळे ते विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही असे मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S. O.T.–1 या विभागाने मागणी केलेले Modular Multiparameter Monitor (Cardiac)ची अंदाजे किंमत ३ लाखपेक्षा जास्त आहे त्यामुळे ते विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१४,३४,९०२/- (अक्षरी रक्कम रु. चौदा लाख चौतीस हजार नऊशे दोन मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S.-1 विभागांकरीता Modular Multiparameter (Cardiac) खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१४,३४,९०२/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५६** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्याचे दर निश्चित करणे (Rate Contract) तसेच On Consignment Basis वरील Material खरेदी करणेकामी येणाऱ्या अंदाजित एकुण रक्कम रु.६९,४७,९९,४२२/-चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०२०-२१ या वर्षाकरीता लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब व ब्लड बँक केमीकल्स, क्ष-किरण, सि.टी.स्कॅन, एम.आर.आय. फिल्म्स, डेंटल मटेरीयल, मलम, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब व कार्डीयाक ओ.टी. मटेरीयल, न्युरो ओ.टी. मटेरीयल, आय लेन्सेस इत्यादी खरेदीकामी दि.२६/०९/२०१९रोजीचे परिपत्रकान्वये दोन्ही रुग्णालयातील वॉर्ड / विभाग प्रमुख यांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी देण्यात आली होती. त्यास अनुसरुन काही वॉर्ड / विभागाची मागणी प्राप्त न झाल्याने दि.१०/१०/२०१९ अन्वये स्मरणपत्र क्र.०१ अन्वये मागणी मिळणेकामी तगादा करण्यात आला होता. त्यानुसार काही वॉर्ड / विभागांनी मागणी सादर केली होती.तसेच दि.१९/१०/२०१९रोजीचे पत्राअन्वये साईनाथ सबस्टोअर विभागास श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व वॉर्ड / विभागांची मागणी एकत्रित करुन वार्षिक मागणी देणेबाबत तगादा करण्यात आला होता. त्यानुसार साईनाथ सबस्टोअर विभागाने दि.२८/१०/२०१९ रोजी सर्व वॉर्ड / विभागांची मागणी एकत्रित करुन दिलेली आहे.

तसेच मा.वैद्यकिय संचालक यांचे आदेशान्वये दि.१३/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर, कॅथलॅब, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर नं. १ व २ या विभागांना त्यांनी सन २०२०-२१ या वर्षाकरीता दिलेल्या मागणीची यादी संबंधित डॉक्टरांना दाखविण्यात येऊन त्यामध्ये Technical Specification तथा त्याच्या Strength मध्ये काही बदल वाटल्यास तसेच केलेल्या मागणीमध्ये काही ठिकाणी नग संख्या कमी – जास्त करावयाची असल्यास तसेच काही नविन Molecule समाविष्ठ करावयाचे असल्यास त्यानुसार व्यवस्थित तपासून, खात्री करुन व त्याप्रमाणे दुरुस्ती करुन सदरहू यादी दि.२०/०१/२०२० पर्यंत रुग्णालये खरेदी विभागाकडे जमा करणेबाबत कळविण्यात आले होते, त्यानुसार कॅथलॅबविभागाने

दि.२२/०१/२०२० रोजी सदरहू यादी जमा केलेली आहेव आर्थोपेडीकऑपरेशन थिएटरविभागाने दि.२३/०१/२०२० रोजी यादी जमा केलेली असून त्यांनी त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केलेला नाही, तसेच कार्डीयाक ऑपरेशन थिएटर नं.१ व २ या विभागाकडून दि.२४/०१/२०२० रोजी मागणी जमा करण्यात आली असून त्यांनी सुचविल्याप्रमाणे बदल करण्यात आलेले असून कॅथलॅब विभागाने काही ठिकाणी कमी-जास्त प्रमाणात नगसंख्येमध्ये बदल केलेला असून काही ठिकाणी नविन मटेरीयलची मागणी केलेली असून त्यानुसार बदल करुन प्रस्ताव अंतिम करण्यात आलेला आहे.

तसेच विविध वॉर्ड व विभागाकडुन प्राप्त झालेल्या मागणीनुसार श्री साईबाबा रुग्णालयातील औषधे व सर्जिकल साहित्याचा विविध विभागाकडून आलेल्या मागणीचा विचार करता यासाठी अंदाजे खर्च काढल्यास तो रु.१,२१,०६,२५,०३४/- इतका येत आहे व याच मागणीचा मागिल खप व शिल्लक साठयानुसार खर्च काढल्यास तो रु.६९,४७,९९,४२२/- इतका असून याकामी झालेल्या किंमतीमूळे पुरवठाधारकाकडून घेण्यात येणारी सुरक्षा रक्कम ही देखील कमी होणार असून त्यामुळे जास्तीत जास्त पुरवठाधारक निविदा प्रक्रियेत भाग घेतील.

खरेदी विभागाने स्टोअर विभागातील वेगवेगळया प्रकारच्या हेड असणा-या फार्मासिस्टकडून वार्षिक मागणीकामी दैनंदिन खपाचा विचार करुन मागील दिड वर्षाच्या औषधे / सर्जिकल साहित्याच्या वापरावरुन वार्षिक मागणी ठरविण्यात आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी केलेल्या मागणीनुसार व ज्या औषधांची रुग्णालयात आवश्यकता आहे, अशा औषधांची मागणी केलेली आहे, तर काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव / शिल्लक असलेला साठा यांचा विचार करुन तसेच डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नवीन औषधे / सर्जिकल साहित्य इत्यादींचा यादीत समावेश करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे सर्व बाबींचा विचार करुन केलेल्या मागणीचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे-

| **अ. नं.** | **तपशिल** | **सन 2020-21 करीता मागणी प्रमाणे येणारा अंदाजे खर्च रु.** |
|---|---|---|
| १ | गोळया (Tablet) | 53063944.72 |
| २ | इंजेक्शन व आय.व्ही.फ्ल्युड्स (Injection & I.V.Fluids) | 92454275.90 |
| ३ | लिक्वीड ओरल्स (Syrup) | 5964523.87 |
| ४ | मलम (Ointment) | 4213907.95 |
| ५ | आय, इअर व नोझल ड्राप्स (Drops) | 3135046.90 |
| ६ | डेंटल मटेरीयल (Dental Material) | 2206294.86 |
| ७ | क्ष-किरण, सि.टी.स्कॅन, एमआरआय फिल्म्स व इतर साहित्य | 44526615.91 |
| ८ | लॅब केमीकल्स (श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, ब्लड बँक) | 73591650.14 |
| ९ | Miscellaneous (इतर किरकाळ साहित्य) | 9349954.94 |
| १० | ओ.टी. आणि इतर सर्जिकल मटेरीयल | 88645856.76 |
| ११ | डायलेसीस युनीट | 2729424.50 |
| १२ | न्युरो ऑपरेशन थिएटर विभाग सर्जिकल साहित्य | 3592821.29 |
| १३ | कॅथलॅब, कार्डीयाक ओ.टी. व परफ्युजनीस्ट मटेरीयल व सर्जिकल साहित्य | 134186936.57 |
| १४ | आयुर्वेदीक औषधे | 9571499.96 |
| १५ | होमिओपॅथी औषधे | 264642.30 |
| १६ | कॅटगट ॲन्ड सुचर्स मटेरीयल (श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व ओ.टी.) | 87302025.12 |
| १७ | On Consignment Basis Items (Stent / Valve / Balloon / Pacemaker / Devices / Ortho & Neuro Surgery Items etc.) | 80000000.00 |
| | **एकुण रक्कम रु.-** | **694799421.69** |
| | **पुर्णांकित एकूण रक्कम रु- .** | **६९,४७,९९,४२२/-** |

**सदरची मागणी तयार करताना पुढील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत-**

०१) दोन्ही रुग्णालयात वाढ झालेली रुग्णांची संख्या, शस्त्रक्रियांची संख्या इत्यादीचा तपशिल खालीलप्रमाणे-

श्री साईनाथ रुग्णालयातील अंतर्रुग्ण व बाहयरुग्णांची संख्या-

| अ. नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 -2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03.12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) | सन 2014 - 2015 (01.04.14 ते 31.03.15) | सन 2015 - 2016 (01.04.15 ते 31.03.16) | सन 2017-2018 (01.04.17 ते 31.03.18) | सन 2018-2019 (01.04.18 ते 31.03.19) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अंतर्रुग्ण संख्या | 9365 | 11573 | 11639 | 11900 | 15220 | 14075 | 12279 | 8628 | 15945 | 15623 |
| ०२ | बाहयरुग्ण संख्या | 240890 | 223844 | 261321 | 260414 | 303668 | 298226 | 297184 | 213134 | 341402 | 361971 |
| ०३ | शस्त्रक्रिया संख्या | - | - | - | - | - | 10183 | 8464 | 8528 | 11198 | 12339 |

श्री साईबाबा रुग्णालयात कॅथलॅब ऑपरेशन थिएटर,दोन्ही कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, जनरल ऑपरेशन थिएटर, न्युरो ऑपरेशन थिएटर, आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर तसेच सि.टी.स्कॅन, एमआरआय,२-डी इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन जवळजवळ १०-१२ वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्याशस्त्रक्रियांचा / तपासण्यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 -2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03.12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) | सन 2014 - 2015 (01.04.14 ते 31.03.15) | सन 2015 - 2016 (01.04.15 ते 31.03.16) | सन 2017 - 2018 (01.04.17 ते 31.03.18) | सन 2018-2019 (01.04.18 ते 31.03.19) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | कॅथलॅब प्रोसिजर | 4616 | 4922 | 5482 | 7332 | 9254 | 9805 | 5915 | 4577 | 5530 | 4500 |
| ०२ | हृदय शस्त्रक्रिया | 721 | 1023 | 1216 | 1491 | 1579 | 1700 | 1716 | 1665 | 1380 | 1416 |
| ०३ | ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया | 289 | 542 | 699 | श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतर | | | | | | |
| ०४ | आर्थोपेडीक शस्त्रक्रिया | 710 | 728 | 763 | 817 | 925 | 1030 | 936 | 548 | 1134 | 1071 |
| ०५ | जनरल शस्त्रक्रिया | 817 | 1535 | 1664 | 2249 | 2221 | 1984 | 1565 | 1036 | 1235 | 1425 |
| ०६ | न्युरो शस्त्रक्रिया | 253 | 489 | 571 | 611 | 586 | 337 | 383 | 565 | 680 | 822 |
| ०७ | युरोलॉजी शस्त्रक्रिया | 328 | 397 | 440 | 548 | 570 | 615 | 643 | 556 | 552 | 617 |
| ०८ | सि.टी.स्कॅन | 8091 | 8024 | 9995 | 9656 | 9546 | 8780 | 7827 | 7851 | 8887 | 8425 |
| ०९ | एम.आर. आय. | 7943 | 8777 | 10060 | 15596 | 13050 | 13317 | 13244 | 12084 | 16194 | 9669 |
| १० | 2 - डि इको | 6402 | 6785 | 8793 | 11960 | 14113 | 16591 | 15692 | 14971 | 16517 | 17213 |
| ११ | डायलेसीस | 1777 | 1850 | 1960 | 2078 | 2516 | 2337 | 2611 | 2162 | 2900 | 2764 |
| १२ | अंतर्रुग्ण संख्या | 11147 | 12689 | 13489 | 15533 | 17266 | 17226 | 12792 | 11033 | 13267 | 12409 |
| १३ | बाहयरुग्ण संख्या | 66543 | 73068 | 102478 | 130105 | 147147 | 153034 | 146526 | 127668 | 162927 | 172918 |
| | **एकुण संख्या** | **109890** | **120986** | **150213** | **189153** | **207940** | **226756** | **209850** | **184716** | **224293** | **227333** |

प्रस्तावना- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात खालील सर्व बाबींचा विचार करता रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाल्यामुळे औषधे / सर्जिकल साहित्यांचा सुध्दा खप वाढत आहे.

१) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानमध्ये सर्व इनसोर्स कंत्राटी पध्दतीने काम करणारे कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबित यांचेसाठी रुग्णसेवा पुर्णपणे मोफत करणेत आलेली आहे व त्याची अंमलबजावणी देखील चालू झालेली आहे. त्यामुळे रुग्णांसाठी लागणा-या औषधांमध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे.

२)	दि.१६/११/२०१३ पासून केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या, पंतप्रधान जनआरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य या दोन्ही योजना श्री साईबाबा रुग्णालयात सुरु असलेने या योजनेतंर्गत उपचार घेणा-या रुग्णांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. या रुग्णांवर उपचार करणेसाठी सर्व औषधे रुग्णालयातूनच पुरवावी लागत असल्याने त्यांची मागणी विचारात घेतलेली आहे.

३)	श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा, मायक्रोबायोलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी इत्यादी विभागासाठी लागणारे केमिकल्स यांचा गतवर्षाचा झालेला खप, महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रुग्णांच्या तपासण्या इत्यादी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात वाढणारी संभाव्य रुग्णांची संख्या यांचा विचार करुन मागणी सुचविलेली आहे.श्री साईनाथ रुग्णालय हे दि.०१/०१/२०१७ पासून समाजातील सर्व स्तरातील रुग्णांना मोफत केले असलेमुळे रुग्णांची संख्या वाढत आहे.

४)	दोन्ही रुग्णालयामध्ये होणारी विविध प्रकारची शिबिरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, महामार्गावरील अपघात इत्यादीमुळे वाढणारी गर्दी व महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत दाखल होणारे वाढत्या रुग्णांची संख्या (उदा. किडनी स्टोन शिबिरे, उत्सव, कार्डीयाक वर्कशॉप, आध्यात्मिक शिबिरे, पालखी सोहळा इत्यादी) या सर्व गोष्टींचा विचार करुन मागणी सुचविण्यात आलेली आहे.

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय मिळून १३ ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. सदरचे थिएटरमध्ये होणा-या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व त्यासाठी लागणारे सर्जिकल साहित्य इत्यादीचा विचार करण्यात आलेला आहे. श्री साईनाथ रुग्णालयात दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ अखेर १२३३९ तर श्री साईबाबा रुग्णालयात दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ या कालावधीत ९८५१ इतक्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. श्री साईनाथ रुग्णालयात येणा-या वर्षात दोन ऑपरेशन थिएटर, १२ बेडचे आयसीसीयु व विविध प्रकारचे नविन वॉर्ड सुरु करण्यात येणार आहेत. त्या अनुशंगाने रुग्णांच्या संख्येत वाढ होणार आहे.

विविध प्रकारचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर इत्यादी ह्दयविकारांच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारी महागडी साहित्य ही On Consignment Basis वर खरेदी करणेबाबत प्रस्तावित केलेले आहे. ते साहित्य रुग्णांना वापरल्यानंतर पुरवठा धारकांचे बील अदा करत असतो. त्यासाठी दरमहा गतवर्षाचा अनुभव विचारात घेऊन अंदाजे रक्कमेची तरतूद केलेली आहे.

मागील वर्षाच्या टेंडरमध्ये खरेदी नियमानुसार सर्व Product हे निम्नतम दराने (L1 Bidder) घेण्यात आलेले होते. सोबतच्या तक्त्यातील औषधांचे अंदाजे दर घेण्यासाठी पुरवठाधारकांकडून ई-मेलव्दारे अंदाजे दर मागविण्यात आले होते, त्यानुसार पुरवठाधारकांनी ज्या Product करीता दर कळविलेले होते, त्याठिकाणी त्यांचे सरासरीनुसार अंदाजे खर्चासाठी दर घेण्यात आलेले आहेत, तर ज्या Product करीता दर प्राप्त झालेले नाहीत त्या Product करीता ऑनलाईन सध्याचे बाजारभावाप्रमाणे दर घेऊन केवळ हिशोबासाठी अंदाजे दर धरणेत आलेले आहे, तर काही ठिकाणी गतवर्षातील मंजूर दराने संस्थानने जी औषधे खरेदी केलेले आहे त्या दरावरसाधारणता आवश्यकतेनुसार१० टक्के वाढ करुन अंदाजे दर धरणेत आलेले आहे.

सध्या औषधांचे बाबतीत Branded औषधे जरी खरेदी करावयाचे ठरले तरी त्यांच्या उत्पादीत कंपन्याचा विचार करता त्यांचे कमीत कमी ५० ते ६० Brand असलेल्या कंपन्याचे एकाच Content ची औषधे आज बाजारात उपलब्ध आहे, त्यांचे खरेदी किंमतीचा विचार करता त्यामध्ये बरीच तफावत आढळते. त्यामुळे औषधे खरेदीकामी जर एखादे कंपनीचे दर धरुन खरेदी केल्यास आपणास निविदेव्दारे मिळणारे दर व आपले निविदासाठी घेतलेले अंदाजे दर यातील तफावत पाहता खरेदी प्रक्रियेस अडथळा येईल त्यामुळे औषधे खरेदी करता येणार नाही. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होऊन हॉस्पिटलला लागणारे औषधे उपलब्ध होणार नाही.

यासाठी प्राप्त दर व आपण घेतलेल्या अंदाजे दरामध्ये तफावत येणार हे विचारात धरुनच खरेदी करावे लागणार आहेत. सध्या एकच Content असलेल्या औषधांच्या वेगवेगळया कंपन्यांचे दर उदाहरणार्थ सादर केलेले असून ते खालीलप्रमाणे –

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Tab. Deplat CV 10 mg –**<br>USV – 84.76 Mankind – 71.25<br>Sun – 48.00 Intas – 62.00 | 7 | **Tab. Atorvastatin 80mg**<br>Morepen-2.38 Biochem-3.92<br>Emcare-32.64 Zydus-42.60 |
| 2 | **Tab. Telma 20 mg –**<br>USV – 6.93 Aristo – 4.99<br>Ezis – 6.93 Mankind – 3.26<br>Lupin – 6.68 | 8 | **Inj. Amiodarone 3ml**<br>Samarth-25.08 Cipla-44.80<br>Neon – 51.74 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | **Inj. Supacef –**<br>Macledoes – 226.00 Lupin – 226.00<br>GSK – 260.00 Fountil – 260.00<br>Glenmark – 349.00 | 9 | **Liq. Sodium Hypo Chloride 4.6% W/v 5 lit**<br>SVAS-156.80 Other-218.30<br>Geniune-590.00 |
| 4 | **NIV Mask –**<br>BMC – 1850.00 Philips – 4000.00<br>Medical Bulkbag – 2899.00<br>BMC – 4700.00<br>Haffrichfer – 6500.00 | 10 | **Knee cap-**<br>Samson-65.20<br>Ascent – 70.62<br>Dynamic-110.45<br>Vissco-152.25 |
| 5 | **I.V.Set –**<br>Oyster – 8.70 Poly Medicure – 8.70<br>Romson – 8.97 B.Braun – 15.50 | 11 | **Posterior chamber foldable lenses**<br>Contacare-952.00 Omni lens-1234.00<br>Aurolab-1344.00 |
| 6 | **Tab. Telpress TM 25**<br>Knoll-3.30 Sun -10.22 Abbott-12.50 | | |

त्यामुळे औषधे खरेदी करताना गृहीत धरलेला अंदाजे खर्च व प्रत्यक्षात आलेला निम्नत्तम धारकांचा दर यांचा विचार करुन योग्य निर्णय घेण्यात यावा.

५) सन २०१३-१४ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये सदरचे खरेदीकामी प्राप्त होणा-या निविदांवर अंतीम निर्णय घेणेकरीता सरकारी सहा.वकील श्री. पी. पी. मोरे, जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक यांची समिती गठीत करुन सदर समितीने औषधे खरेदीची प्रक्रिया पूर्ण करावी असे आदेश पारीत केले होते, त्यानुसार सन २०१३-१४ या वर्षाकरीता लागणारी औषधे खरेदी करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०१५-१६ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.१३/०३/२०१५ रोजीचे आदेशान्वये निविदाधारकांकडून निविदा मागवितांना प्रत्येक आयटमची MRP मागवून त्यानंतर खरेदीची कार्यवाही करणेस मान्यता मिळालेली आहे.

तथापि सन २०१७-१८ मध्ये औषधे खरेदीकामी कोणतीही कमिटी स्थापन करण्यात आलेली नव्हती. सन २०१७-१८ चे निविदामध्ये खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार निम्नत्तम दराने खरेदी करणेत आलेली होती, त्यामध्ये हलक्या प्रतीच्या कंपन्यांना भाग घेता येऊ नये म्हणून ठराविक Turnover व Standard Certificates ची मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार ज्या कंपन्याचा Turnover आपल्या मागणीप्रमाणे नाही व ज्या कंपन्यांकडे आपल्या मागणीप्रमाणे Certificates नाहीत, अशा कंपन्यांना अपात्र करुनच निम्नत्तम दराने खरेदी करणेत आलेली होती, परंतु त्यामध्ये वापरणा-या डॉक्टर यांना पाहिजे असलेल्या कंपन्यांचे औषधे न मिळाल्यामुळे खरेदी विभागाला ब-याच डॉक्टरांचा रोष सहन करावा लागला आहे. त्यामुळे सन २०२०-२१ च्या खरेदीकामी आवश्यक असलेल्या औषधे व सर्जिकल साहित्य व इतर साहित्य यांच्या तांत्रिक बाबी तपासण्यासाठी डॉक्टर व अधिका-यांची कमिटी बनविण्यात यावी.

खरेदी कमिटीबाबत:- वार्षिक औषधे खरेदी प्रक्रिया राबवितांना मागील अनुभव पाहता वारंवार औषधे/ साहित्याचा वापर करणा-या डॉक्टर/तंत्रज्ञ यांच्या तक्रारीचा विचार करता तसेच ज्या मटेरीयलबाबत त्रुटी आहेत ते मटेरीयल वर्षभर न वापरल्यामुळे दैनंदिन रुग्णांची गैरसोय टाळणेकामी वैद्यकिय संचालक यांचे अधिकारात संबंधित वापरणारे डॉक्टर / तंत्रज्ञ यांचे प्रत्येक विभाग / वॉर्डचे प्रतिनिधींचा समावेश करुन औषधे / सर्जिकल साहित्य तथा इतर मटेरीयलकामी येणा-या तांत्रिक अडचणीसाठी समिती स्थापन केल्यास सुचर्स मटेरीयल, सर्जिकल साहित्य व लॅब मटेरीयल तसेच On Consignment Basis Material खरेदीकामी येणा-या तांत्रिक अडचणींचे निवारण करुन कमर्शियल बाबींत पारदर्शकता येईल व रुग्णांना वैद्यकिय सेवा देणेसाठी मटेरीयलची कमतरता दूर करुन संस्थानचा फायदा होईल. तसेच सदर मटेरीयलची निवड करतांना संबंधित वापर करणा-या डॉक्टर / तंत्रज्ञांची शिफारस घेतल्यास शासकीय नियमावलीचा आधार घेऊन खरेदी प्रक्रिया राबवावी असे मत आहे.

औषधे वेळोवेळी नियमित उपलब्ध होणेचे दृष्टीने खालीलप्रमाणे खरेदीची कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी असे नम्र मत आहे-

१) रुग्णालयात उपलब्ध असलेलीच औषधे वापरणेबाबतः- सन २०२०–२०२१ च्या वार्षिक खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या वार्षिक मागणीमध्ये ब-याशा डॉक्टरांनी Branded Company तसेच Specific Company च्या औषधांची तोंडी मागणी केली जाते. त्यामुळे Branded (Ethical) औषधेच खरेदी करणेत यावीत.परंतु सदर मागणीपत्र देतांना त्यामध्ये कमीत-कमी ३-५ चांगल्या कंपनीची / आपणास हवी असलेल्या कंपनीची नावे देण्याबाबत परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले होते, परंतु कोणत्याही वापरकर्त्या डॉक्टरांनी ३-५ कंपनीची नावे दिलेली नसल्यामुळे आपणामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणारी औषधे सर्व वापरकर्त्या डॉक्टरांना वापरणे बंधनकारक असणार आहे. तसेच पुरवठा आदेश गेलेल्या Content ची औषधे संबंधित डॉक्टरांना वापरण्याची समज देण्यात यावी.

२) शिबीरासाठी लागणारे औषधे/सर्जिकल साहित्याबाबत– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था मार्फत गरीब व गरजू रुग्णांना यथायोग्य वैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी रुग्णालयांमध्ये विविध आरोग्य तपासणी व शस्त्रक्रिया शिबीरांचे आयोजन केले जाते,उदा. रक्तदान, Ophthtalmic, Plastic Surgery, Urology, जयपुर फुट इत्यादी. तसेच इतर साथीचे आजाराबाबतचे शिबीर नियमितपणे आयोजित केले जाते. त्यासाठी संस्थानमध्ये डॉक्टर व शिबीरासाठी बाहेरुन बोलविण्यात येणारे डॉक्टर यांच्या विशिष्ट प्रकारच्या औषधांच्या मागणीनुसार ते संस्थानमध्ये उपलब्ध नसतील तर त्या शिबीरासाठी स्वतंत्रपणे उपलब्ध करुन दयावी लागतात. अशी औषधे तातडीच्या गरजेनुसार खरेदी करता येईल.

**३)** संसर्गजन्य रोगांचे प्रादुर्भाव वाढल्याने पुरविण्यात येणा-या औषधांबाबत– डेंग्यु,मलेरीया, गोचीड ताप, चिकनगुण्या, स्वाईन फ्ल्यु तसेच रक्तपेशी वाढणे अथवा कमी होणे या प्रकारच्या संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे रुग्णांची वाढती संख्या त्यांच्यावर करण्यात येणा-या Lab Test तसेच त्यांचे उपचारासाठी लागणारे विविध केमीकल्स व औषधे यांची मागणी वार्षिक मागणीच्या दुप्पट / तिप्पट होते तेंव्हा याकामी सुध्दा अतिरिक्त खरेदीसाठी कामी नवीन खरेदी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मंजूर बजेटच्या रक्कमेतून मंजुर दराने ती खरेदी करणे आवश्यक आहे.

**४)** संस्थान कर्मचा-यांना तसेच त्यांचे अवलंबितांना पुरविण्यात येणा-या औषधांबाबत– संस्थानचे कायम / कंत्राटी कर्मचारी व त्यांचे अवलंबितास आपले स्टोअर विभागामार्फत लागणारे औषधे पुरविले जातात. परंतु, जे औषधे आपणाकडे शिल्लक नसतात ती औषधे बाहेरुन विकत घेऊन वैद्यकीय बील परताव्याव्दारे त्यांना ती रक्कम परत भेटते. त्यामध्ये बाहेरुन घेतलेल्या औषधांसाठी MRPदर आकारले जातात. त्यामुळे जास्तीची रक्कम द्यावी लागते. त्याकरिता वार्षिक खरेदीमध्ये संस्थानचे कर्मचा-यांना लागणा-या सर्व औषधांची मागणी करण्यात येऊन कर्मचा-यांना शक्यतो आपणाकडे असलेले औषधे डॉक्टरांनी लिहून द्यावीत म्हणजे संस्थान कर्मचा-यांना औषधांची उपलब्धता होऊन वैद्यकीय बील परतावा देणेकामी संस्थानला जास्तीचा भार पडणार नाही व त्याबाबत सर्व डॉक्टरांना समज देण्यात यावी.

५) उपलब्ध औषधांचा नियमितपणे वापर होणेबाबतः- औषधे खरेदीकामी रुग्णालयातील कार्यरत डॉक्टर/ तंत्रज्ञ यांच्या शिफारसीनुसार न्वये मागणी करण्यात येते, परंतु ब-याच वेळी असा अनुभव येतो की, सदर शिफारसी केलेले डॉक्टर / तंत्रज्ञ सोडून गेल्यास सदर औषधांचा वापर बंद केला जातो तसेच काही औषधांबाबत मागणी वर्षाचा खप पाहून मागणी केले जाते प्रत्यक्षात चालू वर्षात त्या औषधांचा खप इतका कमी होतो की, ते मटेरियल कधी – कधी मुदतबाह्य सुध्दा होते अथवा पुरवठाधारक परत घेत नाही त्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपणाकडे बरेच पुरवठाधारक संस्थान खातर सेवाभावी म्हणून दर भरतात परंतु, त्यांचे मटेरियल न वापरताच त्यांना परत केल्यामुळे त्यांचे नुकसान होते त्यामुळे बरेचसे पुरवठाधारक आपणाकडे निविदा भरण्यास तयार होत नाही. काही डॉक्टर / तंत्रज्ञ हे Specific कंपनीच्या औषधांची मागणी करतात त्यामुळे सुध्दा आपणाकडील उपलब्ध असलेल्या औषध साठयाचा वापर न झाल्याने ते पुरवठाधारकास परत करावे लागते अथवा पुरवठाधारकांने परत न घेतल्यास ते मुदतबाह्य होऊन संस्थानचे आर्थिक नुकसान होते तेंव्हा सदर कामी संस्थानचे डॉक्टर / तंत्रज्ञ यांना प्रथमतः औषध भांडारमधील असलेल्या साठ्यांचा वापर करणेबाबत संस्थान स्टोअर विभागाने वैद्यकिय संचालक / वैद्यकिय अधिक्षिका यांचे स्वाक्षरीने वेळोवेळी परिपत्रक काढून संस्थानच्या डॉक्टरांना अवगत करणे आवश्यक आहे जेणेकरुन संस्थानमध्ये उपलब्ध असलेल्या औषधांचा वापर होऊन मुदत बाहयता न होता संस्थानचे अर्थिक नुकसान टाळता येईल.

६) तांत्रिक बाबींची पुर्तता करुन घेणेबाबतः- औषधे खरेदी प्रक्रिया कालावधी व ऑनलाईन दर तथा इतर माहिती भरताना येणा-या अडचणी पाहता आणि विविध प्रकारचे एकुणच २००० ते २५०० औषधे / सर्जिकल साहित्याचे दर, Packing, Company, Strength, Brand Name, MRP, GST टक्केवारी व वेगवेगळया साईजेसचा विचार करता ऑनलाईन ई-निविदा / कोटेशन्स भरताना काही तांत्रिक गोष्टीच्या चुका (म्हणजेच Spelling Mistake) पुरवठा आदेश दिल्यानंतर समोर येतात, त्यामुळे ते मटेरीयल न स्विकारता बाजुला ठेवण्यात येऊन रुग्णांची गैरसोय होते, त्यासाठी वैद्यकिय संचालक यांना सदर बाब दाखवून त्याकामी संबंधित पुरवठाधारकाकडून लेखी खुलासा मागवून त्यांचे अधिकारात तांत्रिक बाबी दुरुस्ती केल्यास त्या मटेरीयल अभावी होणारी रुग्णांची गैरसोय टाळता येऊन मटेरीयल उपलब्ध होईल.

७) पुरवठाधारकांकडून वेळेत पुरवठा न झाल्यास इतर पुरवठाधारकांकडून खरेदी केलेल्या मटेरीयलच्या रक्कमेतील फरक वसुल करणेबाबतः- पुरवठाधारकांनी कोणत्याही कारणास्तव मटेरियल वेळेत पुरवठा न केल्यामुळे सदर मटेरियल हे संस्थान नियमाप्रमाणे इतर पुरवठाधारकांकडून जास्तीची रक्कम अदा करुन खरेदी करावे लागते तेंव्हा जास्तीची रक्कम मुळ पुरवठाधारकाच्या सुरक्षा रक्कमेतून किंवा चालू पुरवठा बिलांमधून वसूल करण्यात येईल.

८) एखादे कंपनीस पुरवठा आदेश दिला व त्या कंपनीने पुरवठाकरणेकामी एखाद्या नजीकच्या विक्रेतामार्फत पुरवठा करणेकामी मान्यता घेतली असता कधी कधी सदर कंपनीधारक काही तांत्रिक कारणामुळे दुस-या विक्रेत्यांकडून पुरवठा करतो. त्यासाठी लागणारी मंजुरी ही वैद्यकीय संचालक यांचे मान्यतेने देण्यात यावी कारण याव्दारे संस्थानचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नसून त्याव्दारे मटेरिअल मागविण्यास अडचण येणार नाही. परंतु दुस-या पुरवठाधारकाने पुरविलेले मटेरीयल हे नमुद केलेल्या पुरवठा आदेशातील Specification प्रमाणे योग्य असल्याची खात्री करुन मेडीकल स्टोअर विभागाने स्विकारावे.

९) काही वेळेस मटेरिअल हे पुरवठा आदेशाच्या मागणी पेक्षा जास्त प्राप्त होते अथवा मटेरिअल हे पुरवठा आदेश नसतानाही कंपनीकडून पाठविले जाते. त्याबाबत पुरवठा धारकांना वारंवार फोन, ई-मेल तथा पत्र करुन सुध्दा पुरवठा धारक परत घेऊन जात नाही कधी-कधी ते मटेरिअल आपणाकडे पडून मुदतबाह्य सुध्दा होते. यामध्ये संस्थानच्या स्टोअर विभागाची कोणतीही चूक नसताना सदर बाबत लेखापरिक्षण मध्ये मुद्दा उठविला जातो. तेव्हा सदर कामी प्राप्त मटेरिअल हे जर पुरवठाधारकांनी परत नेले नाही तर ते मुदतबाह्य झाल्यास ते विहीत पध्दतीने नष्ट करण्यास वैद्यकीय संचालक यांनी त्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

१०) औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीसाठी मोठया प्रमाणात प्रसिध्दी मिळणेसाठी महाराष्ट्र राज्यातील जास्त खपाच्या मराठी, इंग्रजी व हिंदी वर्तमान पत्रात तसेच बाहेरील राज्यातील जास्तीच्या खपातील इंग्रजीव हिंदी वर्तमान पत्रात ई-निविदेची जाहिरात देण्यात येऊन महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे सर्व प्रक्रिया राबविण्यात येईल.

११) बरेचसे लॅब मटेरीयल तथा ओ.टी.मधील सर्जिकल साहित्य हे आपण पुर्वी खरेदी केलेल्या कंपन्याच्या मशिनसाठी लागतात व ते पण त्याच कंपनीचे खरेदी करावे लागते म्हणजेच त्यासाठी Monopoly आयटम म्हटले जाते, त्यासाठी फक्त एकच निविदा प्राप्त होते त्यामुळे त्या प्राप्त एकाच निविदेचा विचार होऊन त्याची बाजारभावाशी तुलना करुनच सदर पुरवठाधारकास संस्थानसाठी खास सुट देण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून त्यांचेशी चर्चा / वाटाघाटी करुन अंतिम दर ठरविण्यात येतील.

१२) सन २०२०-२१ मध्ये राबविण्यात येणारी औषधे / सर्जिकल साहित्याची खरेदी प्रक्रिया ही नमुद केलेल्या अर्थिक वर्षामध्ये पुर्ण झालेनंतर आवश्यकतेप्रमाणे व रुग्णांची तातडीची गरज विचारात घेऊन त्या मटेरीयलची पुढील खरेदी प्रक्रिया होईपावेतो सदर मटेरीयल मंजुर दराने खरेदी करणे आवश्यक आहे.

१३) औषधे खरेदीतील अनुभवानुसार असे निदर्शनास आले आहे की, औषधे खरेदीच्या निविदेला आपल्याला खुप चांगला प्रतिसाद मिळतो, म्हणजेच मागील सन २०१७-१८ च्या वार्षिक खरेदी वेळेस प्रथम ई-निविदेला १६० पेक्षा जास्त कंपन्यांनी सहभाग घेतला होता. परंतु टेक्निकल मध्ये ब-याच निविदाधारकांचे १ ते २ कागदपत्र कमी असल्यामुळे जवळपास ४० निविदा बाद ठरविण्यात आल्या होत्या. त्यामुळे ब-याच आयटमसाठी ३ पेक्षा कमी निविदा मिळाल्यामुळे फेर ई-निविदा मागवाव्या लागल्या. सदरबाबत कागदपत्रांची पुर्तता करुन घेणेकामी नविन खरेदी नियमावलीमध्ये तरतुद नाही, परंतु त्यामुळे वारंवार फेर निविदा मागवाव्या लागतात. वेळेचा अपव्यय व औषधांचा तुटवडा टाळणेकामी आपण DMER व Haffkine यांचे कार्यपध्दतीनुसार कार्यवाही केल्यास पहिल्याच ई-निविदेमध्ये जास्तीत जास्त आयटमकरीता पुरवठा आदेश देता येतील. याबाबत DMER व Haffkineमध्ये करण्यात येणारी प्रक्रिया खालीलप्रमाणे –

DMER व Haffkine, Mumbai यांचे कार्यपध्दतीनुसार खरेदीकामी निविदाधारकांनी ऑनलाईन निविदा भरल्यानंतर तांत्रिक ऑनलाईन काही दस्तऐवज (Document) दयावयाचे राहील्यास व तसेच तांत्रिक निविदा तपासताना ते लक्षात आल्यास संबंधित निविदाधारकांना दुरध्वनीव्दारे किंवा ई-मेल व्दारे कळविण्यात येते की, तुम्ही अपलोड केलेल्या ऑनलाईन निविदेमध्ये काही दस्त (Document) दिलेले नाही ते आम्हाला सरकारी सुट्टी (Government Holiday) वगळता पुढील सात दिवसात देण्याचे करावे असे कळविले जाते व सात दिवसात जे पुरवठाधारक उर्वरीत दस्त (Document) देतील त्यांचीच फक्त Commercial Bid उघडण्यात येईल व जे पुरवठाधारक दस्त (Document) देणार नाहीत त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात येईल, असे कळविले जाते. संस्थानने DMER व Haffkineची कार्यपधद्ती राबविल्यास ब-याच प्रमाणात निविदाधारक पात्र होऊन जास्तीची स्पर्धा होऊन संस्थानला चांगले दर प्राप्त होतील त्यामुळे त्यांच्या कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा उघडून वार्षिक औषधे / सर्जिकल साहित्याची खरेदी होईल, जेणेकरुन औषधांअभावी रुग्णांची होणारी गैरसोय टाळता येईल. DMER व Haffkine, Mumbai चे कार्यपध्दतीने अपुर्ण कागदपत्रे मागवून निविदाधारकाची पुर्तता करुन घेतल्यास आपणास जास्तीत जास्त निविदा प्राप्त होऊन शासन नियमाप्रमाणे आपणास लागणा-या कमीत कमी तीन निविदा धारकांचे दर मिळतील व त्यामुळे मटेरीयल खरेदीस मदत होईल.

१४) सध्याच्या शासकीय नियमावलीनुसार निविदा फॉर्मची किंमत व अनामत रक्कम आणि निविदा भरताना प्रथमतः उत्पादीत कंपनीस प्राधान्य देण्यात येऊन Authorised अधिकृत विक्रेत्यास त्यानंतर प्राधान्य देण्यात येऊन तांत्रिक बाबींचा विचार करुन निविदाधारकास उत्पादीत कंपनीची मागील तीन वर्षाची वार्षिक उलाढालीची C.A.Certified विशिष्ट रक्कमेपर्यंत मागणी करण्यात येऊन त्या उत्पादीत कंपनीचे WHO-GMP/ CE/ USFDA Certification मागविण्यात येते व त्यासोबत Authorisation, Licence, PAN, RTGS Details इतर कागदपत्रे मागविल्याने या सर्व गोष्टींचा विचार करता आपणास फारच कमी प्रमाणात प्रतिसाद प्राप्त झाल्याचे व ३००० औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीकामी नियमावलीनुसार प्रती मटेरीयलकामी तीन निविदाधारकांचे दर प्राप्त न झाल्याने ते वारंवार फेर निविदा प्रकियेत येतात, त्यामुळे रुग्णालयांची व पेशंटची गैरसोय होऊन खरेदी विभागाला प्रचंड रोष सहन करावा लागतो व मटेरीयल नसल्यामुळे संस्थानची नाहक बदनामी होते या सर्व बाबींचा विचार करता एकुण अंदाजे ३००० नग इतक्या औषधे/सर्जिकल साहित्याची खरेदी पाहता खालीलप्रमाणे औषधे खरेदी केल्यास जास्तीत जास्त मटेरीयलसाठी निविदा/कोटेशन्स प्राप्त होऊन त्याव्दारे अंदाजे ३००० नगपैकी जास्तीत जास्त मटेरीयलची खरेदी सुरळीत करता येईल.

i) प्रत्येकी रु.५०००/- इतक्या रक्कमेचे औषधे/सर्जिकल साहित्य हे जागेवर (Spot Purchase) खरेदी करता येईल.

ii) रु.३,००,०००/-च्या पुढील प्रत्येक औषधे/सर्जिकल साहित्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून त्यासाठी लागणा-या तांत्रिक बाबींमध्ये औषधांसाठी WHO-GMP घेण्यात येऊन व सर्जिकल साहित्यासाठी व On Consignment Basis Material साठी CE/ USFDA(संबंधित विभागाच्या मागणीनुसार) घेणे बंधकारक राहील व उर्वरीत मटेरीयलसाठी आवश्यक असलेले Certification सह निविदा कोटेशन मागवाव्या तसेच Imported Material करीता भारतातील Authorised Distributors चे Valid Licence, PAN व RTGS Details मागवून खरेदी करता येईल. तसेच Tablet, Injection व Suture इत्यादीच्या उत्पादीत / मार्केटींग कंपन्यांचा विचार करता सर्वच Tablet, Injection व Suture साठी ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करता येईल व आपणास जास्तीत जास्त निविदा प्राप्त होऊन स्पर्धात्मक दर मिळतील.

१५)

| Sr. No. | Name of Item Head | Total Items | Tender Items | Quotation Items |
|---|---|---|---|---|
| 1 | Syrup | 54 | 0 | 54 |
| 2 | Ointment | 50 | 0 | 50 |
| 3 | Drop | 60 | 0 | 60 |
| 4 | Dental | 133 | 0 | 133 |
| 5 | Ayurvedic | 207 | 0 | 207 |
| 6 | Homeopathy | 95 | 0 | 95 |
| 7 | X-ray | 12 | 8 | 4 |
| 8 | Laboratory Material | 373 | 58 | 315 |

| Sr. No. | Name of Item Head | Total Items | Tender Items | Quotation Items |
|---|---|---|---|---|
| 9 | Miscellaneous | 86 | 12 | 74 |
| 10 | OT & Other Surgical Material | 563 | 69 | 494 |
| 11 | Dialysis | 9 | 4 | 5 |
| 12 | Neuro OT Material | 28 | 3 | 25 |
| 13 | Cardiac & Cathlab Material | 365 | 89 | 276 |
| 14 | Tablet | 283 | 283 | 0 |
| 15 | Injection | 236 | 236 | 0 |
| 16 | Suture Material | 139 | 139 | 0 |
| 17 | On Consignment Material | 288 | 288 | 0 |
| | **TotalNo.of Items-** | **2981** | **1189** | **1792** |

उपरोक्त मागणी पाहता अ.नं.१ ते १६ मधील २२७९ आयटम हे प्रती नग रु.३ लाखाच्या आत असल्याने सदर आयटमकरीता कोटेशन्स मागणी करु शकतो, परंतु Tablet, Injection व Suture च्या उत्पादीत कंपन्याव्दारे ई-निविदा प्रक्रियेत सर्वच आयटमसाठी एकत्रित दर मिळत असल्याने Tablet, Injection व Suture मधील ४८७ कोटेशन्स आयटमसाठी ई-निविदा काढण्यात येऊन उर्वरीत फक्त १७९२ आयटमकरीता कोटेशन मागणी केलेली आहे. सदर मागणी ही शासन खरेदी नियमावलीनुसार रु.३,००,०००/- पर्यंतचे खरेदीस असणा-या तरतुदीनुसार कोटेशन्स मागवून खरेदी करता येतील. तसेच मागील वर्षीच्या अनुभवावरुन सदरचे औषधे / सर्जिकल साहित्य आपण ई-निविदा व्दारे मागविण्यात आले होते, परंतु त्यातील काही मटेरीयलकरीता ३-४ वेळा ई-निविदा प्रक्रिया राबवून सुध्दा सदरचे औषधे / सर्जिकल साहित्यासाठी दर प्राप्त झाले नव्हते आणि सदर औषधे / सर्जिकल साहित्याची खरेदी नझाल्यामुळे त्याकाळात पेशंटची फारच गैरसोय होऊन डॉक्टरांचा तसेच स्थानिक वृत्तपत्रांचा रोष सहन करावा लागला होता. त्यानंतर आपण मागील वर्षी सदरचे औषधे / सर्जिकल साहित्य विहीत पध्दतीने खरेदी नियमावलीनुसार कोटेशन्स मागवून खरेदी करुन दिलेले आहेत. तसेच सदर औषधे / सर्जिकल साहित्यांची वार्षिक खरेदी किंमत पाहता निविदाधारकांस सुध्दा निविदा फी व अनामत रक्कम भरणे शक्य होत नसल्याने ई-निविदा प्रक्रियेस आवश्यक प्रतिसाद मिळत नसल्याने सदरहू औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी वारंवार ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागते.

तेंव्हा वरील सर्व बाबींचा विचार करता आणि हॉस्पिटलची दैनंदिन गरज पाहता रु.३,००,०००/- लाखापर्यंतचे १७९२ आयटम औषधे / सर्जिकल साहित्याकामी खरेदी नियमावलीनुसार कोटेशन मागणी करुन खरेदी करता येईल. यासाठी जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात संस्थानचे संकेतस्थळावर टाकण्यात येईल तसेच जास्त खपाच्या वर्तमान पत्रात जाहिरात देता येईल आणि जास्तीत जास्त पुरवठाधारकांना ई-मेल तथा पत्राव्दारे कोटेशन्स मागणी करता येऊन वैद्यकिय संचालक यांचेमार्फत परिपत्रक काढून डॉक्टरांकडे येणा-या औषध कंपनीच्या प्रतिनिधींना कोटेशन मागणीबाबत माहिती देता येईल, तसेच उपरोक्त तक्त्यातील १७९२ आयटमकरीता प्रत्येक आयटम स्वंतत्रपणे कोटेशन न मागविता त्याचे Head प्रमाणे एकत्रित कोटेशन मागविण्यास व पुरवठा आदेश देतेवेळेस एकत्रित पुरवठा आदेश देण्यास प्रस्तावित केले आहे.

तसेच Tablet, Injection, OT & Other Material, Cardiac & Cathlab Material, Laboratory & X-ray Material, Consignment Material इत्यादी पार्टसाठी याआधी चांगला प्रतिसाद मिळालेला असून त्यामध्ये प्रत्येक पुरवठाधारकाकडे त्या त्या पार्टमधील जास्तीत जास्त मटेरीयल उपलब्ध असते. त्यामुळे त्यामधील ११८९आयटम खरेदीकामी ई-निविदा करणेबाबत प्रस्तावित करणेत आलेले आहे.परंतु वरील ई-निविदा प्रक्रियेमध्ये जर यामधील प्रती नग रु.३ लाखाचे आतील आयटमसाठी दर प्राप्त झाले नाही, तर त्याकामी पुढील खरेदी कोटेशनव्दारे करुन रुग्णालयातील औषधे / साहित्याची गरज भागविता येईल.

१६) महात्मा फुले जन आरोग्य योजना व पंतप्रधान जनआरोग्य योजनेअंतर्गत पुरविण्यात येणा-या औषधांबाबत– महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पेशंटला औषधे/सर्जिकल साहित्य पुरविण्याची सर्वस्वी जबाबदारी रुग्णालयाची असल्याने त्यांना ती औषधे कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध करुन दयावी लागतात. कधी-कधी त्या मटेरीयलचा वार्षिक औषध खरेदीमध्ये समावेश नसतो किंवा ते मटेरीयल फेर कोटेशन / निविदा मागवून खरेदीची कार्यवाही चालू असते अथवा त्याचा पुरवठाधारकाने वेळेवर पुरवठा न केल्याने तुटवडा भासतो. अशा वेळी महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पेशंटचे नातेवाईक औषधांसाठी वरिष्ठांकडे तथा वर्तमान

पत्राव्दारे तक्रार नोंदवितात तसेच महात्मा फुले योजनेच्या वेबसाईटला देखील तक्रारी नोंदवितात, अशा तक्रारी प्राप्त झाल्यामुळे याआधी काही रुग्णालयामध्ये सदरहू योजनेची मान्यता रद्द करणेत आलेली आहे. त्यासाठी काही औषधांचा तुटवडा भासू नये म्हणून सदर औषधे नजीकच्यापुरवठा धारकाकडून होलसेल हॉस्पिटल दराने तातडीने वैद्यकिय संचालक यांचे अधिकारात खरेदी करुन देण्यात येतील. तसेच भविष्यात मेडीकल क्षेत्रात होणारे बदल पाहता वारंवार औषधे / सर्जिकल साहित्याचे अदयावतीकरण केल्याने रुग्ण तपासणी तथा शस्त्रक्रियेसाठी होणारा फायदा पाहता लागणारे साहित्य तातडीने खरेदी करुन त्या विभागाची गरज भागविता येईल.

१७) ऐनवेळेस श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील काही डॉक्टर औषधे खरेदीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर नविन मटेरीयलची मागणी करतात, अशा आलेल्या मागणीची खरेदीची शासनाच्या नियमावलीप्रमाणे करता येईल व त्यासाठी नविन मागणी कमीत कमी तीन महिने अगोदर नोंदवावी.

१८) संस्थानच्या दोन्ही रुग्णालयामध्ये यापुर्वी औषधे / सर्जिकल साहित्य यांच्या अंदाजित नगसंख्येप्रमाणे ई-निविदा / कोटेशन मागवून खरेदी करण्यात येत होते. परंतु असे अनुभवास येते की, संबंधित विभागाने दिलेल्या अंदाजित मागणीपेक्षा प्रत्यक्षात वापरली जाणारी नगसंख्या बहुतेकवेळा कमी अथवा जास्त होत असल्याने त्या नगसंख्येप्रमाणे खरेदी करणे रुग्णालय खरेदी विभागास अडचणीचे होत होते. ज्यादा नगसंख्या खरेदी करणेसाठी अत्यावश्यक परवानगी घेण्याची वेळ जावून रुग्णांना वेळेवर औषध पुरवठा करणे होत नव्हते. यामुळे चालू वर्षीच्या औषधे/ सर्जिकल मटेरियलच्या खरेदीमध्ये अंदाजित नगसंख्येप्रमाणे खरेदी न करता पुरवठाधारकांशी निम्नतम दराने दरनिश्चिती (Rate contract) करुन संस्थानच्या दोन्ही रुग्णालयात औषधे/ सर्जिकल साहित्य मागणीप्रमाणे खरेदी करुन उपलब्ध ठेवता येईल. जेणेकरुन औषध तुटवडा न भासता रुग्णांना यथायोग्य आरोग्य सेवा पुरविता येईल.

१९) दर निश्चिती (Rate Contract) करताना सुरक्षा रक्कमेबाबतः- दर निश्चिती (Rate Contract) करताना निम्नत्तम दरधारकांस ई-निविदेव्दारे दर्शविण्यात आलेल्या अंदाजे नग संख्येच्या अनुशंगाने त्यांना जात असलेल्या पुरवठा आदेशातील रक्कमेच्या 3% सुरक्षा रक्कम म्हणून औषधे व सर्जिकल साहित्याकरीता तर On Consignment Basis वरील Material करीता प्रती पुरवठाधारकाकडून रु.२,००,०००/- इतकी सुरक्षा रक्कम म्हणून घेण्यात येईल तसेच सदर दर निश्चिती (Rate Contract) केल्यानंतर आपण त्या पुरवठाधारकांकडून मागविण्यात येणारे मटेरीयल हे आपल्या रुग्णालयातील खप पाहता अंदाजे नग संख्येपेक्षा कमी अथवा जास्त खरेदी करता येईल.

२०) सन २०२०-२१ या वार्षिक खरेदीस मंजुरी मिळणेकामी मा.तदर्थ समितीची मान्यता घेऊन सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे लागणार असल्यामुळे सदरहू खरेदीस मान्यता मिळून निविदा प्रक्रिया राबवून मटेरीयल उपलब्ध होणेकामी साधारणतः ४ ते ५ महिन्यांचा कालावधी लागू शकतो, त्यामुळे अत्यावश्यक सेवेचा विचार करता रुग्णालयात औषधांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून चालू बजेटमधून मागील मंजुर दराने मंजुर नगसंख्या वाढवून रुग्णांची आवश्यक गरज पाहता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे अधिकारात औषधे खरेदी करावी लागणार असून त्यास मान्यता असावी.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- ०१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

०२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस–२०१४/प्र.क्र.८२/भाग–३/उद्योग–४,दि.०१ डिसेंबर २०१६ अन्वयेः-

परिच्छेद ३.२.१/२– नियम पुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तू निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकूण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी. तसेच,

परिच्छेद ३.२.३–रु.५हजार ते रु.३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

विभागाचा अभिप्राय– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या दोन्ही रुग्णालयासाठी खरेदी करावयाचे औषधे, केमीकल्स, किरकोळ साहित्य, O.T.Material व On Consignment Basis Material यासाठी येणारा अंदाजे खर्च एकुण रक्कम रु.६९,४७,९९,४२२/- मात्र (अक्षरी रु.एकोणसत्तर कोटी सत्तेचाळीस लाख नव्यान्नव हजार चारशे बावीस मात्र) सोबतच्या तक्त्यामध्ये प्रस्तावित केलेला आहे.

०१) सदरहू औषधे / सर्जिकल साहित्य व On Consignment Basis Material इत्यादी खरेदीसाठी सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे अंदाजे खर्च रु. रु.६९,४७,९९,४२२/- मात्र (अक्षरी रु.एकोणसत्तर कोटी सत्तेचाळीस लाख नव्यान्नव हजार चारशे बावीस मात्र) इतक्या रक्कमेस मान्यता मिळणे.

०२) प्रस्तावित केलेल्या सदर औषधे खरेदीसाठी उपरोक्त नमुद केलेल्या मुद्दा क्र.१ ते २० प्रमाणे कार्यपध्दती राबविण्यास मान्यता असावी, त्याचप्रमाणे मुद्दा क्र.१५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अ.नं. १ ते १६ प्रकारचे मटेरियल खरेदीसाठी प्रती नग दर निश्चिती (Rate Contract) करणे व अ.नं.१७ मध्ये दर्शविलेले मटेरीयल On Consignment Basis साठी पुरवठाधारकांकडून निम्नत्तम दराने रुग्णालयाच्या मागणीप्रमाणे खरेदीस मान्यता मिळणे.

०३) वरील सर्व खरेदीकामी विहित पध्दतीने कोटेशन / ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास तसेच सदरहू खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपावेतो चालू बजेटमधून मागील मंजुर दराने नगसंख्या वाढवून खरेदीस मान्यता असावी.

तरी, उपरोक्त प्रस्ताव मंजुर होणेसाठीच्या मान्यतेस्तव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्याचे दर निश्चित करणे (Rate Contract) तसेच On Consignment Basis वरील Material उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या मुद्दा क्र.१ ते २० च्या कार्यपध्दतीनुसार व विभागाचे अभिप्रायात नमुद अ.नं.१ ते ३ नुसार खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन/ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे एकुण रक्कम रु.६९,४७,९९,४२२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.५७** **मागील वार्षिक खरेदीच्या मंजुर दराने औषधे, सर्जिकल साहित्य, लॅबोरॅटरी साहित्य (मंजूर नग संख्येपेक्षा जास्त नग) खरेदीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-

(०१) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७ निर्णय क्रमांक ०५ अन्वये औषधे अतिरिक्त खरेदीबाबत – नवीन नियमावली नुसार वार्षिक औषधांचे पुरवठा आदेश दिल्यानंतर पुढील सहा महिन्यातच अतिरिक्त औषधे खरेदी करता येणार आहे. परंतु ब-याच वेळा वार्षिक औषधे खरेदीचा कालावधी संपून पुढील वार्षिक खरेदीस विलंब लागल्याने वार्षिक औषधांची वर्षाची मागणी संपते यासाठी कमीतकमी एक वर्षाचा कालावधी पुर्ण होऊन जातो तसेच कधीकधी संसर्ग जन्य रोगांची लागण झाल्यामुळे सुध्दा वार्षिक मागणी इतक्याच नगांची फेर मागणी करावी लागते. तेंव्हा वार्षिक खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभेने दिलेल्या मंजूरी अंतर्गत ती औषधे / सर्जिकल साहित्य मंजूर दराने अतिरिक्त नग खरेदीस मंजूरी मिळालेली आहे.

(०२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/०१/२०१५ निर्णय क्रमांक २६ Clause No.9 अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठयापैकी रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची अतिरीक्त मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

(०३) दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.७५६(५) अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षीक (सन २०१६-१७) यावर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, रुग्णालय उपसमितीने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या, त्यामान्य करण्यात आल्या आहेत.

बऱ्याचशा नामांकित रुग्णालयांमध्ये जनरीक औषधे वापरली जातात. त्यामुळे संस्थान रुग्णालयांकरीता प्राधान्याने जनरीक औषधे खरेदी करावीत. काही जनरीक औषधांचा रुग्णांवर प्रभाव होत नाही, असे डॉक्टर्स

सांगतात, अशी औषधे संबंधीत कंपनीकडून बदलून घेण्यात यावी व तरीही तक्रारी आल्यास सदरहू औषध निर्माती कंपनीस काळया यादीत टाकण्यात यावे.

औषध खरेदी प्रक्रिया राबविणेपुर्वी कोकीळाबेन हॉस्पिटल, नागपुर, रुबी हॉल क्लिनिक, पुणे, माऊट अबु, राजस्थान अशा नामांकित तसेच राज्य शासन/भारतीय लष्करांच्या रुग्णालयांमध्ये वापरण्यात येणाऱ्या औषधांची व औषध खरेदी प्रक्रियेची माहिती संकलीत करुन, उपकार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, रुग्णालय व वैद्यकिय संचालक यांनी औषध खरेदी करणेकामी अटी/ शर्ती निश्चित करुन सभेसमोर प्रस्ताव सादर करावा. तोपर्यंत औषधांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता सध्याचे मंजुर निम्नतम दराने औषधे खरेदी करण्यात यावीत, असे ठरले आहे.

त्यानूसार सन २०१५–२०१६ मध्ये मंजूर दराने औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य अतिरिक्त खरेदी करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| अ. नं. | मंजूर टिप्पणीची दिनांक | प्रस्तावाची रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | दि.२३/०५/२०१६ | ७१८५३०२.०० |
| २ | दि.१२/११/२०१६ | ११८९८८३७.०० |
| ३ | दि.०९/०२/२०१७ | १७०३८८०२.०० |
| ४ | दि.०१/०६/२०१७ | ७८९८५६८.०० |
| ५ | दि.०५/१२/२०१७ | २०५८२२९६.०० |
| ६ | दि.१३/०४/२०१८ | १६४४१३७.०० |
|  | एकूण रक्कम | ६६२४७९४२.०० |

प्रास्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य खरेदीकामी सन २०१७-१८ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील दरानेएकुण रक्कम रु.४४०८५७०२८.२४ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत, त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| अ. नं. | पुरवठा आदेशाची दिनांक | पुरवठा आदेशाची रक्कम | मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता |
|---|---|---|---|
| १ | २८/०७/२०१७ | १६४९५१४९९.०८ | दि.२५/०७/२०१७ निर्णय क्र.५२४ (A-१४) |
| २ | ०७/१२/२०१७ | २२९७४९४३४.७५ | दि.१४/११/२०१७ निर्णय क्र.१००६ (०१) |
| ३ | १६,१७,/०१/२०१८ | ४६५५५०७.०० | दि.०८/१२/२०१७ निर्णय क्र.१०५१ (१३) |
| ४ | १५/०१/२०१८ | २७७०८७१.८६ | दि.२५/१२/२०१७ रोजीची मंजूर टिप्पणी |
| ५ | १०/०४/२०१८ | १७११४२५७.९८ | दि. ०२/०४/२०१८ रोजीची मंजूर टिप्पणी |
| ६ | २३,२४/०४/२०१८ | २१६१५४५७.५७ | दि.०४/०४/२०१८ निर्णय क्र.२२५ (२३) |
|  | एकूण रक्कम | ४४०८५७०२८.२४ |  |

सन २०१७-१८ या वर्षाकरीता वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य खरेदीकामी मंजुर रक्कम रु.५५,९१,९१,८३६/- इतकी आहे त्यामधून रु.४४०८५७०२८.२४ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून रु.११,८३,३४,८०७.७६ इतकी रक्कम शिल्लक आहे, त्यामुळे आपणास अतिरीक्त खरेदी ही शिल्लक रक्कमेतुन करता येणार आहे.

सदर पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठाधारकांकडून मालाचा पुरवठा चालु आहे, तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादींचा औषधांचा भांडारात साठा शिल्लक नाही, सदर साठयाची वार्षिक मागणी पुर्ण झालेली आहे. तथापि सदरहू औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य हे दैनंदिन वापरासाठी आवश्यक असल्यामुळे तेंव्हा गरज पाहता काही औषधे / सर्जिकल साहित्य मंजुर दराने खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच यातील काही मटेरिअल मागवीण्यात येवून वापरण्यात देखील आलेले आहे.

सदर औषधे/सर्जिकल साहित्य हे आपण जर मंजुर दराव्यतिरीक्त खरेदी केले तर त्यासाठी जास्त खर्च येऊन त्यात संस्थानचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर मटेरीयल हे मंजुर दरानेच खरेदीचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच ब-याच ठिकाणी मागील खप पाहता तसेच पुढील वार्षिक खरेदीचा कालावधी बघता वार्षिक मंजुर नग संख्या व्यतिरीक्त जास्त नग संख्याची मागणी करण्यात आलेली आहे. १ सप्टेंबर २०१७ पासून १८ ऑक्टोंबर २०१८ पर्यंत शताब्दी वर्ष आयोजित करण्यात आले होते त्या कालावधीत रक्तदान शिबीर, युरोलॉजी शिबीर, डोळयांचे व कानाचे शिबीर, प्लॅस्टिक सर्जरी शिबीर,THR वTKR साठी शिबीर आयोजित करण्यात आले होते सदर शिबीरे ही अगोदर नियोजित नसल्यामुळे सदर शिबीरांसाठी लागणारे औषधे/सर्जिकल साहित्य हे आपल्या वार्षिक खरेदीतील मंजूर नग संख्येमधून खरेदी केल्याने तसेच पाथर्डी येथे महाआरोग्य शिबीर आयोजीत करण्यात आले होते, त्यासाठी संस्थानमार्फत खुप मोठया प्रमाणात औषधे पुरविण्यात आले होते. त्यामुळे सुध्दा वार्षिक नग संख्या संपलेली असल्याने दैनंदिन वापरांसाठी लागणारे बरेचसे औषधे/सर्जिकल साहित्याचा वार्षिक साठा संपल्यामुळे ती अगोदर मागविण्यात येऊन त्यासाठी या प्रस्तावात मंजूरी घेण्यात येत आहे कारण रुग्णाची गैरसोय टाळणेकामी सदर मटेरीयल खरेदी करण्यात आलेले आहे.

सन २०१९-२० या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामीचा प्रस्ताव मान्यता घेण्यात येऊन सदर मंजूरीन्वये कोटेशन/ई निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन त्यामधील कोटेशन्सद्वारे Tab., Inj., Ayur., Drop, Syrups, Ointment, इ कामी पुरवठा आदेश देण्यात आलेले असून उर्वरीत Dental, Mis., CDL., Neuro OT Material, Dialysis & Laboratary material चे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून जे मटेरीयलकामी पुरेशे कोटेशन प्राप्त नाहीत ते मटेरीयल देखील अतिरिक्त नग खरेदी कामी पुढील कार्यवाही चालू आहे. तसेच मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०२/२०१९ अन्वये मान्यता मिळाल्याप्रमाणे ई निविदेचे पुरवठा आदेश येऊन जे मटेरीयल फेर निविदेमध्ये आलेले असेल त्यासाठी सुध्दा अतिरिक्त नग खरेदी करावे लागणार आहे.तसेच सन २०१९-२० मधील काही औषधांचे पुरवठा आदेश देण्यात आले असून सध्याची पेशंटची वाढती संख्या पाहता तसेच काही नवीन डॉक्टर रूजु झाल्यामुळे त्यांना लागणारी औषधे पाहता आणि Lab विभागात मागील वर्षी सर्व Kit च्या Manual पध्दतीने वापरणा-या घेण्यात आल्या होत्या परंतु सन २०१९-२० मध्ये सदरच्या Kit ह्या Manual व Automatic अशा दोन्हीही घेण्यात आल्याने Automatic Kit ची मागणी वाढल्यामुळे वार्षिक मागणी पुरेशी नसल्याने ते अतिरिक्त नग खरेदी करावे लागणार आहे.

वार्षिक खरेदीमधील काही औषधे ही वार्षिक मागणीपेक्षा कमी लागतात तर काही औषधे ही मुळ मागणीपेक्षा जास्त लागतात, अशी औषधे मंजुर दराने (Annual Rate Contract) अतिरिक्त नगसंख्या खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. सन २०१७-१८ या वार्षिक खरेदीमध्ये रक्कम रु.४४०८५७०२८.२४इतक्या मंजुर रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून यावर्षी आतापर्यंत रक्कम रु.३,९६,१३,५०३/- चा प्रस्ताव मंजूर करुन त्यानूसार अतिरीक्त औषधे खरेदी करण्यात आलेली आहे व सन २०१९-२० या वार्षिक खरेदीमध्ये रक्कम रू. ४,०५,८२,९३७/- चे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून त्यामधील औषधांची आपण प्रथमत:अतिरिक्त खरेदीचा प्रस्ताव आहे.

मागणी– सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्ण दाखल होत असतात. सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्ण पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात, त्यामुळे औषधांचा खप हा कधी कधी अचानक वाढतो. महात्मा फूले जीवनदायी योजने अंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळत असतो. तसेच दि.०१/०१/२०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालय हे पूर्णतः मोफत सेवा देण्यात येत असल्यापासून तेथील रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यासाठी सुध्दा लागणारी औषधे / सर्जिकल साहित्यांचा खप वाढलेला आहे. त्यामुळे जशी जशी लागतील तशी तशी औषधे वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात येतील. कारण एकाच वेळेस खरेदी करुन ठेवल्यास ती मुदतबाहय होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे संस्थानचे मोठे अर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.तसेच कोल्हापूर व

सांगली भागात महापुर आल्याने संस्थानमार्फत पुरग्रस्तांना मदत करणेकामी तसेच तेथे वैद्यकीय सेवा देणेकामी कमित कमी रक्कम रू. १० लाख इतक्या रक्कमेचे औषधे तथा सर्जिकल साहित्य पुरविण्यात आलेले आहेत आणि गोदावरी नदीस पुर आल्यामुळे कोपरगांव परिसरमधील ब-याच भागांत रोगांचा प्रादुर्भाव होऊन Dengue, Malaria, रक्तातील पेशी कमी-जास्त होणे या सारखे आजार वाढल्यामुळे पेशंटची वाढती संख्या पाहता औषधे/सर्जिकल साहित्य तथा लॅब मटेरिअलचा वाढता खप पाहता वार्षिक मागणी कमी पडत आहे.आणि सन २०१९-२० या वर्षाच्या पुढील वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी पुरवठा आदेश देण्यात येऊन त्यामधील काही संपलेल्या वार्षिक नगसंख्या अतिरिक्त खरेदीकामीची औषधे सोबतच्या यादीतील औषधे सन २०१९-२० या वर्षातील मंजुर दराने खरेदी करुन देता येतील.

तसेच आपण खरेदी करत असलेल्या मटेरीयलचे मंजूर दराची बाजार भावात चौकशी केली असता ते वाजवी असलेबाबत समजले आहे त्यामुळे नक्कीच संस्थानचा आर्थिक फायदा होणार आहे.

तरी सन २०१७-१८ या वर्षाच्या वार्षिक औषधे खरेदीकामी मंजूर रक्कम रु.५५,९१,९१,८३६.०० पैकी रक्कम रु.४८,०४,७०,५३९.०० (रु.४४,०८,५७,०२८.०० ही देण्यात आलल्या पुरवठा आदेशाची रक्कम + ३,९६,१३,५०३.०० अतिरिक्त नग संख्या खरेदी केलेली रक्कम) वजा जाता शिल्लक रक्कम रु.७,८७,२१,३०५.०० मधून व सन २०१९-२० मधील मंजुर रक्कम रू.५७,६२,०२,५१७.०० पैकी रक्कम रू.१४,,०५,८२,९३७.०० हे देण्यात आलेल्या पुरवठा आदेश रक्कम वजा जाता शिल्लक रक्कम रू.४३,५६,१९,५८०.०० मधून सोबतच्या तक्त्यातील औषधे तातडीने मंजूर दराने अतिरिक्त (मंजूर नग संख्येपेक्षा जास्त नग) खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु.२,९५,८६,७३४.०० इतका खर्च येणार आहे.

प्रस्ताव–ज्या काही औषधांची सन २०१९-२० मध्ये खरेदी झालेली नाही अशा औषधांसाठी व सन २०१७-१८ तसेच सन २०१९-२० च्या वार्षिक खरेदीतील नगसंख्या संपत आलेल्या औषधांची मागील मंजूर दराने मंजूर नगापेक्षा जास्त नग खरेदी करून त्या अनुशंगाने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने कार्योत्तर मान्यता घेण्यात येऊन व त्या अनुशंगाने येणा-या खर्चाचा प्रस्ताव दि.०४/१२/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे नोंद घेणेकामी सादर करणेत आलेला होता, त्यास सदर सभेतील निर्णय क्र.५७० अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन सन २०१७-१८ व सन २०१९-२० मधील (Annual Rate Contract) वार्षिक खरेदीमधील मंजुर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरीक्त (मंजुर नग संख्येपेक्षा जास्त नग) खरेदीबाबत तपासणी करून सविस्तर प्रस्ताव तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा, असे ठरले. त्यानुसार प्रस्ताव फेर तपासणी करून एकुण रक्कम रू.२,९५,८६,४३४ पैकी अ) रक्कम रू.१,१८,४८,५९६.०० इतक्या रक्कमेचे औषधे/सर्जिकल साहित्य रूग्णांची तातडीची गरज पाहता खरेदी करणेत आले असल्याने त्यासाठी कार्योत्तर मान्यता असावी व ब) उर्वरीत रक्कम रू.१,७७,३८,१२५.०० इतक्या रक्कमेची औषधे/सर्जिकल साहित्य मंजुर दराने जास्तीचे नग खरेदीस मान्यता असावी.

तरी उपरोक्त औषधे खरेदीकामी अ व ब प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ व सन २०१९-२० मधील (Annual Rate Contract) वार्षिक खरेदीमधील मंजुर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरीक्त (मंजुर नग संख्येपेक्षा जास्त नग) खरेदीबाबत रक्कम रू.१,१८,४८,५९६.००मात्र रक्कमेची औषधे/सर्जिकल साहित्य रूग्णांची तातडीची गरज पाहता खरेदी करणेत आलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच उर्वरीत रक्कम रू.१,७७,३८,१२५.०० मात्र रक्कमेची औषधे/सर्जिकल साहित्य मंजुर दराने जास्तीचे नग खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.५८** **संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत कंत्राटी पध्दतीने नियुक्ती आदेश देणेबाबत.. मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर (मा.तदर्थ समितीचे सदस्य) यांचे दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजीचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयांस अनुसरुन, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर (मा. तदर्थ समितीचे सदस्य) यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक पीए/०३/२०२०, दिनांक ०६ जानेवारी, २०२० अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे -

" .. .. With reference to the subject noted above, my attention was invited to the news published in daily newspaper " Loksatta" dt. 04.01.2020. As per said news, 588 contractual employees, working in ShriSaibabaSansthan Trust have been issued with regular appointment letters absorbing them in the employment of ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.

It is seen from order dt. 09.10.2019 passed in PIL No. 120 of 2019 between UttamraoRambhajiShelkeVs The State of Maharashtra &ors., regularization of 2500 contractual employees is also one of the grounds agitated.

In the above background, it is clear as to why the ad-hoc Committee was bypassed before issuing such appointment orders.

I hope that all important facts would be brought to the notice of the Committee in this regard. "

उपरोक्त मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर ( मा. तदर्थ समिती सदस्य) यांचे प्राप्त पत्रास अनुसरुन विवेचनात्मक तपशील खालीलप्रमाणे सादर करीत आहोत -

विषयाची पूर्वपीठीका -

(अ-१) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध मंजूर करणेबाबतचे दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) खालील अटी-शर्तीसअधिनराहुनमान्यतादिलेलीआहे. या अटी-शर्तीचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

(०१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

(०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

(०४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

(०५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.

(०६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.

(०७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

*(०८)* समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

*(०९)* आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.

(१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

(११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचापरिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

(अ-२) त्यानंतर, मा. शासनाने दिनांक २५ सप्टेंबर, २०१४ रोजीचे शासन निर्णयानुसार, संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल या शाळेच्या प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापक (एक पद) व श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता परफ्यूजनिस्ट (०१ पद) नव्याने समाविष्ट करणेस मान्यता दिली.

(अ-३) त्यानंतर मा. शासनाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ चे पत्रानुसार, संस्थानकडील विविध पत्रव्यवहारास अनुसरुन असे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सर्व

विभागातील कामकाजाचा आढावा घेऊन वाढीव पदे मंजूर करण्याचा सुधारित व एकत्रित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

(अ-४) याच कालावधीत, श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल, शिर्डी कडील विद्यार्थी संख्येत झालेली वाढ व त्यामुळे तुकडयांच्या संख्येत झालेली वाढ लक्षात घेऊन १० वाढीव सहाय्यक शिक्षक पदांना मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता. त्यास अनुसरुन, मा. शासनाने दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार, सहायक शिक्षक संवर्गातील १० पदे निर्माण करणेस मान्यता दिलेलीआहे.

(अ-५) दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-५ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेतां,सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

(अ-६) दरम्यानचे कालावधीततत्कालीनमा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५ (२३) अन्वये,संस्थान प्रशासनाकडील दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे पत्राव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल-८११ व कुशल-१०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आला. सदरहू मूळ प्रस्तावावर मा. शासनाकडून विचारणा करणेत आलेल्या बाबींवर वेळोवेळी अलाहिदा पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

(अ-७) तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, संस्थान प्रशासनामार्फत दिनांक ०८ डिसेंबर,२०११ रोजी सादर करणेत आलेल्या (परिच्छेद अ-६ मध्ये नमूद केलेप्रमाणे) कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेच्या प्रस्तावाबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे शासकीय निवासस्थानात झालेल्या संस्थान कामकाजासंबंधित आढावा बैठकीचे इतिवृत्त मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र दिनांक ०१ मार्च, २०१८ (प्रत्यक्ष प्राप्त दिनांक ०९ मार्च, २०१८ ) इकडील कार्यालयास प्राप्त झालेले होते.

उपरोक्त दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे आढावा बैठकीचे इतिवृत्तातील विषय क्रमांक ०४ श्री साईबाबा संस्थानच्या कुशल व अकुशल ९१३ कर्मचा-यांना नियमित करणेबाबत यावर खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे -

*(०१)* श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आकृतीबंधातील कंत्राटी पदांना स्थायी पदे म्हणून मान्यता देणेत यावी.

(०२) सदर पदांवरील पदभरती प्रक्रिया राबविण्यात यावी.

(०३) पदभरती प्रक्रीयेमध्ये श्री साईबाबा संस्थानमधील कामाचा अनुभव, त्यांचे कौशल्य आणि मागील सेवा कालावधीस प्राधान्य देण्यात यावे व त्यासाठी २५ गुण ग्रेस स्वरुपात देण्यात यावेत.

(अ-८) याच अनुषंगाने मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून दिनांक १२ सप्टेंबर,२०१८ रोजीचे पत्राने असे कळविणेत आले होते की,

".. .. (दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे मा. मुख्यमंत्री यांच्या आढावा बैठकीतील निर्णय क्र.०४) सदर निर्णयानुसार संस्थानच्या आकृतीबंधात सुधारणा करणे आवश्यक आहे. यास्तव या अनुषंगाने संस्थानमार्फत व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. "

(अ-९) उपरोक्त तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निवासस्थानी दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे बैठकीतील निर्णयानुसार, कंत्राटी पदे स्थायी पदांमध्ये रुपांतरीत झालेनंतर त्यावरील नेमणुकांसाठी पदभरती प्रक्रीया कशी राबवावी याबाबत स्पष्ट निर्देश देणेत आलेले नाहीत. तसेच पदभरती प्रक्रियेमध्ये कंत्राटी कर्मचा-यांना कामाचा अनुभव, त्यांचे कौशल्य आणि मागिल सेवा कालावधीसाठी २५ गुण ग्रेस देणेत यावेत असे कळविले आहे, याबाबतही स्पष्टता नाही. तसेच सेवेतील आरक्षणाबाबत ही स्पष्टता नाही. सध्या संस्थानमध्ये कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांपैकी बहुतांशी कर्मचारी हे ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचे आहेत, त्यामुळे पदभरती करतांना वयोमर्यादेचे निकषात त्यांचा समावेश होणे

शक्य नाही, त्यामुळे त्यांना वयोमर्यादेत सूट द्यावी किंवा कसे तसेच सेवेतील आरक्षण याबाबत मा. शासन स्तरावरुन मार्गदर्शन मिळणेकामी संस्थान प्रशासनामार्फत दिनांक ०१ डिसेंबर,२०१८ अन्वये विनंती पत्र देणेत आलेले होते.

(अ-१०) त्यानंतर मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ (प्राप्त दिनांक १५ जानेवारी, २०१९) अन्वये खालीलप्रमाणे कळविले होते -

१. शासनाच्या दिनांक १२ सप्टेंबरच्या (या टिपणीतील संदर्भ क्रमांक ०८) पत्रान्वये कळविल्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सन २००९ मधील मंजूर आकृतीबंधात १९१८ पदे जी कायम स्वरुपी कंत्राटी दाखविण्यात आली आहेत त्या पदांपैकी किती पदांना स्थायी पदे म्हणून रुपांतरीत करणे आवश्यक आहे,

२. यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना किती वित्तीय भार येणार आहे,

३. उपरोक्त मुद्यांच्यासह व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

(अ-११) संस्थानमध्ये कर्मचारी कंत्राटारामार्फत कंत्राटी पध्दतीने काम करत असलेले माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे व सन २००१ ते २००५ अखेर पर्यन्त ढोबळमानाने ९१६ अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमित नेमणुका देणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांची माहिती खालील प्रमाणे आहे –

तक्ता अ

| अ. नं. | तपशील | माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे परंतु दि. २२ ऑगष्ट, २००४ अखेर संख्या | दि.२३ ऑगष्ट, २००४ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर संख्या | दि.३१ डिसेंबर, २००५ अखेर एकूणसंख्या (३+४=५) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | तांत्रिक कुशल कर्मचारी | ०५२ | ०१६ | ०६८ |
| ०२ | कुशल कर्मचारी | ०३९ | ०१७ | ०५६ |
| ०३ | अकुशल कर्मचारी | ३५६ | ११२ | ४६८ |
| ०४ | कुशल सुरक्षा कर्मचारी | ००४ | ००१ | ००५ |
| ०५ | अकुशल सुरक्षा कर्मचारी | १८४ | ०६१ | २४५ |
| | एकुण (१) | ६३५ | २०७ | ८४२ |

उपरोक्त तक्ता अ व मूळ दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी सादर केलेल्या प्रस्तावातीलकर्मचा-यांच्या संख्येत खाली नमूद केलेल्या कारणांमुळे काही कंत्राटी कर्मचारी कमी झालेने फरक पडलेला आहे-

तक्ता ब

| अ. नं. | तपशील | माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे परंतु दि. २२ ऑगष्ट, २००४ अखेर कमी झालेली संख्या | दि.२३ ऑगष्ट, २००४ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर कमी झालेली संख्या | दि.३१ डिसेंबर, २००५ अखेर एकूणकमी झालेली संख्या (३+४=५) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | काम सोडून गेलेले | ४२ | १२ | ५४ |
| ०२ | मयत झालेले | १० | ०१ | ११ |
| ०३ | वयोमर्यादा ओलांडल्याने | ०७ | ०१ | ०८ |
| ०४ | अभिलेख सापडत नसलेले | ०४ | ०१ | ०५ |
| ०५ | कमी केलेले | ०३ | ०४ | ०७ |
| | एकुण (२) | ६६ | १९ | ८५ |
| | एकुण (तक्ता क्र.०१+०२) | ७०१ | २२६ | ९२७ |

थोडक्यात, मूळ प्रस्तावात नमूद केलेले ९१६ कर्मचारी अधिक नजरचुकीने राहून गेलेले माहे डिसेंबर, २००५ पूर्वीचे ११ कर्मचारी असे मिळून एकूण ९२७ कंत्राटी कर्मचारी आहेत / होते.

उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेल्या विवेचनास आणि विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन, या प्रस्तावा बाबत करणेत आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे सविस्तर नमूद केली आहे.

विषयाची सद्यःस्थिती -

(ब-१) दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या सविस्तर विवेचनास तसेच संदर्भाकिंत पत्रव्यवहारास अनुसरुन,मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ /२२/प्र.क्र.७०/का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

(ब-२) मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत " या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे-

" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "

(ब-३) उपरोक्त विवेचनानुसार व सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी सादर करणेत आलेल्या कार्यालयीन टिपणीवरील आदेशानुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन खाली नमूद केलेप्रमाणे नियुक्ती आदेश दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर पारित करणेत आलेले आहेत-

तक्ता क्रमांक ०१

| अ.नं. | तपशील | संख्या | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| (अ) | दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांची संख्या | ६३५ | -- |
| ०१ | यादीत एक नांव दोन वेळेस आलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्री. रविंद्र भडांगे यांचे नांव यादीतील अ.नं.५० आणि अ.नं. ५४ वर ही आलेले आहे, त्यापैकी यादीतील अ. नं. ५० नुसार नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला आहे. |
| ०२ | यादीतील ६० वर्षे वयोमान पूर्ण केलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्रीमती पंचफुला राठोड (यादीतील अ.नं.०२) वयोमान ६० वर्षे पूर्ण झाल्याने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला नाही. |
| ०३ | यादीतील मयत झालेले कंत्राटी | ००२ | श्री. दिवेकर (यादीतील अ.नं.६०) व श्री. कसबे (यादीतील |

| | | | |
|---|---|---|---|
| | कर्मचारी | | अ.नं.५६४) हे मयत असल्या कारणाने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत. |
| ०४ | यादीतील दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतरचे कंत्राटी कर्मचारी | ००८ | सदरचे कंत्राटी कर्मचारी हे दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर हजर झालेले आहेत, त्यामुळे त्यांना नियुक्ती आदेश देणेत आलेले नाहीत. (यादीतील अ.नं. ५७२, ५७४, ५७६, ५७७, ६३२, ६३३, ६३४ व ६३५ ) |
| ०५ | यादीतील सतत गैरहजर असणारे कर्मचारी | ००७ | कामगार विभागामार्फत ०१ वर्षापेक्षा जास्त तसेच ०१ वर्षाचे आतिल कालावधीत सतत गैरहजर असणारे एकूण २५ कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत अलाहिदा कार्यवाही सुरु आहे. या २५ कंत्राटी कर्मचा-यांपैकीतसेच ज्या कंत्राटी कर्मचा-यांची नांवे ६३५ कंत्राटी कर्मचा-यांचे यादीत आहेत, परंतु सध्या कामावर हजर नाहीत अशा कंत्राटी कर्मचा-यांना नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत (यादीतील अ.नं. ८९, १७२, २४०, ४९१, ५०४, ६०० व ६११) |
| ०६ | यादीतील सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४) या कालावधीत कामावर नसणारे कर्मचारी | ०१५ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील सन २००१ ते सन २००४ या कालावधीत हजर नसणारे / कामावर नसणारे परंतु माहे डिसेंबर, २००० पुर्वी कामावर हजर असणारे कर्मचारी. (यादीतील अ.नं.३, ४, ९, २७, ४८, ८२, ८४, १०५, ११४, ११६, १२२, १२९, १४९ व १६९) |
| (ब) | एकूण (अ.नं.०१ ते ०६) | ०३४ | -- |
| (क) | पारित करणेत आलेले आदेश ((अ) –(ब)) | ६०१ | दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील ६०१ पात्र कर्मचा-यांना आदेश पारित करणेत आले. |
| (ड) | यादीत समाविष्ट आहेत परंतु नियुक्ती आदेश स्वीकारले नाही असे कर्मचारी | ००३ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्यायादीनुसार हजर दिवस व कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले होते परंतु काही कारणास्तव नियुक्ती आदेश स्वीकारले नाहीत असे कर्मचारी (यादीतील अ.नं.७६, ९० व ५३३ ) |
| (इ) | नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले एकूण कंत्राटी कर्मचारी<br>एकूण (क-ड) | ५९८ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर कामावर असलेले) या कालावधीतील हजर दिवस आणि कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले असून, सदर कर्मचारी सेवेत रुजू झाले आहेत. |

(ब-४) उपरोक्त परिच्छेद ब-३मधील, तक्ता क्रमांक ०१(इ)मध्ये नमुद केलेप्रमाणे, कंत्राटी कर्मचा-यांना पारित करणेत आलेल्या नियुक्ती आदेशातील कर्मचा-यांचा विभागाप्रमाणे व प्रकारानुसार (कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी) यानुसार थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

तक्ता क्रमांक ०२

| अ. नं. | नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले कंत्राटी कर्मचारी | कंत्राटी कर्मचारी | | | कंत्राटी कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | एकुण | पुरुष | स्त्री | एकुण |
| ०१ | ५९८ | ०८७ | ५११ | ५९८ | ५६३ | ०३५ | ५९८ |

तक्ता क्रमांक ०३

| अ.नं. | विभागाचे नांव | कंत्राटी कर्मचारी | | | कंत्राटी कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल | एकुण | पुरुष | स्त्री | एकुण |
| 1 | 2 | 3 | 4 | (3+4)=5 | 6 | 7 | (6+7)=8 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सामान्य प्रशासन विभाग | ०१ | ०६ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| ०२ | जनसंपर्क विभाग | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| ०३ | लेखाशाखा | १० | ०२ | १२ | १२ | ०० | १२ |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान विभाग | ०२ | ०२ | ०४ | ०३ | ०१ | ०४ |
| ०५ | मंदिर विभाग | ०१ | २५ | २६ | २६ | ०० | २६ |
| ०६ | प्रकाशने विभाग | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ०७ | आरोग्य विभाग | ०२ | ९० | ९२ | ८५ | ०७ | ९२ |
| ०८ | संरक्षण विभाग | ०२ | १४३ | १४५ | १३५ | १० | १४५ |
| ०९ | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| १० | बांधकाम विभाग | ०४ | ०० | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| ११ | पाणीपुरवठा विभाग | ०५ | ०२ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| १२ | बगीचा विभाग | ०० | ०३ | ०३ | ०२ | ०१ | ०३ |
| १३ | विद्युत विभाग | १४ | ०२ | १६ | १६ | ०० | १६ |
| १४ | मेकॅनिकल विभाग | ०३ | ०२ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १५ | ध्वनिक्षेपण विभाग | ०३ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| १६ | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १७ | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | ०० | १४ | १४ | १४ | ०० | १४ |
| १८ | साईप्रसाद निवासस्थान विभाग | ०१ | १० | ११ | ११ | ०० | ११ |
| १९ | व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग | ०२ | ०१ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| २० | श्री साई आश्रम विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| २१ | श्री साई धर्मशाळा | ०१ | ०१ | ०२ | ०२ | ०० | ०२ |
| २२ | श्री साई प्रसादालय | ०२ | ७७ | ७९ | ७६ | ०३ | ७९ |
| २३ | कॅन्टिन विभाग | ०२ | ३६ | ३८ | ३८ | ०० | ३८ |
| २४ | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | ०१ | ०७ | ०८ | ०८ | ०० | ०८ |
| २५ | भांडार विभाग | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २७ | वाहन विभाग | १३ | ०३ | १६ | १६ | ०० | १६ |
| २८ | मुंबई कार्यालय | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २९ | श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल | ०४ | ०३ | ०७ | ०२ | ०५ | ०७ |
| ३० | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ३१ | श्री साईनाथ रुग्णालय | ०६ | २३ | २९ | २४ | ०५ | २९ |
| ३२ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ०४ | ३७ | ४१ | ३८ | ०३ | ४१ |
| | **एकूण** | **८७** | **५११** | **५९८** | **५६३** | **३५** | **५९८** |

(ब-५) उपरोक्त परिच्छेद ब-३ मधील तक्ता क्रमांक ०१/ अ. नं. ०४मध्ये नमूद यादीतील जे कर्मचारी दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतर कामावर हजर झालेले आहेत, अशा ०८ कंत्राटी कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश प्रलंबित ठेवणेत आलेले आहेत. या सर्व ०८ कंत्राटी कर्मचा-यांना कागदपत्रे पडताळणीची संधी देणेत येत असून, त्यांना कामगार विभागासह, या कर्मचा-यांनी ज्या-ज्या विभागात काम केलेले आहे अशा विभागातील उपलब्ध कागदपत्रे पडताळणीकामी उपलब्ध करुन देणेत येत आहे.

या ०८ कंत्राटी कर्मचा-यांपैकी, जे कंत्राटी कर्मचारी हे सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४) या कालावधीत हजर असतील व ज्यांची कागदपत्रांची पडताळणी पूर्ण होईल त्यांना विहित प्रशासकीय पध्दतीने / मान्यतेने नियुक्ती आदेश पारित करणेत येतील.

(ब-६) उपरोक्त परिच्छेद ब-३ मधील तक्ता क्रमांक ०१/ अ. नं. ०५ मध्ये जे कर्मचारी सतत गैरहजर आहेत अशा ०७ कंत्राटी कर्मचारी यांचे नियुक्ती आदेश प्रलंबित ठेवणेत आलेले आहेत.

या ०७ कंत्राटी कर्मचा-यांपैकी काही कंत्राटी कर्मचा-यांचा समावेश हा कामगार विभागामार्फत ०१ वर्षापेक्षा जास्त तसेच ०१ वर्षाचे आतिल कालावधीत सतत गैरहजर असणारे एकूण २५ कंत्राटी कर्मचा-यांमध्ये आहे. याबाबत कामगार विभागामार्फत प्रशासकीय स्तरावरुन अलाहिदाकार्यवाही सुरु असून, त्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे (मा. तदर्थ समितीचे) सभेपुढे विचारार्थ तथा निर्णयार्थ सादर करणेत आलेला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे (मा. तदर्थ समितीचे) सकारात्मक निर्णयानंतरच, या ०७ कंत्राटी कर्मचा-यांपैकी जे कर्मचारी पात्र होतील आणि जे सन २००१ ते सन २००४ (दि.२२/८/२००४ अखेर) कामावर हजर असतील, त्यांचे कागदपत्रांची यथोचीत पडताळणी करुन त्यांना विहित प्रशासकीय पध्दतीने / मान्यतेने नियुक्ती आदेश पारित करणेत येतील.

(ब-७) उपरोक्त परिच्छेद ब-३ मधील तक्ता क्रमांक ०१/ अ. नं. ०६ मध्ये कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४अखेर) या कालावधीत हजर नसणारे / कामावर नसणारेअसे १५ कंत्राटी कर्मचारी यांचे नियुक्ती आदेश कागदपत्रांची पडताळणी व पूर्तता पूर्ण होईपावेतो प्रलंबित ठेवणेत आलेले आहेत.

या सर्व १५ कंत्राटी कर्मचा-यांना कागदपत्रे पडताळणीची संधी देणेत येत असून, त्यांना कामगार विभागासह, या कर्मचा-यांनी ज्या-ज्या विभागात काम केलेले आहे अशा विभागातील उपलब्ध कागदपत्रे पडताळणीकामी उपलब्ध करुन देणेत येत आहे.

या १५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी, जे कंत्राटी कर्मचारी हे सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४) या कालावधीत हजर असतील व ज्यांची कागदपत्रांची पडताळणी पूर्ण होईल त्यांना विहित प्रशासकीय पध्दतीने / मान्यतेने नियुक्ती आदेश पारित करणेत येतील.

तसेच या कंत्राटी कर्मचा-यांपैकी जे कर्मचारी सन २००१ पूर्वी म्हणजेच माहे डिसेंबर, २००० पूर्वी कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असतील, त्यांचेबाबतीत विषयांकित मूळ प्रस्तावास अनुसरुन सकारात्मक विचार होणेकामी तसेच मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे आदेशात दुरुस्ती होणेकामी मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागेल.

(ब-८) याव्यतिरिक्त, दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीत समावेश नसलेले परंतु सन २००१ ते सन २००४ याकालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर असणारे अनेक कंत्राटी कर्मचारी नियुक्ती आदेश मिळणेकामी प्रशासनाकडे विनंती अर्ज करीत आहेत. प्रशासनाकडे प्राप्त झालेले संबंधित कंत्राटी कर्मचा-यांचे अर्ज कामगार विभागाकडे पडताळणीकामी पाठविणेत येत आहेत. या संबंधित कारणास्तव प्राप्त होणारे सर्व कंत्राटी कर्मचा-यांचे अर्ज एकत्रित करुन, त्याबाबतचा स्वतंत्र सविस्तर प्रस्ताव कामगार विभागामार्फत अलाहिदा सादर करणेत येत आहे.

मा. तदर्थ समिती सदस्य यांचे पत्राबाबत -

(क) उपरोक्त विषयांस अनुसरुन, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर ( मा. तदर्थ समिती सदस्य) यांचेकडील दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजीचे पत्रातील बाबींबाबत विवेचनात्मक तपशील-वजा-माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहोत -

तक्ता क्रमांक ०४

| अ.नं. | मा. प्रमुख जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर तथा मा. तदर्थ समिती सदस्य यांचे पत्रातील तपशील | तपशील-वजा-माहिती |
|---|---|---|
| ०१ | With reference to the subject noted above, my attention was invited to the news published in daily newspaper " Loksatta" dt. 04.01.2020. As per said news, 588 contractual employees, working in Shri Saibaba Sansthan Trust have been issued with regular appointment letters absorbing them | **०१.** उपरोक्त विषयांस अनुसरुन, संस्थानमध्ये कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४) अखेर कार्यरत असणारे कुशल / अकुशल ६०१ कंत्राटी कर्मचा-यांना आदेश क्रमांक एसएसएस/ साप्रशा / आस्था / २२०० / २०२०, दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांचे कालावधीसाठी कंत्राटी कर्मचारी म्हणून नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले आहेत.<br>**०२.** या संबंधित कंत्राटी कर्मचा-यांना देणेत आलेल्या नियुक्ती आदेशांमध्ये अट / बाब क्रमांक **०४** मध्ये मा. शासनाचे दिनांक |

| | | |
|---|---|---|
| | in the employment of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | १७ सप्टेंबर, २०१९ मधील अटी-शर्तीनुसार, ".. ..संबंधित कंत्राटीकर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीतील दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "<br>०३.या संबंधित कर्मचा-यांना संस्थानचे नियमित सेवेत / कायम कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेले नाही.उपरोक्त अटीनुसार कंत्राटी कर्मचारी म्हणूनच सामावून घेणेत आलेले आहे. |
| ०२ | It is seen from order dt. 09.10.2019 passed in PIL No. 120 of 2019 between Uttamrao Rambhaji Shelke Vs The State of Maharashtra & ors., regularization of 2500 contractual employees is also one of the grounds agitated. | मा. व्यवस्थापन समितीने २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीचे सभेत २५०० कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत सामावून घेणेबाबत निर्णय घेतलेला आहे. परंतु मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिकेमध्ये याबाबत हरकत घेणेत आल्याने सदरहू प्रस्तावावरची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे. |
| ०३ | In the above background, it is clear as to why the ad-hoc Committee was bypassed before issuing such appointment orders. | ०१. विषयांकित मूळ प्रस्ताव हा तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५(२३) अन्वये, जा. क्र. एसएसएस / वशी-७अ / ४६०१ / २०११, दिनांक ०८ डिसेंबर, २०११ अन्वये मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस सादर करणेत आलेला होता.<br>०२. सदर प्रस्तावाबाबत मा. शासन स्तरावर संस्थान व्यवस्थापनामार्फत वर नमुद केलेप्रमाणे वेळोवेळी पाठपुरावा करणेत आला. |
| | | ०३. उपरोक्त प्रस्तावास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी संस्थानचे आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करणेबाबतचा यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७०/का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ पारित केला.<br>०४. उपरोक्त सर्व बाबी या विहित पध्दतीने पूर्ण झाल्याने तसेच मा. शासनाने मंजुरी दिल्याने, शासन निर्णयातील अटी-शर्तीनुसार सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४) संस्थान प्रशासनामार्फत संबंधित सर्व कर्मचा-यांचे कागदपत्रांची पडताळणी करुन पात्र ६०१ कर्मचा-यांना कंत्राटी कर्मचारी म्हणून नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले आहेत.<br>०५. वर नमुद केलेली सर्व कार्यवाही ही तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, मा. शासनाने मान्यता दिलेनंतर संस्थानचे प्रशासन स्तरावर पूर्ण करणेत आलेल्या आहेत, यामध्ये मा. तदर्थ समितीस टाळण्याचा कुठलाही हेतू नाही.<br>०६.विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३/२२/प्र.क्र.७०/का-१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी पारित केलेला आदेश (शासन निर्णय) हा सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष) यांचेकडील दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ चे मंजूर टिपणीनुसार, मा. तदर्थ समितीचे दिनांक ०४ |

| | | |
|---|---|---|
| | | डिसेंबर, २०१९ रोजीचे सभेत विषय नं. १६ – शासन निर्णय व परिपत्रके यांचे वाचनया शीर्षाखाली अवलोकनार्थ सादर करणेत आलेला होता. मा.तदर्थ समितीनेदिनांक ०४ डिसेंबर, २०१९रोजीचे सभेतीलनिर्णय क्रमांक ५७५अन्वये,शासनाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त शासन निर्णयाचे वाचन करुन नोंद घेण्यात आली, असा निर्णय पारित केलेला आहे.<br>०७.तसेच वर नमुद केलेला घटनाक्रमाचे अवलोकन करतां, मा. तदर्थ समितीचा दिनांक ०४ डिसेंबर, २०१९ रोजीचा उपरोक्त दिनांक ०४ डिसेंबर, २०१९ रोजीचा निर्णय क्रमांक ५७५ हा सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी कार्यवाहीसाठी प्राप्त झालेनंतरच, प्रशासकीय स्तरावर संपूर्ण बाबी पूर्ण करुन, म्हणजेच दिनांक ०२ जानेवारी, २०२० रोजी एकूण ६०१ कर्मचा-यांना कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी म्हणूनच नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले आहेत. |
| ०४ | I hope that all important facts would be brought to the notice of the Committee in this regard. | वर नमुद केलेल्या सर्व बाबी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल मा. तदर्थ समितीचे सभेपुढे नोंद घेणेसाठी सादर करणेत येत आहे. |

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर (मा. तदर्थ समितीचे सदस्य) यांनी त्यांचे दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजीचे पत्रान्वये, संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना, संस्थान सेवेत कंत्राटी पध्दतीने नियुक्तीदेणेकामी करणेत आलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने घेतलेल्या आक्षेपांबाबत उपरोक्त वस्तुस्थितीदर्शक अहवाल मा. तदर्थ समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

**निर्णय क्र.१५८ सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५९ श्री.रविंद्र चिंधू ठाकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीस मुदतवाढ देणेकामी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना अभिप्राय कळविणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) उपरोक्त विषयांस अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ११ जानेवारी, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार, महसूल विभाग आणि विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अनुक्रमे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीचे आदेशाने, श्री. रविंद्र चिंधू ठाकरे, उपजिल्हाधिकारी यांची ‘उपमुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी’या पदावर प्रतिनियुक्तीने प्रथमतः एक वर्षासाठी नियुक्ती करणेत आलेली आहे. या संबंधित आदेशानुसार, श्री. रविंद्र चिंधू ठाकरे, उपजिल्हाधिकारी हे दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी मध्यान्हपूर्व ‘उपमुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ’ या प्रतिनियुक्तीचे पदावर हजर झालेले आहेत. मा. शासनाचे दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री. रविंद्र चिंधू ठाकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा प्रतिनियुक्तीचा ०१ वर्षाचा कालावधी हा दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी संपुष्टात येत आहे.

त्यानंतर, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १८ नोव्हेंबर, २०१९ रोजीचे पत्रानुसार, श्री. रविंद्र चिंधू ठाकरे, उपजिल्हाधिकारी (सध्या प्रतिनियुक्तीने ‘उपमुख्य कार्यकारी अधिकारी’) यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीस पुढील दोन वर्ष मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजीचे पत्राने,श्री. रविंद्र चिंधू ठाकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देणे आवश्यक असल्यासतसा रितसर प्रस्ताव आवश्यक त्या कारणमिमांसेसह मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने शासनास तत्काळ सादर करणेबाबत कळविलेले आहे.

(ब) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजीचे पत्रास अनुसरुन विवेचन असे की, श्री साईबाबा संस्थानविश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे व्यवस्थापनामार्फत/ प्रशासनामार्फत खाली नमूद केलेले विकास प्रकल्प सध्या प्रगतीपथावर असून, काही प्रकल्पांवर कार्यवाही सुरु आहे -

०१. शिर्डी येथे येणारे भक्तांना श्री साईचे दर्शन विनासायास व विनाविलंब व्हावे म्हणून अंदाजित रक्कम रुपये १०९.५० मात्र कोटीचा बांधकाम प्रकल्प प्रगतीपथावर आहे.

०२. संस्थान व्यवस्थापन संचलित शैक्षणिक संकुलासाठी (आयटीआय, इंग्लिश मिडियम स्कूल, कन्या विद्या मंदिर, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय) करीता अंदाजित रक्कम रुपये २१८ कोटी मात्रचा बांधकाम प्रकल्प प्रगतीपथावर आहे.

०३. श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारतीवर वाढीव तिसरा मजल्याचे बांधकामाचा अंदाजित रक्कम रुपये ३.९९ कोटी मात्र खर्चाचा बांधकाम प्रकल्प प्रगतीपथावर आहे.

०४. निळवंडे धरणातून संस्थान करीता पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करणेचा प्रकल्प प्रगतीपथावर आहे.

०५. शिर्डी शहरातील व परिसरातील रस्ते विकसित करणेकरीता शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत सुरु असणारे प्रकल्पांसाठी भूसंपादन करणे व त्यासाठी आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देणेबाबतचे प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

०६. प्रस्तावित स्मार्ट सिटी अंतर्गत सीसीटीव्ही प्रकल्प राबविणेकामी प्राथमिक कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

०७. प्रस्तावित सोलर सिटी प्रकल्पाची प्राथमिक कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

०८. आस्थापना विषयक कामकाजासाठी नियुक्त करणेत आलेल्या सेवानिवृत्त शासकीय अधिका-यांचे कार्यगटाकडून सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम आणि बिंदूनामावली आदि कामकाज सुरु करणेत आलेले आहे.

०९. या व्यतिरिक्त घनकचरा प्रकल्प, साई नॉलेज पार्क, लाडु व बुंदी प्रोसेसिंग युनिट आदि विकास प्रकल्पांचे कामकाज सुरु करणेत आलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे सुरु असणारे आणि प्रस्तावित / नियोजित विकास प्रकल्प व त्या अनुषंगिक कामकाजाचे प्रभावीपणे दैनंदिन नियोजनासह अंमलबजावणी करणेकरीता तसेच संस्थान प्रशासनाचे दैनंदिन कामकाजाचे नियोजनाकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समन्वयक व सहाय्यक म्हणून "उप मुख्य कार्यकारी अधिकारी" या पदावर मा. शासनामार्फत उपजिल्हाधिकारी या संवर्गातील शासकीय अधिकारी अथवा मा. शासनाकडील दिनांक ११ जानेवारी, २०१९ रोजीचे निर्णयानुसारवेतनश्रेणी ८०००-१३५०० (०५ व्या वेतन आयोगानुसार) व वेतनश्रेणी १५६००-३९१००+ग्रेड पे ५४०० (०६ व्या वेतन आयोगानुसार) या वेतनश्रेणीतील शासकीय अधिकारी यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणे आवश्यक आहे.

(क) वरील सर्व बाबींचा विचार करतां, सध्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारे श्री.रविंद्र चिंधू ठाकरे (उपजिल्हाधिकारी) यांना वर नमुद केलेल्या विकास प्रकल्पांसह संस्थानाचे दैनंदिन व्यवस्थापनाबाबत असलेला गत वर्षीचा अनुभव पाहता, श्री. रविंद्र चिंधू ठाकरे, उपजिल्हाधिकारी (सध्या प्रतिनियुक्तीने 'उपमुख्य कार्यकारी अधिकारी') यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीस पुढील दोन वर्ष मुदतवाढ देणेबाबतचा सकारात्मक अभिप्राय मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये सुरु असलेले विविध विकास प्रकल्प व श्री.ठाकरे यांचा दैनंदिन व्यवस्थापनाबाबत असलेला गत वर्षीचा अनुभव पाहता, श्री. रविंद्र चिंधू ठाकरे, उपजिल्हाधिकारी (सध्या प्रतिनियुक्तीने 'उपमुख्य कार्यकारी अधिकारी') यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीस पुढील दोन वर्ष मुदतवाढ देणेबाबत सकारात्मक अभिप्राय मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.६०** **सन २०२०-२१ वर्षाकरीता किराणामाल व अनुषंगिक साहित्यातील गहु, तांदुळ, साखर व ज्वारी संस्थानने FCI कडून खरेदी करणेबाबचे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे सुचनेबाबत... व याबाबत संस्थानने FCI यांना पाठविलेले पत्र व FCI यांनी त्यांचे पत्राव्दारे कळविलेली माहिती... सन २०२०-२१ साठी गहु,साखर व तांदुळ खरेदी निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे प्रसादालय, लाडु निर्मिती, मंदिर व कॅन्टीन विभगाकरीता आवश्यक किराणामाल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी भांडार विभागाने मा.तदर्थ समितीचे दि.१४.०१.२०२० चे सभेतील निर्णय क्रं.४१ अन्वये मान्यता मिळालेली होती. सदर खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन सादर केले होते. त्यावर दि.१३.०२.२०२० रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. त्यातील किराणामाल व अनुषंगिक साहित्य खरेदीबाबत खालीलप्रमाणे मुद्दयांमध्ये सदर निर्देश नमूद आहेत.

4. Considering the aforesaid subjects, learned Counsel for respondent No.7 raises no objection to the application, but the suggestion is given by learned Counsel for respondent No.7 in respect of Subject No.41. Along with the application, an annexure is placed on record under the caption annexure 'A' and this document refers to the various grocery items in a tabular form. It is the suggestion of learned Counsel for respondent No.7 that the grocery items, such as, Wheat, Rice, Jawar, Sugar, etc are available and are stored in the godowns of Food Corporation of India and in case the applicant -Sansthan undertakes the exercise of establishing contact with the Food Corporation of India and if there is no rider, can place the bulk orders

with the Food Corporation of India, so that instead of purchasing these items from open market, it would be supplied through the Central Government agency and this exercise may also save the expenses of Sansthan on one hand and on the other hand, it would limit the private suppliers in the activities of grocery items to be supplied to the Sansthan. This suggestion is certainly a welcome suggestion.

5. As there is no material at this stage before this Court, we may only suggest the applicant - Sansthan to consider the aforesaid suggestion provided by learned Counsel for respondent No.7 with a positive approach.

6. Accordingly, with the aforesaid observations, the application is allowed in terms of prayer clause (B) and same is disposed of.

वरील मा.उच्च न्यायालयाचे निर्देशामध्ये, संस्थानला वार्षिक आवश्यक असणारे गहु, तांदुळ, ज्वारी व साखर भारतीय खादय निगम यांचेकडून संस्थानने खरेदी करणेबाबतची सुचना केली होती. त्यामुळे गहु, तांदुळ, साखर व हरबराडाळ ही ई-निविदा एकत्रित काढीत असल्यामुळे प्रलंबीत ठेवण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयाचे वर नमूद सुचनेस अनुसरून सादर करण्यात येते की, ज्वारी संस्थानचे प्रसादालयात साईभक्तांना देण्यात येणा-या प्रसाद भोजनात वापरण्यात येत नाही. दि.१३.०२.२०२० रोजीच्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णया अनुषंगाने मा.महाव्यवस्थापक, भारतीय खादय निगम,मुंबई यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/४५०१/२०२० दि.१८.०२.२०२० अन्वये गहु, तांदुळ व साखर पुरवठयाबाबत पत्र देण्यात आले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

मा.उच्च न्यायालयाचे वरील निर्देश विचारात घेता FCI ला संस्थानची वरील नमूद गहु, तांदुळ व साखर इ.मालाची वार्षिक मागणी कळवून त्यांना संस्थानचे मासिक गरजेप्रमाणे सन २०२०-२१ या वर्षासाठी शाश्वत स्वरूपात संस्थानला पुरवठा करणेस तयार आहे काय? याबाबत व सन २०२०-२१ या पुर्ण वर्षाकरीता गहु, तांदुळ व साखरेचा शाश्वत स्वरूपात संस्थानच्या शेडयुलप्रमाणे पुरवठा करणेस तयार असलेस खालील मुद्दयांबाबतही माहिती उलट टपाली कळविणेबाबत विनंती केली होती.

१. गहु, तांदुळ व साखरेचा पुरवठा करण्यासाठी प्रती क्विंटलचा दर काय असेल? यामध्ये GST, GST-TDS, पॅकिंग फॉरवर्डींग, शिर्डी संस्थान भांडार पोहच वाहतूक खर्च, वाराई वगैरे सर्व खर्चासह मालाचे प्रती क्विंटलचे दर कळवावेत.
२. संस्थानला पुरविणार असलेल्या गहु, तांदुळ व साखर या मालाचे नमुनेही संस्थानकडे पाठविणे गरजेचे आहे.
३. एप्रिल २०२० ते मार्च २०२१ या पुर्ण वर्षासाठी सदर मालाचे संस्थानला खरेदीसाठी दर निश्चित राहणार अगर बदलणार? बदलणार असल्यास किती महिन्यासाठी कोणते दर लागू राहतील.
४. सदर मालाचे पुरवठयाच्या पेमेन्ट टर्म काय राहतील?
५. संस्थानला सदर मालाचा पुरवठा कोणत्या ठिकाणाहून होईल.

सदर पत्रावर भारतीय खादय निगम यांनी त्यांचेकडील दि.१९.०२.२०२० चे पत्रान्वये खालीलप्रमाणे सविस्तर कळविले आहे.

"With the reference to the subject cited above, and your letter No. SSS/Vashi-Kharidi/4501/2020 dtd.18.02.2020 it is stated that FCI distributes food grains (Wheat & Rice) only as per the allocation received from Central & State Government & hence FCI cannot provide food grains directly to Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. Further FCI does not deal with storage and distribution of Sugar.

If your good self intends to purchase food grains from FCI, same can be done through open market sales scheme [OMSS(D)] conducted by FCI on a weekly basis. Wheat is offered in both Maharashtra and Goa where as Rice is offered only in Goa. Some important points related to [OMSS(D)] are as follows:

a) FCI has engaged the services of m-junction for entire tender process.

b) The bids are to be made between 11.00 AM to 2.00 PM on every Wednesday on m-junction website www.valuejunction.in/fci for the Bulk consumers who are already empanelled with FCI through E-auction platform of m-junction service limited. The minimum quantity to be purchased is 10 MT.

| Tender uploading & Starting Date for EMD Deposition | Last Date for depositing EMD | Start Date and time for online bidding | End date & time for online bidding |
|---|---|---|---|
| Friday | Tuesday | Wednesday from 11.00 Hrs. | Wednesday from 14.00 Hrs. |

c) The request depots to Shirdi are CWC Nashik, FCI Manmad & PWS Shrirampur."

भारतीय खादय निगम यांचे पत्रात ते गहु व तांदुळ फक्त केंद्र आणि राज्य सरकारला पुरवितात. संस्थानला थेट पुरवठा करू शकत नाही. तसेच साखर त्यांचेकडे उपलब्ध नाही व तांदुळ फक्त गोवा राज्यामध्ये उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे त्यांचेकडे फक्त् गहु उपलब्ध होऊ शकतील असे दिसते. सदर उपलब्ध गहु त्यांचेकडील Open Market Sales Scheme [OMSS(D)] अंतर्गत भारतीय खादय निगम यांनी नेमणूक केलेले M-Junction Service यांचे मार्फत दर आठवडयाला होणारे ई-ऑक्शनव्दारे संस्थानला खरेदी करावे लागतील. असे त्यांनी कळविले आहे.

सदर फक्त गहु ई-ऑक्शनव्दारे खरेदी करणेसाठी संस्थानला भारतीय खादय निगमचे वरील पत्राप्रमाणे खालील कार्यवाही करावी लागेल.

१. ई-ऑक्शनसाठी नेमलेले M-Junction यांचेकडे रजिस्ट्रेशन करावे लागेल.

२. ई-निविदा अपलोडिंग व सुरवात दर शुक्रवारी सुरू होते व मंगळवारपर्यंत असते.

३. बुधवारी ११ ला ई-ऑक्शन सुरु होऊन २ ला संपतो.

४. तसेच संस्थानला माल नाशिक, मनमाड व श्रीरामपूर या ठिकाणाहून पुरवठा होऊ शकतो. सदर बाबी त्यांनी त्यांचे पत्राने कळविल्या आहेत.

या व्यतिरिक्त भारतीय खादय निगम कार्यालयातून माहिती घेतली ती खालीलप्रमाणे-

१. संस्थानला M-Junction रजिस्ट्रेशनसाठी असणारी फी भरावी लागेल.

२. संस्थानचे रजिस्टेशननंतर प्रत्येक ई-लिलावाची माहिती संस्थानला उपलब्ध होईल.

३. लिलावाची Base Price FCI निश्चित करते.

४. Base Price x खरेदी करावयाचे परिमाणानुसार येणा-या एकुण रकमेच्या १० टक्के रक्कम बयाणा रक्कम म्हणून भरावी लागेल.

५. Base Price पेक्षा जास्त रकमेची संस्थानला लिलावाची बोली रक्कम बोलावी लागेल व अशा बोलीतून जास्तीत जास्त रकमेची बोली रक्कम अंतिम होईल.

६. लिलाव अंतिम बोली रक्कम + महाराष्ट्र शासन टॅक्स + वाहतूक + वाराई + हमाली रक्कम अशी मिळून अंतिम खरेदीची रक्कम होईल.

७. लिलाव रक्कम अंतिम झालेनंतर खरेदी करावयाच्या पुर्ण परिमाणाची एकुण रक्कम ८ दिवसाचे आत आगाऊ भरावी लागेल.

८. खरेदी केलेला संपुर्ण माल १४ दिवसात उचलावा लागतो.१४ दिवसानंतर माल उचलल्यास त्यास चार्जेस अकारले जातात.

वरील कार्यपध्दतीचा विचार करता संस्थानला या पध्दतीने माल खरेदी करावयाचा असल्यास महिन्यातून एकदा लिलावात भाग घेऊन संपुर्ण महिन्याचा माल एकदाच खरेदी करावा लागेल. पुर्ण वर्षाचा माल खरेदी करून साठवणूक करण्याकरीता संस्थानकडे गोडावून उपलब्ध नाही. तसेच सदर मालाची वाहतूक संस्थानमार्फत करावी लागेल त्याकरीता वाहन तसेच अतिरिक्त मनुष्यबळाची गरज लागेल. तसेच संस्थानला प्रत्येक महिन्याला ई-लिलावात भाग घेऊन प्रत्येक वेळी वेगवेगळया दराने गहु खरेदी करावा लागेल. त्यामुळे लेखापरीक्षणातही मुद्दा उपस्थित होऊ शकतो.

साखर व तांदुळ FCI कडे उपलब्ध नसल्यामुळे त्याची खरेदी संस्थानला ई-निविदा पध्दतीने करावी लागणार आहे.

सध्या संस्थानकडून गहु खरेदी ई-निविदा पध्दतीने तिमाही दर घेऊन न्युनतम पुरवठादार निश्चित केला जातो. सदर पुरवठादाराकडून मंजूर दराने संस्थानच्या मासिक गरजेप्रमाणे खरेदी करण्यात येते. पुरवठाधारकाकडून GST, GST-TDS, वाहतूक वाराई, पॅकिंग फॉरवर्डींग, शिर्डी पोहच मालाचे दर घेतले जातात व संस्थानच्या मागणीप्रमाणे पुरवठा होतो. मालाचा पुरवठा झालेनंतर साधारण ३० दिवसाच्या आत सदर मालाची रक्कम पुरवठाधारकाला आदा करण्यात येते. पुरवठाधारकाकडून सुरक्षा अनामत रक्कम स्वीकारण्यात येते. करारनामा करण्यात येतो. ही पध्दत संस्थानच्या कार्यपध्दतीच्या दृष्टीने सोयीस्कर वाटते.

वरील वस्तूस्थिती विचारात घेता भारतीय खादय निगम यांचेकडून साखर व तांदुळ उपलब्ध होणार नाही. त्याकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागेल. भारतीय खादय निगम यांचेकडून केवळ गहु उपलब्ध होऊ शकतो. ई-निविदा पध्दतीने संस्थानला पाहिजे तेव्हा माल उपलब्ध होत असल्यामुळे फक्त गहुच FCI चा उपलब्ध आहे व तोही ई-ऑक्शन पध्दतीने खरेदी करावा लागणार असल्यामुळे सदर FCI चे पत्र मा.उच्च न्यायालयात सादर करून गहु संस्थानच्या नेहमीच्या ई-निविदा पध्दतीने खरेदी करण्याबाबत मान्यता मिळणेकामी पुन्हा मा.उच्च न्यायालयाकडे फेर प्रस्ताव सादर करावा असे मत आहे.

तरी,

अ) सन २०२०-२१ करीता गहु खरेदी भारतीय खादय निगम यांचेकडून ई-लिलाव पध्दतीप्रमाणे खरेदी करावा

अगर

ब) संस्थानच्या नेहमीच्या ई-निविदा पध्दतीने खरेदी करण्याबाबत मान्यता मिळणेकामी पुन्हा मा.उच्च न्यायालयाकडे फेर प्रस्ताव सादर करावा.

वरील "अ" किंवा "ब" बाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेत सविनय सादर.

**निर्णय क्र. १६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला वार्षिक आवश्यक असणारे तांदुळ व साखर भारतीय खादय निगम यांचेकडून उपलब्ध होणार नाही. केवळ गहु उपलब्ध होऊ शकतो मात्र तोही ई-ऑक्शन पध्दतीने खरेदी करावा लागणार आहे, ही बाब मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे निदर्शनास आणून देणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले. तसेच सन २०२०-२१ वर्षाकरीता गहु, तांदुळ, साखर व ज्वारी खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.** **(कार्यवाही- खरेदी विभाग/विधी विभाग)**

---

**यानंतर आजचे तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये आयत्या वेळी खालील विषयांवर निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दिनांक १५.०२.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१६१** **दिनांक १५.०२.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **आर्थिक अनुदान मागणीकरिता आलेल्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अर्थसहाय्य मागणीकरीता दररोज, नोंदणीकृत संस्था, शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था, तसेच वैयक्तीकरित्या अर्ज येत असतात. सदरच्या अर्जांद्वारे, १) बांधकाम, २) आश्रमातील लोकांचा खर्च, ३) वाचनालयासाठी पुस्तके-फर्निचर, ४) दवाखान्यासाठी मशिनरी / औषधे, ५) संमेलने, स्पर्धा, शिबिरे, ६) दुष्काळी भागाकरीता चारा/अन्नधान्य/पाणी ७) मुलांच्या शिक्षणासाठी मदत, ८) विधवा/निराधार/अपंग यांना दैनंदिन खर्चासाठी मदत, ९) व्यवसाय सुरू करणेकरीता मदत, १०) मुलांचे लग्नासाठी मदत, ११) जळीत झाल्याने मदत, अशाप्रकारे अनेक कारणासाठी अनुदान मागणी केली जाते.

संस्थान अधिनियम तरतुद:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम २००४ चे कलम २१(२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या विविध प्रयोजनासाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्कयापेक्षा अधिक नसेल एवढा भाग,समितीस वेळोवेळी खालील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

कलम २१ (२) (एक) " छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाचे पूर्व मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रूग्णालय, आधारगृह, किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था, अथवा कला वा साहित्याशी संबंधित असलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांची स्थापना व देखभाल करून घेणेसाठी, अशी तरतुद आहे.

संस्थान कडे दाखल झालेले अर्ज:- दि.०१.०९.२०१९ ते ३१.०९.२०२०१९ कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | अनुदान मागणीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगर पालिका | पुरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तुची मदत मिळणेबाबत. | |
| २ | तानाजी आनंदा देसाई, सांगली | घरासाठी मदत | |
| ३ | ओंकार किशोर बेलेकर, अहमदनगर | शैक्षणीक मदत | |
| ४ | श्री कुबेर साईबाबा त्रिकोल चॅरिटेबल ट्रस्ट | श्री साईबाबा मुर्ती साठी | |
| ५ | श्री पंकज झा, | Seeking help | |
| ६ | ग्रामपंचायत कार्यालय मानोरी, सिन्नर | शाळा इमारत बांधकामासाठी | |
| ७ | ज्ञानसागर मतिमंद बहूउद्देशीय संस्था, बुलढाणा | मतीमंद विद्यालयास मदत | |
| ८ | अरुणोदय शासकीय कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. यवतमाळ | मंदीर बांधकामासाठी | |
| ९ | श्री मव्दिरशैव पट्टशाली कोष्टी समाज विकास मंडळ, सोलापूर | मंगलकार्यालय बांधकामासाठी | |
| १० | श्री राजेंद्र श्रीरंग गलांडे, पंढरपूर | पुरग्रस्तांसाठी मदत | |
| ११ | सोमेश्वर सेवाभावी संस्था, संगमनेर | आर्थिक मदत | |
| १२ | कै. बबीबाई सुरजमलजी लुंकड वाचनालय/ग्रंथालय सांगली | ग्रंथालयास मदत | |
| १३ | श्री राजेंद्र श्रीरंग गलांडे, पंढरपूर | पुरग्रस्तांसाठी मदत | |
| १४ | सोमेश्वर सेवाभावी संस्था, संगमनेर | शैक्षणीक साहित्य | |
| १५ | श्री दत्तात्रय दा. पवार, शिरुर | वैयक्तीक गोशाळा मदत | |
| १६ | मुक्ताबाई उकिरडे सार्वजनिक वाचनालय बार्शी | वाचनालय साहित्य मदत | |
| १७ | श्री ए. बालकृष्णन, तामिळनाडू | आर्थिक मदत | |
| १८ | श्री पांडूरंग कृष्णा जांभळे, कराड | पुरग्रस्त मदत | |
| १९ | श्री सुजीत पाटील, सातारा | शैक्षणीक संस्थेस कदत | |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | श्री सुजीत पाटील, सातारा | शैक्षणीक संस्थेस कदत | |
| २१ | राहाता तालुका कुस्ती तालिम सेवा संस्था | कुस्ती स्पर्धा भरविणेसाठी | |
| २२ | निर्मिती अंध अपंग कल्याणकारी संस्था पुणे | अंध अपंग संस्थेस मदतीसाठी | |
| २३ | श्री नागेश्वर पार्श्वनाथ गोशाळा, बासंडा | गोशाळा मदत | |
| २४ | श्री मनोहर तुकाराम सोनुते, यवतमाळ | शेड तयार करुन मिळणेसाठी | |
| २५ | श्री संतोष काळे, औरंगाबाद | आर्थिक मदत | |
| २६ | श्री देवानंद विष्णू देसाई, कोल्हापूर | पुरग्रस्त मदत | |
| २७ | श्री निलकमल तिवारी, दिल्ली | आर्थिक मदत | |
| २८ | निवारा बालगृह, जामखेड | अनाथांना मदत | |
| २९ | श्री राजेश सिंग, करौली | अपंग मदत | |
| ३० | श्री कलगोंडा बाळगोंडा हिंगलजे को. पूर | शैक्षणीक मदत | |
| ३१ | श्री पाडेकर ज. काशिनाथ, कोपरगांव | मुलीच्या विवाहासाठी | |
| ३२ | कु. शितल संग्राम चाकुरे, लातूर | शैक्षणीक मदत | |
| ३३ | श्री महेशकुमार गनभाव, | शैक्षणीक मदत | |
| ३४ | सौ. वंदना मनोहर पाटील, शिरोळ | पुरग्रस्त मदत | |
| ३५ | श्री नंदकिशोर ना. घाटगे, सांगली | वैद्यकीय मदत | विधी व न्याय विभाग यांचे पत्र. |

दि.०१.१०.२०१९ ते ३१.१०.२०१९ कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | अनुदान मागणीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | माता वैष्णो देवी लोक सेवा ट्रस्ट, जम्मू | सामाजीक कार्यासाठी | |
| २ | श्री दादासाहेब कुशाबापू पवार, नाशिक | निळवंडे कालव्यासाठी | |
| ३ | श्री परिनाथ गौरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट नांदुरा | गोशाळासाठी | |
| ४ | Office Of The Principal Shirdi Sai Bidya Mandir Odisha | शाळेसाठी मदत | |
| ५ | ग्रामपंचायत कार्यालय निमगांव मढ | शाळेसाठी संगणक मदत | |
| ६ | श्री रविकांत | सौरशक्ती साठी | |
| ७ | श्री रविकांत | सौरशक्ती साठी | |
| ८ | श्री विवेक रामदासजी काळबोंडे, नागपूर | वैद्यकीय उपचारासाठी | |
| ९ | श्री पी.सी. रैकवार, भोपाल | कर्ज भरण्यासाठी | |
| १० | पैस प्रतिष्ठान नेवासा | शैक्षणीक सुविधा देणेसाठी | |
| ११ | क्षिरसागर नम्रता निळकंठ, दौंड | लॅपटॉप साठी | |
| १२ | सेवा भारत फौंडेशन, ओरिसा | शाळेसाठी मदत | |
| १३ | सेवा भारत फौंडेशन, ओरिसा | शाळेसाठी मदत | |
| १४ | गोदावरी उजवा कालवा नुतनीकरण समिती राहाता | कालवा नुतनीकरणासाठी | |
| १५ | जिल्हाधिकारी वाशिम | पुरनियंत्रण कामासाठी | |
| १६ | Bright Future Organization For The Blind, Mumbai | अंध मुलांच्या शैक्षणीक साहित्यासाठी | |

दि.०१.११.२०१९ ते ३१.१२.२०१९ कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालील प्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | अनुदान मागणीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती पन्नाबेन नरेशकुमार सोनी | उदरनिर्वाह चालविणेसाठी | |
| २ | खुशी शैक्षणीक व सामाजीक ट्रस्ट, मुंबई | कलामहोत्सवा साहित्यासाठी | |
| ३ | क्षितीज मतिमंद मुलांची शाळा, डोंबिवली | शैक्षणीक उपक्रमासाठी | |
| ४ | शेतकरी बचाव कल्याणकारी बहूउद्देशीय संस्था, यवतमाळ | लघु सिंचन प्रकल्पासाठी | |
| ५ | जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कैनाड खरपडपाडा, डहाणू | शाळेसाठी हॉल व कंपाऊंडसाठी | |
| ६ | महाराष्ट्र पशु व मत्स विज्ञान विद्यापीठ | पशुसंवर्धनासाठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | दि नॅशनल असोशिएन फॉर द ब्लाईंड | वृद्धाश्रमासाठी मदत | |
| ८ | अपंग एकता विकास सेवा संस्था, रत्नागिरी | अपंगासाठी मदत | |
| ९ | जिद्द अपंग सामाजिक संस्था, मुरबाड | अपंगासाठी मदत | |
| १० | श्री भास्करराव म्हस्के | क्रिकेट मैदानासाठी | |
| ११ | ओम श्री साईनाथ बाबा सेवा संस्थान, गोंदिया | मंदीर शेजारील तलावाचे सुशोभिकरणासाठी | |
| १२ | रामचंद्र प्रतिष्ठान | व्यसनमुक्ती, महिला सबलीकरण | |
| १३ | निशांत नामदेव | राम मंदीरासाठी | |
| १४ | Be The Change, Ahmedabad | Digital Learning | |
| १५ | Be The Change, Ahmedabad | Digital Learning | |
| १६ | श्री राहूल शर्मा | शैक्षणीक मदत | |
| १७ | श्री प्रदीप कोडींबा कांबळे, सातारा | कर्ज भरण्यासाठी | |
| १८ | श्री भास्करराव म्हस्के | क्रिकेट मैदानासाठी | |
| १९ | श्री भास्करराव म्हस्के | क्रिकेट मैदानासाठी | |
| २० | श्री व्ही. अरुणाचलम | मंदीरासाठी मदत | |
| २१ | श्री व्ही. अरुणाचलम | मंदीरासाठी मदत | |
| २२ | कु. प्रियंका पोपट सुतार, सातारा | शैक्षणीक मदत | |
| २३ | श्रीमती रेखा मुखर्जी | आईच्या वैद्यकीय उपचारासाठी | |
| २४ | श्री चिंतामणी पार्श्वनाथ अल्पसंख्याक बहूउद्देशीय विकास संस्था, मुर्तीजापूर | सामाजीक कार्यासाठी | |
| २५ | आदेश्वर वैदिक संस्कार विवाह सेवा समिती, इंदोर | आर्थिक दुर्बल घटकांसाठी | |
| २६ | मा. श्री सदाशिव लोखंडे,<br>लोकसभा सदस्य | पुरग्रस्तांना मदत | मा. श्री सदाशिव लोखंडे साहेब लोकसभा सदस्य शिर्डी यांचे पत्र |
| २७ | श्री करविरभद्रेश्वर देवस्थान ट्रस्ट | मंदीर बांधकाम | |
| २८ | श्री राहूल शर्मा, | शैक्षणीक मदत | |
| २९ | श्री दिनेश परमानंद पगारे, खरगोन | कर्ज भरण्यासाठी | |
| ३० | श्री मीर आबेद अली, औरंगाबाद | शैक्षणीक मदत | |
| ३१ | तक्षवी चॅरिटेबल ट्रस्ट, सांगली | कॅन्सरग्रस्तांसाठी मदत | |
| ३२ | साईबाबा सामाजिक संस्था, ठाणे | गोशाळा मदत | |
| ३३ | ग्रामपंचायत कानळद | घाट बांधण्यासाठी | |
| ३४ | श्री सुशील मधुकर शिंदे, उल्हासनगर | दंड रक्कम भरण्यासाठी | |
| ३५ | श्रद्धा सबुरी मित्र मंडळ, पेण | मंदीर बांधकाम | |
| ३६ | श्री प्रथमेश प्राणेश सोनदूर, पुणे | शैक्षणीक मदत | |
| ३७ | श्री रिहान आर. बागवान, औरंगाबाद | शैक्षणीक मदत | |
| ३८ | आधार बहूउद्देशीय सेवा मंडळ, पंढरपूर | सार्वजनिक विवाहसोहळा मदत | |
| ३९ | सेवा भारत फौंडेशन, ओरिसा | रुरल डेव्हलपमेंटसाठी | |
| ४० | भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सेवाभावी संस्था, शिर्डी | सामुदायीक विवाह सोहळा | |
| ४१ | सौ. शैला सुरेश कासार, संगमनेर | आर्थिक मदत | |
| ४२ | सौ. वर्पे सविता चांगदेव, शिर्डी | मुलाचे शिक्षणासाठी | |
| ४३ | श्री किसन दगडू मकासरे, नेवासा | चर्च बांधकामासाठी | |
| ४४ | श्री राजाराम साहू | इमारत बांधकामासाठी | |
| ४५ | सौ छाया सूहास झालटे, अमरावती | शैक्षणीक मदत | |
| ४६ | श्री सुरेश ए. गायकवाड, राहाता | वैद्यकीय मदत | |
| ४७ | श्री शिवराम आर. होके, बीड | शैक्षणीक मदत | |
| ४८ | ग्रामपंचायत कार्यालय चापडगांव | विकासासाठी | |
| ४९ | सेवा भारत फौंडेशन, ओरिसा | रुरल डेव्हलपमेंटसाठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | स्नेहालय सामाजिक विश्वस्त संस्था सोलापूर | शाळा इमारत बांधकाम | |
| ५१ | संतोष पंढरीनाथ खालकर, लोणी, राहाता | बॅंक कर्ज भरण्यासाठी | |

दि.०१.०१.२०२० ते ३१.०१.२०२० कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | अनुदान मागणीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | आंबवडे सैनिक विकास मंडळ, महाड | शाळा इमारत बांधकाम | |
| २ | चिंचवड बधिर मूक विद्यालय पुणे | विद्यालयासाठी मदत | |
| ३ | श्री साई शिक्षण संस्था कांचनवाडी | शाळा इमारत नुतनीकरणासाठी | |
| ४ | जय योगेश्वर भगवान सामाजिक व शैक्षणीक मंडळ विंचूरे ता. सटाणा | शाळा इमारत बांधकामासाठी | |
| ५ | श्री हितेंद्र बारिया | दैनंदीन गरजेसाठी | |
| ६ | आदिशक्ती गौरक्षण संस्था, अकोला | गोशाळा मदत | |
| ७ | श्री हरिहरनाथ बहूउद्देशीय सेवाभावी संस्था, हिंगणी | सामूहिक विवाह सोहळा | |
| ८ | श्री माद्विरशैव पट्टशाली कोष्टी समाज विकास मंडळ सोलापूर | पार्किंग बांधकाम | |
| ९ | सन्मति नर्सिंग होम ॲम्बुलन्स फंड, माढा | इमारत बांधकाम | |
| १० | श्री चैतन्य विश्वास कुलकर्णी, दाढ | ट्रेकिंग प्रशिक्षणासाठी | |
| ११ | श्री एस. नारायण आयप्पा | अन्नदानासाठी मदत | |
| १२ | लक्ष्मी दिव्यांग जन सेवा संस्थान | अनाथ असहाय्यांसाठी मदत | |
| १३ | श्री दिगंबर एस. गवळी, सोलापूर | मुलीचे लग्नासाठी मदत | |
| १४ | श्री साईनाथ सेवा मंडळ, सिंधुदुर्ग | मंदिराचे जिर्णोद्धारासाठी | |
| १५ | श्री सिद्धीविनायक मंदिर ट्रस्ट आवरे | मंदिराचे जिर्णोद्धारासाठी | |
| १६ | श्री शंकर नारायण आयप्पा | अन्नदानासाठी मदत | |
| १७ | श्री शंकर नारायण आयप्पा | अन्नदानासाठी मदत | |
| १८ | श्रीमती ममता महेंद्र भाटे, सांगली | उदर निर्वाहासाठी | |
| १९ | श्रीमती पूर्वा सिमा विकास प्रतिष्ठान | शाळेसाठी मदत | |
| २० | श्री अशोक सतीजा | आर्थिक मदत | |
| २१ | द ब्लाईन्ड हयुमॅनिटी वेलफेअर सेंटर | अंधासाठी मदत | |
| २२ | श्री प्रसाद साटलकर | रेल्वेसाठी मदत | |
| २३ | श्रीमती रेखा दिलीप मंजुळ गंगापुर | उपजिवीकेसाठी | |
| २४ | श्री अमित डी. घोंगडे, कलबुर्गी | वैद्यकीय शिक्षणासाठी | |
| २५ | राजर्षी श्री शाहू प्रतिष्ठान, पुणे | शाळेसाठी मदत | |
| २६ | श्रीमती बसंतीबाई लक्ष्मीनारायण चांडक रिसर्च फौंडेशन ट्रस्ट, अकोला | डायलेसिस मशीनसाठी | |
| २७ | दाजी प्रतिष्ठान सोलापूर | संगणक साहित्यासाठी | |
| २८ | गुजरात असोशिएशन ऑफ द डेफ | बहि-यांसाठी मदत | |
| २९ | ग्रामपंचायत लाडेगांव, वाळवा | जलसंधारणासाठी | |
| ३० | सेलको सोलर लाईट प्रा. लि. बंगलोर | सोलर पॉवर प्रकल्प | |
| ३१ | द बेने इसरेल कॉन्फरन्स एज्युकेशन फंड | शिष्यवृत्तीसाठी मदत | |
| ३२ | मेवात क्षेत्र गौशाला समिती, हरियाणा | गोशाळा मदत | |
| ३३ | श्री चैतन्य विश्वास कुलकर्णी | शिखर चढण्यासाठी | आ. श्री राधाकृष्ण विखे पाटील,विधानसभा सदस्य, शिर्डी |
| ३४ | राष्ट्रीय स्वच्छ गंगा मिशन | स्वच्छ गंगा मिशनसाठी | |
| ३५ | श्री सतिष गोपाळ पाटील, | अपंग नातीच्या खुर्चीसाठी | |
| ३६ | श्री भगवान रामकृष्ण कोंढरे, निफाड | आर्थिक मदत | |
| ३७ | करवीर हायकर्स कोल्हापूर | शिखर चढण्यासाठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | श्रीमत सुंदरामुर्ती एज्युकेशन ट्रस्ट | सामाजिक कार्यासाठी | |
| ३९ | जनसेवा केंद्र, चन्दौसी यु. पी. | शाळा इमारतीसाठी | |
| ४० | श्री अथर्व धनंजय मोरे, नाशिक | शिक्षणासाठी मदत | |
| ४१ | मुक्ती श्रद्धांजली कल्याणकारी सेवा संस्था, नागपूर | शववाहिकासाठी | |
| ४२ | श्रीमती पुर्वा सिमा विकास | शाळेसाठी मदत | |
| ४३ | ब्राईट फ्युचर ऑर्गनाइजेशन फॉर ब्लाइन्ड | अंधासाठी मदत | |
| ४४ | श्री साईदत्त गोशाळा पांजरापोळ संस्था, नाशिक | गोशाळा मदत | |

दि.०१.०२.२०२० ते २१.०२.२०२० कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | अनुदान मागणीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती मुक्ताबाई कांतीलाल इंगवले, कर्जत | कॅन्सरग्रस्त कुटुंबास मदत | |
| २ | श्री हर्षवर्धन एस. कालेलकर, सिंधूदुर्ग | घर बांधण्यासाठी | |
| ३ | नित्यसेवा हॉस्पीटल | इमारत बांधकामसाठी | |
| ४ | दि नॅशनल असोशिएन फॉर द ब्लाईंड, नाशिक | वस्तीगृह, वृद्धाश्रमासाठी | |
| ५ | श्री सुधीर कुमार, चन्दौसी | शाळा इमारत बांधकामासाठी | |
| ६ | श्री नितीन चौधरी | धंदाउभारणीसाठी | |
| ७ | श्री भुजंगराव देशमुख | आर्थिक मदत | |
| ८ | साईबाबा सामाजिक संस्था, अकोला | गोशाळा व वृद्धाश्रमासाठी | |
| ९ | श्री सुधीर भीम सिंग, रेवाडी | कोर्टकामासाठी | |
| १० | ग्रामपंचायत कार्यालय जामगांव | जलसंधारण कामासाठी | |
| ११ | आखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद | शाळा इमारत बांधकामासाठी | |
| १२ | जिवनज्योती एड्स प्रतिबंध व प्रबोधन संस्था, पुसद | एड्स बाधीतांसाठी मदत | |
| १३ | Earth Saviours Foundation | जेष्ठ नागरिकांसाठी मदत | |
| १४ | शांतीलालजी जवाहरमलजी पाटणी विद्यालय, श्रीरामपूर | विद्यालय भौतीक सुविधांसाठी | |
| १५ | माऊली मेडिकल रिसर्च फाउंडेशन संचलित युनिक दिव्यांग निवासी कार्यशाळ, राहाता | कार्यशाळेसाठी साहीत्य व मशनरीज् साठी | |
| १६ | श्री भगवान रामकृष्ण कोंढरे, निफाड | साई पालखीत मृत्यु झालेल्या मुलाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत | |
| १७ | सर्वोदय बहूउद्देशीय सेवाभावी संस्था कोल्हापूर | शाळा बांधकामासाठी | |
| १८ | श्री जयंत बालाजी साखरे, कल्याण | घरगुती उद्योग उभारणीसाठी | |
| १९ | श्री हूकुम माणिक कदम, पंढरपूर | घरबांधणीसाठी | |
| २० | Earth Saviours Foundation | जेष्ठ नागरिकांसाठी मदत | |
| २१ | शिर्डी साई मिशन | मंदीरबांधकामासाठी | |
| २२ | श्री सेल्व बालाबाकीया शिर्डी साईबाबा चॅरिटेबल ट्रस्ट | मंदीरबांधकामासाठी | |
| २३ | निवासी मुक बधीर विद्यालय, विटा | वस्तीगृह इमारत बांधकामासाठी | |
| २४ | श्री हनसेल डी. गोडिनहो, मुंबई | कर्ज भरण्यासाठी | |
| २५ | श्री संत गजानन महाराज बहूउद्देशीय संस्था धोत्रा, वाशिम | इमारत बांधकामासाठी | |
| २६ | श्री विवेक विकास सरपोतदार, पुणे | घर दुरूस्तीसाठी मदत | |
| २७ | राजश्री श्री शाहू प्रतिष्ठान, चाकण | इंग्लीश मिडीयमसाठी मदत | मा. श्री दिलीप वळसे पाटील, मंत्री कामगार, राज्य उत्पादन शुल्क |
| २८ | लोकसेवा संघ गणेशवाडी, कोल्हापूर | वाचनालयासाठी मदत | मा. श्री राजेंद्र यड्रावकर, राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध |

विभागाचा अभिप्राय :-

१) वैयक्तीक आर्थिक मदत देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतूद नाही.

२) आर्थिक मदत मागणीकरीता दिलेल्या अर्जाबाबतची सद्यस्थितीची अर्जदार विचारणा करीत असतात. त्याबाबत संबंधितांना त्यांच्या "अर्जाबाबतची सद्यस्थिती कळविणेबाबतच्या विषयावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र.७६६ अर्जदारास अर्जाची सद्यस्थिती कळविण्याची आवश्यकता नाही" असे ठरले आहे. "

३) अधिनियम २००४ मध्ये ज्या बाबीसाठी अनुदानची स्पष्ट तरतूद आहे संस्थानने त्यासाठी योजना तयार केलेली आहे व अर्ज मागविले आहेत त्याच अर्जाचा अनुदान देतांना विचार व्हावा असे नम्र मत आहे.

प्रस्ताव:- दि.०१.०९.२०१९ ते २१.०२.२०२० या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीबाबत आलेले अर्ज अवलोकनार्थ व नस्तीबंद करण्याचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१.०९.२०१९ ते २१.०२.२०२० या कालावधीत आलेले आर्थिक अनुदान मागणी अर्ज नस्तीबध्द करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३**

**निर्णय क्र.१६३** मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०६.०२.२०२० रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१ नुसार श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपुर यांना ऐतिहासिक वस्तु, शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी वापरास दिलेल्या संस्थान मालकीची मौजे निमगाव-को-हाळे, ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील जागा वापरास देणेबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

निर्णय क्र.८७- यावर सविस्तर चर्चा झाली, प्रस्तुत प्रकरणी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१० अन्वये श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात यावे, तसेच सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यिक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा, असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाबाबत श्री.शिंदे यांना दि.२६.१२.२०१९ रोजी पत्र देण्यात आले होते. यावर श्री.शिंदे यांनी दि.२५.०१.२०२० रोजीचे पत्रान्वये मा.तदर्थ (Ad-hoc) समिती जो निर्णय घेईल तो मान्य असेल असे कळविले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरहु जागेबाबत दि.२२.०१.२०२० रोजी दिलेल्या मासिक भाडेदराचे प्रमाणपत्रानुसार रक्कम रु.८८,०२२/- इतके दर निश्चीत केले आहे. मालमत्ता विभागाचे प्रशासकिय अधिकारी श्री.किसवे यांनी समितीचे असे निदर्शनास आणून दिले की, सदरची जागा श्रींचे मंदिरापासून १ कि.मी.अतंरावर श्री साई प्रसादालयाचे इमारतीमध्ये आहे, व सद्यस्थितीत सदरहु जागेचा बाजाराभावाप्रमाणे वाणिज्यीक वापराचा दर रु.१ लाख पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.

अशा सर्व परिस्थीतीत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१० याव्दारे रद्द करण्यात येत आहे, व श्री.शिंदे यांना मान्य असल्यास दि.०१ मार्च, २०२० पासून पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजे दि.३१ जानेवारी,२०२१ पर्यंत दरमहा रक्कम रु.१,००,०००/-मात्र परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या अटीवर सदरची जागा वापरास देत असल्याचे व याबाबत आपली अनुमती दि.१५ फेब्रुवारी,२०२० चे आत कळवावी असे श्री.शिंदे यांना कळविण्यात यावे. श्री.शिंदे यांची संमती असल्यास पुढील कार्यवाही करण्यात यावी. तसेच श्री.शिंदे यांची संमती न आल्यास दि.२९ फेब्रुवारी,२०२० पर्यंत सदरची जागा खाली करुन घेण्यात यावी, असे ठरले.

**उपरोक्त निर्णयावर आजचे सभेमध्ये चर्चा होऊन, याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.**

**प्रस्तुत प्रकरणी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१० अन्वये श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात यावे, तसेच सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यिक वापरासाठीचा बाजारातील**

**दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा, असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाबाबत श्री.शिंदे यांना दि.२६.१२.२०१९ रोजी पत्र देण्यात आले होते. यावर श्री.शिंदे यांनी दि.२५.०१.२०२० रोजीचे पत्रान्वये मा.तदर्थ (Ad-hoc) समिती जो निर्णय घेईल तो मान्य असेल असे कळविले आहे.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरहु जागेबाबत दि.२२.०१.२०२० रोजी दिलेल्या मासिक भाडेदराचे प्रमाणपत्रानुसार रक्कम रु.८८,०२२/- इतके दर निश्चीत केले आहे. मालमत्ता विभागाचे प्रशासकिय अधिकारी श्री.किसवे यांनी समितीचे असे निदर्शनास आणून दिले की, सदरची जागा श्रींचे मंदिरापासून १ कि.मी.अतंरावर श्री साई प्रसादालयाचे इमारतीमध्ये आहे, व सद्यस्थितीत सदरहु जागेचा बाजाराभावाप्रमाणे वाणिज्यीक वापराचा दर रु.१ लाख पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.**

**अशा सर्व परिस्थीतीत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१० नुसार श्री.शिंदे यांना वापरास दिलेल्या संस्थान मालकीच्या उपरोक्त मिळकतीचे दि.०१.११.२०१९ ते ३१.०३.२०२० या कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.६०,५००/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारणेत येऊन सदर कालावधीसाठीचा पुर्वीप्रमाणे लिव्ह ॲन्ड लायसन्स करारनामा श्री.शिंदे यांचेकडून करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच श्री.शिंदे यांना मान्य असल्यास दि.०१ एप्रिल,२०२० पासून पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.२८ फेब्रुवारी,२०२१ पर्यंत दरमहा रक्कम रु.१,००,०००/-मात्र परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या अटीवर सदरची जागा वापरास देत असल्याचे व याबाबत आपली अनुमती दि.१५ मार्च,२०२० चे आत कळवावी असे श्री.शिंदे यांना कळविण्यात यावे. श्री.शिंदे यांची संमती असल्यास पुढील कार्यवाही करण्यात यावी. तसेच श्री.शिंदे यांची संमती न आल्यास दि.३१ मार्च,२०२० पर्यंत सदरची जागा खाली करुन घेण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

वरील निर्णय क्र.१०१ ते १६३ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायं.०६.४५ वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

**स्वाक्षरीत/-**
**(श्रीमती गिता पी.बनकर)**
**सहा.धर्मादाय आयुक्त,**
**अहमदनगर.**

**स्वाक्षरीत/-**
**(दिलीप स्वामी)**
**अप्पर महसुल विभागीय आयुक्त,**
**नाशिक**

**स्वाक्षरीत/-**
**(अरुण डोंगरे,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

**स्वाक्षरीत/-**
**(श्रीकांत एल.आणेकर)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,**
**अहमदनगर.**